३९९८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू प्रवास
सं. क्र. ४१६



# जपान.

प्रबोधनकार ठाकरे

REFBK-0017211


जगाचा परिचय : : : ४


# जपान

प्रा. दि. ह. लिमये

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २

पाच रुपये




जपान

# जपान

•

ऽमये

REFBK-0017211

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ५५६८८ दि:
२९।३।६७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
पाच रुपये १९७०

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २

प्रकाशक
अशोक महादेव जोशी
ज्ञानराज प्रकाशन
४२१, शनिवार पेठ, पुणे २

●

मुखपृष्ठ व अंतर्गत सजावट
सुधाकर खासगीवाले

●

ठसे
ब. शं. दाते, कलाभुवन, पुणे २

●

सर्व हक्क लेखकाधीन

●

प्रकाशन
डिसेंबर १९६८

●

मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा.) लिमिटेड
४०५ नारायण पेठ, पुणे २

●

या पुस्तकात नोव्हेंबर १९६८ पर्यंतच्या चालू घडामोडींची माहिती दिली आहे.

●

या पुस्तकात महामंडळाचे शुद्धलेखन स्वीकारले आहे.

●

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचना :–** खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.


JAN 1976

[ क्र. मा. प. ]


# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ ) | प्रास्ताविक | १ |
| २ ) | स्वाभाविक माहिती | ८ |
| ३ ) | जपानी लोक | १८ |
| ४ ) | पूर्वेतिहास | ३४ |
| ५ ) | शेती व इतर उद्योग | ६३ |
| ६ ) | संरक्षण | ९५ |
| ७ ) | राज्यकारभार | ८६ |
| ८ ) | दळणवळण | १०६ |
| ९ ) | अर्थव्यवस्था | ११३ |
| १०) | महत्त्वाची शहरे | ११८ |
| ११) | महत्त्वाच्या व्यक्ती | १२७ |

# चित्रमय जपान







( १ ) जपानी वधू उत्कृष्ट पोषाख करून मिरवत आहे.

( २ ) केशभूषा

( ३ ) पंखा व छत्री ह्या स्त्रियांना हवीच !

( ४ ) पोराला पाठीवर बांधून जपानी कोठेही हिंडेल. खांद्यावर मुलाला घेण्यापेक्षा त्याला पाठीवर बांधणे हीच इकडील पद्धत.

( ५ ) एक खेडुत जपानी स्त्री. लांब बोटे व गोल वाटोळा चेहरा हे वैशिष्ट्य.



( १ ) **ऐनू** - खुजी मान आणि लांब हात पाय असलेली जमात. ऐनू चालताना पाय फाकून चालतात.

( २ ) जपानी बौद्धधर्मगुरु

( ३ ) पर्वतावरील वाटाडे व शिकारी. हा एक स्वतंत्र धंदा आहे. शरीराने बळकट व पर्वतावर कोठेही जाण्याची तयारी अशी ही शूर जमात आहे.

( ४ ) नवव्या शतकामध्ये चीनमधून चहाने जपानमध्ये प्रवेश केला. धर्मगुरूंनी चहाला महत्त्व दिले व धार्मिक कार्याशी त्याचा संबंध जोडला गेला.

( ५ ) शिन्तो म्हणजे पूर्वजांची पूजा. हा धर्म बौद्ध धर्माच्या आधीपासून येथे आहे. हा धर्मगुरू अगदी साधा आहे. पाठीवर धार्मिक साहित्याची पेटी आहे. धर्मातील काही अद्‌भुत गोष्टी हा लोकांना सांगत हिंडत असतो.

( ६ ) गवताची टोपी घातलेला शेतकरी मुलगा.

( ७ ) बौद्ध धर्मगुरू. पाठीवर एक धार्मिक वस्तु घेऊन जात आहे. लोकांनी दिलेल्या भेटी त्यावर बांधल्या आहेत. पुढे एक टोपली आहे. त्यात खेडुत धार्मिक कार्यासाठी पैसे किंवा धान्य टाकतात. ह्या धर्मगुरूबरोबर त्याची बायको व मुलगीही जात आहे. सहकुटुंब जाणारे हे धर्मगुरू खेडोपाडी दिसतात.



(१) शिन्तो म्हणजे पूर्वजांची पूजा. त्यासाठी जपानमध्ये मोठा उत्सव असतो. सजविलेले मेणे व डोलारे देवांना अर्पण करण्यासाठी देहोप होऊन ही मंडळी गावातून जात असतात. नंतर त्यांचे विसर्जन करतात.

(२) ही लहान मुले मिरवणुकीत भाग घेण्यासाठी खास जपानी वेशभूषा करून तयार आहेत. "हिना–मात्सुरी" म्हणजे बाहुल्यांचा सण. हा ३ मार्चला असतो. खास समारंभासाठी तयार केलेल्या बाहुल्या आणतात. कमीत कमी पंधरा बाहुल्या असतात. त्यात दायिरी व मामा म्हणजे राजपुत्र व राजकन्या ह्या मुख्य असतात. अतिशय शोभिवंत व कलाकुसरीने केलेल्या बाहुल्या पाहून मोठी माणसेही ह्या सणाचेवेळी रंगून जातात.

(३) भले मोठे व चित्रविचित्र दिसणारे पतंग उडविणे ही एक येथील प्रथा आहे. ओशोगात्सू म्हणजे नूतन वर्षारंभ दिनी सगळेच आनंदाने ह्यात भाग घेतात.

(४) प्रतिवर्षी ५ मेला मुलांचा सण असतो. घरापुढे गुढीप्रमाणे हे कागदाचे मासे टांगलेले असतात. धैर्य व खंबीर मन ह्यांचे हे प्रतिक आहे.

(५) बाहुल्यांच्या सणातील बाहुली.

(६) प्रतिवर्षी ७ जुलैला रात्री ताऱ्यांचा एक सण असतो त्यावेळी सुंदर काव्य लिहिलेले नक्षीचे कागद घराच्या सज्जात टांगून ठेवण्याची प्रथा आहे. शोकुजो व केन्ग्यू ह्या ताऱ्यांची ती पूजा असते. शोकुजो सूत कातणारी आदर्श मुलगी! हस्तकला व संस्कृतीची जागृती कायम राहण्यासाठी हिची पूजा असते.



( १ ) **कारेत**–हा एक मारामारीचा प्रकार आहे. पाय उंच झाडणे किंवा छलांग मारणे हे कारेतचे वैशिष्टच. हा मूळ चिनी प्रकार. कारेत म्हणजे हातात काही हत्यार न घेता हाणामारी करणे. पायाने, हाताच्या मुठीने प्रतिस्पर्ध्याला चीत करणे म्हणजे कारेत पद्धतीची मारामारी.

( २ ) तिरंदाजी हा जपानमधील एक जुना व महत्त्वाचा खेळ आहे. ह्या स्पर्धा गावोगाव होतात. घोड्यावरून बरोबर लक्ष्य वेधणे ही तिरंदाजीतील फार मोठी करामत समजली जाते. त्याला चाबुसामे म्हणतात. त्या वेळी तिरंदाज जुन्या सामुराई पद्धतीची रंगीबेरंगी वस्त्रे परिधान करतो.

( ३ ) शेतकरी हौसेने बैलांच्या झुंजी लढवितात. बैलांना सांभाळणारे अशा तऱ्हेने दोर हलवितात व बैलांना लढवितात की प्रेक्षकांना ती झुंज फारच भयंकर वाटते पण दक्षताही अशी घेतली जाते की कोणाला इजा होत नाही.

( ४ ) जूडो किंवा शुमो हा कुस्तीचा खास जपानी प्रकार. कमरेला भलत्याच जाडजूड लंगोटाची विशिष्ट प्रकारची गाठ व चांगले घेरदार पोट पैलवानाचा दर्जा दाखविते.

( ५ ) शिडीवर तोल सांभाळण्याची ह्याची कला काही औरच आहे ! असे कसरतीचे प्रयोग हे सणासुदींना असणाऱ्या जत्रेतून पहावयास सापडतात.



(१) वसन्त ऋतूची चाहूल म्हणजे फेरीवाल्यांजवळ दिसणारे हे सोनेरी मासे !

(२) **कागो** – पूर्वीच्या जमान्यात जपानमधील उच्चभ्रू लोक नेहमीच अशा मेण्यातून प्रवास करीत. हल्ली मात्र हे मेणे काही विशिष्ट भागाखेरीज कुठे दिसत नाही.

(३) मोती तयार करणारे काल्व असलेले शिपले ह्या बायका गोळा करतात. त्या शिपल्यातील कालवांवर विशिष्ट क्रिया करून ते परत समुद्रात सोडून देतात. ह्या क्रियेसाठी ३ ते ४ वर्षांचे कालव उत्तम समजले जातात.

(४) **वेतकाम**–जपानमध्ये आणि जगातही सर्वत्र प्रसिद्ध असलेले हे जपानी वेतकाम. नाजूक पण घट्ट बांबूच्या धाग्यापासून केलेल्या त्या वस्तू नुसत्याच शोभेच्या म्हणून लोकप्रिय नाहीत तर रोजच्या वापरासाठीही टिकाऊ असतात.


(५) **शिप्पो** – मातीची, कलाकुसर केलेली मोठी भांडी. हे महिनो-नमहिने वेळ खाणारे अतिशय कष्टाचं काम ! त्याचं नक्षीकाम आणि पॉलिश करण्याचं काम तर कित्येकवेळा वर्षानुवर्षे चालते. जेवढी जास्त चकाकी आणि नक्षीकाम तेवढीच किंमतही अधिक.


(६) **जपानी छत्र्या**— तेलकट कागदापासून तयार केलेल्या त्या छोट्या शोभेच्या छत्र्या पावसातही उपयोगी येतात. हा विशिष्ट जपानी कागद आकाशकंदील आणि इतर शोभेच्या वस्तूंसाठीही वापरला जातो. तसेच पंखे तयार करणे हाही एक महत्त्वाचा धंदा आहे.

(७) **रेशमी भरतकाम**— सर्व कुटुंबच्या कुटुंब ह्या भरतकामात पारंगत असते. आईकडून मुलीला आणि वडिलांकडून मुलाला ही कला वंशपरंपरेने मिळत रहाते. वाद्या सरसावून अतिजलद रीतीने हे कारागीर आपले काम करीत असतात.


১


২


৩


৪


৫


৬

(१) घराच्या अगणात नववर्षाच्या शुभेच्छा एकमेकांना जपानी पद्धतीनं अतिशय मृदुपणाने व्यक्त केल्या जातात.

(२) **धूर ओकणारा पर्वत**– एकेकाळी जागृत ज्वालामुखी असलेले हे लहानसे बेट १९१४ साली पूर्वेकडून भूभागाशी जोडले गेले. लाव्हा रसाने चिंचोळ्या खाडीत खडक निर्माण झाल्याने एक द्वीपकल्प तयार झाले.

(३) **पवित्र प्रवेशद्वार—** फूजीयामाला जाणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर ही अतिभव्य प्रवेशद्वारे (तोरी) उभी आहेत. ही तोरी जपानभर सर्वत्र सापडतात. ओमीया हे महत्त्वाचे आणि फार प्राचीन दार. जपानच्या सर्वांत पवित्र मानल्या जाणाऱ्या फूजीच्या शिखराकडे जाणारे अनेक यात्रेकरू ह्याच दारातून आत शिरून आपले पवित्र पर्वतारोहण सुरू करतात.

(४) **काशुगा स्तूप—** हा इ. स. ७६८ मध्ये बांधला गेला. २०४० जुन्या मौल्यवान रत्नांनी आणि १००० ब्राँझच्या दिव्यांनी सजविलेला हा स्तूप वर्षातून दोनदाच उजळला जातो. तांबूस रंगावर असलेला हा स्तूप तेव्हा खरोखरच अतिशय सुंदर दिसतो.

(५) **ओजी**– एका खेड्यातील संथ वहाणाऱ्या झऱ्यावरचा हा वर्तुळाकार पूल. टोकियोपासून जवळच असल्याने शहरातील लोक फेरफटक्यासाठी इथं सहज येऊ शकतात. जवळपास कागदाच्या आणि कापडाच्या गिरण्या झाल्या असल्या तरी वसंतातल्या चेरींचा सुगंधी बहार आणि हिवाळ्याआधी विविधरंगी पानांमुळे विलक्षण सुंदर दिसणारी मॅपेलची झाडे शहरवासियांना मोहवतात.

(६) **भूकंप स्मारक**– १९२३ च्या भयानक भूकंपात दैवयोगाने वाचलेला हा मनोरा त्या भूकंपाचे स्मारक झाले आहे. तोक्यो आणि योकोहामाच्या परिसरात झालेल्या भूकंपात आणि लागलेल्या आगीत १ लाखांवर लोकांना आपले प्राण गमवावे लागले.




૧



૨



૩



૪



૭



૬



૫

(१) **बोन्साई (खुजी झाडे)**–वर्षानुवर्षे जतन केलेल्या आणि मुद्दाम लहान ठेवलेल्या झाडांचा हा जपानी वैशिष्टयपूर्ण शोभेच्या वस्तूंचा प्रकार. कोणत्याही तऱ्हेची झाडे अतिशय कौशल्याने लहान ठेवली जातात. कित्येक झाडे तर ५०० वर्षांपेक्षांही जुनी आहेत.

(२) **बोंकीई**– ही एक आणखी वेगळी कला आणि कल्पना ! चिनीमातीच्या पसरट भांड्यात वाळू व दगडांच्या साहाय्याने एखाद्या निसर्गचित्राची छोटीशी प्रतिकृतीच दिवाणखाना सुशोभित करायला ठेवली जाते.

(३) **बेप्पूचा राक्षस**– उकळत्या झऱ्यांच्या परिसराला शोभेशी राक्षस मूर्ती बेप्पूमध्ये आहे. खनिज मिश्रित ऊष्ण पाण्याचा उपचार संधिवाताच्या रोग्यांना होतो. बेप्पूचा सारा परिसर वाफा आणि उकळत्या पाण्याच्या झऱ्यांनी भरून गेला आहे. सुसरी मगरींसारखे प्राणी इथल्या गरम हवेमुळे अतिशय लवकर वाढतात.

(४) **मितो–इवा**–जपानी पौराणिक कथेतील जोडपे. यांना जपानचे निर्माते समजतात. फुतामी–गा–उरा येथील हे दोन खडक हे या जोडप्याचे प्रतीक आहेत.

(५) ही दयेच्या देवतेची मूर्ति तोक्यो– ओसाका रस्त्यावर ओफूना स्टेशनजवळच्या एका टेकडीवर आहे. १४ वर्षे ह्या मूर्तीचं काम चालले आहे.

(६) अतिभव्य बुद्धमूर्ती

(७) वाईट पाहू नका, बोलू नका आणि सांगू नका हे सांगणारी माकडे निक्कोच्या दरवाजावर कोरलेली आहेत. १७ व्या शतकातल्या लाकूड कारागिरांनी ह्या मूर्ती लोकप्रिय केल्या. तोक्योच्या उत्तरेकडे असलेल्या ह्या मूर्तींचा प्रसार प्रथम चीन आणि नंतर साऱ्या जगभर झाला. पण ह्या मूर्तींमधील जिवंतपणा काही औरच आहे.



(१) **गिफू**–मासे पकडण्याची और रीत. पाठीवर मशाल बांधून रात्रीच्या वेळी मासे पकडतात.

(२) **चा–नो–यू**– चहापानाचा कार्यक्रम.

(३) बुद्धाचा. जगातील सर्वात मोठा ब्रांझचा पुतळा–हा ५३ फूट उंच आणि ५०० टनी वजनाचा आहे. इ. स. ७५२ मध्ये हा प्रथम तयार केला. मूर्तीचे शिर मात्र नंतर तयार केलेले आहे.

(४) १४ फूट लांब पिसे असलेले हे कोंबडे जमिनीवरूनही कसेबसे चालतात. जपानी अधिकारी पूर्वी त्या ओंगोदारी कोंबडयाची पिसे मोठ्या अभिमानाने घालत असत. आणि लढवय्ये ही पिसे आपल्या भाल्याच्या टोकाला लावत असत. अजूनही काही शौकिन हे पक्षी पाळतात. त्यांच्या लांब पिसांमुळे त्यांना मुद्दाम उंच चिंचोळ्या पिजऱ्यात ठेवावे लागते किंवा मग त्यांची पिसं गुंडाळून ठेवतात. जास्तीत जास्त २४ फूट लांबीची पिसे आतापर्यंत मिळाली आहेत.

(५) **कळसूत्री बाहुल्या**–जवळ जवळ माणसाच्या उंचीच्या त्या बाहुल्या तयार करण्याची कला एकेकाळी जपानमध्ये अतिशय लोकप्रिय होती. हल्ली मात्र ओसाका हे शहरच त्यासाठी विशेष प्रसिद्ध आहे. माणसे ह्या जिवंत वाटणाऱ्या बाहुल्या रंगमंचावर हातात घेऊन नाचवतात. बाहुलीचे हात, पाय, डोळे, भुवया इतकंच काय पण हातापायांची बोटेही इतकी छान हालचाल करतात की ह्या बाहुल्या मुळी बाहुल्या वाटतच नाहीत.

(६) पुष्परचना हा जपानी मुलांच्या विशेषत: मुलींच्या शिक्षणातील मोठाच भाग आहे. थोडक्याच गोष्टीतून आपली धार्मिक सौंदर्यदृष्टी ते सहज दाखवून जातील. फुलदाणीतील प्रत्येक पान नि फूल स्वत:च्या चोखंदळ दृष्टीला पसंत पडल्याखेरीज कोणताच जपानी माणूस पुष्परचना हातावेगळी करणार नाही. मग त्याला कितीही का वेळ लागेना ! जपानी घराचे सौंदर्य वाढविण्यात ह्या पुष्परचनेचा मोठाच हात आहे. अगदी साध्या गोष्टीत कलात्मक सौंदर्य निर्माण केले जाते.



(१) भटक्या वादक.

(२) टोपीवजा मुखवटा. सबंध तोंड झाकून टाकणारी ही टोपी घालून नाच किंवा काम करताना कुणी आपल्याला ओळखेल ही भीती नसते.

(३) अटीतटीची वाद्य जुगलबंदी खेळणारे हे भटके वादक. ह्या वाद्याच्या चमत्कारिक पण विलक्षण सुंदर आवाजाची बरोबरी करणारं दुसरं वाद्य मिळणं कठीण! भटक्या वृत्तीचा बेफिकीरपणा पण तितकीच धमक असलेली ही मुलगी आपलं गेकिन घेऊन निघाली आहे.


(४) **ओ शिमा आंकी–** जुन्या पद्धतीच्या पोषाखात डोक्यावर पाण्याचे घडे घेऊन जाणाऱ्या या बायका तोक्योपासून थोड्याच अंतरावर असलेल्या एका बेटावर पहायला मिळतात. तोक्यो जवळ असूनही खेड्यातील सारी वैशिष्ट्ये इथे आवर्जून जपली आहेत.

(५) **थादो चोकेसा–** बेटावरची समूहगीते आणि लोकनृत्ये ही जपानभर लोकप्रिय आहेत. त्याचे साधे सोपे परंतु तालबद्ध सूर भुरळ पाडणारे असतात.

(६) किरीशिनाजिगु स्तुपातील वार्षिक समारंभातील एक नर्तक.

(७) कसलेले गेकिनवादक आणि सनीसन वादक. जपानी संगीत मूळ चीनमधून आले. ही आयात जवळजवळ १४ शे वर्षापूर्वीच झाली. त्यामुळे इथली मूळ वाद्येही ह्या वाद्यांशी जुळती आहेत.

७५५८८
४९६
29/3/67



# प्रास्ताविक

दिनांक ५ सप्टेंबर , १९०५ या दिवशी पाश्चिमात्य देशांच्या सर्व राजधान्यांतील दूरध्वनीवर संदेश पोचविला गेला, की रूसो-जपानी युद्धाचा शेवट मुकडेनच्या पाडावानंतर रशियन सैन्याच्या शरणागतीने झाला. रशिया व जपान या दोन देशांत इंग्लंड वगैरे राष्ट्रांच्या मध्यस्थीने तह झाला. जपानसारखे एक लहानसे पौर्वात्य राष्ट्र फक्त ३०–४० वर्षांच्याच तयारीने युरोपातील नामांकित व एका उत्तम प्रतीच्या रशियन सैन्याचा धुव्वा उडविते, ही एकच गोष्ट पाश्चात्य देशांना जबरदस्त धक्का देणारी होती. त्याचप्रमाणे या रूसो-जपानी युद्धाने आशियातील अनेक परतंत्र देशांना आपले गमावलेले स्वातंत्र्य पुन्हा हस्तगत करण्यास व नवीन जोमआणि हुरूप आणून देण्यास संधी मिळाली.

इ. स. १८६० च्या सुमारास प्रथम अमेरिकेने व नंतर युरोपातील इतर लहान-मोठ्या राष्ट्रांनी चीनप्रमाणे जपानवर स्वारी करून प्रत्येक वेळी जपानी लोकांना मानहानीकारक अटी कबूल करण्यास भाग पाडले. चीन व जपान

यांच्यात झालेल्या युद्धात जपानने चीनचा पराभव केला व चीनकडून क्वांगटुंग द्वीपकल्प, मांचूरिया व कोरिया हे चीनचे पूर्वेकडील भाग जपानला देण्यास चीनला भाग पाडले. तरीही केवळ रशियाच्या हट्टाखातर इंग्लंड व अमेरिका या दोन राष्ट्रांनी जपानला तंबी देऊन कोरिया व मांचूरिया हे दोन्ही प्रदेश चीनला परत देण्यास भाग पाडले. जवळ जवळ १०-१२ वर्षांनंतर या अपमानाचा वचपा जपानने रशियाकडून तर सव्याज काढलाच; परंतु त्याचबरोबर इंग्लंड व अमेरिका या दोन्ही पुढारलेल्या देशांना जपान ही एक आशियातील पूर्वेकडील नवीन शक्ती आहे व तिला डावलून यापुढे आशिया खंडात वाटेल तसा धुडगूस घालता येणार नाही हेही एक कटू सत्य पटवून दिले.

अमेरिका व इतर युरोपियन देशांचे जपानवरील गेल्या शतकातील आक्रमण व त्यानंतर त्यांनी जपानी लोकांवर लादलेले सक्तीचे निर्बंध, हे सही सही चीनवर लादलेल्या मानहानीकारक निर्बंधासारखेच होते. चिनी लोकांना पाश्चिमात्यांची मुस्कटदाबी व कुरघोडी झुगारून देण्यास जवळजवळ एक शतकाचा काळ लागला. परंतु त्या वेळच्या जपानी नेत्यांनी अत्यंत मुत्सद्देगिरीने आंतर-राष्ट्रीय राजकारणातील निनिराळ्या राष्ट्रांचे एकमेकांविषयींचे हेवेदावे बरोबर टिपून, आस्ते आस्ते आपल्या देशाची जी सर्वांगीण प्रगती घडवून आणली, तो सारा इतिहास म्हणजे आज भारतासारख्या नवस्वतंत्र व अनेक समस्यांनी गांजलेल्या देशांना गिरवण्यासारखा एक धडा आहे. आपले बलाबल, दुसऱ्या देशांचे बलाबल, व त्याचबरोबर इतर राष्ट्रांच्या आपआपसांतील द्वेष्यादाव्यांचा, आपल्या राष्ट्राला कसा व कितपत उपयोग होईल, याविषयीची दूरदृष्टी सुदैवाने त्या वेळच्या जपानी नेत्यांमध्ये होती. अशा जपानबद्दल आपल्याला या पुढील प्रकरणातून माहिती करून घ्यावयाची आहे.

आशिया खंडाच्या अग्निपूर्वेकडे चीनच्या किनाऱ्यापासून सुमारे ७००-८०० मैल ईशान्येला आशियाच्या पूर्व किनाऱ्याला समांतर असा जो एक द्वीपसमूह आहे, तोच जपान हा देश होय. जपान हा देश लहानमोठ्या अशा एकंदर ३,३०० बेटांचा बनला आहे. या देशाचा विस्तार दक्षिणोत्तर ३० अंश २० मिनिटे ते ४५ अंश ३० मिनिटे उत्तर अक्षांशापर्यंत सुमारे ९०० मैल व पूर्व पश्चिम १२७ अंश ते १५२ अंश पूर्व रेखांशापर्यंत आहे. ही सर्व बेटे अर्ध किंवा धनुष्याकृती असल्यामुळे या पूर्वपश्चिम किंवा दक्षिणोत्तर विस्ताराची

नीटशी कल्पना येणे शक्य नाही. या सुमारे ३,३०० बेटांपैकी सर्वात महत्त्वाची व मोठी अशी एकंदर चारच बेटे आहेत. ही महत्त्वाची बेटे अशी—( १ ) अगदी उत्तरेकडील ३०, ३७२ चौरस मैल क्षेत्रफळाचे 'होक्काइदो', ( २ ) अगदी दक्षिणेकडे असलेले व १६,२२३ चौरस मैल क्षेत्रफळ असलेले 'किऊशू', ( ३ ) होक्काइदोच्या दक्षिणेकडील ८८, ९२५ चौरस मैल क्षेत्रफळ असलेले 'होनशिऊ' व (४) किऊशूच्या उत्तरेकडे असलेले किंवा होनशिऊच्या दक्षिणेकडील ७,२४७ चौरस मैल क्षेत्रफळ असलेले 'शिकोकू'

जपानचे एकंदर क्षेत्रफळ १,४२,७६७ चौरस मैल असून, त्याची आजची लोकसंख्या जवळजवळ १० कोटीच्या घरात आहे. या द्वीपसमूहाचा विस्तार आशिया खंडाच्या अतिपूर्वेला असलेल्या 'कामाचात्का' या नावाच्या द्वीपकल्पा-पासून थेट दक्षिणेला मध्य आशियातील इंडोचीन व मलाया या द्वीपकल्पापर्यंत पसरलेला दिसून येईल. या भौगोलिक विस्तारामुळेच जपानच्या बहुतेक आर्थिक, राजकीय व लष्करी घटनांचा अन्वयार्थ लावणे सुलभ होईल. उत्तरेकडील कामाचातका द्वीपकल्प व होक्काइदो बेट यांच्यात पोवळ्यांच्या द्वीपांची एक मोठी माळ दक्षिणोत्तर पसरलेली असून हाही जपानचाच एक भाग आहे. त्याला कुराईल बेटे असे म्हणतात. होक्काइदो बेटाच्या वायव्येला व मांचूरियाच्या पूर्व किनाऱ्याला समांतर असे आणखी एक बेट असून त्याला 'साखलीन' बेट असे नाव आहे. जपानी बेटे ज्याप्रमाणे उत्तरेकडे मांचूरिया व सैबीरियाच्या पूर्व भागाशी निगडीत आहेत, त्याप्रमाणेच ती दक्षिणेकडे थेट तैवान पर्यंत पसरली आहेत. याशिवाय दक्षिणेकडील तैवान व उत्तरेकडील किऊशू या बेटांच्या दरम्यान 'रियुकू' किंवा 'लिऊशिऊ' या नावाचा आणखी एक द्वीपसमूह दक्षिणोत्तर पसरलेला आहे.

कोरिया व मांचूरिया यांचा पूर्व किनारा व जपानी बेटांचा पूर्व किनारा यांच्यांत प्रशांत महासागराचा जो एक जलाशय आहे, त्याला जपानचा समुद्र असे म्हणतात. जपानी द्वीपसमूहाच्या धनुष्याकृती आकारामुळे जपानचा मध्यभाग म्हणजे होनशू हे बेट आशिया खंडाच्या पूर्व किनाऱ्यापासून सुमारे ६००-७०० मैलच लांब पडते, तर या धनुष्याकृती द्वीपांची दक्षिण व उत्तर टोके, आशिया खंडाच्या पूर्व किनाऱ्याला अगदी जवळ येतात. साखलीन बेट व सैबीरियाचा पूर्व किनारा यांच्यात 'तार्तार'ची सामुद्रधुनी आहे.

या सामुद्रधुनीमुळे आशिया खंड व जपान यांच्यातील अंतर सर्वात कमी म्हणजे जेमतेम २०-४० मैलच झाले आहे. याच्या उलट होनशू बेटाचा नैर्ऋत्य भाग हा त्सुशिमाच्या सामुद्रधुनीमुळे कोरियाच्या द्वीपकल्पाच्या आग्नेय भागापासून जवळजवळ १२५ मैल दूर गेला आहे. त्सुशिमाची सामुद्रधुनी जपानला आशिया खंडातील चीन, कोरिया व मांचूरिया हे भाग अगदीच जवळ आणते. त्यामुळेच जपानी लोकांनी पूर्व आशियात आपले आर्थिक व राजकीय साम्राज्य वाढविण्यासाठी या सामुद्रधुनीचा पुरेपूर उपयोग करून घेतला. याच त्सुशिमा सामुद्रधुनीमुळे फार पुरातन काळापासून चीन व जपान या दोन देशांतील दळणवळण सुलभपणे होऊ शकले. आशिया खंडाच्या पूर्वेकडील भागातील कित्येक लोक वसाहतीकरता जपानी बेटांवर गेले तर चीनमधून धर्म व संस्कृती यांचा ओघ जपान मध्ये वाहू लागला.

नंतरच्या काळात जपानी बेटांवरून चिनी भूमीवर स्वारी करण्याकरता या त्सुशिमा सामुद्रधुनीचा फारच उपयोग झाला. या सामुद्रधुनीमुळेच पुढे जपानला कोरिया व मांचूरिया हे पूर्वीचे चीनचे प्रांत बळकावता आले. जपानी लोकांना या त्सुशिमा सामुद्रधुनीचा व त्याच बरोबर जपानी व चिनी समुद्राच्या उथळपणाचा मच्छीमारीकरता फार मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊ लागला.

जपान हा देश अनेक बेटांचा मिळून बनला असल्यामुळे साहजिकच जपानी लोकांमध्ये मच्छीमारी व नाविककला हे दोन गुण चांगलेच जोपासले गेले आहेत. या दोन गुणांवरच जपानने आपला व्यापार व नाविकदल वाढवून भक्कम केले व मगच साम्राज्यविस्ताराला सुरुवात केली. या प्रत्येक बेटावर निरनिराळ्या उंचीचे डोंगर व पर्वत पसरले आहेत. त्यामुळे सपाट जमिनीचा असा भाग जपानच्या वाट्याला फारच थोडा आला आहे. ही सपाट मैदाने बहुतेक जपानच्या पश्चिम भागात म्हणजे जपानी समुद्राला लागून आहेत. त्यामुळे जपानी लोकांचे एकंदर आयुष्यच ‘एक पाय जमिनीवर व एक पाय समुद्राच्या पाण्यावर’ अशासारखे झाले आहे. जपानमधील जनतेस पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळावयाचे, तर ते मूळ जपानमधून मिळणे कठीणच; त्यामुळे जपानी लोकांनी जपानच्या समुद्राच्या पलीकडे असलेल्या चीनच्या पूर्व भागाकडे आपली आशाळभूत नजर फिरवण्याखेरीज त्यांना दुसरा पर्यायच नव्हता.

जपानच्या पूर्वेला प्रशांत महासागर असून, पश्चिमेला जपानचा समुद्र आहे. या दोन किनाऱ्यांची तुलना करता आपणाला असे दिसून येते, की जपानचा पूर्व किनारा हा पश्चिम किनाऱ्यापेक्षा सुमारे चारपट मोठा असून या पूर्व किनाऱ्यावरच मोठमोठी बंदरे आहेत. दोन्ही किनारे सारखेच दंतुर असले, तरी त्यातल्यात्यात नौकानयनाच्या दृष्टीने पश्चिम किनाऱ्यापेक्षा पूर्व किनाऱ्यावर अनेक संरक्षक बंदरे आहेत. पूर्व किनाऱ्यावरील तोकियोच्या उत्तरेला सेंदाई द्वीपकल्प असून, त्यामुळे त्या ठिकाणी संरक्षित बंदरांची पुष्कळच सोय झाली आहे. तोकियोच्या दक्षिणेला ' सागामी ' ' सुरुया ' व ' इसे ' हे तीन उपसागर आहेत. त्यामुळे पूर्व किनाऱ्यावर चांगल्या बंदरांची सोय होण्यास मदत होते. त्याच्याही दक्षिणेला कागोशिमाचे द्वीपकल्प व आरोआकेचा समुद्र असल्यामुळे, किनारा दंतुर झाला आहे. त्यामुळेही अनेक लहान मोठ्या बंदरांची जडणघडण होणे सुलभ झाले आहे.


जपानी लोक स्वतःला ' आशिया खंडातील इंग्रज ' असे म्हणवून घेतात. त्यांचा जपान हा देश ' आशिया खंडातील इंग्लंड किंवा ब्रिटिश बेटे ' असल्याचा त्यांचा जप चालू असतो. तसे पाहिले तर जपान व ब्रिटिशबेटे यांच्यात अनेक बाबतीत साम्य दिसते. त्याचप्रमाणे त्यांच्यात भिन्नताही पुष्कळ आहे. जवळजवळ समान अक्षांश, समान हवामान, अनेक द्वीपांचा मिळून झालेला देश, नजिकच्या मोठ्या खंडापासून सोयीस्करपणे काही वेळा खंडाचाच एक भाग समजणे; तर काही प्रसंगी आपण जवळच्या खंडापासून स्वतंत्र आहो असे म्हणणे, एकंदर जमिनीचा विस्तार व तिच्यावर अवलंबून असणारी मोठी लोकसंख्या, अशा मोठ्या लोकसंख्येच्या जीवनाला आवश्यक अशा अन्न व अर्थोत्पादन यांच्याकरता करावे लागणारे श्रम, त्यासाठी साम्राज्य वाढविणे अपरिहार्य होणे, यासारखी बरीच साम्ये दृष्टीस पडतात. वंश, रूप, कातडीचा रंग, मनुष्यस्वभाव वगैरे बाबतीत मात्र या दोन देशांत भिन्नताच जास्त दिसते. इतके असूनही, जपानी लोकांस आपण इतर आशियायी लोकांपेक्षा निराळे व युरोपीयनांना जवळचे आहो असे, भासविण्याची फार आवड आहे. म्हणूनच किंवा काय, त्यांनी कित्येक बाबतीत युरोपीयन लोकांचे सही सही अनुकरण, प्रसंगी नक्कल करण्यासही मागेपुढे पाहिले नाही. उदाहरणार्थ, जपानमधील सर्वात उंच पर्वतास त्यांनी ' आल्प्स ' हे नाव दिले आहे. पूर्व चिनी ( आशियाई )

किनारा व पश्चिम जपानचा किनारा यांच्या दरम्यान असलेल्या जपानच्या किनाऱ्यांच्या समुद्राला ते लोक 'जपानी भूमध्य समुद्र' असे म्हणतात. युरोपियन पेहराव, संस्कृती व शिष्टाचार जपानी लोकांनी बऱ्याच अंशी आत्मसात केले आहेत; परंतु त्यातही स्वत:चे जपानी वैशिष्ट्य मात्र मोडले नाही.

इ. स. १८६० च्या नंतर आशिया खंडातील इतर देशांप्रमाणेच अमेरिका व युरोप खंडातील इतर देश यांची दृष्टी जपानी बेटांकडे वळली. या बेटांशी शक्यतोवर शांततेने, पण जरूर पडल्यास लढाई करूनही व्यापारी संबंध सुरू करण्याचा युरोपीयन राष्ट्रांनी चंग बांधला. जपानी जनता परक्यांच्या जपानमधील या वास्तव्याच्या विरुद्ध असल्याने व त्यातही त्या वेळच्या जपानी राजसत्तेने या पाश्चात्यांबरोबर मैत्रीचे तहनामे करून त्यांना आपल्या भूमीवर पाय पसरण्यास परवानगी दिल्यामुळे, जपानमध्ये जागोजाग बंडे झाली. मग या बंडांचा बीमोड करण्यासाठी वरपांगी सोज्वळ, पण आतून जपान जिंकण्याचा कुटिल हेतू बाळगून हे परकीय मुत्सद्दी पुढे सरसावले व त्यांनी जपानी सत्ताधाऱ्यांना निरनिराळ्या प्रकारचे तहनामे करण्यास भाग पाडले. चीनप्रमाणेच युरोपातील निरनिराळ्या राष्ट्रांनी, जपानी भूमीचे लचके तोडण्यासही कमी केले नसते; पण इतक्यात युरोप खंडातील निरनिराळ्या देशांत एकमेकांविरुद्ध मत्सराग्नीने पेट घेतला व त्यामुळे त्यांचे काही वर्षे तरी जपानकडे दुर्लक्ष झाले. युरोपीयन राष्ट्रे आपआपसात भांडत आहेत, असे पाहून जपानमधील काही पुढाऱ्यांनी जपानमधील त्या वेळचे सरकार बरखास्त केले व पुनरपी जुनी राजवट सुरू केली. त्याचप्रमाणे यापुढे पाश्चिमात्य देशांपुढे टिकाव धरावयाचा तर पाश्चात्य शास्त्रे व संस्कृती यांचा अभ्यास करून त्यातल्या आपल्या राष्ट्राला हितावह असणाऱ्या गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत असा त्यांनी निश्चय केला. त्यामुळे इ. स. १८६० -६४ च्या दरम्यान जपानी लोकांवर लादल्या गेलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या अपमानास्पद अटी रद्द करवून घेणे एवढे तरी नंतरच्या सुमारे २५-३० वर्षांनी शक्य झाले. म्हणजे अवघ्या ३० वर्षांत कालाधीन जपानने इतकी आमूलाग्र सुधारणा घडवून आणली की, पाश्चात्यांना जपानी लोकांच्या हरेक मताला मान्यता द्यावी लागली. इ. स. १८६४ ते १८९४ हा तीस वर्षांचा काळ म्हणजे जपानच्या इतिहासातील — नव्हे जगाच्या इतिहासातील एक अजोड

क्रांतिपर्वाचा काळ आहे, असें दिसून येईल. आशियाखंडातील बहुतेक सर्व परतंत्र देश गेल्या महायुद्धानंतर स्वतंत्र झाले आहेत. या प्रत्येक देशाला आपला भाग्योदय घडवून आणण्यास जपानचे हे उदाहरण खचितच मार्गदर्शक होईल, यात शंका नाही.





# स्वाभाविक माहिती

जपान हा देश ४५ अंश ३० मिनिटे ते ३० अंश २० मिनिटे उत्तर अक्षांशामध्ये उत्तर-दक्षिण असा वसला आहे, हे आपण या पूर्वी पाहिलेच आहे. हा देश म्हणजे कामाचात्का द्वीपकल्पापासून तो खाली दक्षिणेकडे इंडोनेशियापैकी कालिमंतानपर्यंत सुमारे ९०० मैल दक्षिणोत्तर पसरला आहे. जपानचा सर्वात उत्तरेचा भाग म्हणजे होक्काइदो हे बेट व कामाचात्का हा रशियाच्या ताब्यातील सैबेरियाच्या पूर्वेच्या द्वीपकल्पाचा भाग यांमध्ये 'कुराइल' या नावाची उत्तर-दक्षिण अशी पसरलेली एक द्वीपांची लांबच लांब तोरणमाळ आहे. त्याचप्रमाणे जपानच्या थेट दक्षिणेकडे असलेले किऊशू बेट व सध्या राष्ट्रीय चिनी सरकारच्या ताब्यात असलेले तैवान बेट यांच्यामध्येही अशीच एक दक्षिणोत्तर पसरलेली 'रियूकू' नामक बेटांची तोरणमाळ आहे.

जपानची ही धनुष्याकृती बेटे आशिया खंडाच्या पूर्व किनाऱ्याला समांतर असून, त्या बेटांचा बहिर्गोल प्रशांत महासागराच्या बाजूला, तर अंतर्गोल जपानी समुद्राकडे आहे. जपानी समुद्र हा एक अतिशय उथळ असा समुद्राचा

भाग असून, तो जपानी बेटांना आशिया खंडापासून अलग करतो. जपानच्या अतिउत्तरेकडील होक्काइदो बेटाच्या उत्तरेला रशियाच्या ताब्यात असलेले 'साखलीन' या नावाचे बेट आहे. साखलीन बेट व. सैबेरियाचा पूर्व किनारा यांच्यामध्ये एक चिंचोळा जलाशय आहे, त्याला तार्तारिचे आखात असे नाव आहे. ज्याप्रमाणे धनुष्याकृती जपानी बेटांच्या उत्तरेकडील एक टोक आशिया खंडाच्या पूर्व किनाऱ्याजवळ आहे, त्याचप्रमाणे या बेटांचे दक्षिण टोकही ( किऊशू बेट ) हे आशिया खंडातील कोरिया द्वीपकल्पापासून, जेमतेम १२५ मैलांवर असून त्यांच्या दरम्यान त्सुशिमाची सामुद्रधुनी आहे.

जपानच्या समुद्राचा दक्षिण किनाऱ्यानजीकचा भाग हा साधारणत: उथळ आहे. जपानी समुद्र कोठेही १०,०००फुटांपेक्षा अधिक खोल नाही. काही काही ठिकाणी तर ही खोली जेमतेम २,५०० फुटांपर्यंतच आहे. याच्या उलट जपानच्या पूर्वेला असलेला प्रशांत महासागर ( किंवा पासिफिक महासागर ) हा कमीत कमी २०,०००फूट व जास्तीत जास्त ६५,००० फूट खोल आहे. या प्रशांत महासागराचा एक भाग म्हणजे पूर्व व उत्तरेला होनशू, पश्चिमेला किऊशू व दक्षिणेला शिकोकू या बेटांनी वेढलेला एक सरोवरासारखा भाग होय. यालाच जपानी लोक जपानी सरोवर किंवा जपानी भूमध्य समुद्र असे म्हणतात. हा जपानी भूमध्य समुद्र पूर्व-पश्चिम असा सुमारे २००-३०० मैल पसरला असून, त्याच्या आजूबाजूला असंख्य लहान-मोठी बेटे आहेत. प्रशांत महासागरावरून वाहणारे वादळी वारे या ठिकाणी अडविले गेल्यामुळे या जपानी भूमध्य समुद्राचे पाणी नेहमी शांत असते. येथील निसर्गसुंदर व रम्य वनश्री, माफक हवामान यामुळे हा भाग प्रवाशांना रात्रंदिवस हजारोंच्या संख्येने खेचून आणू शकतो.

जपानी भूमध्य समुद्र प्रशांत महासागराला 'कीई' या सामुद्रधुनीने व 'बंगो'च्या खाडीने जोडला गेलेला आहे. शिमोनोसेकीची सामुद्रधुनी या भूमध्य समुद्राला चिनी समुद्राशी नेऊन मिळविते. जपानी भूमध्य समुद्राच्या आसपास मोठमोठी बंदरे उदयाला आली आहेत. आशिया खंडाशी अगदी जवळचा रस्ता शिमोनोसेकी सामुद्रधुनीमुळे झाला असल्यामुळे या समुद्राच्या आसमंतातील प्रदेश म्हणजे जपानी संस्कृतीचे एक माहेरच समजण्यात येते.

जपानच्या जवळजवळ १,५०,००० चौरस मैलांच्या क्षेत्रफळापैकी सुम

८५ टक्के भाग डोंगराळ असून, सपाट मैदानांचा किंवा शेतीला लायक असा भाग जेमतेम १५ टक्केच आहे. एकंदर क्षेत्रफळाचा ८५ टक्के भाग डोंगराळ असल्याने शेतीच्या कुचकामाचा आहे. असे असले, तरी जपानी लोकांना या डोंगराळ भागातील जंगलापासूनही मोठा फायदा होतो. या डोंगराळ क्षेत्रफळामुळेच जपानमधील नद्या लहान असल्या तरी त्यावर असंख्य धबधबे आहेत. खनिजांचे—त्यातल्या त्यात उत्तम प्रतीचा कोळशाचे—जपानमध्ये दुर्भिक्ष असल्याने या असंख्य धबधब्यांपासून जपानी लोकांनी मोठ्या प्रमाणावर जलविद्युत्निर्मितीला सुरुवात केली. ही जलविद्युत्निर्मिती नैसर्गिकरीत्याच अत्यंत स्वस्त होते. या प्रचंड जलविद्युत् प्रकल्पामुळेच जपानची पुढील औद्योगिक भरभराट झाली.

जपानमधील डोंगर हे जपानच्या निरनिराळ्या बेटांवर बहुतेक मध्यभागी असल्याने जपानचा डोंगराळ भाग म्हणजे जणू त्याचा कणाच आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. पृथ्वीवर झालेल्या निरनिराळ्या उत्पातांमुळे प्रशांत महासागरातून हे डोंगर वर आले असावे, असा भूगर्भशास्त्रज्ञांचा अंदाज आहे. या डोंगरांचा मध्यभाग होनशिऊ बेटावर असून त्या ठिकाणी त्या डोंगरांची उंची समुद्रसपाटीपासून १०,०००फुटांपेक्षाही जास्त आहे. होनशिऊ या मध्य बेटांतील आल्प्स् पर्वतांची उंची, जसजसे उत्तरेकडे होक्काइदो या बेटापर्यंत किंवा दक्षिणेकडे किऊशू या बेटापर्यंत यावे तसतशी कमीकमी होत जाते.

होनशिऊ बेटाच्या पूर्वेला प्रशांत महासागराच्या किनाऱ्याला समांतर अशी आणखी एक डोंगरांची ओळ आहे तिला 'चिगोकू' पर्वत असे नाव आहे. या चिगोकू पर्वतावरील सर्वात उंच शिखर समुद्रसपाटीपासून जेमतेम ३,००० फूट उंच आहे. दुसरी एक डोंगरांची रांग 'फोस्सा मॅग्ना' ही जपानी भूमध्यसमुद्राच्या दक्षिणेला असून, तिचे सर्वात उंच शिखर समुद्रसपाटीपासून सुमारे ९,००० फूट उंच आहे. होनशिऊ बेटाच्या पूर्वेकडील चिगोकू पर्वताचे काही भागही सुमारे ८–९ हजार फूट उंच आहेत. जपानमधील सर्व डोंगर हे ज्वालामुखींनी परिपूर्ण आहेत. अधून मधून या ज्वालामुखींच्या उत्पातामुळे सर्वसाधारण जपानी जीवनच विस्कळित होते. त्यामुळे जपानी लोक स्वतःचे आयुष्य क्षणभंगूर आहे असेच समजून चालत असल्यास विशेष आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

किंबहुना ज्वालामुखींच्या या सान्निध्यामुळेच त्यांच्या घरांची बांधणी तात्पुरती, कमी खर्चाची व तकलादू असते.

जपानमध्ये असलेले हे ज्वालामुखी म्हणजे प्रशांत महासागराला पूर्व-पश्चिम वेटोळ्याने घेरलेल्या वर्तुळाकृती ज्वालामुखींच्या ओळीचा एक भाग आहे. जपानमध्ये आजपर्यंत निरनिराळ्या अशा १५० ठिकाणी ज्वालामुखीचे स्फोट झाले असून, या १५० जागांपैकी आजमितीला किमान४० तरी जागा अजूनही ज्वालामुखींच्या दाढेतच आहेत, असे म्हणतात. यापैकी कोणत्याही एका किंवा अधिक ठिकाणी, वाटेल त्या वेळी ज्वालामुखीचा स्फोट होण्याची शक्यता आहे. जपानमधील ज्वालामुखी एकंदर सात भागात विभागले गेले आहेत. त्यापैकी पहिली रांग दक्षिणेकडील रियूकू व किऊशू बेटांतून पूर्वपश्चिम पसरली असून, या रांगेतील ' किरिशिमा ' हे समुद्रसपाटीपासून सुमारे ५५५७ फूट उंचीवर असलेले शिखर म्हणजे एका जिवंत ज्वालामुखीचे तोंड आहे. कागोशिमा उपनगरातील 'सुकुराजिया ' हे ३,७५२ फूट उंचीवरील शिखर म्हणजेही असे जिवंत ज्वालामुखी आहे. दुसरी एक ज्वालामुखीची रांग ' आसो ' डोंगरांवर असून, ती मध्य किऊशू व उत्तर शिकोकू बेटांत पसरलेली आहे. या आसो डोंगरातील किऊशू बेटावर असलेले एक शिखर 'आसो' याच नावाने प्रसिद्ध आहे. हे आसो शिखर समुद्र सपाटीपासून ५,२२३ फूट उंच आहे. हे शिखर, जगातील सर्वात मोठे ज्वालामुखीचे तोंड समजण्यात येते. या आसो शिखराच्या घेर सुमारे ७१ मैल असून, या क्षेत्रफळात ३ मोठी शहरे व ११ इतर लहान लहान गावे वसली आहेत.

होनशिऊ बेटाच्या मध्यभागापासून आणखी एक रांग जोगासावारा या लहानशा बेटाकडून येऊन पूर्व-पश्चिम पसरलेली आहे. या पर्वताचे ' फुजी ' नामक शिखर जपानमधील सर्वात उंच शिखर असून, ते १२,३८५ फूट उंच आहे. ' यामा ' हा जपानी भाषेतील पर्वत वाचक शब्द असल्याने या डोंगरराजीस ' फुजियामा ' असे म्हणतात. हे शिखर म्हणजे जपानमधील एक सर्वात पवित्र यात्रेचे ठिकाण समजण्यात येते. दरवर्षीच्या जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांत हजारो यात्रेकरू ही फुजीयामाची यात्रा करतात. फुजीयामा हा ज्वालामुखी पूर्वी सुमारे २५० वर्षे जिवंत होता.

होनशिऊ बेटावर 'असामा' या नावाचे आणखी एक ८,३४० फूट उंचीचे

शिखर असून, तेथेही ज्वालामुखी आहे. या असामा ज्वालामुखीच्या तोंडावाटे आजही सारखा धूर व रस बाहेर येत असतो. होनशिऊ बेटाच्या पूर्वेकडे 'नासू' ( उंची ६,२८३फूट ), 'आझूमा' ( उंची ६,६४१ फूट ), 'बंदाई', ( उंची ५,९६८फूट ) अशी आणखी ज्वालामुखींची शिखरे आहेत. या ज्वालामुखींच्या रांगेचे सर्वात उत्तरेकडील टोक, कुराईल बेटे व कामाचातकाच्या द्वीपकल्पात असून, त्या ठिकाणी या ज्वालामुखीची 'आकान' व 'दाईसेत्सू' अशी दोन शिखरे आहेत.

वर सांगितलेल्या जपानमधील ज्वालामुखीच्या अस्तित्वाबरोबर या देशात हजारो ठिकाणी गरम पाण्याचे झरे आहेत हेही सांगितले पाहिजे. या झऱ्यांचे पाणी निरनिराळ्या प्रकारच्या त्वचा रोगांवर फार उपयुक्त आहे. या पाण्याचा उपयोग करण्यासाठी दररोज शेकडो लोक या गरम पाण्याच्या झऱ्यांवर येतात. जपानमध्ये भूकंपही एकसारखे होत असतात. असे म्हणतात की, या देशात निरनिराळ्या ठिकाणी दररोज किमान चार तरी भूकंपाचे धक्के जाणवतात. परंतु या पैकी बहुतेक धक्के फक्त भूकंपाच्या धक्क्यांची मोजदाद व नोंदणी करणाऱ्या यंत्रावर समजले जाणारे म्हणजे अत्यंत सूक्ष्म असे असतात. दर सहा वर्षांनी मात्र कोठेना कोठे तरी भूकंपाचा एक जबरदस्त हादरा बसतोच व त्यामुळे असंख्य नागरिकांचे आयुष्य बरबाद होते. त्याशिवाय इतर नुकसानही अपरिमित होते.

### हवामान

जपानचा विस्तार ३० अंश ते ४५ अंश उत्तर अक्षांशांच्या दरम्यान १५ अंश म्हणजेच जवळजवळ ९०० मैल दक्षिणोत्तर आहे. साहजिकच या ९०० मैलांच्या परिसरात हवामानही निरनिराळ्या प्रकारचे आढळून येते. दक्षिणेकडील कियूशू बेटावर हवामान सर्वसाधारण उष्ण व आर्द्रतायुक्त असते. याच्या उलट उत्तरेकडील होक्काइदो बेटावरील हवामान विषम स्वरूपाचे परंतु कोरडे असते. या दोन टोकांच्या दरम्यान हवामानाचे निरनिराळ्या विभाग पाडता येतात. याशिवाय जपानच्या चोहोबाजूला समुद्र असल्याने या समुद्रसान्निध्याचा परिणाम जपानमधील हवामानावर होऊन, या अक्षांशावर असणाऱ्या हवामानापेक्षा जपानमधील हवामान पुष्कळच

समशीतोष्ण होण्यास मदत होते. 'कुरोसीवो' हा उष्ण पाण्याचा प्रवाह जपानच्या दोन्ही किनाऱ्यांवरून दक्षिणेकडून उत्तरेकडे अखंड वाहत असल्यामुळे थंडीच्या दिवसांत जपानमधील एकंदर हवामान पुष्कळच उबदार असते. हा उबदारपणा विशेषत: पश्चिम किनाऱ्यावर जाणवतो.

जपानच्या उत्तरेकडील भागात, बेअरिंगच्या सामुद्रधूनीकडून आलेला 'ओयाशियो' (यालाच जपानमध्ये 'कुराइल' प्रवाह असे म्हणतात) हा थंड पाण्याचा प्रवाह विशेषत: होक्काइदो बेटाच्या दोन्ही किनाऱ्यांवर अखंड गारठा पसरवीत असतो. हे दोन्ही प्रवाह सुमारे ४० अंश उत्तर अक्षांशावर एकमेकांना मिळतात. त्यामुळे या अक्षांशावरील जपानच्या पूर्वकिनाऱ्यावर असंख्य वादळे होतात व नेहमी दाट धुके आढळते. होक्काइदो बेटाच्या पूर्व किनाऱ्यावर (हा जपानमधील मच्छीमारीचा महत्त्वाचा विभाग आहे) तर हे धुक्याचे व वादळाचे प्रकार मच्छीमारीला फारच त्रासदायक ठरतात.

आशिया खंडाच्या सान्निध्यामुळे जपानी हवामानावर फार मोठा परिणाम झालेला दिसतो. हिवाळ्यात मध्यआशियामध्ये तपमान फारच कमी असल्याने त्या ठिकाणी हवेचा दाब नेहमीच जास्त असतो; पण इकडे प्रशांत महासागरावर त्या मानाने उष्णतामान जास्त असल्याने हवेचा दाब बराच कमी असतो. याचा परिणाम म्हणजे हिवाळ्यात मध्यआशियाकडून येणारे वारे हे फार थंड असल्याने जपानच्या पश्चिमेकडील भागात थंडी विशेष जाणवते. हे पश्चिमी वारे जपानपर्यंत पोहोचण्यापूर्वी जपानी समुद्रावरील बाष्प आपल्याबरोबर गोळा करीत असल्याने जपानच्या पश्चिम किनाऱ्यावर, हिवाळ्यात भरपूर पाऊस पडतो. उन्हाळ्यात प्रशांत महासागरावर हवेचा दाब जास्त असतो, त्यामुळे मध्यआशियात उष्णता अधिक व हवेचा दाब कमी असल्याने वारे पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतात. जपानपर्यंत येण्यापूर्वीच हे वारे प्रशांत महासागरावरील बाष्प गोळा करीत असल्याने जपानच्या पूर्व किनाऱ्यावर उन्हाळ्यात चांगला पाऊस पडतो.

खाली दर्शविलेल्या तपमानाच्या काही आकडयांवरून, त्या त्या भागातील हवामानाची कल्पना येईल. मध्य होक्काइदोमधील 'असाहिगावा' येथे, डिसेंबर ते फेब्रुवारी या चार महिन्यात सरासरी तपमान १४ अंश फॅरनहाईट असते. जानेवारी महिन्यात तोकियोचे सरासरी तपमान ३७ अंश फॅरनहाईट

असते. पश्चिम किनाऱ्यावर ओसाका येथे जानेवारी महिन्यात सरासरी तपमान ४० अंश फॅरनहाईट असते. याच जानेवारी महिन्यात दक्षिण कियूशू बेटावर सरासरी तपमान ४५ अंश फॅरनहाईट असते. त्याचप्रमाणे ऑगस्ट महिन्यातील तपमानाचे वरील चार शहरांचे आकडे असे आहेत– असाहीगावाच्या नैर्ऋत्येस असलेले सप्पोरो–६९ अंश, तोकियो–७७ अंश, ओसाका–८१ अंश, कियूशूमधील कागोशिमा –७९ अंश.

वरील आकडयांवरून जपानी हवामान जसजसे उत्तरेकडे जावे तसतसे विषम होत जाते व सर्वांत दक्षिणेकडील कियूशू बेटावर तर ते समशीतोष्ण असते, हे स्पष्ट होईल.

जपानमध्ये जिकडेतिकडे भरपूर पाऊस पडतो. उत्तरेकडील भागात तर पर्जन्यवृष्टीच्या ऐवजी बर्फवृष्टीच होते. तरीपण एकंदरीत पाहता जपानमध्ये नैसर्गिक रीत्या पाण्याचा पुरवठा भरपूर असतो, असेच म्हणावे लागेल. जपानमधील पाऊस हा उन्हाळी व हिवाळी असा दोन्ही प्रकारचा असतो. पावसाचे सरासरी प्रमाण या देशात ४० इंचांपेक्षाही जास्त आहे. उत्तरेकडील होक्काइदो बेटाचा पश्चिमेकडील भाग, होनशिऊ बेटाचा पूर्वेकडील भाग व जपानी भूमध्यसमुद्राच्या आसपासचा भाग या सर्व ठिकाणी वार्षिक पर्जन्यमान सरासरीने ६० इंचांपेक्षा जास्त आहे. जपानी समुद्रावरून पूर्वे-कडून पश्चिमेकडे प्रशांत महासागराच्या दिशेने वाहणारे वारे, सुरवातीला मध्य आशियातून निघत असल्यामुळे त्या वाऱ्यांपासून पश्चिम जपानच्या भागांत पडणारा उन्हाळ्यातील पाऊस हा बहुतांशी बर्फमिश्रित असतो. कित्येक वेळा तर हा पाऊस म्हणजे नुसत्या गाराच गारा असतात. जपानमधील सर्वात अधिक पर्जन्यमान होनशिऊ बेटावरील सर्वात उंच डोंगरशिखरांवर असते. येथील सरासरी पर्जन्यमान जवळजवळ १२० इंचांच्या आसपास असते.

**जपानमधील नद्या**

जपानमध्ये सर्वसाधारणपणे भरपूर पाऊस पडत असल्यामुळे व एकंदर क्षेत्रफळाच्या ८५ टक्के भाग डोंगराळ असल्याने या देशात लहान लहान का होईना, पण असंख्य नद्या व नाले आहेत. जपानमधील सर्वात मोठी नदी म्हणजे 'शिनानो' ही होय. ही नदी होनशू बेटातील वायव्य भागात उगम पावून

सुमारे २५० मैलांच्या प्रवासानंतर आग्नेय होनशिऊच्या किनाऱ्याजवळ प्रशांत महासागराला येऊन मिळते. दुसरी महत्त्वाची नदी 'इशिकारी'. ही उत्तरेकडील होक्काइदो बेटाच्या नैर्ऋत्येला उगम पावून, सुमारे २२८ मैलांचा प्रवास केल्यावर त्याच बेटाच्या वायव्येला म्हणजे जपानी समुद्राच्या उत्तरेकडील भागास मिळते. तिसरी जपानमधील नदी म्हणजे 'तोन' ही होय. होनशिऊ बेटावरील डोंगराळ भागात उगम पावून, सुमारे २०० मैल पूर्वेकडे 'कोतो' या मैदानी प्रदेशांतून वाहत जाते व अखेर प्रशांत महासागराला मिळते जपानमधील एकंदर शेतीकरता बांधण्यात आलेल्या पाटबंधाऱ्यांपैकी जवळजवळ दोनतृतीयांश पाटबंधारे या दोन नद्यांवरच बांधले आहेत. त्याचप्रमाणे जपानमधील एकंदर जलविद्युत् निर्मितीपैकी जवळजवळ ८० टक्के जलविद्युत् फक्त तोन नदीवरील जलविद्युत् प्रकल्पांतून मिळते एवढे सांगितल्यावर या नदीचे महत्त्व कोणासही पटेल.

जपानमध्ये अनेक लहानमोठी सरोवरे आहेत. सर्वात महत्त्वाचे 'बिवा' नामक सरोवर एकंदर २६० चौरस मैल क्षेत्रफळाचे असून, ते पश्चिम होनशिऊ बेटावर आहे. ऐतिहासिक काळात या बिवा सरोवरामुळेच पश्चिमेकडील जपानी समुद्र व पूर्वेकडील जपानी समुद्र यांच्यातील दळणवळण सुकर होत असे. अलीकडे सडका व लोहमार्ग यांच्यात अनेक पटींनी वाढ झाल्यामुळे दळणवळणाच्या दृष्टीने या सरोवराचा पूर्वीसारखा उपयोग केला जात नाही. तरी पण या सरोवरामुळे गोड्या पाण्यातील मासळी भरपूर प्रमाणात मिळू शकते.

जपानच्या एकंदर क्षेत्रफळापैकी जेमतेम १५ टक्के भागच मैदानी असल्यामुळे जपानमधील कोणताही लहान अगर मोठा सपाट जमिनीचा प्रदेश म्हणजे एक अत्यंत महत्त्वाचा भूभाग समजला जातो. जपानमधील एकंदर मैदानी विभागात होनशू बेटाच्या पूर्व भागातील 'कांतो' हे महत्त्वाचे मैदान समजले जाते. या कांतो मैदानाचे क्षेत्रफळ जेमतेम ५००० चौरस मैल आहे. जपानमधील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता या मैदानी विभागात शेती करण्याकरता उपयुक्त असणारी जमीन जास्तीत जास्त कशी उपयोगात आणता येईल, हाच सर्वप्रथम विचार जपानी लोकांपुढे आज आहे. याच कांतो मैदानावर जपानमधील मोठमोठी औद्योगिक, सांस्कृतिक व इतर केंद्रे उभारली

गेली आहेत. याच मैदानात लोहमार्ग व सडका याचे अत्यंत गुतागुंतीचे जाळे तयार झाले आहे. या मैदानाच्या पूर्वेकडे महत्त्वाची बंदरेही आहेत. जपानची राजधानी तोकियो व त्याच्या आसमंतात असलेले सर्वात महत्त्वाचे बंदर याकोहामा ही दोन्ही कांतो या मैदानी भागातच आहेत. उत्तर होनशिऊ बेटात सेंदाई या नावाचा एक लहान मैदानी भाग असून या विभागातील प्रमुख शहर म्हणजे 'सेंदाई' हे होय.

कांतो मैदानाच्या पश्चिमेकडे (प्रत्यक्षात नैर्ऋत्येकडे) 'नोकी' या नावाचे एक मैदान असून; या भागात 'नागोया' हे अखिल जपानमधील अत्यंत महत्त्वाचे असे औद्योगिक केंद्र आहे. बिवा सरोवराच्या नैर्ऋत्येकडील जपानी समुद्राच्या ईशान्य किनाऱ्याला लागून आणखी एक सपाट जमिनीचा भाग असून या भागात जी दोन महत्त्वाची औद्योगिक केंद्रे उभी ठाकली आहेत, त्यावरून या मैदानाला 'ओसाका--कोबे'चे मैदान असे नाव पडले आहे. होनशिऊ बेटाच्या पूर्व भागात जपानी समुद्रकिनाऱ्याला लागून आणखी एक मैदान आहे, त्याला 'एशिगो' चे मैदान म्हणतात. या एशिगो मैदानातील सर्वात महत्त्वाचे केंद्र म्हणजे 'निईगारा' हे होय. होक्काइदो बेटावरील 'सपारा' हे महत्त्वाचे केंद्र असलेले 'इशिकारी' मैदान हा आणखी एक जपानमधील मैदानाचा भाग आहे.

भौगोलिक दृष्टचा जपानचे खालीलप्रमाणे नैसर्गिक विभाग पडतात.

१ ) **उत्तर समशीतोष्ण कटिबंधातील दक्षिण जपान** – अगदी दक्षिणेकडील म्हणजे ३० ते ३५ अंश उत्तर अक्षांशामधील कियूशू, शिकोकू ही बेटे व मध्य होनशिऊमधील काही भाग यांचा अंतर्भाव या विभागात केला जातो. हा सर्व भाग म्हणजे जपानी भूमध्य समुद्राच्या आसमंतातील भाग होय. या भागात हिवाळा कोरडा व कमी थंड असतो. उन्हाळ्यात तपमान ऊष्ण असते. हिवाळ्यातील तपमान ४० ते ४५ अंश फॅरनहाईट व उन्हाळ्यातील तपमान सरासरीने ७५ ते ८० अंश फॅरनहाईट असते. वार्षिक पर्जन्यमान सरासरीने १०० इंचांहूनही जास्त असते.

२ ) **जपानचा पूर्वेकडील भाग** – जपानमधील मध्य पर्वतांच्या रांगांच्या पूर्वेकडील हा भाग असून उत्तरेकडील होक्काइदो या बेटाचा दक्षिणेकडील भागही त्यात अंतर्भूत होतो. या भागात हिवाळा कोरडा, पण कडक असतो. कडक किंवा अतिशय कमी तपमान असलेला हिवाळा असण्याचे कारण म्हणजे

या किनाऱ्याजवळून अखंड वाहणारा थंड पाण्याचा कुराईल प्रवाह हे होय. या कुराईल प्रवाहालाच 'ओखोतस्कचा प्रवाह, असेही म्हणतात. या विभागाच्या उत्तरेकडील भागात हिवाळ्यातील सरासरी तपमान २५ ते ३२ अंश फॅरनहाईट असते. याच काळात दक्षिण जपानमध्ये सरासरी तपमान ६० ते ६५ अंश फॅरनहाईट असते.

३ ) **जपानचा पश्चिमेकडील भाग** – या भागात होनशू बेटाचा पश्चिमेकडील किनारा व होक्काइदो बेटाचा दक्षिण भाग यांचा समावेश होतो. या विभागाचे वैशिष्ट्य असे, की येथे हिवाळ्यात पाऊस पडतो. हिवाळ्यात हवा नेहमी ढगाळ असते व धुक्याचा अमलही विशेष असतो. या विभागाच्या उत्तर भागात सरासरी तपमान कमी, तर दक्षिण भागात ते जास्त असते.

४) **जपानचा उत्तरेकडील भाग** – उत्तर होक्काइदो एवढाच भाग या नैसर्गिक विभागात मोडतो. साखलीन किंवा काराफूतो बेटाचाही याच विभागात समावेश केला जातो. या विभागात हिवाळा कोरडा व अतिशय कडक असतो. सरासरी तपमान २० अंश फॅरनहाईट पेक्षाही कमी असते. उन्हाळ्यातही गारवा जास्त असतो. उन्हाळ्यातील सरासरी तपमान ६० अंश फॅरनहाईटच्या आसपास असते.





# जपानी लोक

जपानी समुद्रामुळे आशिया खंडापासून जपानी बेटे जरी निराळी किंवा विलग झाली असली, तरी मूळ आशिया खंड व निराळा झालेला जपानचा भूभाग यांचे दळणवळणाचे संबंध आजतागायत अव्याहत चालू आहेत. आशिया खंडातील शेजारच्या लोकांप्रमाणेच सर्वसाधारण जपानी मनुष्य हा मोंगोल वंशाचा असल्याचे स्पष्ट दिसते. मूळ जपानमध्ये राहणारे व मागसलेल्या ' ऐन् ' जमातीचे लोक यांच्याशी मोंगोल लोकांचा सर्रास संकर होऊन जी प्रजा निर्माण झाली, तीच जपानी प्रजा होय. या मोंगोल वंशापैकी जपानी प्रदेशाला अगदी निकट असलेल्या चीन, कोरिया, मांचूरिया वगैरे देशांतून आलेल्या लोकांचा जपानमधील मूळच्या ' ऐन् ' जातीशी संकर घडला असला पाहिजे. अलिकडील सुमारे १,००० वर्षांत मात्र जपानमध्ये

बाहेरच्या देशांतून फारसे लोक येऊन स्थायिक झाल्याचा पुरावा नसल्याने या संकरज प्रजेमध्ये आणखी संकर झालेला दिसत नाही.

जपानी लोक हे मूळचेच ठेंगू असून, जुन्या चिनी वाङमयातही त्यांचा उल्लेख जगातील नामांकित खुजे म्हणूनच केला गेला आहे. अलिकडील ५०–६० वर्षांत मात्र जपानी लोकांची सर्वसाधारण उंची वाढत असल्याचे निरनिराळ्या सरकारी अहवालांवरून स्पष्ट दिसते. उदाहरणार्थ इ. स. १९०१ मध्ये जपानी लोकांची सरासरी उंची ५ फूट १ इंच होती, ती इ. स. १९२० मध्ये किंवा त्या सुमारास ५ फूट २ इंच झाली व अलिकडे ती ५ फूट ४ इंचांपर्यंत वाढली असल्याचे जपानी सरकारच्या समाजकल्याण खात्याच्या अहवालात स्पष्टपणे नमूद केले गेले आहे.

सर्वसाधारण जपानी मनुष्य हा धार्मिक मतांच्या बाबतीत बराच सहिष्णू दिसतो. एखाद्या विशिष्ट धर्माबद्दल चीड, मत्सर, किंवा तत्सम अनादराच्या भावना जपानी समाजामध्ये क्वचितच उफाळलेल्या दिसतात. राजकीय पक्षोपपक्षांनी यदाकदाचित एखाद्या विशिष्ट धर्माचे सत्तालोभाने भांडवल केले, तरच धार्मिक मतभिन्नता किंवा क्वचित प्रसंगी अशांतताही उफाळते. पण असे प्रसंग जपानमध्ये हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच सापडतात.

जपानी लोकांचा मुख्य धर्म ' शिंतो ' हा जरी असला, तरी कन्फ्यूशियसने सांगितलेली महान तत्त्वेही अत्यंत भक्तिभावाने ते नेहमी आचरणात आणतात व त्यामुळे त्यांना 'कन्फ्यूशियसवादी–' म्हणण्यास हरकत नाही. या शिवाय असंख्य जपानी लोक बुद्धालाही मानीत असल्यामुळे त्यांना बुद्धधर्मीय म्हणण्यासही हरकत नाही. जपानमध्ये एक वचन आहे,' जपानी तरुण हा प्रथमतः शिंतोवादी असतो, वयात आल्यानंतर व गृहस्थाश्रमात तो कन्फ्यूशियसवादी होतो; परंतु वानप्रस्थाश्रमात शिरल्यावर मात्र तो बुद्धधर्मी होतो. '

अठराव्या शतकाच्या अखेरीस जपानमध्ये ' आयेनारो ' राजवंशाच्या कारकीर्दीत जपानी समाजाची सर्वांगीण सुधारणा करण्यासाठी ज्या अनेकविध चळवळी सुरू करण्यात आल्या, त्यापैकी सर्वांत महत्त्वाची चळवळ म्हणजे ' शिंतोवादी ' ही होय. सुप्रसिद्ध चिनी तत्त्ववेत्ता कन्फ्यूशियस याची तत्त्वे व जुन्यापुराण्या बुद्ध धर्माची तत्त्वे ही जपानमधील विशिष्ट राजकीय उलथापालथीमुळे जवळ जवळ टाकाऊ म्हणूनच समजली गेली होती. इसवी

सनाच्या सतराव्या शतकात मित्सुकुनी या नावाच्या एका मोठ्या जपानी लेखकाने प्रथम त्या वेळच्या 'तोकूगावा' या राजवंशाविरुद्ध प्रचार करण्याकरता जे अनेक ग्रंथ लिहिले, त्यामध्ये 'दाय निहोन्शी' हा ग्रंथ फारच प्रसिद्ध आहे. अठराव्या शतकात 'माबुची', 'मोतुरी', 'हिराता' वगैरे जपानी साहित्यिकांनी जपानी साम्राज्यातील जनतेच्या अगदी शेवटच्या थरापर्यंत 'शितो' तत्त्वज्ञानाचे लोण पोचवून तत्त्वज्ञानाला जपानमध्ये भक्कम करण्यास पुष्कळच मदत केली.

शितो तत्त्वज्ञान हे निःसंशय कट्टर चीनविरोधी व जपानी राष्ट्रसंवर्धनाला अनुकूल असे होते. तत्त्वतः शितो तत्त्वज्ञान बुद्धधर्माला पुष्कळसे धरूनच होते. यामुळेच किंवा काय, बुद्धाची शिकवण न विसरताही शितो तत्त्वज्ञानाचा जपानमध्ये झपाट्याने प्रसार झाला. आधुनिक शितोधर्मात जपानमध्ये पूर्वी होऊन गेलेल्या पराक्रमी योद्ध्यांना कामो हे देवत्व दर्शक नाव देण्यात येते. उदाहरणार्थ, जनरल नोशी या एका जपानी उच्च लष्करी अधिकाऱ्याने मैजी बादशहाबरोबरच आपल्यालाही सद्गती मिळावी म्हणून आत्महत्या केली. याच जनरल नोशीचे पुढे पुतळे उभारण्यात येऊन हा सर्वात पवित्र पुतळा असे सर्वत्र मानले जाऊ लागले. शितोधर्मप्रणालीमध्ये आपआपल्या कुटुंबातील पराक्रमी पूर्वजांची पूजा करणे हे सर्वांत महत्त्वाचे व पवित्र कार्य समजले जाऊ लागले. त्यामुळे साहजिकच मोठमोठ्या कुटुंबांतून अशा शूर व वीर पूर्वजांचे अनेक पुतळे उभारले गेले व त्यांच्या विषयीचा आदर रोमरोमात्त भिनून या निरनिराळ्या कुटुंबीयांत एक विशेष उत्साह व आवेश निर्माण होऊ लागला.

बुद्धधर्माची स्थापना, भारतात जरी इसवी सनापूर्वी ५०० – ६०० वर्षे झाली असली, तरी त्याच्या अति पूर्वेकडील विस्तारास मात्र बराच कालावधी लागला. जपान हा आशिया खंडाच्या पूर्वेला असलेला, पण बेटांचा प्रदेश असल्यामुळे या देशात बुद्ध धर्माचा शिरकाव बराच उशिरा झाला. एकदा बुद्धधर्माचा प्रवेश झाल्यावर मात्र जपानमध्ये त्या धर्माचा प्रसार भराभर झाला. साधारणपणे मोठमोठ्या शहरांतून या धर्माचा प्रसार विशेष झाला.

जपानी संस्कृती, भाषा व साहित्य यांच्यावर बौद्धधर्माचा जबर पगडा बसला. परंतु जपानमध्ये अठराव्या शतकाच्या सुरवातीला जपानची महाराणी

'गेम्मायो' हिने आपली राजधानी 'नारा' या ठिकाणी हालविली. महाराणी गेम्मायो व तिचे राजघराणे यांच्या सत्तेला 'नारो' सत्ता किंवा 'नारो' राजघराणे असेही म्हणतात. या नारो कारकीर्दीत बुद्धधर्मीयांत निरनिराळे उपभेद सुरू झाले. साधारणतः या सर्व निरनिराळ्या पंथांचे दोन मुख्य भाग पाडता येतात. १ ) 'हीनयान' किंवा मूळ बुद्धधर्मासारखा व २ ) 'अवतांशक' किंवा प्रत्येक जपानी किंवा बौद्ध मानवाचा आत्मा हा बुद्धाचाच एक अंश आहे, असे मानणारा.

बौद्धभिक्षूंच्या वर्चस्वाला खो देण्याकरता म्हणून शितोपंथाची स्थापना करण्यात आली, असे म्हणतात. इसवी सनाच्या तेराव्या शतकात जपानमधील राजसत्ता हळूहळू अस्त पावू लागली. मध्यवर्ती राजसत्ता जसजशी कमकुवत होऊ लागली, तसतसे निरनिराळे लष्करी अधिकारी व सरंजामदार आपआपले वर्चस्व वाढविण्याच्या मार्गास लागले. जपानी जनतेवर आपले वर्चस्व लादण्याकरता धर्माचा सर्रास उपयोग करण्यात येऊ लागला. या निरनिराळ्या तथाकथित पुढाऱ्यांनी आपआपल्या कार्यात सवतासुभा निर्माण करण्याच्या हेतूने मूळ बौद्ध धर्माची सोयीस्कर अशी पुनर्रचना घडवून आणण्यास सुरवात केली. या पुनर्रचनेप्रमाणे बौद्धधर्माचे चार निरनिराळे स्वतंत्र विभाग अस्तित्वात आले. १ ) निचिरेन, २ ) जोदो, ३ ) शिन व ४ ) झेन असे हे चार निरनिराळे पंथ उदयास आले. या सर्वांत शेवटी 'शिन' पंथाचे पारडे जड आले. कारण या पंथाने कोणत्याही प्रकारची तपश्चर्या किंवा संन्यास यांचे महत्त्व कमी केले नाही. इतकेच नव्हे, तर शिनपंथाच्या धर्मगुरूंना विवाह व आहार-विहार यांच्या संबंधीची बुद्धधर्मातील सर्व बंधने दूर केली.

जपानमध्ये बुद्धधर्माबद्दल प्रथमपासूनच प्रेम व आदर दिसून येत असे. सुरवातीला जरी जपानचे राजघराणे व त्याच्या अनुषंगाने इतर सरदार, दरकदार, वगैरे मोठ्या लोकांनी बुद्धधर्म स्वीकारला, तरी त्या धर्माचा प्रसार थेट लहानशा झोपडीपर्यंत होण्यास बराच कालावधी लागला. इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या सुमारास जपानमधील राजकीय सत्ता राजघराण्याकडून निरनिराळ्या सरंजामी सरदारांकडे व नंतर शोगून घराण्याकडे गेली व तेथपासून बुद्धधर्माचा प्रसार फारच झपाट्याने होऊ लागला. हजारोंच्या संख्येने जपानी लोक भिक्षू बनू लागले. बुद्ध मंदिरेही शेकड्यांच्या संख्येने

उभारली जाऊ लागली. ताज्या रक्ताचे जपानी भिक्षू खेडोपाडी जाऊन बुद्धधर्माचा प्रसार करू लागले. प्रत्येक खेड्यात किमान एक तरी बुद्ध मंदिर उभारले गेल्याचे दिसून आले. परंतु लवकरच जेसूइट ख्रिश्चन मिशनरी जपान-मध्ये आले व त्यांनी येशू ख्रिस्ताची विचारप्रणाली जपानी लोकांसमोर मांडून हळूहळू आपल्या ख्रिश्चन धर्माचे जाळे विणण्यास सुरवात केली. थोडक्याच काळात जपानमध्ये जिकडे-तिकडे येशू ख्रिस्ताचा बोलबाला होऊ लागला. शेकडो जपानी लोकांनी ख्रिस्तीधर्माची दीक्षाही घेतली. शेगूकावा या नावाच्या एका लष्करी अधिकाऱ्याच्या कारकीर्दीत कॅथॉलिक पंथाच्या या आक्रमणाला पायबंद घालण्याच्या उद्देशाने सरकारी पातळीवरून जेसूइट धर्मगुरूंचा पद्धतशीर छळ सुरू झाला व त्यामुळे थोड्याच काळात जपानमधील ख्रिश्चन धर्माचा हा प्रसार थोपविण्यात आला.

याच सुमारास जपानमध्ये धर्मसुधारणेची एक कल्पना पुढे येऊन थोड्याच अवधीत तिला एका मोठ्या लाटेचे स्वरूप आले. इ. स. १८०० च्या सुमारास मितो पंथाच्या काही साहित्यिकांनी बौद्धधर्म तत्त्वे व त्यांत शितो तत्त्वांनुसार कराव्या लागणाऱ्या फेरफारांची जनतेला जाणीव करून देण्याचा प्रयत्न सुरू केला. सुरवातीस काही प्रसिद्ध साहित्यिकांना ही गोष्ट पटवून दिल्यावर त्यांच्या सहकार्याने जपानी जनतेमध्ये जोराच्या प्रचारास प्रेरणा मिळाली. मितो पंथाचे एक महान कार्यकर्ते योशिदा शॉइन यांनी या प्रचारकार्याचा धूमधडाका सुरू केला. त्यांच्या लेखांमुळे व काव्यांमुळे त्या वेळच्या मोठमोठ्या जपानी राजकारणी लोकांस याचे महत्त्व पटले. शेवटी इ. स. १८६५ नंतर मोईजी राज्यक्रांतीनंतर शितोपंथ हा जपानी लोकांचा सर्वसंमत धर्म म्हणून सरकार दरबारी नोंदला गेला.

### जपानी स्थापत्य

जपानची स्वाभाविक रचना व जपानी लोकांचे स्वच्छता व साधेपणा हे गुण या गोष्टींचा जपानी स्थापत्यावर फार मोठा प्रभाव पडला असल्याचे दिसते. जपानमधील ज्वालामुखी, भूकंप वगैरेंच्या सातत्यामुळे एकंदर जपानी जीवन व क्षणभंगुर समजले गेल्यास नवल नाही. याच नैसर्गिक अडचणींमुळे दगडाऐवजी लाकूड वापरण्याची पद्धती जिकडे-तिकडे सर्रास चालू असावी असे म्हणावयास

हरकत नाही. जपानमध्ये मुबलक प्रमाणात आढळून येणाऱ्या ‘ हिनोकी ’ जातीच्या लाकडाच्या इमारती आजही म्हणजे सुमारे ६०० – ७०० वर्षां-नंतरही जशाच्या तशा राहिलेल्या आढळून येतात.

जपानी स्थापत्यात खालील टप्पे आढळून येतात :– १) पहिला टप्पा बुद्धपूर्व स्थापत्याचा. यालाच साधेसुधे बांधकाम म्हणावयास हरकत नाही. चारही बाजूंना मोठमोठे लाकडाचे ओंडके उभे करून त्यावर वरून लाकडी फळ्या मारून व आजूबाजूंनी या फळ्यांना उतार देऊन एक मोठी मंडपाची आकृती तयार करण्यात येते. आतील बाजूला निरनिराळ्या प्रकारांनी आपआपल्या सोयीप्रमाणे लाकडी अगर कातडी भिंतींचा आडोसा तयार करून लहान अथवा मोठे घर, वाडा किंवा क्वचित राजवाडा बांधून काढावयाचा, अशी ही प्राथमिक स्थापत्याची अवस्था होती. जपानमध्ये मिळणारे लाकूड भक्कम असल्याने अशा केवळ लाकडी इमारती शेकडो वर्षे सुस्थितीत राहू शकतात. खर्चाच्या दृष्टीनेही अशा लाकडी इमारती किफायतशीर असतात.

२) या नंतरचे जपानी स्थापत्यांतील दुसरे पर्व म्हणजे त्यावर चिनी लोकांच्या चालीरीतींचा पडलेला प्रभाव हे होय. जपानमध्ये लोकप्रवाद असा आहे, की इसवी सनाच्या सहाव्या शतकात कोरियामधून जपानमध्ये बुद्धधर्माच्या विचारांची आयात होऊ लागली व लहानमोठी मंदिरे बांधण्यात येऊ लागली. या बुद्ध मंदिरांना लागूनच मोठेमोठे मठ बांधण्यात येऊ लागले. मंदिरांच्या आतील व बाहेरील बाजूंना निरनिराळे रंग देण्यात येऊ लागले. आंतील व बाहेरील बाजूंप्रमाणेच इमारतींची छते व बाहेरील छपराचा भाग हे सुद्धा रंगविण्यात येऊ लागले. अशा रीतीने साध्या सुध्या इमारतींचे रूपांतर विविध रंगी इमारतीत होऊ लागले. या स्थित्यंतरांत ‘ कापूगा ’ ,‘ नागारे’ व ‘ हीये ’ असे तीन निरनिराळे स्थापत्य संप्रदाय होते.

३) इसवी सनाच्या सातव्या शतकात जपान व चीन या दोन देशांमधील दळणवळण पुष्कळच घटले. साहजिकच चिनी आचार-विचारांचा जपानी जीवनावर व स्थापत्यावर होणारा परिणामही कमी कमी होऊ लागला. चिनी संप्रदायातील इमारतीच्या रंगातील भडकपणा हलकेहलके कमी झाला आणि नेत्रदीपक व चित्तथरारक रंगांना फाटा देण्यात येऊन सुलभता, शुचिता,

व साधेपणा या गोष्टींना जपानी स्थापत्यात विशेष प्राधान्य मिळू लागले. या नवीन सांप्रदायाला ' शिंदेझुकुरा संप्रदाय ' असे म्हणू लागले.

४) इसवी सनाच्या बाराव्या शतकापासून कामाकुरा राजघराण्याच्या अमदानीत चिनी-जपानी दळणवळण पूर्ववत सुधारले व चीनमधील बुद्ध-धर्मीय 'झेन ' पंथाचा प्रसार जपानमध्ये शीघ्र गतीने होऊ लागला. याचा परिणाम म्हणजे जपानमधील स्थापत्य ' तेंजीकू ' किंवा हिंदी धर्तीवर होऊ लागले. याच सुमाराला जपानमध्ये लष्करशाहीचा अंमल असल्यामुळे संरक्षणाच्या दृष्टीने इमारतींची छपरे शक्य तितकी खुजी करण्याची प्रथा सुरू झाली. आंतरबाह्य साधेपणा, स्वच्छता व शक्य तितके कमी भडक रंग ही सर्व वैशिष्टये कायमच राहिली. अशा तऱ्हेच्या स्थापत्याला ' शोइनझुकुरी ' असे नाव देण्यात येऊ लागले.

५ ) इसवी सनाच्या सतराव्या शतकापासून जपानी स्थापत्याची आणखी एक नवीन परंपरा सुरू झालेली दिसते. या काळात अनेक नवीन इमारती उभारल्या गेल्या, कित्येक जुन्या व पडिक इमारतींची डागडुजीही करण्यात आली. परंतु या सर्व इमारतींच्या बाबतीत ' गोंगेन ' किंवा ' यात्सुमुने ' नामक स्थापत्याचा प्रकार विशेष प्रकर्षाने आढळून येऊ लागला. या यात्सुमुने प्रकारचे स्थापत्य म्हणजे इमारतीच्या आंतरबाह्य भागात करण्यात आलेला लाखेचा सर्रास उपयोग. विशेषतः तोगुकावा राजघराण्यातील कर्त्या पुरुषांच्या थडग्यांवर व समाधींवर या यात्सुमुने संप्रदयाचा ठसा विशेष उमटलेला दिसतो. शोगून राजघराण्याचे उदाहरण गिरवावे म्हणून कित्येक सरंजामी सरदारांनी आपआपल्या गढ्या व प्रासाद अशा रीतीने बांधून घेतले.

६) जपानी स्थापत्यातील सर्वांत अर्वाचीन प्रकार म्हणजे इ. स. १८६८ साली झालेल्या राज्यक्रांतीनंतरचा होय. या काळात सरंजामशाहीचा नायनाट करण्यात आला. जुने ते सर्व रद्दी, असे मानण्यात येऊ लागले. पाश्चिमात्य आचार-विचार, राहाणी, पेहेराव वगैरेंचा जपानी स्थापत्यावर जबरदस्त प्रभाव पडू लागला. इमारतींकरिता शक्यतो कमी लाकूड वापरून विटांचा उपयोग जास्तीत जास्त करण्याला याच युगात सुरवात झाली. त्यानंतर आजतागायत जपानी स्थापत्यांत साधेपणा, स्वच्छता, व सुबकपणा या गुणांची पूर्वीप्रमाणेच जोपासना केली जाते.

६५७८८ मू.प्र. २९६ 29/3/09

## जपानी भाषा

जपानी भाषा ही एक संयोगी किंवा जोडभाषा असून तिच्या उगमासंबंधी अजूनही निरनिराळे विचार-प्रवाह असल्याचे दिसते. ही भाषा चिनी व कोरियन भाषा यांचा संयोग किंवा मिश्रण आहे असे म्हणावयास हरकत नाही. अगदी सुरवातीच्या काळात जपानी लोकांनी चिनी कल्पनाचिन्हांची उसनवारी केली. कालांतराने या कल्पनाचिन्हांचा उच्चार इतका बदलला, की त्यांचे चिनी उच्चारांशी फारसे साम्य उरले नाही. ही कल्पनाचिन्हे लाखांनी मोजता येण्यासारखी असली, तरी सर्वसाधारण सुशिक्षित जपानी मनुष्य जेमतेम ७–८ हजार कल्पनाचिन्हांवरच आपली भाषेची गरज भागवू शकतो.

चिनी कल्पनाचिन्हांची जपानमध्ये प्रथम उसनवारी करण्यात आल्यावर उच्चारांप्रमाणे त्यांचे दोन भाग झाले, ते असे – १) काताकाना व २ ) हिरागाना. या प्रत्येकात ५० अक्षरे आहेत. यापैकी हिरागाना ही पद्धती लेखनाकरता उपयोगात आणली जाते.उच्चार व लिपी यांच्यातील ही तफावत काढून टाकण्याकरता मध्यंतरी रोमन लिपीचा लेखनासाठी व उच्चारासाठी सर्रास वापर करावा, अशा हेतूने ' रोमाजी ' नामक एक चळवळ जपानमध्ये सुरू झाली होती. परंतु जनतेकडून तिला फारसा पाठिंबा मिळाला नाही.

जपानी आकडे दोन प्रकारचे आहेत. १ ) जपानी व २) चिनी. खालील कोष्टकांवरून त्यांचीं कल्पना येईल.

| जपानी | चिनी | इंग्रजी | मराठी |
|---|---|---|---|
| हिनोत्सू | इची | वन् | एक |
| फ्यूतात्सू | नी | टू | दोन |
| मित्सू | सान | थ्री | तीन |
| योत्सू | शी | फोर | चार |
| इत्सुत्सू | गो | फाइव्ह् | पाच |
| मुत्सू | रोक् | सिक्स | सहा |
| नानात्सू | शिची | सेव्हन | सात |

| | | | |
|---|---|---|---|
| यात्सू | हाची | एट | आठ |
| कोकोनोत्सू | कू | नाइन | नऊ |
| तो | जू | टेन | दहा |

वर दिलेले जपानी व चिनी अशा दोन्ही प्रकारचे आकडे जपानात सरसहा प्रचारात आहेत.

## जपानी साहित्य

गुणवत्तेच्या व संख्येच्या दृष्टीने जपानी साहित्य पौर्वात्य भाषांच्या साहित्यात अग्रेसर आहे. जपानी साहित्यात इतर साहित्याप्रमाणे कथा, कादंबरी, काव्य, नाटच, हेच प्रकार विशेष महत्त्वाचे दिसतात.

जपानी साहित्याला चिनी साहित्यापासून स्फूर्ती मिळाली असावी. इसवी सनाच्या पाचव्या शतकात ज्या वेळी चिनी साहित्याचा विशेष बोलबाला होत होता, त्या वेळी जपानमध्ये भाषेलाही पत्ता नव्हता; मग साहित्य कोठून येणार ? कोरियाच्या मार्गाने चिनी संस्कृतीचा जपानमध्ये शिरकाव होऊ लागल्यावरच चिनी साहित्याच्या अनुषंगाने जपानी साहित्याचा श्रीगणेशा झाला, असे म्हणावयास हरकत नाही.

सुरवातीच्या काळातील जपानी साहित्य हे जपानी भाषेत लिहिले न जाता, ते चिनी भाषेतच लिहिले जाई. जपानी भाषेतील व जपानी लिपीतील पहिले ग्रंथ म्हणजे ' कोजिको ' व ' निहोंजी ' हे होत. वस्तुतः हे दोन्ही ग्रंथ म्हणजे त्या वेळच्या राज्यकर्त्यांनी लिहवून घेतलेली वर्णनेच होत. साहजिकच या ग्रंथांत दंतकथा, काल्पनिक वर्णने वगैरेंची भरपूर खैरात केलेली दिसते.

## शोगुन

शोगुन याचा अर्थ जनरॅलिस्सिमो किंवा सरसेनापती असा असून, जपानी राजकारणात व समाजकारणात या शोगुनांचे फार मोठे प्रस्थ दिसते. इ. स. ८१३ मध्ये ' क्वामू ' या नावाच्या एका जपानी बादशहाने उत्तर जपानमधील मागसलेल्या व बंडखोर आयनू लोकांच्या विरुद्ध सशत्र कारवाई करण्याकरता ' शोगुन ' हा किताब देऊन एका लष्करी अधिकाऱ्याची रवानगी केली. काही काळापर्यंत या शोगुनबद्दल जपानी जनतेत फारसे कुतूहल दिसले नाही. परंतु पुढे इसवी सनाच्या बाराव्या शतकात योरितोमो

मिनायोतो नामक एका लष्करी अधिकाऱ्याने त्या वेळच्या सर्व जपानी सरंजामदारांस बाजूला सारून सर्व लष्करी व मुलकी सत्ता आपल्या हाती घेतली व जपानच्या बादशहाला नाममात्र राजा ठरविले. त्या वेळेपासून या 'शोगुन' व्यक्तींचा फारच बोलबाला होऊ लागला. थोडक्यात म्हणजे सिंहासनावर कोणताही राजा असला, तरी हे शोगुन व त्यांचे वंशज पुढे सर्व-सत्ताधारी बनले. जपानच्या अर्वाचीन इतिहासात जपानी राजांची कारकीर्द मुळी उरलीच नाही; तर त्याऐवजी या निरनिराळ्या शोगुनांचीच कारकीर्द जिकडे तिकडे गाजू लागली. 'शोगुन' हा किताब वंशपरंपरागत चालू झाला. या शोगुनांपैकी 'आशिकागी' या घराण्याने इ. स. १३३८ ते १५७३ पर्यंत आपला अंमल जारी केला. त्यानंतर इ. स. १६०३ ते १८६८ पर्यंत तोगुकावा या आणखी एका नामवंत शोगुनाचा अंमल चालू झाला. इ. स. १८६८ मध्ये जपानमध्ये जी क्रांती झाली, त्या क्रांतीत शोगुनांची सत्ता संपुष्टात येऊन पुन्हा पूर्वीच्या राजघराण्यांकडे सत्ता आली.

तोगुकावा शोगुन घराण्यापैकी तिसरा शोगुन आयेमित्सू याने जपानी समाजाला एक विशेष पद्धती ठरवून दिली. या काळात जपानमध्ये त्रैवर्ण्याची पद्धत होती. हे त्रिवर्ण म्हणजे (१) 'कुगे' किंवा राजाचे नातलग, त्याच-प्रमाणे सगे, सोयरे, इत्यादी, (२) 'बुके' किंवा लष्करी अधिकारी (या बुके-नाच पुढे 'सामुराई' असे म्हणण्यात येऊ लागले.) व (३) 'हायमिन' किंवा सर्वसाधारण मध्यमवर्ग. या त्रिवर्णांपैकी कुगे हे स्वतःला राजाचे (राज-घराण्याचे) किंवा मोठमोठ्या देवदेवतांचे वंशज समजत असत. साहजिकच समाजात त्यांना सर्वांत श्रेष्ठ मान दिला जाई. कालांतराने या कुगे पैकी बरेचजण आर्थिक दृष्टया हलाखीला आले. त्यांच्यापैकी काही कुगेंना 'दायमिओ' असेही म्हणण्यात येऊ लागले. (यांनाच 'फुदायी' असेही आणखी एक नाव असे.) आयेमित्सू शोगुनाने नव्याने पादाक्रांत केलेल्या मुलुखापैकी काही भाग अशा कर्तृत्ववान दायमिओस दिला व त्यांना पुन्हा नावारूपास येण्यास मदत केली. आयेमित्सूने या डायमिओ कुटुंबांतील व्यक्तींना दायमिओ खेरीज इतर कुटुंबांशी बेटीव्यवहार करण्यास मनाई केली. यानंतर या दायमिओंना राजवंशातील व्यक्तींशीही विवाहबंदी केली गेली. थोडक्यात सांगायचे तर, या परिस्थितीमुळे कुगे समाजातील उच्चवर्णीयांचे दोन भाग

पडले. १ ) फुदाई. हे लोक तोगुकावा शोगुनशी इमान राखून असत. व २ ) 'तोझामा'. हे शोगुनांशी इमानी असले, तरी फुदाई पेक्षा जास्त स्वतंत्र व स्वाभिमानी असत.

या दायमिओ घराण्यांची मालमत्ता व त्यांच्या सांपत्तिक परिस्थितीचे मोजमाप म्हणजे 'कोकू' हे होय. एक 'कोकू' म्हणजे सुमारे १३ – १४ रुपये इतकी किंमत असलेले माप. अमूक दायमियोची मालमत्ता किती कोकूची आहे, यावर त्यांचा समाजातील दर्जा अवलंबून असे. जपानी लोकांचे मुख्य अन्न म्हणजे तांदूळ हे होय. साहजिकच दायमिओंच्या मालकीच्या एकंदर जमिनीतून तयार होणाऱ्या तांदळाला कोकू हे माप वापरले जाई. दायमियोंच्या एकंदर जमिनींतून जो तांदूळ उत्पादन केला जाई, त्यापैकी अर्धा हिस्सा उत्पन्नाची वहिवाट प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या कुळाला ठेवून, बाकीचा अर्धा हिस्सा दायमिओंना मिळे. आपल्याकडे कोकणातही एखाद्या गृहस्थाची श्रीमंती त्याच्या मालकीच्या शेतातील तांदळाच्या उत्पादनावरून ठरविली जात असे. या काळात जपानमध्ये 'कागाचे मायेदा' हे दायमियो घराणे सर्वात श्रीमंत म्हणजे १० लाख कोकूचे उत्पन्न असणारे असे समजले जात असे.

तोगूकावा शोगुनांचे तीन निरनिराळे भाग किंवा घराणी पुढे सुरू झाली. त्यांची नावे अशी – १ ) मितो, २) कीई व ३) ओवारी. आयेमित्सू शोगुनने आपल्या तीन मुलांना आपली सर्व इस्टेट वाटून दिली व म्हणून त्याच्या पश्चात वर दिलेली तीन घराणी स्वतंत्र झाली. शोगुनांखेरीज जे इतर सामुराई सरंजामदार होते, त्यांसही वतने किंवा लहान-मोठ्या जहागिरी दिलेल्या असत. या सामुराई सरंजामदारांना मिळालेल्या जहागिरी या बहुधा त्यांनी वेळोवेळी निरनिराळ्या युद्धांत बजावलेल्या कामगिरीबद्दल व दाखविलेल्या मर्दुमकीबद्दल मिळालेल्या असल्याने या जहागिरींबद्दल त्यांना कसलेही कर भरावे लागत नसत. या सामुराई सरंजामदारांपैकी 'हानामातो' नामक सामुराई हे शोगुनच्या खास विश्वासातले किंवा त्यांच्या 'हुजुरात' पागेपैकी म्हणून ओळखले जात. साहजिकच दायमिओ वर्गात या हानामातो' सामुराई कुटुंबांना बराच वरचा मान असे.

हायमिन किंवा सामान्य जन या वर्गात १ ) शेतकरी, २ ) कारागीर किंवा तंत्रज्ञ व ३ ) व्यापारी या तीन पेशांच्या लोकांचा समावेश होत असे.

त्यांच्यापैकी फक्त शेतकरी वर्गातील पुरुषांना एकच तलवार जवळ बाळगण्याची परवानगी असे. ( एकाच वेळी दोन तलवारी धारण करण्याचा मान फक्त सामुराई वर्गालाच होता. ) बाकीच्या कारागीर व व्यापारी वर्गातील लोकांना तर त्या काळी साधी तलवार धारण करण्याचीसुद्धा मुभा नसे. त्यातल्या त्यात व्यापारी वर्गाबद्दल तर त्या काळी एक प्रकारची तुच्छताच दिसून येई. त्यामुळे त्रैवर्णिकांत या व्यापारी वर्गाच्या कुटुंबियांचे स्थान साहजिकच फार खालचे होते.

या त्रैवर्णिक समाजव्यवस्थेत आणखी एका ' शूद्र ' जनसमुदायाचा समावेश होत असे. पशूहत्या करणारे व फाशीची शिक्षा झालेल्या व्यक्तींना देहदंड देणारे लोक सर्वांत खालच्या वर्गात मोडत असत. या लोकांना ' इटा ' किंवा ' हिनित ' म्हणजे अस्पृश्य असे म्हणण्यात येत असे. अस्पृश्यांना इतर जपानी समाजापासून निराळे राहावे लागे. त्यांची वसतीही स्वतंत्र असे त्यांचा इतर जपानी त्रैवर्णिकांशी रोटी-बेटी व्यवहार होऊ शकत नसे.

जपानमध्ये प्रथमपासूनच कोर्टकचेऱ्यांबद्दल एक प्रकारची घृणा आढळून येत असे. सर्व प्रकारची भांडणे कोर्टात न जाता शक्यतोवर आपआपसात मिटविली जात. जमीनविषयक तंटे जमिनीच्या मालकांकडून किंवा सरंजामदारांकडून सोडविले जात असत. लहानलहान सरंजामदारांमधील तंटे शोगुनकडून सोडविले किंवा मिटविले जात असत.

### जपानमधील शिक्षण

फार पुरातन काळी चीन व कोरिया येथील लोकांनी जपानमध्ये येऊन वसाहती केल्या. साहजिकच सुरवातीच्या काळात हे नवीन वसाहतवाले. आपल्या मुलाबाळांस ज्ञानोपार्जनाकरता चीनमध्ये पाठवीत असत. त्या वेळी जपानमध्ये सरसहा चिनी भाषा, चिनी लिपी व चिनी वाङ्मय यांचेच प्रावल्य होते. जपानी राजघराण्यांची वृत्ते, राजकीय कागद-पत्रे, इ. सर्व चिनी भाषेत असत. अर्थातच तरुणांना चीनमध्ये शिक्षणाकरता पाठवणे फार खर्चाचे काम असल्यामुळे, मोठमोठ्या व श्रीमंत घराण्यांतील मुलांच्या बाबतीतच ती गोष्ट शक्य होत असे. हळूहळू जसजसा शिक्षणाचा फैलाव होऊ लागला, तसतसे शिक्षण जपानमध्येच मिळावे, सर्वप्रकारची

शैक्षणिक सोय जपानमध्येच व्हावी, असे सर्वसाधारण जपानी जनतेस वाटू लागले. मग ' तारा ' या राजधानीच्या ठिकाणी एका विश्वविद्यालयाची स्थापना करण्यात येऊन, तेथे विद्यार्जनाचे कार्य सुरू झाले. पुढे जपानची राजधानी तारा येथून कियोतो येथे हलविण्यात आल्यामुळे, आपोआपच ताराचे विश्वविद्यालयही कियोतो येथे हलविण्यात आले. या विद्यापीठात चिनी भाषा, चिनी लिपी व चिनी संस्कृती यांचाच अभ्यास विशेषत: केला जात असे.

याच सुमारास जपानमधील विद्यालयांचीही वाढ होऊ लागली. मोठमोठी घराणी आपल्या व आपल्या आश्रितांच्या मुलांकरिता विद्यालये स्थापन करू लागली. हळूहळू या विद्यालयांमध्ये विशिष्ट तऱ्हेच्या व विशिष्ट विषयांच्या अध्ययन अध्यापनाकडे विशेष लक्ष देण्यात येऊ लागले. मोठमोठ्या अधिकाराच्या जागा या खानदानी व राजघराण्यांशी संबंध असलेल्या कुटुंबियांचीच मक्तेदारी असल्यामुळे या विद्यालयीन शिक्षणाचा फायदा सर्वसाधारण जनतेला मिळत नसे.

आयेमित्सू हा शोगुन अधिकारावर असताना त्याने शिक्षणावर विशेष भर दिला. त्या वेळेपर्यंत चिनी ही राजभाषा समजली जाई. उत्तम चिनी बोलणे, स्वच्छ व सुवाच्य चिनी लिहिणे, चिनी भाषेत लहान मोठ्या कविता करणे, इ. गोष्टीत प्रवीण असणे हा मोठमोठ्या अधिकाराच्या जागा मिळविण्याचा एक राजमार्ग समजला जाई. बुद्ध भिक्षूंखेरीज इतरांना शिक्षकाचा पेशा स्वीकारण्यास प्रतिबंध होता, तो आयेमित्सूने प्रथम रद्द केला. त्यामुळे विद्यादानासारखे एक महत्त्वाचे कार्य एका विवक्षित जातीचे किंवा जमातीचे न राहता ते लायकीप्रमाणे कोणालाही करता येईल, असा एक नवा पायंडा पाडला गेला.

तोगूकावा शोगुनांच्या कारकीर्दीत शिक्षणाचाच नुसता फैलाव झाला असे नाही, तर जपानचा भूगोल तयार करणे व त्याची विद्यार्थ्यांना माहिती देणे; जपानी भाषा व लिपी यांना उत्तेजन देऊन जपानी भाषेतील ग्रंथांना सरकारी अनुदान येणे; यासारख्या कित्येक नवीन गोष्टींना चालना मिळाली. याच सुमाराला ' आराई हाकुसेकी ' या एका नामवंत जपानी लेखकाचे 'राईयो किबून ' किंवा पाश्चात्य अफवांचा संग्रह व ' साईरान ईगेन ' किंवा परकीय भाषेची माहिती या नावांचे दोन ग्रंथ प्रसिद्ध झाले. याच शोगुनाच्या कारकीर्दीत

येदो या राजधानीमध्ये सरकारी खर्चाने ' बानझो शिरावेडॉकोरो ' या नावाची परकीय भाषांचे शिक्षण देणारी एक संस्था किंवा विद्यालय सुरू करण्यात आले. इ. स. १८६२ मध्ये ' कायसाय जो ' नामक दुसरी एक सरकारी संस्था निरनिराळ्या संस्कृतींच्या अभ्यासाकरिता सुरू करण्यात आली.

इ. स. १८६८ च्या सत्तांतरानंतर राज्यकर्त्यांनी शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावयास सुरवात केली. ' मोनुबुशो ' किंवा शिक्षण मंत्रालयाची स्थापना करण्यात येऊन शिक्षण मंत्र्याला मंत्रिमंडळात स्थान दिले गेले. त्यानंतर युरोप व अमेरिकेतील पुष्कळ पुढारलेल्या देशांत एक जपानी शिष्टमंडळ पाठविण्यात आले. त्या निरनिराळ्या देशांतील शिक्षणाची माहिती, प्रगती व व्यवस्था इत्यादींचे निरीक्षण करून त्याप्रमाणे जपानमधील शिक्षणाची पुनर्घटना करण्यात आली. इ. स. १८७२ मध्ये प्रथमच एक शिक्षण संहिता तयार करण्यात आली. त्यानुसार प्राथमिक शिक्षण सर्वत्र व सक्तीचे करण्यात आले. इ. स. १८७३ ते १८७९ पर्यंतच्या सहा वर्षांच्या काळात प्राथमिक शाळांची संख्या आठ हजारांवरून जवळजवळ सव्वीस हजारांवर गेली. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही या काळात दहा लाखांवरून पंचवीस लाखांवर गेली. याच काळात सरकारी व खाजगी माध्यमिक विद्यालयांची संख्या वीस वरून जवळ जवळ सातशेंच्या घरात गेली. इ. स. १८७७ मध्ये तोकियो येथे पहिल्या शाही रॉयल विश्वविद्यालयाची स्थापना झाली. इ. स. १९३८ मध्ये प्राथमिक शाळांची संख्या लाखाच्यावर असून, त्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सव्वा कोटीहूनही जास्त होती. जपानी लोकांनी पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीला अनुसरून आपल्या शिक्षणाची जरी पुनर्रचना केली, तरी त्यांतही आपले वैशिष्ट्य राखले. खालील बाबी पहा :–

१) पाश्चात्य देशांतील वैज्ञानिक शिक्षणाची जपानच्या भौगोलिक व सांस्कृतिक जीवनाशी सांगड घालण्यात आली. पाश्चात्यांची आंधळी नक्कल टाळण्यात आली.

२) रसायन शास्त्र, खगोलशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र व जीवशास्त्र या विषयांचे सर्वांगीण शिक्षण मुक्तहस्ते मिळण्याची सोय करण्यात आली. याचा परिणाम असा झाला, की थोडक्याच काळात जपानी विद्यार्थ्यांना या निरनिराळ्या विषयात विशेष प्रावीण्य दाखविण्यास मदत झाली.

३) विश्वविद्यालयांतून स्थापत्यशास्त्र व आरोग्यशास्त्र यांच्याही अध्ययन-अध्यापनाला सुरवात करून, त्या शास्त्रांच्या अभ्यासात निरनिराळ्या विद्यार्थ्यांनी अहमहमिकेने भाग घ्यावा अशी व्यवस्था केली.

४) पाश्चात्य शिक्षणशास्त्रात अनुस्यूत असलेल्या बुद्धिवाद, स्वातंत्र्य, आचार-विचार वगैरे बाबतीत मात्र जपानी शिक्षण तज्ज्ञांनी थोडीशी मर्यादा घातली. पाश्चात्य शिक्षणाबरोबर प्रत्येक जपानी विद्यार्थी हा आज्ञाधारक व पूर्वजनांना न विसरणारा असा व्हावा, या दृष्टीने एकंदर शिक्षणाची आखणी करण्यात आली. आत्मिक बलाबरोबरच वडीलधाऱ्या व मोठ्या मंडळींबद्दलचा आदर यांची कदर व जोपासना ही अत्यंत आवश्यक बाब समजून ती प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्यक्ष कृतीत आणली पाहिजे, याकडे कटाक्षाने लक्ष देण्यात येऊ लागले.

५) इ. स. १९३१ नंतर लष्करी शिक्षण सक्तीचे करण्यात येऊन, माध्यमिक विद्यालयापासून त्याला सुरवात करण्यात आली. याप्रमाणे युद्धशास्त्राचे बाळकडूच जपानी तरुणांना मिळू लागले.

६) जपानमध्ये प्राथमिक शिक्षण जरी सक्तीचे व मोफत करण्यात आले असले, तरी माध्यमिक व उच्च शिक्षण हे मग ते तांत्रिक किंवा इतर कसलेही असो – फक्त लायकीवर अवलंबून ठेवण्यात आले. त्यामुळे केवळ बुद्धिमान विद्यार्थ्यांनाच माध्यमिक व उच्च शिक्षण मिळणे शक्य झाले व एकंदर शिक्षणाचा दर्जाच उंचावला गेला.

७) माध्यमिक व उच्च शिक्षण लायकीच्या तत्त्वावर आधारल्यामुळे प्राथमिक शिक्षणक्रम पुरा केलेल्या अशा असंख्य विद्यार्थ्यांचा प्रश्न जिव्हाळ्याचा होऊन बसला. त्यांच्या बुद्धीचा व कामाचा कल पाहून त्यांच्याकरता काही खास यांत्रिक व तांत्रिक शिक्षणाची सोय करण्यात आली.

८) सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षणाचे विकेंद्रीकरण करण्यात आले नाही ! प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण हा समाजाचा मूलभूत पायाच असल्यामुळे शिक्षण खात्याचा कारभार हा सरकारी पातळीवरूनच चालू राहिला. राजकारणातील पक्षोपपक्षांच्या धामधुमींत व सावळ्या गोंधळात शिक्षणाची कशी परवड होते हे अलिकडेच भारतातील जिल्हा परिषदांच्या व पंचायत राज्यांच्या स्थापनेपासून आपल्याला दिसून येऊ

लागले आहे. शिक्षण, आरोग्य वगैरेंसारख्या मुख्य बाबी खरोखर वादातीत असावयास पाहिजेत; पण सत्तेच्या झोंबाझोंबीत चांगल्या कार्याचाही कसा विचका होतो, ते आपल्याला प्रत्यही जाणवते आहे. या पार्श्वभूमीवर जपानचे हे धोरण उठावदार ठरते.

परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर जपानमधील एकंदर शिक्षणाची नव्याने पुनर्रचना करण्यात आली. शिक्षण खात्यांत, सत्तेच्या विकेंद्रीकरणास महत्त्व देण्यात येऊ लागले. माध्यमिक शिक्षणाकरता ठेवली गेलेली लायकीची अटही बरीचशी सैल करण्यात आली.





# पर्वेतिहास

जपानविषयी सर्वात प्रथम माहिती देणारे दोन ग्रंथ म्हणजे ' कोजिकी ' व ' निहोंजी ' हे होत, हे आपण मागील प्रकरणात पाहिलेच. जपानी भाषेत सर्वप्रथम लिहिलेल्या या ग्रंथांत जपानबद्दलची स्पष्ट माहिती नसून, त्यात दंतकथा, आख्यायिका, इत्यादींचेच भारूड जास्त आहे हेही आपण पाहिले. या दोन्ही ग्रंथांतून जपानच्या उत्पत्तीविषयी जे वर्णन आहे, त्यावरून जपानी लोकांची व भूमीची उत्पत्ती ईश्वरेच्छेमुळे झाली व त्या उत्पत्तीत ' आमातेरासू ' ही सूर्यदेवता व ' सुसानू 'हा तिचा भाऊ या दोघांनी फार महत्त्वाचा भाग घेतला असे कळते. त्याच ग्रंथात पुढे असेही म्हटले आहे, की सुसानू हा प्रथम कोरिया देशांतील ' सिल्ला ' येथे आकाशातून उतरला व तेथून त्याने जपानमधील ' इझुमो ' येथे आपले प्रस्थान ठेविले. पुढे तेथेच त्याच्या पिढ्या उत्पन्न झाल्या. त्याचप्रमाणे आमातेरासू या सूर्यदेवतेने जपानवर राज्य

करण्याकरता पाठविलेला देवदूत इझुमो येथील जपानी राज्यकर्त्यांबरोबर बोलणी करून मग दक्षिण कियूशू प्रांतातील ' हिद्रगा ' येथे आला व तेथेच त्याने आपले स्वतंत्र राज्य स्थापले.

कियूशू प्रांतात ' जिम्मू तेन्नो ' या नावाचा पहिला राजा राज्य करीत असल्याचा सर्वांत जुना उल्लेख आढळतो. आपल्या राज्याचा विस्तार करण्या-करता जिम्मू तेन्नो जपानी भूमध्य समुद्राच्या उत्तर किनाऱ्यावर आला व तेथील लोकांशी युद्ध करून त्याने त्या वेळच्या ' यामोतो ' या भागावर (सध्याचे मध्य होनशिऊ ) आपले वर्चस्व स्थापले. हा जिम्मू तेन्नो राजा व त्याचे वंशज यांच्याबद्दलची पुष्कळ माहिती कोजिकी व निहोंजी या दोन ग्रंथात दिलेली आहे. या जिम्मू वंशाच्या एकंदर कारभारावरून खालील गोष्टी स्पष्टपणे कळून येतात –

१) या घराण्याच्या कारकीर्दीत स्त्रियांना फार मान देण्यात येत असे. इतकेच नव्हे; तर स्त्रियांना राजपदसुद्धा मिळू शकत असे. उदाहरणार्थ, महाराणी जिंगो हिने तर जपानच्या वायव्य व पश्चिमेकडील कोरियावर स्वारी केली व तेथे आपले वर्चस्वही स्थापन केले.

२) या घराण्याच्या कालखंडात बहुपत्नीकत्व रूढ असल्याचे दिसते. राजे व इतर सरदार–दरकदार, मानकरी, लष्करी अधिकारी वगैरे लोकांना अनेक स्त्रिया असत. निहोंजी या ग्रंथात ' काईको ' या बादशहाने आपल्या निरनिराळ्या सुमारे ८० अपत्यांना जमिनी वाटून दिल्या असल्याचे स्पष्ट उल्लेख आहेत. मध्ययुगात सरंजामशाहीचा उदय जवळजवळ अशाच तऱ्हेने झाला व ही गोष्ट प्रत्येक देशाच्या बाबतीत दिसून येते.

३) या राजघराण्याच्या अमदानीत शेतीला उपयुक्त असे पाटबंधारे व धरणे बांधण्यात आली. 'सुईनिन' या जिम्मू घराण्यातील एका बादशहाने जवळजवळ ७००–८०० लहान-मोठी धरणे बांधून शेतीला ऊर्जितावस्था आणून दिल्याचे स्पष्ट उल्लेख आहेत.

४) याच राजघराण्याच्या कारकीर्दीत जलप्रवासाकरता जहाजांचा उपयोग सुरू झाला. इतकेच नव्हे, तर एका राजफर्मानाने त्या राज्याच्या प्रत्येक प्रांतास जहाजे बांधवून घेण्याचे हुकूम देण्यात आलेले होते.

५) बादशहा काईकोनंतर सिंहासनावर आलेल्या ' यामातो ताकेरू '

या राजाने जपानमधील मागसलेल्या व डोंगराळ भागात राहणाऱ्या आईनू लोकांवर अनेक स्वाऱ्या केल्या. या स्वाऱ्यांमुळे यामातो-ताकेरा याच्याविषयी जपानी जनतेला फारच आदर वाटू लागला. परंतु राजा यामातो-ताकेरा अगदी तरुण वयातच कालवश झाला. त्यानंतर त्याच्या स्मरणार्थ अनेक ठिकाणी त्याचे पुतळे उभारण्यात आले.

६) या काळात राजा हाच प्रजेचा पालनकर्ता असल्यामुळे तो सर्वश्रेष्ठ समजला जाई. राजा नेहमी प्रजेचे हितच पाहतो. व सर्वसाधारणपणे तो प्रजेचे सुख तेच आपले सुख असेही मानतो. ' यूरिआकू' व ' बुरित्सू ' या दोन राजांखेरीज बहुतेक सर्व राजे नीतिनियमांचे स्वत: पालन करीतच; पण प्रजेलाही त्याप्रमाणे वागावयास लावीत. युरिआकू व बुरित्सू हे दोघेच अपवादात्मक राजे निघाले व त्यांच्या प्रत्येकाच्या कारकीर्दीत जुलूम, जबरदस्ती व अनीती यांचा धुमाकूळ चालू होता.

७) याच काळात सरंजामशाहीचा उदय झाला. सरंजामदार साधारणत: दोन प्रकारचे असत. (अ ) ' ओमी ' म्हणजे राजघराण्याशी रक्ताचे संबंध असलेले व ( ब ) ' यूराजी ' म्हणजे स्वकष्टार्जित मानमरातब मिळविणारे. प्रत्येक नवीन राजा गादीवर बसताना तो एक ओमी राज्यकारभाराकरता व एक यूराजी सेनापती म्हणून अशा दोघांची निवड करीत असे. याखेरीज जपानच्या निरनिराळ्या भागातील महत्त्वाच्या जातींचे म्होरके, त्या त्या प्रांतांचे हवालदार किंवा ' कुनी-नो-मियाको ' म्हणून नेमीत असत.

८) सुतारकी, जहाजे बांधणे, जंगलांतील मोठमोठी लाकडे तोडणे, वगैरे कामात कुशल असलेल्या लोकांचे संघ स्थापले जात व अशा तंत्रज्ञांच्या संघांस ' बे ' असे नाव दिले जाई.

इसवी सनाच्या सहाव्या शतकात पाकचेच्या राजाकडून जपानी बादशहाकडे एक शिष्टमंडळ धाडण्यात आले. या शिष्टमंडळाकडे जपानी बादशहाकडून पाकचेच्या राजाला सैन्य व इतर कुमक मिळविण्याचे काम सोपविण्यात आले होते. या शिष्टमंडळाने पाकचेच्या राजाच्या वतीने जपानी बादशहाला एक बुद्धाचा पुतळा नजराणा म्हणून दिला. या वेळेपासून जपानमध्ये बुद्ध-धर्माच्या शिरकावास व प्रसारास सुरवात झाली, असे म्हणावयास हरकत नाही. याच सुमाराला जपानमधील एक सर्वश्रेष्ठ सरंजामदार 'सोगा ' याने

स्वत: बुद्धधर्माची दीक्षा घेतली. या नंतर जपानमध्ये बुद्धधर्माचा फैलाव होण्यास वेळ लागला नाही. याच सुमाराला ‘ उपायादो ’ या नावाच्या राजाने बुद्धधर्माचा स्वीकार करून, बुद्धधर्मास राजाश्रय मिळवून दिला. याच उपायादो राजाने ‘ होरीउजी ’चे एक मोठे बुद्धमंदिर बांधले.

चीन व जपान या दोन देशांच्या राजघराण्यांमध्ये मैत्री वाढू लागली. एकमेकांच्या दरबारी एकमेकांचे राजदूत राहू लागले. याचा परिणाम जपान-मधील बुद्धधर्माच्या प्रसारास जोराने चालना मिळण्यात झाला. सोगा या सरंजामदाराने प्रथम बुद्धधर्माचा स्वीकार करून, नंतर लगोलाग त्याला राजाश्रयही मिळवन दिला. या गोष्टीमुळे सोगाकुटुंबाचे वर्चस्व जपानमध्ये इतके वाढले, की हे सोगाकुटुंब म्हणजे जणू काही जपानचे अनभिषिक्त राजघराणेच असा त्यांच्याबद्दल समाजात दबदबा उत्पन्न झाला.

इसवी सनाच्या तेराव्या शतकात चीनवर मोंगोल लोकांनी स्वारी केली व सर्व चीन आणि कोरिया आपल्या ताब्यात घेतला. त्या वेळी मोंगोल सरदार कुबलाखान याला चीनचे शेजारी राष्ट्र जपान हेही स्वारी करून पादाक्रांत करावे, अशी इच्छा झाली. इ. स. १२७४ च्या सुमाराला कुबलाखानाच्या सैन्याने जपानच्या दक्षिणेकडील कियूशू बेटावर हल्ला चढविला; परंतु तो लागलीच परतविण्यात आला. या वेळी कामाकुरा या नावाचा राजा जपानमध्ये राज्य करीत होता. लवकरच जपानमध्ये मध्यवर्ती सरकारच्या कमकुवतपणामुळे अराजक माजले. निरनिराळ्या भागात निरनिराळे सत्ताधीश बलवान झाले व ते मध्यवर्ती सत्तेला जुमानीतनासे झाले. याप्रमाणे जपानमध्ये सुरू झालेल्या सत्तास्पर्धेत नोकुनारा, हिदेयोशी, आयेयासू, तोगुकावा, आशीकामा वगैरे निरनिराळी सरंजामी घराणी होती. नोकुनाराच्या हाताखाली एक किरकोळ मोतद्दार म्हणून नोकरी करणारा हिदेयोशी हा आपल्या अंगच्या गुणांनी व अक्कलहुशारीमुळे पुढे लवकरच नोकुनाराची सर्व सत्ता बळकावून बसला. याच हिदेयोशीच्या कारकीर्दीत स्पॅनिश, पोर्तुगीज व ख्रिश्चन धर्माच्या पाद्री लोकांनी जपानमध्ये आपले हातपाय पसरण्यास सुरवात केली. या हिदेयोशीला त्याच्या कर्तबगारी, शौर्य आदी गुणांमुळे ‘ जपानचा नेपोलियन ’ असा किताब बहाल करण्यात आला. हिदेयोशी अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. त्याच्या मनात कोरिया व चीन हे दोन देश

स्वारी करून जिंकावयाचे होते. त्यांपैकी कोरियावर स्वारी करून तो प्रदेश त्याने नंतर जिंकला; पण चीनच्या बाबतीत मात्र त्याला अपयश पदरी घ्यावे लागले.

हिदेयोशीच्या पश्चात जपानच्या राज्यकारभाराची सूत्रे आयेयासूकडे आली. त्याच्या अमदानीत म्हणजे इसवी सनाच्या सतराव्या शतकाच्या सुरवातीला डच लोकांचे पाय जपानी किनाऱ्याला लागले. हिदेयोशी व आयेयासू या दोघांसही परकीय व्यापार संबंध राखणे आवश्यक वाटत होते. 'लोफदे' या डच जहाजावरोबर विल अडॅम्स या नावाचा एक इंग्रज गृहस्थ त्या जहाजाचा कप्तान म्हणून आला. या अडॅम्सला आयेयासूने ओसाकाला बोलाविले व त्याला येदो (जपानी सरकारचा मुख्य जहाज बांधणी अधिकारी) म्हणून नेमून भरपूर मालमत्ता देवविली. इ. स. १६२० मध्ये अडॅम्स मरण पावला. त्याच्या हयातीतच जपानी सरकारने डच ईस्ट इंडिया कंपनीला 'हितेको' येथे एक गुदाम उघडण्याची व व्यापार करण्याची परवानगी दिली.

डचांच्या मागोमाग इ. स. १६१३ च्या सुमाराला कॅप्टन जॉन सॅरिस याला इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीतर्फे व्यापार करण्याला परवानगी मिळाली. डच व इंग्रज व्यापाऱ्यांबरोबर त्या त्या देशांतून काही पाद्रीही आले होते व त्यांनी जपानमध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यास सुरवात केली. इ. स. १६१६ मध्ये आयेयासू परलोकवासी झाला व त्याच्या मागून हिदेतादा या त्याच्या मुलाकडे जपानच्या राज्यकारभाराचा वारसा आला. ख्रिश्चन पाद्र्यांचे वाढते उपद्व्याप पाहून हिदेतादा याने ख्रिश्चन धर्म व धर्मगुरू यांच्यावर कडक बंधने जारी केली. हिदेतादाच्या या ख्रिश्चनविरोधी निर्बंधांचे कोलीत हाती मिळताच जपानमध्ये सर्वसाधारण परकी यांबद्दल एकदम द्वेषभाव निर्माण झाला. त्या मागोमाग दंगेधोपे सुरू होऊन अनेक ख्रिश्चनधर्मीयांना-विशेषत: गोऱ्या पाद्र्यांना मारून किंवा जिवत जाळून टाकण्यात आले.

हिदेतादाने इ. स. १६२३ मध्ये राजसंन्यास घेतल्यावर त्याचा मुलगा आयेमित्सू याच्या हातात सर्व सत्ता आली. या आयेमित्सूच्या अमदानीत 'शिमाबाराची दुर्घटना' घडली. जपानमध्ये नागासाकीच्या पूर्वेला 'आमाकुसा' नामक एक बेट आहे. नागासाकी व आमाकुसा या दोन्ही भागात ख्रिश्चन धर्माचा पुष्कळच प्रसार झाला होता. किंबहुना हे भाग ख्रिश्चन धर्माचे

बालेकिल्ले म्हणून ओळखले जात. आमाकुसा बेटावर हिदेतादाच्या आदेशाप्रमाणे ख्रिश्चन धर्मीयांचा पद्धतशीर छळ सुरू झाला. कित्येक वेळा जाळपोळीचे व ख्रिश्चन लोकांना जिवंत जाळण्याचेही प्रकार घडले. त्यामुळे इ. स. १६३८ च्या सुमारास या बेटावरील ख्रिश्चन लोकांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल उघड उघड बंड पुकारले. सुमारे ३५-४० हजार स्त्रिया, पुरुष व मुले, आमाकुसा येथून जवळच असलेल्या 'हारा' या नावाच्या गढीत गेले व तेथे त्यांनी नाकेबंदी करून लढाईची जय्यत तयारी केली. जपानी सैन्याने 'हारा' वर स्वारी करताना इतका बेसुमार तोफमारा केला, की त्या बंडखोरांपैकी अवघे १०५ जण जिवंत हाती लागले. या वेळेपासून जपानमधून ख्रिस्ती धर्माचे जवळजवळ उच्चाटनच झाले, असे म्हणावयास हरकत नाही.

इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या सुरवातीला सुमारे ३० वर्षे तोगुकावा या शोगुन घराण्यातील 'योशीमुने', याच्या हातात अधिकार सूत्रे होती. योशीमुने या शोगुनाचा एकंदर राज्यकारभार इतका चोख होता, की त्याची कारकीर्द म्हणजे कार्यतत्परता व स्वार्थत्यागी वृत्तीने राज्य कसे करावे, याचा एक उत्कृष्ट नमुनाच म्हणावयास हरकत नाही. त्याने ज्याप्रमाणे राज्यकारभारात सुधारणा केल्या त्याचप्रमाणे एकंदर सामाजिक व सार्वजनिक जीवनामध्येही पुष्कळच सुधारणा घडवून आणल्या. इस्टेटीचा वारसा कोणत्याही घराण्यात बापाच्या थोरल्या मुलाकडेच जावा या तत्त्वाचा योशीमुने याने जोराने पुकारा केला. सार्वजनिक दृष्टया आवश्यक व योग्य वाटणारे तत्त्व कित्येकदा व्यवहारात तरी स्वतःच्या व्यक्तिगत किंवा कौटुंबिक हिताविरुद्ध असते व त्यामुळे अशा तत्त्वाचा प्रचार किंवा पुकारा करणाऱ्या व्यक्तीवर एक मोठा पेचप्रसंग गुदरतो. बापाच्या पश्चात त्याचा वारसा त्याच्या थोरल्या मुलाकडे जावा हे तत्त्व, योशीमुनेच्या स्वत.च्या बाबतीतच नडू लागले. कारण त्याच्या तीन मुलांपैकी सर्वात मोठा 'आयेशिगे' हा अत्यंत वाह्यात, बाहेरख्याली व चंगीभंगी होता. आपल्या थोरल्या मुलाकडे जाणारा वारसा टाळण्याकरता योशीमुने याने इ. स. १७४४ मध्ये निवृत्ती स्वीकारली व आपल्या पश्चात आपल्या थोरल्या मुलाचा मुलगा 'आयेहारू' याला वारस म्हणून जाहीर केले. तो वयात येईपर्यंत आपला थोरला मुलगा 'आयेशिगे' याने अजाण आयेहारू याच्या नावाने राज्यकारभार करावा, असे जाहीर केले.

योशीमुनेची कल्पना अशी होती, की आपला नातू आयेहारू हा वयात येईपर्यंत आपण हयात राहू व साहजिकच आपल्या हयातीत तरी आपले चिरंजीव आयेशिगे फारसे वाह्यात वागणार नाहीत. दुर्दैवाने योशीमुने इ. स. १७५१ मध्ये वारला. या नंतर त्याचा नातू आयेहारू हा राज्यकारभार हाती घेईपर्यंत म्हणजे इ. स. १७६० पर्यंत आयेशिगे याने मन मानेल तसा धुमाकूळ व धागडधिंगा घातला.

आपल्या थोरल्या मुलाच्या वर्तनाने पश्चाताप होऊन योशीमुने याने आपल्या बाकीच्या दोन मुलांना स्वतंत्र सरदार म्हणून नेमून टाकले. थोरल्या मुलाचा दुसरा मुलगा यालाही त्यानंतर असेच सरदारपद देण्यात आले व अशा रीतीने योशीमुने याच्या पश्चात या शोगुनचे तायासू, हितोत्सुवाशी व शिमिझू असे तीन भाग पडले. योशीमुनेच्या पश्चात त्याचा नातू आयेहारू वयात आल्यावर त्याने इ. स. १७६० ते १७८५ पर्यंत राज्यकारभार चालविला. आयेहारू इ. स. १७८६ मध्ये मरण पावला. परंतु त्यापूर्वीच त्याचे दोन्ही मुलगे मरण पावले असल्यामुळे त्याने आपल्या चुलत घराण्यातील हितोत्सुविशी 'आयेनहीरी' याला आपल्या पश्चात शोगुन करावे, असे लिहून ठेवले. हा आयेनहारी अज्ञान असल्यामुळे इ. स. १७८६ ते १७९३ या सात वर्षांच्या काळात आयेनहारीच्या नावाने योशीमुने याच्या एका नातवाला ( सादा नोबू मात्सूदारा ) कारभारी म्हणून नेमण्यात आले.

सादानोबू मात्सुदाराच्या सात वर्षांच्या कारकीर्दीत शौर्य गाजविणाऱ्यांविषयी एक विशेष अभिमान असावा, अशी शिकवण एकसारखी जपानी समाजाला देण्यात येऊ लागली. त्यामुळे लष्करातील शिपाई, अधिकारी वगैरे लोकांना साहजिकच मोठेपणा मिळू लागला. जपानी समाजातील सामुराई ( म्हणजे क्षात्रवर्ग ) यांना तर फारच महत्त्व येऊ लागले. परदेशांशी व परकीयांशी संबंध तुटलेले, अंतर्गत यादवी बहुतेक शमलेली, यामुळे या सामुराई वर्गाला काही कामच राहिले नाही. सुदैवाने या सामुराई लोकांनी पुंडाई वगैरे माजविली नाही; परंतु त्यांचे आळशी जीवन त्यांच्या मधील शौर्य पोखरू लागले.

योशीमुने शोगुनच्या काळापासून जपानमध्ये डच लोकांबद्दल एक विशेष प्रकारचे औत्सुक्य दिसू लागले. जपानमध्ये परकीयांना मज्जाव असला, तरी

त्यांत डचांचा अपवाद केला जाई. आपल्या ह्यातीतच योशीमुनेने पुष्कळ पुस्तकांचा जपानी भाषेत अनुवाद करून घेतला होता. त्याच्या या डच प्रेमाचा डचांनी भरपूर उपयोग करून घेऊन, जपानशी आपले व्यापारी संबंध जास्त घनिष्ठ केले. कित्येकदा जपानच्या किनाऱ्यावर इतर युरोपीयन देशांतील लोकांच्या काही बोटी येत असत; परंतु डचांखेरीज इतरांच्या बोटींना हाकून देण्यात येई.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला युरोप खंडात इंग्रज व डचांमध्ये युद्ध सुरू झाले. इ. स. १८०८ मध्ये एका डच गलबताचा पाठलाग करीत 'फैटन' या नावाची एक इंग्लिश युद्धनौका नागासाकी या जपानी बंदरांत घुसली. जपानमधील परकीयांचा हा सक्तीचा प्रवेशच आहे, अशी जपानी राज्यकर्त्यांनी आपली समजूत करून घेतली. कारण त्याच्यापूर्वी सुमारे चारच वर्षे नागासाकी बंदरांत एक रशियन गलबत आले होते व त्यावरील अधिकाऱ्यानी जपानी सरकारबरोबर व्यापारविषयक बोलणी सुरू करण्याचा प्रयत्नही केला होता. अर्थात रशियन लोकांस स्पष्ट नकारच मिळाला हें सांगणे नकोच. यानंतर 'व्हेल' मच्छीमारीसाठीही रशियन बोटी पुष्कळ वेळा जपानी किनाऱ्यापर्यंत येत असत.

इ. स. १८२४ मध्ये कागोशिमा येथे एक इंग्रज गलबत येऊन पोचले व त्यावरील खलाशांनी बंदरात जाऊन तेथे कित्येक गुरांची कत्तल केली. त्याच बरोबर त्यांनी काही लुटालूटही केली. याचा परिणाम असा झाला, की त्या वेळच्या जपानी सरकारने जाहीरनामा काढून कोणाही परकीयास जपानी भूमीवर पाऊल ठेवण्यासही मज्जाव केला. 'मिझूनो तादाकुनो' या शोगुनाने इ. स. १८४३ च्या सुमाराला परकीयांच्या बाबतचा पूर्वीचा जाहीरनामा थोडासा बदलून परकीयांना जपानी भूमी वर्ज्य असली, तरी परकीय गलबतांस जरूर पडेल त्या वेळी दाणापाणी वगैरे अत्यावश्यक वस्तू पुरविण्यास हरकत नाही असा एक अपवाद जाहीर केला. त्याच वेळी 'देशिये' येथील डच लोकां-कडून त्याने हॉलंडमधील काही महत्वाची यंत्रे व त्यांचे नमुने, सचित्र माहिती-पुस्तके, नियतकालिके, वगैरे वस्तू व साहित्य मिळविले.

मझिनो तादाकुनो याच्या वरील मागणीमुळे आनंदून जाऊन इ. स. १८४५ मध्ये हॉलंडच्या राजाने जपानी दरबारकडे आपला एक खास प्रतिनिधी

पाठवून या दोन देशांत व्यापारी संबंध सुरू करावे अशी इच्छा प्रदर्शित केली. परंतु या मागणीपत्रकाला दिलेल्या लेखी उत्तरात जपानी सरकारने परकीयांच्या बाबतच्या पूर्वीच्या जाहीरनाम्यावर बोट ठेवून, डचांच्या वरील मागणीला पुन्हा एकदा वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

यानंतर जपानी किनाऱ्याजवळ 'व्हेल' मच्छीमारीसाठी रशियन गलबतां-प्रमाणेच काही अमेरिकन गलबतेही घिरट्या घालू लागली. इ. स. १८३७ मध्ये 'मॉरिसन' या नावाच्या एका अमेरिकन गलबतावर ते जपानी किनाऱ्याजवळ 'व्हेल' ' मच्छीमारीच्या निमित्ताने आले असल्याचे पाहून , जपानी किनाऱ्या-वरून तोफांचा भडिमार करण्यात आला. या सर्व गोष्टींचा अमेरिकेच्या लोकसभेने आढावा घेऊन ' जपानबरोबर व्यापारी संबंध प्रस्थापित करावे ' अशा आशयाचा एक ठरावही इ. स. १८४५ मध्ये संमत केला. या ठरावाची अंमलबजावणी करावी म्हणून पुढील वर्षी जेम्स बीडल या नावाच्या एका अमेरिकन गृहस्थास दोन गलबतांसह जपानला पाठविण्यात आले. इ. स. १८५३ मध्ये अमेरिकन सरकारने कमोदोर पेरी याच्या नेतृत्वाखाली चार गलबते भरून सुमारे५००-६०० खलाशी व शिपाई जपानकडे पाठविले. कमोदोर पेरी हा 'उरागा'च्या बंदरात दिनांक८जुलै,१८५३ रोजी येऊन ठाकला त्याने लागलीच अमेरिकेच्या अध्यक्षांकडून आणलेला एक खलिता उरागा येथील जपानी अधिकाऱ्यांस देऊन त्यांना आपल्या देशाच्या शुभेच्छा सांगितल्या व निरनिराळया व्यक्तींसाठी निरनिराळे नजराणे देऊन तो उरागा बंदरांतून चीनकडे निघून गेला. कमोदोर पेरी याच्या बरोबर आलेली गलबते व त्यावरील नाविक शिपाई वगैरे संभार पाहून सर्वसाधारण जपानी लोकांची तारांबळच उडाली. परकीयांच्या या फेरीबद्दल कियोतो येथे जपानच्या बादशहाला एकंदर वृत्त ऐकविले गेले.

त्यानंतर परकीयांच्या या आक्रमणाविरुद्ध कारवाई करण्याची जपानी बादशहांनी आज्ञा दिली. एकीकडे जपानमधील सर्वश्रेष्ठ अशा सान मंदिरातून परकीयांना हाकून लावण्यासाठी ईश्वराची प्रार्थना करण्याबाबतचे हुकूम सुटले. त्याचबरोबर देहीमा येथील डच लोकांना एक लढाऊ गलबत तयार करून देण्याविषयी आज्ञा देण्यात आली. त्यासाठी त्यावेळेपर्यंतच्या जपानमध्ये गलबतांच्या बांधणीस असलेला निर्बंध रद्द करण्यात आला. त्याचप्रमाणे सर्व

सामुराईस युद्धाकरता शस्त्रसज्ज राहण्याचा आदेशही सुटला. इतके सर्व करूनही जपानमधील राज्यकर्त्यांना परकीयांच्या विरुद्धच्या लढाईत आपला कितीसा टिकाव लागेल याची शंकाच होती. म्हणून कमोदोर पेरी जपानमध्ये परत आल्यावर त्याच्याविषयी फारसा उत्साह दाखवू नये, अशा आशयाचे बचावाचे धोरण अनुसरण्याचे नक्की झाले.

इ. स. १८५४ मध्ये कमोदोर पेरी जपानला परत आला, तो दहा गलबते व जवळजवळ २,०००नाविक शिपाई बरोबर घेऊनच. त्याने आपल्याबरोबर आणलेल्या तहाच्या अटींमध्ये शिमोदा व आक्कोदेत ही बंदरे अमेरिकन लोकांस मच्छीमारीकरता मोकळी असावी व त्यांच्या गलबतांना पाणी, अन्न, इत्यादींचा पुरवठा जपानी बंदरांतून होण्याची मुभा असावी, या दोन मुख्य गोष्टी होत्या. या वेळी आयेमुनी शोगुन हा अधिकारावर होता व नामधारी बादशाहा तेन्नोमीईजी हा गादीवर होता. अमेरिकेबरोबर झालेल्या तहाच्या अनुषंगाने जपानने इतर पाश्चिमात्य राष्ट्रांशीही तह करावे असा त्या राष्ट्रांचा मग जपानच्या मागे लकडा सुरू झाला. जपान व अमेरिका यांच्यांतील तहाची शाई वाळते न वाळते तोच चीन व जपान येथील ब्रिटिशांचे राजदूत लॉर्ड एल्जिन हे स्वत: शिमोदा येथे येऊन दाखल झाले. त्यांनी लागलीच इंग्लंड व जपान यांच्यांत अमेरिकेप्रमाणे तह घडवून आणला. लॉर्ड एल्जिन यांच्या मागोमाग फ्रेंचांचे राजदूत बॅरन ग्रॉस यांनीही फ्रान्स व जपान यांच्यात तह घडवून आणला.

जपानचे बादशाहा तेन्नोमीईजी यांच्या इच्छेप्रमाणे इ. स. १८६० साली जपानमधील काही नामवंत व्यक्ती व पुढारी यांचे एक शिष्टमंडळ परदेशांच्या दौऱ्यावर गेले व त्यांनी अमेरिका व इतर प्रमुख पाश्चात्य राष्ट्रांना भेटी देऊन, आपल्या सदिच्छा व्यक्त केल्या. इकडे परकीयांचे आक्रमण वाढत असता जपानमध्ये मात्र शोगुनविरुद्ध कारवाया व मसलती सुरू झाल्या. शोगुनच्या कमकुवतपणामुळे परकीयांचे पांढरे पाय जपानच्या पवित्र भूमीला कायमचे भ्रष्ट करणार, अशा अफवा देशात सर्वत्र फैलावू लागल्या.तेव्हा या परकीयांचे समूळ व कायमचे उच्चाटन करण्याकरता नाइलाज होऊन शोगुनाने डायमियो सरंजामदारांस आपआपल्या सैन्यांची जुळवाजुळव करण्याची आज्ञा दिली. जनतेच्या भावना चेतविणे पुढाऱ्यांना फार सोपे वाटते; परंतु त्या एकदा

घेतल्यावर त्याचे दूरगामी परिणाम काय होतील याचा अंदाज किंवा दूरदृष्टी त्यांच्या ठायी क्वचितच असते. दायमिओंना एवढे निमित्त पुरे झाले. लहानग्या जॉर्ज वॉशिंग्टनने हातात कुऱ्हाड आल्यावर मागचा पुढचा विचार न करता ज्याप्रमाणे भराभर लहानमोठी झाडे जमीनदोस्त करण्याचा सपाटा सुरू केला, त्या प्रमाणेच या दायमिओंच्या अंगांत वीरश्री संचारल्याबरोबर त्यांनी दिसेल त्या परकीय इसमांचे मुडदे पाडावयास सुरुवात केली. इ. स. १८६२ मध्ये येदो येथील ब्रिटिश वकिलातीच्या दोघा शिपायांस कंठस्नान घालण्यात आले. त्याचप्रमाणे रिचर्डसन नामक एका गृहस्थाची येदो व योकोहामा या दोन शहरांस जोडणाऱ्या रस्त्यावर खांडोळी करण्यात आली. हे कत्तलसत्र पाहून इंग्रज सरकारने जपानी सरकारला एक निर्वाणीचा खलिता सादर केला.

यानंतर जपानी सरकारला ज्या एका महत्त्वाच्या सशस्त्र विरोधाला तोंड द्यावे लागले तो म्हणजे सामुराई जमातीने परकीयांविरुद्ध सुरू केलेला. ज्या सामुराई जनतेने शोगुनांचा पाडाव करण्याकरता जपानी बादशहाला स्वार्थ-त्यागपूर्वक हरतऱ्हेचा पाठिंबा दिला, त्याच सामुराईंनी बादशहाच्या इच्छे-विरुद्ध अशी कारवाई करावी व तीही थोड्याश्या अदूरदृष्टीने, याचे जपानी राजकर्त्यांना फार वैषम्य वाटले. त्याच वेळी जपानी मंत्रिमंडळातही कोरिया-विरुद्ध युद्ध करावे अथवा करू नये, या प्रश्नावरून दोन तट पडले. जपानमधील या मतभेदाची माहिती कोरियन सरकारला मिळताच नवीन जपानी सरकारबद्दल ( बादशहासंबंधी ) कोरियन सत्ताधाऱ्यांकडून एक तुच्छतादर्शक खलिता आला. परंतु जपानी सरकारने त्याबद्दल हालचाल केली नाही किंवा कोरियन सरकारचा खरमरीत निषेधही केला नाही. या नंतर इ. स. १८७५ मध्ये एक जपानी बोट किनाऱ्यावर संशोधनात्मक काम करीत असताना कोरियन किनाऱ्याकडून तीवर तोफांचा भडिमार करण्यात आला. या घटनेची दखल आपण घेऊ नये असे मंत्रिमंडळातील बहुसंख्य मंत्र्यांचे मत होते. परंतु सायगो ताकामोरी या मंत्र्याच्या पुढारीपणाखाली मंत्रिमंडळातील अल्पसंख्य गटाने या विषयावर मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. स्वतः सायगो ताकामोरी यांनी मीईजीच्या पुनःस्थापनेमध्ये पुष्कळच भाग घेतला होता. तरीही मंत्रिमंडळाचा राजीनामा दिल्यावर ते आपल्या सत्सुमा नावाच्या जिल्ह्यात जाऊन राहिले. सत्सुमा भाग हा जरी शोगुनांच्या ऐवजी

जपानी बादशहाची पुनःस्थापना करावी, यासाठी अत्यंत उतावीळ होता. तरी सत्सुमातील बहुसंख्य लोक जपानमध्ये सुरू करण्यात आलेल्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सुधारणांविरुद्ध असल्यामुळे हा विभाग म्हणजे केंद्रशासना-विरुद्ध असंतुष्ट असणारांचा बलाढ्य बालेकिल्ला समजण्यात येऊ लागला. सायगो ताकामोरी हे स्वतः सामुराई असल्याने सत्सुमा भागात आल्यावर त्यांनी तेथील सामुराई लोकांची संघटना आरंभिली. लवकरच त्यांच्या कडव्या व लढवय्या अनुयायांची संख्या चाळीस हजारांच्यावर गेली. इ. स. १८७५ मध्ये जपानी सरकारने सामुराई लोकांचे विशिष्ट हक्क नष्ट करणाऱ्या कायद्याचा मसुदा जाहीर केला, तेव्हा या सत्सुमामधील सामुराई लोकांनी उघड उघड बंडाचे निशाण उभारले. स्वतः सायगो ताकामोरी हे जपानी बादशहाचे एकनिष्ठ चहाते असूनही त्यांनी सत्सुमामधील सामुराई लोकांच्या बंडाचे नेतृत्व स्वीकारले. बादशहाचे सल्लागार बादशहाला बदसल्ला देत आहेत, अशी त्यांची स्वतःची पूर्ण खात्री झाली.

सुमारे आठ महिने हे बंड चालल्यावर ते समूळ मोडून काढण्यात आले. त्यामुळे जपानी जनमनात आपल्या सैन्याबद्दल एक विशेष असा आत्मविश्वास उत्पन्न झाला. सामुराई लोकांशिवायही जपानी सैन्यातील इतर लोक लढाया मारून विजय मिळवू शकतात, हे सिद्ध झाल्याने सर्वसामान्य नागरिकांना सामुराई लोकांबद्दल भीती वाटेनाशी झाली. जपानी लष्करातील व सत्सुमा भागातील कित्येक सामुराईंनी सरकारचा पक्ष सोडून केवळ जातगोताला प्राधान्य दिले व बंडखोरांना साह्य केले नाही. स्वतः सायगो ताकामोरी यांच्याविषयी जनतेत पुष्कळच आदर होता. बंडाचे नेतृत्व केल्यामुळे त्यांचे सर्व अधिकार व मानमरातब काढून टाकले गेले होते, तथापि त्यांच्या मृत्यूनंतर मात्र जपानी सरकारने त्यांच्या एकंदर स्वार्थ-त्यागी जीवनाची कदर म्हणून त्यांच्या मुलांना सर्व अधिकार व सत्ता परत दिली. इतकेच नव्हे; तर त्यांचा एक भव्य पुतळा मोठ्या समारंभाने उभारण्यात आला. यानंतर त्यांच्या मुलाला सरकारने 'मार्क्विस' हा सर्वोच्च किताब बहाल करून, त्यांच्या घराण्याबद्दलचा आदर व्यक्त जाहीर केला.

जपानमध्ये राजशाहीच्या पुनःस्थापनेनंतर ज्या अनेक सुधारणा एका पाठोपाठ

जाहीर करण्यात आल्या, त्यांचा येथे फक्त नामनिर्देशच करणे शक्य आहे. त्यांत जपानी लोकांवरचे परदेशगमनासंबंधीचे जाचक नियम रद्द करणे, ख्रिश्चन धर्मप्रसारास संमती देणे, सक्तीने देवीची लस टोचून घेणे, पोस्ट व तार खात्याची स्थापना व वाढ करणे, नौकानयनात आगबोटींचा उपयोग करणे, लोहमार्ग व इतर दळणवळणाच्या साधनात भरपूर वाढ करणे, शैक्षणिक सुधारणा व वर्तमानपत्रांचा प्रसार करणे, सरकारी नोकरांना सक्तीचा युरोपीयन पोषाख देणे, वगैरे गोष्टींचा समावेश होतो.

वरील सर्व सुधारणांना जसजसा वेग येऊ लागला, तसतसे जपानी लोकमत परराष्ट्रांबरोबरच्या करारांत सुधारणा करण्याबद्दल विशेष आग्रह धरू लागले. परराष्ट्रांबरोबर झालेल्या करारांत सर्वांत मानहानीकारक वाटणारे एक कलम होते. त्या कलमान्वये त्या त्या राष्ट्रांतील व्यक्तींना जपानमध्ये काही विशेष हक्क मिळाले.

हे विशेप हक्क पुढीलप्रमाणे होते.

(१) कानागावा व आणखी इतर पाच बंदरे परकीयांना खुली करण्यात यावी. केवळ या बंदरांतच नव्हे, तर त्या प्रत्येक बंदराच्या चोवीस मैलांच्या परिसरात त्यांना स्थायिक होण्याची मुभा मिळावी. ( २ ) जपानमधील प्रचलित कायदे-कानू परकीयांना लागू न करता त्यांच्याविरुद्ध काही कायदेशीर कारवाई करावयाची झाल्यास, ती त्यांच्या त्यांच्या देशांतील प्रचलित कायद्याबरहुकूम केली जावी. परकीयांच्या विरुद्धचे न्यायनिवाडे देखील जपानी न्यायासना-समोर न चालता, त्या त्या राष्ट्रांच्या कचेऱ्यांमार्फतच चालले जावेत. ( ३ ) जपानमध्ये आयात होणाऱ्या परकीय मालावर नाममात्र (शेकडा पाच टक्के ) जकात घ्यावी.

वरील सर्वच गोष्टी आपल्या राष्ट्राला अपमानास्पद आहेत, याचा साक्षात्कार जपानी लोक परदेशात जाऊ लागल्यापासून त्यांना होऊ लागला. आपल्या देशातील लोकांना परदेशात हीन लेखण्यात येते व त्या राष्ट्रातील नागरिकांना मात्र जपानमध्ये मानाने वागविण्यात येते. अशा विषम नियमावलीमुळे खुद्द जपानमध्ये जपानी लोकांची परकीयांच्या समोर नाचक्की व नालस्ती होते. जपानी जनमानसांतील हे शल्य लवकरच जाहीरपणे चर्चिले जाऊ लागले. इ. स. १८७६ च्या सुमारास अमेरिकन सरकारने जपान

बरोबर यापूर्वी केलेला तह दुरुस्त करून त्यातील परकीय व्यक्तीविषयींचे हक्क विषयक कलम इतर परराष्ट्रांनी सोडून दिल्यास ते आपणही रद्द करण्यास तयार असल्याचे जाहीर केले. इ. स. १८८२ मध्ये तोकियो येथे सर्व परराष्ट्रांच्या प्रतिनिधींची एक सभा भरविण्यात येऊन अमेरिकन सरकारच्या जाहीरनाम्याच्या अनुषंगाने बाकीच्या राष्ट्रांनी त्यांना जपानमध्ये मिळत असलेल्या विशिष्ट हक्क व सवलती आपण होऊन रद्द करणे कितपत शक्य आहे, त्याचा विचार केला. त्याप्रमाणे काही पाश्चात्य राष्ट्रे उपरिनिर्दिष्ट कलम गाळून टाकण्याला तयार झाली. इ. स. १८९४ मध्ये इंग्लंडने या तहात आवश्यक त्या सुधारणा केल्या व त्या पाठोपाट इतर राष्ट्रांनीही इंग्लंडचा कित्ता गिरविला.

इ. स. १८९९ पासून जपानी सरकारला परदेशी मालावरील आयात कराबद्दल संपूर्ण स्वातंत्र्य मिळणार होते! तरीही काही ना काही अडचणी उदभवून त्याला पूर्णपणे हे स्वातंत्र्य उपभोगावयास इ. स. १९११ हे साल उजाडावे लागले. विसाव्या शतकाच्या सुरवातीलाच जपानी जनतेला व प्रत्यक्ष जपानी सरकारला दोन युद्धे अंगावर घ्यावी लागली. हा वेळ पावेतो जपानची लष्करी सत्ता पुष्कळच मजबूत व सुसज्ज झाली होती. आपल्या राष्ट्राची ताकद अजमावण्यासाठी, तसेच आपली अनेक राष्ट्रीय उद्दिष्टे साधण्यासाठी त्या त्या राष्ट्रांतील सत्ताधाऱ्यांना प्रसंगी परदेशांशी युद्धेही करावी लागतात. जोपर्यंत मनुष्यस्वभाव हा पूर्वीप्रमाणेच संघर्षशील आहे, तोपर्यंत राष्ट्रांराष्ट्रांमधील मतभेद व संघर्ष हे प्रत्यक्ष युद्धाशिवाय मिटविणे शक्य नसते. मनुष्य स्वभावाची ही वृत्ती ध्यानी घेऊन व अशा प्रसंगाची शक्यता दूरदृष्टीने अगोदरच हेरून त्याप्रमाणे आपल्या राष्ट्राची सर्वांगीण तयारी करण्याचे व करवून घेण्याचे महत्त्वाचे कर्तव्य राष्ट्राचे पुढारी व मुत्सद्दी म्हणविणाऱ्यांना करावेच लागते. 'आम्हांस शांतता हवी आहे', 'आम्ही शांततेचे पुरस्कर्ते आहोत', 'आमचे कोणाशीही वैर नाही व म्हणून दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राचे आमच्याशी वैर असण्याचे कारणच नाही' वगैरेंसारख्या बालिश व खुळचट घोषणा करणे व त्यानुसार देशरक्षणाची आबाळ करणे, हे राष्ट्राच्या धुरीणांना शोभत नाही. त्यात नेत्यांचा क्षणिक गौरव होत असला, तरी राज्यनाश मात्र हमखास ठरलेला असतो !

जवळजवळ २५० वर्षे सर्व सत्ता आपल्या हातात ठेवून जपानच्या बादशहाला नामधारी बनविणारे शोगुन भविष्यकाळात तसेच सत्ता उपभोगीत राहिले, तर जपानची धडगत नाही; असे अनेक दूरदृष्टीच्या सामुराईंना वाटले. त्यामुळे त्यांनी बादशहाला हाताशी घेऊन जपानमध्ये राज्यक्रांती घडवून आणली. यानंतर ' फुकोकी कियोहाय ' किंवा देशाची आर्थिक भरभराट व मजबूत लष्करी सत्ता, हे ध्येय जनतेपुढे उभे करण्यात आले. कोणत्याही देशाचा इतिहास चाळला असता आपणास असे दिसून येते, की एखाद्या देशाची सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक बाबतीत होणारी भरभराट ही त्या त्या देशातील काही थोड्या दूरदृष्टीच्या नेत्यांमुळेच होते. या नेत्यांना खरोखरच दूरदृष्टी असेल व त्यांनी आजूबाजूच्या देशांतील एकंदर परिस्थितीचा सखोल अभ्यास केला असेल, तर त्यांना देशाच्या ऊर्जितावस्थेत जनतेचा सहकार लाभतोच; पण सर्वस्वी जनतेच्या तंत्रानेच सुधारणा घडवून आणणे शक्य नसते. कारण जनतेच्या कलाप्रमाणे सर्वच गोष्टी करू म्हटल्यास त्याला कालावधीही फार लागतो. आपल्या देशाच्या गरजा, आपल्या देशातील समाजाची सर्वसाधारण परिस्थिती, त्या समाजाची कुवत, शेजारील देशांकडून अपेक्षित असलेले साहाय्य किंवा क्वचित प्रसंगी येणारे अडथळे या सर्वबाबींचा सांगोपांग विचार करून मगच आपला मार्ग आखणे श्रेयस्कर असते.

पाश्चिमात्य राष्ट्रांचे बळ म्हणजे त्यांची संघटना व संसदीय पद्धती हे असल्याने आपल्याला पाश्चात्यांकडून पुष्कळच शिकण्यासारखे आहे; किंबहुना पाश्चात्यांशी समजुतदारपणे वागल्यावाचून आपली प्रगती होणार नाही व आपल्या देशावर लादण्यात आलेल्या अपमानास्पद अटीही रद्द करवून घेता येणार नाहीत, हे नक्की झाल्यावर पाश्चात्यांबरोबर कशा रीतीने सहकार्य करावे याचा विचारविनिमय जपानमध्ये होऊ लागला. जपानी लोकांवर लादलेली काही कलमे युक्तीयुक्तीने रद्द करवून घेण्याचे प्रयत्न इ. स. १८७१ सालापासून सुरू झाले. देशांतर्गत सामाजिक सुधारणांसाठी त्याच सुमाराला सुरवात झाली. याच वेळी जपानची लष्करी सत्ता जास्त कार्यक्षम करण्यासही प्रारंभ झाला. कोरियाच्या प्रश्नावरून प्रथम चीन व जपान यांच्यातील संबंध बिघडू लागले. परिणामी युद्ध अटळ वाटून जपानी सैन्याने चीनवर चढाई केली व थोड्याच दिवसात चिनी सैन्याचा सपशेल पराभव करून आपल्याला

हव्या असलेल्या अटीवर चीनशी तह केला. कोणत्याही राष्ट्राची उद्दिष्टे ठरविण्याच्या कामात आर्थिक व राजकीय तज्ज्ञांच्या बरोबरीने संरक्षण अधिकाऱ्यांचाही सहकार आवश्यक असतो. या राष्ट्रीय उद्दिष्टांच्या पूर्तीकरता युद्ध हाच एकमेव मार्ग असल्यास युद्ध करणे, युद्धोत्तर आपणांस अनुकूल अशा अटींवर तह करणे, वगैरे गोष्टी संरक्षण अधिकाऱ्यांच्या सहकार्याशिवाय शक्य होतच नाहीत. किंबहुना कोणत्याही देशाच्या परराष्ट्रीय राजकारणात त्या देशाच्या संरक्षण अधिकाऱ्यांना महत्त्वाचे स्थान मिळणे अगत्याचे असते. याचे अनेक दाखले इतिहासातून मिळतात.

चीन व जपान यांच्यामध्ये झालेल्या तहाप्रमाणे जपानी लोकांना पाश्चात्यां-प्रमाणेच चिनी बंदरांत व्यापारी हक्क मिळाले. तैवान बेटही जपानला मिळाले, तसेच लाया ओतुंग या द्वीपकल्पाचा तावाही मिळाला. कोरिया हा स्वतंत्र प्रदेश असल्याचे चीनने मान्य केले. चीन व जपान यांच्यातील युद्धाने, जपानी लष्करी सत्तेचा थोडासा प्रत्यय पाश्चिमात्य राष्ट्रांना आला असावा, असे म्हणण्यास हरकत नाही. चीनमध्ये आपल्या बरोबरीने जपानलाही व्यापारी सवलती व इतर हक्क मिळाले व कोरिया व लाया ओतुंग द्वीपकल्पात जपानी लोकांचा प्रभाव वाढता आहे, हे पाहून इंग्लंडादी पाश्चात्य राष्ट्रे जपानच्या वाढत्या सत्तेला पायबंद घालण्याचे मनसुबे रचू लागली. कोरिया-मधून चीनने काढता पाय घेतल्यावर, कोरियन लोकांनी जपानी वर्चस्व झुगारून देण्यासाठी रशियनांची मदत मिळविली. याच सुमाराला रशियाही मांचूरिया-मध्ये आपले आर्थिक व राजकीय वजन वाढवू लागला होता. मांचूरिया व कोरिया या आपल्या शेजारील दोन्ही आशियाई राष्ट्रांवर रशियन वर्चस्व असणे जपानी लोकांना रुचणारे नव्हते. याच सुमाराला रशियन सरकारने दक्षिण मांचूरियाचा तावा घेतला. तेव्हा मग कोरिया व मांचूरिया येथे रशियाच्या आक्रमणाला पायबंद घातल्याखेरीज जपानी सरकारला दुसरा पर्यायच उरला नाही. याच संदर्भात रशिया व जपान यांच्यातील संघर्ष वाढून शेवटी शस्त्रांचा खणखणाट सुरू झाला व युद्धाचा शेवट अगदी अनपेक्षितरीतीने रशियन सरकारच्या जपानपुढील संपूर्ण शरणागतीने झाला । या रूसो-जपानी युद्धा-नंतर जपानबद्दलचा पाश्चात्यांचा दृष्टिकोन पुष्कळसा बदलला. जपान हे 'बाहुले' नसून ते एक स्वयपूर्ण, शक्तिमान व बलाढ्य राष्ट्र आहे हे एक कटू

सत्य त्यांना पटवून घ्यावे लागले. याच वेळी म्हणजे इ. स. १९०७ मध्ये इंग्लंड व जपान यांच्यात मैत्रीचा तह झाला. या मैत्रीच्या तहामुळे तर पाश्चात्य व पौर्वात्य अशा दोन्ही देशांत जपान राष्ट्राविषयी प्रतिष्ठा व आदर वाढला.

इ. स. १९०७ नंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात खऱ्या अर्थाने जपानचा भाव वाढला. लवकरच युरोप खंडात युद्ध होणार व त्यात सर्व युरोपीयन राष्ट्रे गुंतली जाणार ही गोष्ट जपानी पुढाऱ्यांना कळून चुकली. या संभाव्य युद्धाचा जास्तीत जास्त आर्थिक, औद्योगिक व लष्करीदृष्ट्या फायदा आपण उठविला पाहिजे असे मनसुबे जपानमध्ये रचले जाऊ लागले. कोरिया व मांचूरिया या दोन देशांवरील जपानी पक्कड जास्त आवळण्यात आली. चीनमध्ये एका मोठ्या लोखंड व पोलादाच्या कारखान्यात जपानने भागीदारी मिळविली. जर्मनीने इंग्लंडविरुद्ध युद्ध सुरू केल्याबरोबर जर्मनीच्या ताब्यातील चीनचे सर्व भाग जपानने बळकावले. शांतुंग हे द्वीपकल्प व त्याचे पूर्वेकडील कोरिया व मांचूरिया हे भाग यांत जपानला आर्थिक व औद्योगिक यंत्रणा उभारण्यास भरपूर अवधी मिळाला. युरोपात झालेल्या पहिल्या महायुद्धाने जपानचा सर्वांगीण फायदा झाला. जपानचे साम्राज्य भराभर वाढू लागले. त्याची औद्योगिक भरभराट झाली व परदेशी व्यापार वाढू लागला. जपानमध्ये तयार झालेल्या मालाने बहुतेक सर्व आशियायी बाजारपेठा हस्तगत केल्या. जपानी व्यापारी आगबोटी जगभर संचार करू लागल्या. व याला जोड म्हणून जपानी सैन्य व आरमार जास्त जास्त बलवान होऊ लागले.

जपानची ही सर्वांगीण आगेकूच पाश्चात्यांना भेडसावू लागली. पुढे मागे जपान सर्व आशिया खंडावर आपली सत्ता प्रस्थापित केल्याशिवाय राहणार नाही, असा धसका इंग्लंड व अमेरिका या दोन राष्ट्रांनी घेतला आणि त्यानंतर निरनिराळ्या मार्गांनी जपानच्या वाढत्या वर्चस्वाला प्रतिबंध करण्याचा निश्चय केला. इ. स. १९२७ मध्ये वीस वर्षांपूर्वी केलेल्या इंग्लंड व जपान यांच्यातील तहाची मुदत संपली होती. यापुढे जपानशी व्यापारी व इतर बाबतीत चढाओढच राहणार, इतकेच नव्हे तर ती उत्तरोत्तर वाढीसच लागणार हे ओळखून व पूर्वीची मैत्री चालू ठेवणे कठीण आहे असे पाहून, मुदत संपल्याच्या निमित्ताने आपोआपच तो तह रद्द झाला. जपानच्या वाढत्या आरमारी शक्तीला पायबंद म्हणून इंग्लंडने सिंगापूर येथे एक अजस्त्र नाविक

८५५८८

तळ बांधण्याची योजना आखली व त्या योजनेत ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, भारत वगैरे ब्रिटिश साम्राज्याशी संबंधित असणाऱ्या देशांकडून अर्थसाहाय्यही घेण्यात आले.

नंतर इ. स. १९२९ मध्ये सुरू झालेल्या जागतिक आर्थिक मंदीच्या वावटळीत जपान देश सापडला. इ. स. १८६७ ते १९२७ या साठ वर्षांच्या काळात जपानची लोकसंख्या जवळ जवळ अडीचपट वाढली होती. वाढती लोकसंख्या व तिच्या वाढत्या गरजा यांमुळे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न उत्पन्न झाले. अगोदरच जपानमध्ये लागवडीखाली येऊ शकणारी अशी जमीन अतिशय थोडी असल्यामुळे या वाढत्या लोकसंख्येच्या निर्वाहाचा प्रश्न अत्यंत विकट होऊ लागला. चीन, कोरिया, मांचूरिया, ऑस्ट्रेलिया, इ. जपानच्या आजूबाजूच्या देशांत वसाहतीकरता जाणे कितपत शक्य आहे, याचा विचार सुरू झाला. राष्ट्रसंघामार्फत ऑस्ट्रेलिया वगैरे देशांतील श्वेतेतरांवरील बंदी काढून टाकावी अथवा ती किमान सैल तरी करावी अशाबद्दलचे केले गेलेले प्रयत्न फुकट गेले. जपानमधील पक्षोपपक्षांत याच-वेळी अस्थिरता दिसून येऊ लागली. खंबीर धोरणाचा अभाव जाणवू लागला. जपानमधील काही तरुण रक्ताच्या लष्करी अधिकाऱ्यांनी आपली एक संघटना उभारली व जपानमधील मुलकी सत्ता दूर करून ती लष्करी अधिकाऱ्यांच्या हाती यावी अशा हेतूने या संघटनेचे कार्य सुरू झाले. त्यामुळे जनतेतील विचारवंतांचा शासकीय यंत्रणेवरील विश्वासही ढळू लागला.

इ. स. १९३१ मध्ये चिनी सैन्याने दक्षिण मांचूरियातील लोहमार्गांवर हल्ला चढविला, हे निमित्त दाखवून जपानी सरकारने चीनविरुद्ध युद्ध पुकारले. इ. स. १९३२ च्या अखेरीला जपानी सैन्याने सर्व माचूरिया व्यापला. मांचूरिया प्रकरणावरून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात खूपच धामधूम उडेल, या कल्पनेने जपानी सरकारने मांचूरियाचे स्वतंत्र राज्य जाहीर करून त्या राज्याशी आपल्याला हितावह होतील, अशा अटींवर कायमचा तह केला. जपानची मांचूरिया बाबतची ही नीती राष्ट्रसंघामध्ये विचारविनिमयासाठी आल्यावर जपानला त्याबद्दल ठपका येणार असे दिसताच जपानी सरकारने राष्ट्रसंघाकडे आपला राजिनामाच सादर केला ! याच सुमारास जपानने चीनच्या भूमीवरही निरनिराळ्या बंदरांमधून हल्ला चढविला. जपानच्या चीनवरील स्वारीला

१०.२.७७

'युद्ध' असे मोठे नाव न देता त्याचा उल्लेख फक्त 'चिनी प्रसंग' (China incident) असाच करण्यात येऊ लागला. आशिया खंडातील जपानच्या या चढाईच्या धोरणामुळे युरोपातील इंग्लंड, फ्रान्स, वगैरे मित्र राष्ट्रे व जर्मनी, इटली इ. शत्रू राष्ट्रे ( यांनाच दुसऱ्या महायुद्धाच्या काळात 'अक्ष' राष्ट्रे असे म्हणण्यात येत असे. ) अशा दोन्ही पक्षांकडून जपानला आपल्या बाजूला वळवून घेण्याचे प्रयत्न सुरू झाले. विशेषतः इ. स. १९२७ मध्ये रद्द झालेल्या इंग्लंड व जपान यांच्यातील मित्रत्वाच्या तहामुळे अक्षराष्ट्रांना जपानबद्दल विशेष आपुलकी वाटू लागली. इ. स. १९३६ मध्ये जपान, जर्मनी व इटली या राष्ट्रांमध्ये 'अँटी कॉमिन्टर्न' तह झाला. लवकरच या तहाचे त्रिपक्ष करारात रूपांतर झाले. या तहातील एक प्रमुख कलम म्हणजे या तीन्ही राष्ट्रांपैकी कोणत्याही एका राष्ट्रावर आक्रमण झाल्यास एकमेकांना सर्वतोपरी साहाय्य करण्याविषयी परस्परांनी सिद्ध असावे. या कलमाचा हेतू रशिया व अमेरिका या राष्ट्रांविरुद्ध एकमेकांना साहाय्य करण्याचाच असावा, हे उघड होते.

जगामध्ये सर्वत्र शांतता नांदावी, असे कोणासही वाटणे अगदी साहजिक आहे. परंतु अलिकडच्या काळातील असंख्य संहारक शस्त्रास्त्रांमुळे मानवी जीवन व वित्त या दोहोंची अपरिमित हानी होते हे पूर्णपणे माहीत असूनही निरनिराळी राष्ट्रे युद्धाला उद्युक्त होतात, कारण ज्या वेळी वाटाघाटींनी व शांततेच्या मार्गांनी एखाद्या राष्ट्राची ध्येये व धोरणे सफल होत नाहीत असे दिसून येते, तेव्हा साहजिकच युद्धाचा एकमेव मार्ग शिल्लक राहतो. जागतिक शांततेसाठी राष्ट्रीय उद्दिष्टे व राष्ट्रीय स्वातंत्र्य यांचे बलिदान कोण्या राष्ट्राने केल्याचे जगाच्या आजवरच्या इतिहासात एकही उदाहरण आढळत नाही. त्यामुळे आपले शेजारी कोण व कसे आहेत, त्यांची ध्येय-धोरणे काय आहेत, त्यांचे आपल्याशी संबंध कसे असतील व कसे असावेत, त्यांचे बलाबल कशात आहे, आपले बलाबल कशात आहे, वगैरे सर्व गोष्टींचा आमूलाग्र विचार करणे, प्रत्येक राष्ट्रातील विचारी लोकांचे, पुढाऱ्यांचे व राष्ट्रधुरीणींचे सर्व-प्रथम कर्तव्य ठरते. आपण संयम पाळला म्हणजे आपले शेजारीही तसाच संयम पाळतील, अशी समजूत करून घेणे वेडेपणाचेच म्हणावे लागेल. मनुष्य-स्वभाव हा कोठेही सारखाच आहे. मानवी प्राणी देवत्वाप्रत जाण्यास अजून

सहस्रावधी वर्षांचा काळ लागणार आहे. पण तोपर्यंत मानवी स्वभावाचे विश्लेषण, 'मागील अंकावरून पुढे चालू' या पद्धतीचेच असणार हे एक त्रिकालाबाधित सत्यच समजण्यास हरकत नाही.

जपानने या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करूनच आपले ध्येयधोरण आखले होते.

जपान व जर्मनी यांची शय्यासोबत ही उभयतांच्या गरजांमुळे घडून आली होती. ज्यावेळी जपान व जर्मनी यांच्यात हा 'एकमेका साह्य करू' अशा पद्धतीचा तह झाला, त्याचवेळी साम्यवादी रशिया व जर्मनी हेही तात्पुरते का होईना, पण परस्परांचे मित्र बनले होते. परंतु लवकरच ही मैत्री संपुष्टात येऊन जर्मनीला रशियावर आक्रमण करावे लागेल अशी कल्पनासुद्धा जपान सरकारला आली नसावी. त्याचप्रमाणे अमेरिकेचा वाले किल्ला समजल्या जाणाऱ्या पर्लहार्बरवर जपान झंझावाती चढाई करील व ते नामशेष करून टाकील ही कल्पनाही जर्मन मुत्सद्द्यांना आली नाही. दोन्ही देशांतील धोरणी मुत्सद्दी मात्र, याबद्दल गुप्तपणे विचार-विनिमय करून योजना आखीत असावे असे म्हटल्यास त्यात फारशी अतिशयोक्ती होणार नाही. कोणतेही राष्ट्र राजकारणात सातत्याने मित्र किंवा शत्रू असत नाही, मित्र शत्रू होतात व शत्रू मित्र होतात. त्यासाठी प्रत्येक राष्ट्राच्या ध्येय व धोरणांचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे. जपान आणि जर्मनी या दोन्ही राष्ट्रांतील मुत्सद्यांनी हा विचार नेहमीच महत्त्वाचा मानला व त्यामुळे परस्परांना नकळत त्यांनी आपल्या योजना आखल्या.

जपानने चीनवर स्वारी केल्यापासून इंग्लंड व अमेरिका या दोन्ही देशांशी जपानचे संबंध दुरावले होते. त्यात भर म्हणूनच किंवा काय, जपान व जर्मनी यांचा मैत्रीचा तह झाल्यापासून तर हा दुरावा वाढलाच. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीच्या काळात दोस्त राष्ट्रांचे पारडे हलके होते. नात्सी जर्मनीच्या झंझावाती आक्रमणापुढे दोस्तांचा टिकाव लागेना. दोस्त राष्ट्रांनी जर्मनीच्या पूर्व बगलेवर असलेल्या रशियाला जर्मनीच्या दोस्तीतून फोडण्याचा एक धोरणी व यशस्वी प्रयत्न केला. जर्मनीने इ. स. १९४१ मध्ये रशियावर स्वारी केली, त्यामुळे शत्रूराष्ट्राचे सैन्य पूर्व व पश्चिम अशा दोन्ही आघाड्यांवर विभागले गेले. जर्मनीने आपल्या अतीपूर्वेकडील दोस्त राष्ट्राला ( जपानला ) त्यांच्याशी

झालेल्या कराराच्या आधारे जर्मनीच्या बाजून रशियाच्या पूर्व भागावर हल्ला करण्यास प्रवृत्त करण्यासाठी जंग जंग पछाडले. परंतु जपानी मुत्सद्द्यांनी ही सूचना फारशी विचारात घेतली नाही. उलट जर्मनीच्या रशियावरील स्वारीच्या काही दिवस अगोदर त्यांनी रशियाबरोबरच एक मैत्रीचा तह घडवून आणला. जपान व रशिया यांचे संबंध फारसे चांगले नव्हतेच. तेव्हा अशा स्थितीत रशियाबरोबरचा मैत्रीचा तह जपानच्या दृष्टीने हिताचा होता. रशियालाही अतीपूर्वेकडे फारशा कटकटी नको होत्या व त्यामुळे जपानी मुत्सद्द्यांनी मैत्रीच्या कराराचे सूतोवाच करताच त्यांनी तावडतोब या गोष्टीला संमती दिली. रशियाबरोबर झालेला जपानचा तह हा परराष्ट्रमंत्री मात्सुओका यांना एक मोठाच विजय वाटला. परंतु हा तह घडवून आणून ते जपानमध्ये परतले न परतले, तोच जर्मनीने रशियाविरुद्ध शस्त्र, उपसण्याची घोषणा ऐकून मात्सुओकांसह सर्व जपानी मंत्रिमंडळ अवाक् झाले !

रशियाबरोबर झालेला मैत्रीचा तह झुगारून देऊन जपानने पूर्वेकडून रशियावर हल्ला करावा, असा जर्मन मुत्सद्द्यांचा आग्रह वाढू लागला, पण जपानी लष्करी अधिकाऱ्यांना मात्र आपण रशियावर स्वारी करून आपली दमछाक करून घेऊ नये असे वाटत होते. तसे करण्याऐवजी युरोपांतील युद्धाचा शक्य तितका जास्त फायदा उठवावा असे वाटून जपानी मुत्सद्द्यांनी आपल्या उद्योगधंद्याकरितां लागणारा कच्चा माल आपल्या कक्षेत आणावा असे प्रतिपादन करावयास सुरवात केली. दिनांक २५ जुलै १९४१ रोजी जपान सरकारने फ्रान्समधील ‘ व्हिशी ’ सरकार बरोबर करार करून तात्पुरता का होईना, पण सबंध इंडोचीनचा ताबा घेतला व तसे जाहीरही करून टाकले इंडोचीनचा ताबा घेताच जपानी लोकांची दृष्टी सर्व आग्नेय आशियाकडे वळल्याचे स्पष्ट झाले. लागलीच दिनांक २६ जुलै १९४१ रोजी अमेरिकेच्या रूझवेल्ट सरकारने अमेरिकेतील सर्व जपानी संपत्ती गोठवून टाकल्याचे जाहीर करून जपानला पुरविण्यात येणाऱ्या खनिज तेलावर अनेक निर्बंध जाहीर केले. त्यामुळे कच्चा माल व विशेषत: खनिज तेल यांच्याबाबतीत जपानची जवळ जवळ कोंडीच झाली. आता एक तर अमेरिकेबरोबर वाटेल त्या अटी मान्य करून तह करणे व आपले जीवन सुरक्षित बनविणे; नाही तर जपानच्या आसमंतावरील तेलटापूचे व कच्च्या मालाच्या उत्पादनाचे देश पादाक्रांत

करणे, म्हणजेच अप्रत्यक्षपणे युद्धात उडी घेणे एवढाच मार्ग जपानपुढे उभा होता. कोणत्याही राष्ट्राच्या आयुष्यात असे काही क्षण येतात, की त्या वेळी झटपट निर्णय घ्यावा लागतो. परिणाम चांगला झाला, तर फारच चांगले. परंतु परिणाम वाईट झाला, तरी हरकत नाही. तात्काळ निर्णय घेणे महत्त्वाचे व कौशल्याचे !

इंग्लंड व अमेरिका ही दोन राष्ट्रे सर्व जगभर जपानच्या वाढत्या व्यापाराला पायबंद घालण्याचे मनसुबे करीत असताना जपानी मुत्सद्दी व व्यापारी यांच्या आशाआकांक्षा एकसारख्या वाढत होत्या. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस जपानने चीनचा पराभव करून आपल्या साम्राज्यवाढीला प्रारंभ केला; तेव्हा युरोपियन राष्ट्रांनी राजकीय दडपण आणून, कोरिया व मांचूरिया हे चीनचे दोन भाग जपानला पचू दिले नाहीत. आपण आपल्या शौर्याने मिळविलेली ही शिकार आपल्याला हातची सोडून द्यावी लागली, हे शल्य जपानी मुत्सद्द्यांना फार बोचले. परंतु त्या वेळी जपानला स्वस्थपणे हात चोळीत बसणे भाग पडले. आपली लष्करी ताकद वाढवून आपला देश बलवान केल्याशिवाय आंतरराष्ट्रीय राजकारणात आपला तरणोपाय नाही, हे स्पष्ट झाल्यावर जपानने त्याच एका योजनेला अग्रस्थान दिले. यानंतर विसाव्या शतकाच्या सुरवातीला काही तरी कुरापती काढून जपानने रशियासारख्या एका ख्यातनाम लष्करी सत्तेलाही पुरेपूर धूळ चारली व दहा वर्षांपूर्वी पाश्चात्य राष्ट्रांनी आपल्या तोंडातील जो कोरिया व मांचूरियाचा घास काढून घेतला होता, तो त्यांना ओकायला लावला. अशा प्रकारे जपानने आपल्या शत्रूचा पुरता वचपा काढला.

जपानची वाढती लष्करी ताकद ओळखून, इंग्लंडसारख्या एका बलाढ्य राष्ट्राने त्यांच्याशी वीस वर्षे मुदतीचा दोस्तीचा तह केला. अर्थातच त्या गोष्टीचा जपानी मुत्सद्द्यांना काहीसा गर्व झाला. यानंतर झालेल्या पहिल्या महायुद्धाचा शक्य तितका जास्त फायदा उठवून जपानने जर्मनीच्या ताब्यात असलेला चीनमधील बराचसा मुलूख आपल्या राज्यास जोडूनही टाकला. असे करताना वरपांगी सानभावीपणाचा आव आणण्याची आणि आपली खरी उद्दिष्टे मात्र गुप्त ठेवण्याची पाश्चात्यांची राजकारणी मुत्सद्देगिरी जपानी लोकांनी पूर्णपणे आत्मसात केली. जपानच्या साम्राज्यवाढीबरोबरच

जपानमधील उद्योगधंदेही भराभर वाढू लागले. या वाढत्या उत्पादनाला जास्त जास्त बाजारपेठाही आवश्यक वाटू लागल्या. जपानमध्ये कच्च्या मालाचे उत्पादन अतिशय मर्यादित असल्यामुळे निरनिराळ्या देशांतून आणलेल्या कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करणे व तो पक्का माल पुन्हा विक्रीसाठी निरनिराळ्या देशांत रवाना करणे, अशी काहीशी जिकीरीची व्यापारपद्धती जपानमध्ये अवलंबिली गेली. अर्थात त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नौकानयनाचा धंदाही जरूर वाटू लागला. याप्रमाणे मीईजी सत्तांतरापासून सुरू झालेली जपानची औद्योगिक भरभराट जपानी मुत्सद्द्यांना स्वस्थ बसू देईना. इसवी सनाच्या सोळाव्या शतकापासून आशिया व आफ्रिका खंडात निरनिराळ्या युरोपियन देशांनी आपापली साम्राज्ये वाढविण्यास सुरवात केली. खुद्द जपानमध्ये शांतता व सुबत्ता या दोन गोष्टींचा परिणाम म्हणून लोकसंख्या भराभर वाढू लागली. या वाढत्या लोकसंख्येच्या अन्न, वस्त्र, व निवारा या तीन प्राथमिक गरजा पुऱ्या करण्याकरता साम्राज्यवाढ अनिवार्य आहे अशी जपानने आपल्यामनाशी पक्की खूणगाठ बांधली.

दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभी जपानपुढे अनेक समस्या उभ्या होत्या. त्यांपैकी जपानी कारखानदारांस कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा सतत चालू ठेवणे, परदेशांतील आपल्या बाजारपेठा कायम राखणे, इतकेच नव्हे; तर त्यात शक्य तितकी वाढ करणे, खनिज तेलावर अमेरिकेने घातलेले निर्बंध रद्द करवून घेणे किंवा तेल उत्पादक देश आपल्या पंखाखाली आणणे, त्याचप्रमाणे आपल्या भू, नौ व वायू या तीन्ही दलांची जय्यत सिद्धता राखणे, या प्रमुख समस्या होत. कच्च्या मालाच्या उत्पादनाचे प्रदेश आपल्या पंखाखाली आणण्याच्या धोरणाची पहिली पायरी म्हणून जपानने फ्रान्सच्या व्हिशी सरकारबरोबर तह करून सबंध इंडोचायना तर आपल्या घशाखाली घातलाच; शिवाय मलाया, डच ईस्ट इंडीज, फिलिपाईन्स वगैरे तेलाने समृद्ध असलेल्या बेटांकडेही जपानने आपली दृष्टी वळवली. अमेरिकेने जपानी संपत्ती गोठवताच व जपानला निर्यात केल्या जाणाऱ्या खनिज तेलावर नियंत्रणे बसविताच जपानी मुत्सद्द्यांमध्ये दोन विचार प्रवाह सुरू झाले. एक प्रवाह म्हणजे, आता युद्धाशिवाय तरणोपाय नाही.

म्हणून दोस्त राष्ट्रांविरूद्ध युद्ध पुकारून काय तो सोक्षमोक्ष करून टाकावा हा व दुसरा म्हणजे अशी उतावीळी न करता शक्य तोवर अमेरिकेशी सलोखा करावा व आपले अस्तित्व चालू ठेवावे हा होता. बहुसंख्य जपानी लष्करी अधिकारी युद्ध करण्याच्या बाजूचे होते. तर राजकारणी मुत्सद्द्यांना अमेरिकेबरोबर बोलणी करून मगच कार्यक्रम ठरवावा असे वाटत होते. या वेळी प्रिन्स कोनोये हे जपानचे मुख्यप्रधान असल्याने, त्यांनी प्रथम अमेरिकेशी बोलणी सुरू करण्याचा प्रयत्न केला. त्यात अमेरिकेपुढे जपानने एकूण पाच कलमे ठेवली. ती कलमे अशी. ( १ ) जपानने इंडोचायनावरील तावा सोडून द्यावा. ( २ ) जपानचे चीनमधील आर्थिक संबंध निर्वेध असल्याचे अमेरिकेने मान्य करावे. ( ३ ) आग्नेय आशियातील आणखी कोणत्याही प्रदेशावर यापुढे जपान चढाई करणार नाही. ( ४ ) चीन व जपान यांच्यातील संघर्षांत चीनला मिळणारी दोस्त राष्ट्रांची हरतऱ्हेची मदत तावडतोब थांबविण्यात यावी. थोडक्यात म्हणजे चीनचा प्रश्न हा जपानचा एक खासगी व अंतर्गत प्रश्न आहे, असे दोस्तांनी कबूल करावे. ( ५ ) अमेरिकेने जपानवर घातलेले व्यापारी निर्बंध काढून घ्यावे.

परंतु वरील तत्त्वांनुसार जपानबरोबर मैत्री करण्याचे अमेरिकेने स्पष्टपण नाकारले. या वेळी जपानी मंत्रिमंडळात युद्ध व संरक्षण खात्याचे मंत्री जनरल तोजो हे होते. ते लष्करशाही गटाचे म्होरके होते. मुख्यप्रधान कोनोये यांनी जपानची सदिच्छा सिद्ध करण्याकरिता चीन व इंडोचीनमधील सर्व जपानी सैनिक काढून घ्यावे असे सुचविताच, संरक्षणमंत्र्यांनी ती गोष्ट स्वच्छ झिडकारून लावली. मंत्रिमंडळात आपल्या मताला फारसा पाठिंबा नाही असे दिसताच, प्रिन्स कोनोये यांनी आपली मुख्य प्रधानाची खुर्ची सोडली व आपोआपच जनरल तोजो हे जपानचे पंतप्रधान बनले. हे सत्तांतर दिनांक १६ ऑक्टोबर १९४१ रोजी झाले. दिनांक १ नोव्हेंबर १९४१ रोजी पंत-प्रधान जनरल हिदेकी तोजो यांनी संरक्षणविषयक सर्व मुख्याधिकाऱ्यांची बैठक बोलाविली. या बैठकीत युद्धाचा आराखडा नक्की करण्यात आला व त्याप्रमाणे सर्व तयारी जय्यत होईतोपर्यंत पंतप्रधान तोजो यांनी काहीशा मानभावीपणाने जपान व अमेरिका या दोन देशांतील मतभेद, गैर समजुती, दूर व्हाव्या यासाठी पुन्हा एकदा प्रयत्न सुरू केले. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री

श्री. कॉर्डेल हल यांनी जनरल तोजो यांना ' स्वीकारा किंवा फेटाळा ' अशा आशयाच्या तीन अटी सादर केल्या. त्या अटी अशा – (१) जपानने सर्व इंडोचीन सोडून द्यावा. (२) त्याचप्रमाणे चीनवरील आपली चढाई मागे घ्यावी व (३) चीनमधील चिआंग कै शेक यांच्या राष्ट्रवादी सरकारास जपानने मान्यता द्यावी.

वरील तीन अटी पाहून आता युद्धाखेरीज गत्यंतर नाही, ही गोष्ट जपानी सरकारला कळून चुकली. तेव्हा लगेच जपानी मंत्रिमंडळाची एक तांतडीची बैठक घेण्यात येऊन तीत इंग्लंड, अमेरिका व हॉलंड या राष्ट्रांविरुद्ध युद्ध घोषित करण्यात आले. पाठोपाठ दिनांक ७ डिसेंबर १९४१ रोजी जपानी विमानांनी प्रशांत महासागरातील अमेरिकेच्या पर्लहार्बर या कडेकोट बंदोबस्त असलेल्या आरमारी तळावर प्रखर बाँब हल्ला चढविला. या हल्ल्यात अमेरिकन आरमाराचा इतका नाश झाला, की त्यानंतर सुमारे एक वर्षभर अमेरिकेचे नाविकदल प्रशांत महासागरात फिरकूच शकले नाही. लागलीच जपानी लष्कराने जर्मन युद्धतंत्राचा अवलंब करून सिंगापूर, मलाया, इंडोनेशिया, फिलिपाईन्स बेटे, ब्रह्मदेश वगैरे आशिया खंडातील प्रदेश झंझावाती धडाडीने एकामागून एक सर केले.

परंतु जपानची ही लष्करी चढाई फार काळ टिकू शकली नाही. जपानी लष्करी अधिकाऱ्यांना आपल्या शक्तीबद्दल जो एक वृथा गर्व झाला होता, तो आता ओसरण्यास सुरवात झाली. एव्हाना अमेरिकन आरमार पूर्ववत युद्धाला सज्ज झाले. अमेरिकन विमानदलानेही जपान व आग्नेय आशियातील जपानच्या सत्ताधाऱ्यांनी व्यापलेल्या प्रदेशाची टेहेळणी सुरू केली. जून १९४४ मध्ये दक्षिण जपानवर अमेरिकन विमानदलाने व आरमारी दलाने संयुक्त हल्ला केला आणि ' सायमान ' हे बंदर काबीज केले. साहजिकच जपानी सैनिकाचे धैर्य खचू लागले. इतक्यात ' हिरोशिमा ' येथे अमेरिकन विमान दलाने एक ॲटमबाँब टाकून सर्व जपानभर इतकी दाणादाण उडवून दिली, की जनरल तोजो यांचे मंत्रिमंडळच गडगडले. त्यांच्या जागी आलेल्या जनरल कोईसो या पंतप्रधानांनी जपानला शक्य तितक्या लवकर कमीत-कमी मानहानीचा तह करून मिळावा, असे प्रयत्न सुरू केले. याच सुमाराला रशियानेही जपानबरोबर झालेला मैत्रीचा तह झुगारून देऊन जपानशी

युद्ध पुकारले व मांचूरियावर हल्ला चढविला. तेव्हा ' सांगाल त्या अटीवर तह करू,' असे म्हणून जपानने दिनांक २ सप्टेंबर १९४५ रोजी संपूर्ण शरणागती पत्करली.

**लोकसंख्या**

सबंध आशिया खंडात जपानसारखा दाट लोकसंख्येचा दुसरा देश नाही. एकंदर १,४२,७६७ चौरस मैलांच्या क्षेत्रफळात सुमारे ९॥ कोटी लोक राहतात. म्हणजे लोकसंख्येची सरासरी दर चौरस मैलास ६५० इतकी पडते. युरोप खंडातील काही प्रगत देशांत यापेक्षाही दाट लोकसंख्या आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न जपानमध्ये विशेष बिकट होण्याचे कारण म्हणजे त्या देशात एकंदर क्षेत्रफळाच्या फक्त १५ टक्के जमीनच मशागतीकरता मिळू शकते. जपानमधील किऊशू या मध्य बेटात एकंदरीने मैदाने बरीच असल्यामुळे या बेटावर तर लोकसंख्येचे प्रमाण सरासरीपेक्षा चारपटीहूनही आधिक आहे. उत्तरोत्तर जपानमधील लोकसंख्या शहरी व ग्रामीण अशा दोन्ही विभागात एकसारखी वाढत असल्याने वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न जपानी राज्यकर्त्यांना एकसारखा भेडसावीत आहे.

तोगूकावा शोगुन घराण्याच्या सुरवातीला म्हणजे सतराव्या शतकाच्या सुरवातीला जपानची एकंदर लोकसंख्या दोन कोटींच्या आसपास होती. देशांतर्गत शांतता व सुखी जीवन यामुळे अठराव्या शतकाच्या मध्याला ही लोकसंख्या सुमारे तीन कोटींपर्यंत वाढली. म्हणजे जवळ जवळ १५० वर्षांत लोकसंख्येचे प्रमाण दीडपट झाले. शोगुनांची सत्ता जाऊन मीईजी राज-घराण्याकडे सत्ता आल्यावर, म्हणजे १९ व्या शतकाच्या मध्याला ही लोकसंख्या जवळजवळ तीन कोटींच्या घरात होती. या शंभर वर्षांच्या कालखंडात जपानची लोकसंख्या स्थिर राहण्याची दोन मुख्य कारणे अशी – (१) बालमृत्यूचे मोठे प्रमाण व (२) सामाजिक आचार व नियम. इस्टेटीचा वारसा फक्त थोरल्या मुलाकडे जावा, असा कायदा असल्याने साहजिकच त्याचा जननावर परिणाम होणे अपरिहार्य होते. त्याचबरोबर सर्वसाधारणपणे थोरल्या भावा-खेरीज इतरांनी विवाह करणे व विवाहोत्तर संतती निर्माण करणे यावरही आपोआपच बंधने आली. मीईजी सत्तांतरानंतर देशाची औद्योगिक भरभराट

होऊ लागली. शेती, मच्छीमारी, खाणकाम, वगैरे उद्योगधंद्यांना ऊर्जितावस्था आली. देशांतर्गत दळणवळण वाढले, सामाजिक आरोग्य सुधारले व या सर्वांचा परिणाम म्हणून जपानची भरभराट होऊ लागली. औद्योगिक भरभराटी-बरोबर लोकसंख्याही भराभर वाढू लागली. या वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्याकरता प्रथम जपानच्या अगदी उत्तरेकडील होक्काइदो या बेटावर वसाहती स्थापन होऊ लागल्या. त्यामुळे या बेटाचा कायापालट होण्यास पुष्कळच मदत झाली. याच सुमाराला जपानच्या औद्योगीकरणालाही सुरवात झाली. मोठमोठी शहरे व कारखान्यांची केंद्रे उदयाला येऊ लागली. लोकसंख्या खेड्यांकडून भराभर शहरांकडे धावू लागली. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपासून तो विसाव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत जपानी उद्योगधंद्याचा पसारा इतक्या वेगाने वाढत होता, की काही काही भागातील कित्येक सलग खेडी निर्जन होऊन गेली. पहिल्या महायुद्धाच्या काळात तर जपानी उद्योगधंदे एकसारखे अहोरात्र चालू असत व त्यांच्यामध्ये सारखी भरच पडत होती.

पहिल्या महायुद्धानंतर काही काळ जपानमध्ये मंदीची एक भलीमोठी लाट आली. परंतु त्या मंदीच्या काळात लोकसंख्यावाढीला काही आळा बसला नाही. लोकसंख्या एकसारखी वाढतच राहिली. त्यामुळे पहिल्या महायुद्धा-नंतर जपानला आपल्या वाढत चाललेल्या लोकसंख्येची काहीतरी सोय लावणे अगत्याचे वाटले. अशा स्थितीत कोरिया, मांचूरिया व चीन या प्रदेशा-वरील आर्थिक स्वारी जपानच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने अटळ ठरते. वेदान्त सुचतो पोट भरल्यावरच ! पोटात काही नसले, की सुस्वर भजनही तापदायक ठरते. दोन प्रहरच्या भुकेची भ्रांत असली, म्हणजे पोट भरण्यासाठी कोणत्याही प्रकारचा मार्ग शोधण्याची आपोआप इच्छा होते. अशा वेळी सापडलेला मार्ग हा नीती-अनीती, हिंसा-अहिंसा, खरे-खोटे, यांसारख्या गोष्टींच्या निकषावर घासून पाहण्याचे सुचत नाही. तावडतोबीची गोष्ट म्हणजे पोटभर अन्न मिळविणे हीच शिल्लक राहते.

दुसऱ्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांच्या विमानदलाने जपानवर बेसुमार बाँबवृष्टी केली. परिणामी अनेक शहरे उद्ध्वस्त झाली. तेथील लोकसंख्याही कमालीची रोडावली. इ. स. १९४० मध्ये तोकियोची लोकसंख्या सत्तर लक्ष होती ती इ. स. १९४५ मध्ये जेमतेम तीस लक्ष उरली. म्हणजे जवळजवळ

चाळीस लक्ष लोक मधल्या पंचवार्षिक युद्धकाळात मरण पावले. ओसाकाची लोकसंख्या इ. स. १९४० मध्ये वीस लक्ष होती ती इ. स. १९४५ मध्ये दहा लक्षांवर उतरली.

महायुद्धोत्तर काळात जसजशी औद्योगिक स्थिरस्थावरता येऊ लागली, तसतशी लोकसंख्याही भराभर वाढू लागली. इ. स. १९४५ मध्ये तोकियोची लोकसंख्या ३० लक्ष होती ती इ. स. १९६० पर्यंत ८० लाखांच्यावर गेली. औद्योगीकरणाच्या प्रभावामुळे इ. स. १८७५ मध्ये निरनिराळ्या खेड्या-मध्ये ७८ टक्के लोकसंख्या होती, ती इ. स. १९४५ मध्ये जेमतेम ४५ टक्केच राहिली. आर्थिक दृष्ट्या इतके मोठे लोकसंख्येचे स्थित्यंतर राजकीय दृष्ट्या फार दूरगामी झाल्यास आश्चर्य नाही.


खाली दिलेल्या कोष्टकावरून गेल्या सुमारे १०० वर्षांत जपानमधील लोकसंख्या, जननप्रमाण, मृत्यूचे प्रमाण वगैरेंमध्ये कसकसा बदल झाला ते स्पष्ट होईल.

| वर्ष | एकंदर लोकसंख्या ( १००० ) | दर हजारी जननप्रमाण | मृत्यूप्रमाण | लोकसंख्येची वाढ % |
|---|---|---|---|---|
| १८६८ | ३०,००० | – | – | – |
| १८७४ | ३५,१५४ | २४.६ | २०.५ | ४.१ |
| १८९० | ३९,९०२ | २८.३ | २०.४ | ७.९ |
| १९१० | ४९,१८४ | ३३.९ | २१.१ | १२.८ |
| १९२० | ५५,३९१ | ३६.३ | २५.४ | १०.९ |
| १९२५ | ६०,२१० | ३५.० | २०.३ | १४.७ |
| १९४० | ७१,४०० | २९.० | १६.२ | १२.७ |
| १९६७ | ७८,१०१ | ३४.३ | १४.६ | १९.७ |
| १९५५ | ८९,२७६ | १९.४ | ७.८ | ११.६ |
| १९६० | ९२,६०० | १८.२ | ७.६ | १०.७ |

एकसारख्या वाढत जाणाऱ्या जपानी लोकसंख्येवर उपाय म्हणून जपानी लोकांना आशिया खंडातील कोरिया, मांचूरिया वगैरे निसर्गसंपन्न प्रदेश व प्रशांत महासागरातील अनेक लहान-मोठी बेटे पादाक्रांत करावी लागली,

असे काही विचारवंतांचे मत असल्याचे दिसते. परंतु या प्रदेशात वसाहत करण्याकरता गेलेल्या जपानी लोकांची संख्या पाहता हे म्हणणे फारसे पटण्यासारखे नाही हे स्पष्ट दिसते. वाढत्या लोकसंख्येच्या नावावर जपान्यांनी आपल्या साम्राज्यात, व्यापारात व सागरी वाहतुकीत वाढ करण्याची आपली इच्छा पुष्कळशी पुरी करून घेतली, असे परखडपणे म्हणता येईल.

याच दृष्टीने पाहता जपानच्या आसमंतातील कोरिया व मांचूरिया या दोन आशियाई प्रदेशांकडे जपानची दृष्टी वळणे अगदी स्वाभाविक होते. विशेषत: कोरियामध्ये पुष्कळ जपानी कुटुंबांची वसाहत होऊ शकेल, अशीच तेथील भौगोलिक परिस्थिती होती. त्या मानाने जपानी लोकांना मांचूरियाचे फारसे आकर्षण वाटले नाही. जपानमधून स्थायिक होण्याकरता जाणाऱ्यांबद्दलचे जे आकडे उपलब्ध आहेत, त्यावरून तरी जपानी लोकसंख्येचा हा प्रश्न, परदेशात जाऊन स्थायिक होण्याने सुटण्या सारखा नाही हे स्पष्ट झाले. प्रतिवर्षी जपानच्या लोकसंख्येत होणारी सरासरी वाढ २० लाखांच्या आसपास आहे. अर्थातच दरवर्षी इतके जपानी लोक परदेशांत राहण्याकरता जातात असे नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या नंतरच्या काळात प्रशांत महासागरातील निरनिराळ्या बेटांत राहणारे जपानी व अमेरिकेत वसाहती करून राहणारे जपानी या सर्वांची तेथून हकालपट्टी करण्यात आली व त्यामुळे त्यांचे पुनश्च जपानमध्येच पुनर्वसन करणे भागपडले. यातच भर म्हणून किंवा काय, दुसऱ्या महायुद्धानंतर जपानमधील जननाचे व मृत्यूचे दरहजारी प्रमाण कमीकमी होत चालल्याचे दिसते. आजच्या जपानच्या सुमारे १० कोटी लोकसंख्येच्या मानाने या गोष्टी फार महत्त्वाच्या समजाव्या लागतील. परदेशी जाण्यास मज्जाव, देशात पुरेसे अन्न किंवा उद्योग नाही, अशा स्थितीत जपानी जनतेत धोकास्पद अशांतता निर्माण झाली आहे. आता पुनश्च जपानचा कल साम्राज्य वाढविण्याकड वळतो की काय, अशी साधार भीती विचारवंतांना वाटते आहे.



# शेती व इतर उद्योग

इ. स. १८६८ मध्ये शोगुनांच्या हातून मीईजी बादशहाच्या हाती सत्ता आल्यापासून जपानमध्ये आर्थिक व औद्योगिक सुधारणा झपाट्याने होऊ लागल्या. पूर्वीच्या सरंजामशाही अमदानीतील शेतीवर दिला जाणारा भर हळूहळू ओसरत गेला व दिवसेंदिवस जपान्यांचा कल नैसर्गिक साधनसामुग्रीचा शोध घेऊन त्याचा उपयोग करण्याकडे झुकू लागला. त्यामुळे आर्थिक प्रगतीच्या हातात हात घालून जपानी लोकांच्या राहणीचे मानही वाढू लागले.

जपानमधील आर्थिक भरभराट मुख्यत्वे औद्योगीकरणामुळे झाली असली, तरी शेतीच्या व्यवसायामध्येही मोठ्या प्रमाणावर सुधारणा होत गेल्या. सरकारी कृपेमुळे निरनिराळ्या प्रकारच्या उद्योगधंद्यांची जपानमध्ये वेगाने सुरवात झाली. प्रथम प्रथम जपानच्या औद्योगीकरणात काही थोड्या जपानी व्यक्तींचाच सिंहाचा वाटा होता. या व्यक्तींनी आपल्या कुटुंबातील इतर व्यक्तींच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवून निरनिराळ्या प्रकारची उत्पादने सुरू केली.काही व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात

आलेले हे उद्योगधंदे ज्या पद्धतीने चालू झाले, त्या पद्धतीला ' हाईबत्सू ' असे नाव आहे. या काही थोड्या, हाताच्या बोटांवर मोजता येणाऱ्या व्यक्ती किंवा कुटुंबे मातबर असल्याने, त्यांच्या जवळील पैसा त्यांनी उद्योगधंद्यांच्या कारणी लावला व थोड्याच काळात जपानमधील बहुतेक सर्व मोठमोठाले उद्योगधंदे त्यांच्या हातात गेले. एक प्रकारे उद्योगधंद्याची ही मक्तेदारीच त्यांच्याकडे गेली. भारतात ज्याप्रमाणे गेल्या शतकात सुरू करण्यात आलेले मोठमोठे उद्योग हे ' मॅनेजिंग एजन्सी ' च्या पद्धतीने चालू झाले, त्याचप्रमाणे ' हाईबत्सू ' नामक पद्धतीने जपानमधील उद्योगधंद्यांना चालना मिळाली.

विसाव्या शतकाच्या सुरवातीला युरोपखंडात पहिले महायुद्ध सुरू झाले. इंग्लंड हा देश पूर्णपणे युद्धात गुंतला असल्याने इंग्रजांचा व्यापार, युद्धकालात तरी निदान संपूर्ण बसला. या वेळी इंग्लंड व जपान यांच्यात मैत्रीचा करार झालेला असल्यामुळे, जपानी उद्योगपतींना आशियाखंडातील सर्व बाजारपेठा आयत्याच उपलब्ध झाल्या. युद्धकालात जागतिक बाजारपेठेत इंग्लंडची पीछेहाट व त्याच प्रमाणात जपानी मालाची आगेकूच इतकी झाली, की युद्धोत्तर काळात जपानी मालाशी टक्कर देऊन इंग्लिश मालास, आपल्या पूर्वीच्या हमखास बाजारपेठा मिळेनाशा झाल्या. वाढत्या मागणीबरोबर माल पुरवठा वाढविण्याकरता जपानमध्ये भराभर कारखानेही वाढू लागले. या कारखान्यातील उत्पादनही भराभर वाढू लागले. हरएक बाबतीत जागतिक बाजारपेठेत जपानी मालाची पक्कड घट्ट आवळू लागली. अशा रीतीने एके काळी सरंजामशाहीत खितपत पडलेला जपान राजकीय सत्तांतरानंतर उद्योगप्रधान बनला. जसजसे उत्पादन वाढू लागले, तसतशा जास्त जास्त बाजारपेठा हस्तगत करण्याची जरूर भासू लागली. उत्पादन वाढवायचे म्हणजे कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा व्हावयास पाहिजे. यामुळे साम्राज्यविस्तार जरूर वाटू लागला. साम्राज्यविस्तार व जागतिक व्यापार या दोहोंमुळे जल-वाहतुकीला महत्त्व आले. सुमारे पन्नास वर्षांच्या या काळातील जपानचा इतिहास हा खरोखर नव्यानेच स्वतंत्र झालेल्या अनेक लहान-मोठ्या देशांना खचितच मार्गदर्शक होणारा आहे.

दुसऱ्या महायुद्धामधील युद्धजन्य परिस्थितीचा जपानी उद्योगधंद्यांना फार मोठा तडाखा बसला. परंतु त्यानंतर अनेक बंधने लादली जाऊनही

जाज्वल्य राष्ट्राभिमान, अहर्निश कष्ट करण्याची जिद्द, सच्चेपणा, एकजूट वगैरे अनेक राष्ट्रीय स्वभावविशेषांमुळे त्या चिमुकल्या राष्ट्राने आपली गेल्या २० वर्षांत अशी काही प्रगती केली, की खरोखरच त्या राष्ट्राचे जेवढे कौतुक करावे तितके थोडेच ठरणार आहे !

### जपानी शेतीव्यवसाय

जपानमध्ये गेल्या ७०–८० वर्षात झपाट्याने औद्योगिकरण होऊनही शेती हा एक महत्त्वाचा धंदा राहिला आहे. इ. स. १८८० मध्ये जपानमध्ये शेतीवर अवलंबून असणारे सुमारे ८० टक्के लोक होते, परंतु इ. स. १९६० मध्ये हीच टक्केवारी जेमतेम ४० पर्यंत खाली आली. म्हणजे शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांचा भार गेल्या ७५ वर्षांत जवळजवळ निम्म्याने कमी झाला.

जपानच्या एकंदर क्षेत्रफळापैकी फक्त १५ टक्के क्षेत्रफळातच जमिनीची मशागत करता येते. परंतु या १५ टक्के लागवडीखाली येणाऱ्या जमिनीचा जास्तीत जास्त उपयोग करून, जपानच्या वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्याची कसोशीने पराकाष्ठा केली जाते. जपानच्या पश्चिम व दक्षिण भागात भरपूर पाऊस पडतो. त्यामुळे या भागात एका पाठोपाठ भाताची दोन पिके काढण्यात येतात व याशिवाय इतरही एक किंवा दोन पिके निघू शकतात. उत्तर व पूर्व भागात पाऊस कमी व थंडीचे मान जास्त असल्यामुळे भाताचे जेमतेम एक पीक काढता येते.

जपानमधील एकंदर लागवडीखाली असलेल्या जमिनीपैकी सुपीक जमिनीचे प्रमाणही फार थोडे आहे. तिथला सर्व डोंगराळ भाग हा ज्वालामुखींचा बनलेला आहे. या कारणाने तप्त लाव्हा रस जिकडेतिकडे पसरला गेला. या लाव्हामधील काही रासायनिक द्रव्यें जमिनीला पोषक होण्याऐवजी मारकच ठरलेली दिसतात. यामुळे या जमिनीमध्ये लागवड करण्याकरता मोठ्या प्रमाणावरच खतांचा वापर करणे अत्यावश्यक ठरते. सर्वांत स्वस्त म्हणजे कंपोस्ट खत. त्याचबरोबर मानवाच्या मलमूत्राचाही उपयोग खताकडे करता येतो. जपानमध्ये अन्नातून मासळीचा फार मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याने, त्या मासळीतून उरलेले काटे व इतर टाकाऊ भाग यांचाही खतासाठी फार मोठा उपयोग होतो. या सर्वांपेक्षा जास्त

महत्त्वाची खते म्हणजे खनिजे व रसायने यापासून तयार करण्यात आलेली. गेल्या ५०–६० वर्षांत जपानमधील शेतीच्या उत्पादनात झालेली क्रांतिकारक वाढ ही मुख्यत: जपानी शेतकऱ्यांनी आपआपल्या जमिनीत मोठ्या प्रमाणावर केलेल्या रासायनिक खतांच्या वापरामुळेच झालेली आहे.

भारताप्रमाणे जपानमध्येही शेताच्या क्षेत्रफळाचे दरडोई उत्पन्नाचे आकडे विशेष मोठे नाहीत. प्रत्येक शेतकऱ्याच्या मालकीची जमीन लहान असते. या लहानशा जमिनीच्या तुकड्यावरच हा शेतकरी आपल्या अंग-मेहनतीने जास्तीत जास्त पीक काढण्याची शिकस्त करीत असतो. जपानमध्ये साधारणपणे प्रत्येक शेतकऱ्याकडे सरासरीने जेमतेम २–३ एकरच जमीन असते. कित्येक शेतकऱ्यांच्याकडे तर दोन एकरांपेक्षाही लहान जमिनीचे तुकडे आहेत. परंतु आहे त्या जमिनीत खताचा जास्तीत जास्त वापर करून, जमिनीची बांधबंदिस्ती करून, पिकांमध्ये अदलाबदल करून व इतर हरप्रकारे शेतीपासून जास्तीच जास्त उत्पन्न काढण्याकडे या शेतकऱ्याचा कल असतो. त्याच्या भरीला ठराविक वेळी पाणी पुरवठा होण्याकरिता धरणे व पाटांचाही मुक्त उपयोग केला जातो.

जमिनीची मशागत करताना जपानी शेतकरी नांगराचा फारसा उपयोग करीत नाहीत. प्रत्येक शेतकरी कुटुंबातील लहान-मोठी माणसे कुदळ व फावडे यांच्या साह्याने जमीन खणतात, मग खणलेल्या जमिनीत खते वगैरे घालतात व मग पेरणी करून धान्याची पैदास करतात. जपानमध्ये नांगरणीची वहिवाट नसल्याने बैल किंवा इतर जनावरांची शेतीव्यवसायाला फारशी गरज पडत नाही. प्रयेक शेतकऱ्याच्या मालकीच्या जमिनीचे क्षेत्र लहान असल्याने यांत्रिक नांगरटही अशक्यच म्हणावी लागते. शेतीच्या उपयोगी असणारा पाणी पुरवठा करण्यासाठी विहिरीवर पंप बसवून नियमित पाणी देणे एवढ्याचकरता यंत्राचा उपयोग केला जातो. मोठमोठ्या उद्योगधंद्यात यंत्राचा वापर करून मानवी शक्तीची बचत करण्यात येऊ लागली, त्याच्या अल्पांशानेही जपानमधील शेतीच्या धंद्यात मानवी शक्तीची किंवा श्रमांची कपात केली जात नाही. यांत्रिक साधनांचा अभाव असूनही जपानमधील दर एकरी शेतमालाचे उत्पादन आशिया खंडातील कोणत्याही देशापेक्षा खचितच जास्त आहे; इतकेच नव्हे, तर पाश्चात्य राष्ट्रांपैकी कित्येक देशांमधील शेतमालाच्या दरएकरी उत्पादना-

हूनही जास्त आहे. इथल्या शेतीच्या उत्पादनाला जपानी सरकारनेही अप्रत्यक्षरीत्या पुष्कळसा हातभार लावला आहे. प्रत्येक खेड्यात विजेचा पुरवठा केला जात असून, त्यापैकी प्रत्येकात किमान एक तरी शाळा उघडण्यात आली आहे. साहजिकच साक्षरतेचे प्रमाण जपानमध्ये जास्त आहे. त्याच बरोबर शतकऱ्यांना शेतीसंबंधीची हरतऱ्हेची उपयुक्त माहिती लागेल, तेव्हा सरकारी अधिकाऱ्याकडून ती तत्परतेने मिळू शकते. दळणवळणाची साधने मुबलक असल्याने प्रत्येक खेड्याचा बाह्य जगाशी ताबडतोब संपर्क साधता येतो.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपानमधील जमिनीची मालकी ही काही थोड्या व्यक्तींच्या हाती होती. ज्यांना आपल्याकडे जमीनदार असे म्हणतात, अशा जपानमधील जमीनदारांकडे कमीत कमी म्हणजे ६०--७० एकर जमीन असे. हे जमीनदार आपल्या जमीनीपैकी पुष्कळसा भाग इतरांना कसण्याकरता देत असत. त्यामुळे जपानमध्ये जमीन कसणारांचे एकंदर चार भाग पडत असत, ते असे-- ( १ ) ज्यांची स्वतःच्या मालकीची काहीच जमीन नाही असे शेतकरी. ( २ ) स्वतःच्या मालकीच्या लहानशा तुकड्याबरोबर इतरांच्या जमिनी कसणारे शेतकरी. ( ३ ) स्वतःच्या मालकीची जमीन स्वतःच कसणारे शेतकरी व ( ४ ) स्वतःच्या मालकीची स्वतः जमीन न कसता इतरांना खंडाने देणारे जमिनीचे मालक. अशा प्रकारचे जमीनदार दोन प्रकारचे असत. ( १ ) स्वतःच्या देखरेखीखाली खंडकऱ्याकडून जमिनीची लागवड करून घेणारे व ( २ ) स्वतः इतरत्र किंवा परगावी राहून फक्त जमिनीच्या मालकीमुळे जमिनीचा खंड गोळा करणारे.

इ. स. १९४६ मध्ये जपानी कायदेमंडळाने संमत केलेल्या जमीन सुधार कायद्यान्वये जमीनविषयक कायद्यात पुष्कळ फेरफार करण्यात आले व ज्या शेतकऱ्यांच्या स्वतःच्या मालकीची जमीन नाही त्यांना जमिनी देण्याचा प्रयत्न सुरू झाला. पूर्वी जमिनीचे मालक व कुळे यांच्यामध्ये जमिनीच्या खंडाबद्दल प्रथम तोंडी करार-मदार होऊन नंतर ते कायदेशीर करवून घेण्याचा प्रघात असे. नवीन कायद्याप्रमाणे असे तोंडी करार बेकायदेशीर ठरवून, कोणताही करार लेखीच असला पाहिजे अशी तरतूद करण्यात आली. जमिनीच्या खंडाचे प्रमाणही बेतशीर करण्यात आले. भातजमिनीचा खंड एकंदर जमिनीच्या उत्पन्नाच्या २५ टक्यांहून जास्त नाही असे नक्की ठरवण्यात

आले. 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व प्रत्यक्षात अमलात आणण्यात येऊन जे जमीनमालक स्वत:ची जमीन स्वत: लागवडीखाली आणीत नाहीत, त्यांच्या जमिनी खालसा करून त्या कसणाऱ्यांना देण्यात येऊ लागल्या. याचप्रमाणे मोठमोठ्या जमीनदारांकडील जमिनींचे क्षेत्रही कमी करण्यात येऊन, अशा जादा जमीनी भूमीहीनांना देण्यात आल्या. कोणाही जमीनमालकास जास्तीत जास्त साडेसात एकरच जमीन आपल्या स्वत:कडे ठेवता येईल, असा एक सर्वसाधारण निर्बंध घातला गेला. स्वत:च्या मालकीपैकी जास्तीत जास्त अडीच एकर जमीन कुळाकडे कसण्यास देण्याची मुभा ठेवण्यात आली. काही तुरळक अपवाद वगळल्यास या जमीनसुधार कायद्यामुळे शेती व्यवसायात पुष्कळच सुधारणा झाली, असे म्हणावयास हरकत नाही.

जपानमधील लागवडीखाली असलेल्या जमिनीचे दोन मुख्य प्रकार आहेत. ( १ ) सखल भागातील जमीन व ( २ ) उंच भागातील जमीन. एकंदर लागवडीखाली असलेल्या क्षेत्रफळाच्या सुमारे ५३ टक्के जमीन ही सखल भागापैकी आहे. सखल भागातील लागवडीखाली असलेल्या जमिनीचा दर्जा साहजिकच वरचा किंवा उत्तम असतो. अशा सखल भागातील जमिनीत मुख्यत्वे भाताची पेरणी करतात. भात हे जपानी लोकांचे मुख्य अन्न आहे. जपानमध्ये दरमाणशी दरवर्षी तांदळाचा वापर २४९ पौंड आहे.

सखल भागातील जमिनीत तांदळाचे उत्पादन सर्वात महत्त्वाचे आहे. ह्या जमिनीना पाटबंधाऱ्यांच्या साहाय्याने वाटेल त्या वेळेस हवा तेवढा पाणीपुरवठा होऊ शकतो. सखल भागातील भातशेतीचे क्षेत्रफळ सुमारे ८० लक्ष एकर आहे. हे क्षेत्रफळ इ. स. १९५० च्या सुमाराचे आहे.

डोंगराच्या उतरणीवर असलेल्या जमिनीतून भाताचे उत्पादन फारसे होण्याची शक्यता नाही. बांधबंदिस्ती करणे, समपातळी राखणे, वगैरे गोष्टी करूनही अशा जमिनीतून भाताचे उत्पादन काढणे कठीण होते. साहजिकच भाताऐवजी इतर वस्तूंचे उत्पादन अशा जमिनीतून केले जाते. फळफळावळ, भाजीपाला, वगैरे उत्पन्न या क्षेत्रात काढले जाते व त्यालाही भरपूर मागणी आहे. इ. स. १९५० च्या सुमारास डोंगरांच्या उतरणीवरील अशा जमिनींचे एकंदर क्षेत्रफळ सुमारे ३० लक्ष एकरांइतके होते.

जपानमध्ये लागवडीखाली असलेल्या जमिनीतून होणाऱ्या एकंदर उत्पादनात अन्न-धान्याचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे सुमारे ७०-८० टक्के इतके आहे. या अन्न-धान्यातही नुसत्या तांदळाचे उत्पादन सर्वात अधिक आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात जपानी साम्राज्याचे भाग जपानला सोडावे लाग-त्यामुळे तिथल्या अन्नसमस्येचा प्रश्न बिकट होऊ लागला. आपला देश अन्न-धान्याकरता परदेशांवर अवलंबून असावा हे जपानमधील विचारवंतांना बिलकूल पसंत नव्हते. तांदळाच्या उत्पादनात उच्चांक गाठणे, तांदळाला जोड म्हणून गहू, जव, वगैरे अन्नधान्यांचे उत्पादन करणे, वगैरे विचार त्यांनी नक्की केला व आपल्या योजनाही अमलात आणल्या. परदेशातून हवी तितकी अन्नधान्याची आयात करायची म्हणजे त्याची फेड म्हणून एक तर डोक्यावर राष्ट्रीय कर्जाचा बोजा वाढवून घ्यायचा किंवा इतर वस्तूंची जादा निर्यात करायची. या दोन्ही गोष्टी जपानी विचारवंताना नकोशा वाटल्या.

तांदूळ व इतर अन्नधान्याखेरीज जपानमधील शेतीपासूनचे उत्पादन म्हणजे कापूस, अंबाडी वगैरेंचे होय. परंतु हे उत्पादन फारसे महत्त्वाचे नाही. बटाट्याचेही उत्पादन थोड्याफार प्रमाणात होते. पूरक अन्न म्हणून बटाट्याचा उपयोग केला जातो. चहा व रेशीम यांचे उत्पादनही उल्लेखनीय म्हणावे लागेल तांदुळाप्रमाणेच चहा हेही इथल्या लोकांचे एक महत्त्वाचें उत्पन्न समजण्यात येते. ते त्यांचे राष्ट्रीय पेय आहे. चहाचे उत्पादन मुख्यत्वे डोंगरांच्या उतरणीवरील भागात विशेष होते. रेशमाचे किडे पाळून त्यापासून रेशीम तयार करणे हा जपानी शेतकऱ्यांचा एक महत्वाचा जोडधंदा समजला जात असे. अनेक शतकांपासून रेशमाचे उत्पादन हे जपानी शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे एक जोडसाधन समजण्यात येत असे. त्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस रेशमाच्या व्यापारात हळूहळू जपानला महत्त्व येऊ लागले. किंबहुना चीनपेक्षाही जपानमध्ये रेशमाच्या उत्पादनाला विशेष बहर येऊ लागला. विसाव्या शतकाच्या सुरवातीला, तर जागतिक रेशमाच्या उत्पादनात व व्यापारात जपानचा पहिला क्रमांक होता. इ. स. १९२८ नंतरच्या मंदीच्या लाटेत हा रेशमाचा व्यापार व व्यवसाय एकदम घसरगुंडीला लागला. त्याला भर म्हणूनच किंवा काय, यरोपीयन देशात कृत्रिम रेशमाचे उत्पादन सुरू झाले. परिणामी रेशमाची किंमत त्यामुळे भराभर घटू लागली. ज्या जपानमधून

इ. स. १९२०-३० च्या दरम्यान एकंदर निर्यातीच्या जवळ जवळ ३६ टक्के केवळ रेशमाची निर्यात होत असे, त्याच जपानमधून दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीला एकंदर निर्यातीच्या फक्त १४ टक्क्यांपर्यंत रेशमाची निर्यात खाली आली. रेशमाच्या उत्पादनाचा खर्च व त्याला बाजारात मिळणारी किंमत यांमध्ये इतकी तफावत पडू लागली,की जपानमध्ये रेशमाच्या उत्पादनाचा उद्योग आतबट्ट्याचा होऊ लागला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपानी रेशमाला सर्वात मोठे गिऱ्हाईक मिळाले ते अमेरिकेचे. परंतु अमेरिका हे जपानचे शत्रूराष्ट्र झाल्यामुळे अमेरिकेला जपानकडून होणारी रेशमाची निर्यात आपोआपच थंडावली. याचा परिणाम जपानच्या ग्रामीण जीवनावर होऊन सदरहू परिस्थितीला सरकारच कारणीभत आहे, अशा कल्पनेने जपानी लोकमत क्रांतीच्या विचाराकडे झुकू लागले.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात जपानमधील रेशीम उत्पादकानी रेशमाची किमत कमी करणे, रेशमाची वर्गवारी करणे, रेशमाची निर्यात वाढवणे, वगैरे गोष्टींकडे आवर्जून लक्ष देण्यास सुरवात केली; पण दरम्यानच्या काळात अमेरिकन जनतेला रेयॉन, नायलॉन, टेरिलीन, वगैरेची चांगलीच सवय जडली होती. त्यामुळे महत्प्रयास करूनही जपानचा युद्धपूर्व काळातील रेशमाचा धंदा पुन्हा सावरू शकला नाही.

**पशुसंवर्धन**

जपानमध्ये कुरणांचा प्रदेश अतिशय थोडा असल्यामुळे जपानी लोकांचा प्रथमपासूनच पशुसंवर्धनाकडे कमी ओढा आहे. शेतीकरता बैल व इतर प्राण्यांचा फारसा उपयोग केला जात नसल्याने या जनतेला पशुसंवर्धनाचे महत्त्व कधीच पटले नाही. बौद्धधर्माचा सर्व देशभर प्रसार झालेला असल्यामुळे साहजिकच मांसाशनही निशिद्ध मानले गेले आहे. या सर्वांचा परिणाम म्हणजे जपानमध्ये पशुसंवर्धनाकडे सरसहा दुर्लक्ष झाले. गेल्या सुमारे ३०-४० वर्षात जपानी लोकांची वृत्ती पुष्कळच बदलली. अन्नधान्याच्या वाढत्या दुर्भिक्षतेमुळे मांसाहार विषयीचा परंपरागत निषेध्र पुष्कळच सैल झाला. गाई, डुकरे, कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या वगैरे प्राणी पाळण्यात येऊ लागले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील

निर्घृण अन्नटंचाईमुळे पशुसंहार फार मोठ्या प्रमाणावर झाला. खालील आकडे त्या दृष्टीने उद्‌बोधक ठरतील.

| पशूचे नाव. | संख्या ( लाखात ) | |
|---|---|---|
| | १९४१ | १९४५-४६ |
| घोडे | १० | ३ |
| दुभती जनावरे | २० | ६ |
| डुकरे | १० | ५ |
| कोंबड्या | ५०० | १५० |

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपानमध्ये पशुसंवर्धनाचे खाते निर्माण करण्यात आले. त्यामुळे अलिकडे पशूंची संख्याही पुष्कळच वाढू लागली आहे.

### जंगले व जंगलसंपत्ती

जपानच्या एकंदर क्षेत्रफळापैकी सुमारे ८५ टक्के भाग डोंगराळ आहे. सरासरी पर्जन्यमानही भरपूर आहे. या दोन गोष्टींमुळे जपानमध्ये जंगले विपुल आहेत. असे म्हणतात, की जपानमधील जंगलांनी जवळजवळ साडेचार कोटी एकर जमीन व्यापली आहे. या जंगलांपैकी सुमारे ५० टक्के जंगले खासगी व्यक्ती किंवा संस्था यांच्या मालकीची असून बाकीची सरकारी अगर निमसरकारी मालकीची आहेत. या जंगलात निरनिराळ्या १,५०० जातीचे मोठमोठे वृक्ष आहेत. या जंगलांचे खालील-प्रमाणे तीन मुख्य नैसर्गिक भाग पडतात. ( १ ) दक्षिणेकडील रुंदपर्णी सदाहारी वृक्षांचा प्रदेश – या प्रदेशात ओक जातीची झाडे विपुल आहेत. दक्षिणेकडील कियूशू व शिकोकू बेटे तसेच मध्य होनशिऊ बेटाचा दक्षिणेकडील व मध्य भाग हाही याच प्रदेशांत मोडतो. ( २ ) बीच, अॅश, चेस्टनट, पॉपलर वगैरेसारख्या पानझडी व पाईन, सेडर, वगैरेसारख्या झुबक्याझुबक्यांच्या वृक्षांचा प्रदेश--या प्रदेशात होनशिऊ व होक्काइदो या बेटांचा समावेश होतो. ( ३ ) स्प्रूस, फर, बर्च वगैरेसारख्या बारीक पानांच्या सरळसोट वृक्षांचा प्रदेश–उत्तर व पूर्व होक्काइदो बेटाचा बराचसा भाग व होनशिऊ बेटावरील उंच डोंगराळ भागाचा यात समावेश होतो.

वरील तीन मुख्य नैसर्गिक विभागांशिवाय जपानमध्ये असंख्य व अगणित अशी बांबूची झाडे इतस्ततः कितीतरी पसरलेली आहेत. किंबहुना प्रत्येक हवामानाच्या प्रकारात बांबूचे झाड कायमचे वास्तव्य करून असल्याचे दिसते. बांबूच्या या नैसर्गिक विपुलतेमुळे आणि ज्वालामुखी व धरणीकंप यांचे जपानमध्ये कायमचे भय असल्यामुळे जपानमधील घरांसाठी बांबूचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. केवळ घरबांधणीकडेच नव्हे, तर घरातील बहुतेक सर्वच लाकडी वस्तू या बांबूच्या बनवलेल्या असतात. संसारातील भांडीकुंडी हीसुद्धा शक्यतोवर बांबू किंवा लाकडाचीच केलेली असतात.

जपानी जीवनात लाकडी कोळशाचा उपयोग इंधर म्हणून केला जातो. जपानमधील विपुल जंगलांमुळे कोळशाचे उत्पादन भरपूर होते. अलिकडे काही देशांत लोहमार्गाखाली असणारे ओंडके हे लाकडाऐवजी लोखंडाचे किंवा सिमेंटचेही करण्यात येतात.

जपानी जंगलांतील लाकडाचा मोठ्या प्रमाणावरील वापराचा आणखी एक प्रकार म्हणजे कागदाचा लगदा तयार करणे. या लगद्यापासून रेयॉन किंवा कृत्रिम रेशमाचे उत्पादन करता येते. जपानची लाकडाची भूक हळूहळू इतकी वाढू लागली आहे, की स्थानिक जंगलांतून मिळणारे लाकूड हे निरनिराळ्या उद्योगधंद्याना अपुरे पडू लागले. साहजिकच कॅनडा, नॉर्वे व स्वीडन या देशांतून मोठमोठ्या लाकडी ओंडक्यांची आयात सुरू करणे अपरिहार्य झाले आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर औद्योगिक पुनर्वसनासाठी जपानी जंगलतोडीला इतका वेग आला, की अशाच तऱ्हेने जपानमधील जंगलतोड आणखी ५-५० वर्षे चालू राहिली, तर जपानमध्ये जंगल असे उरणार नाही ! ही भीती खरी ठरू नये, यासाठी दुसऱ्या महायुद्धानंतर जपानच्या सरकारने जंगल संरक्षण व जंगल सुधार खाते उघडले. या खात्यामार्फत जपानमधील यच्चयावत जंगलांची निगा राखली जाऊन, प्रत्येक जंगलतोडीबरोबर जंगलाच्या पुनर्वसनाचाही प्रश्न हाती घेण्यात येऊ लागला.

**मच्छीमारी**

मच्छीमारी हा जपानमधील लोकांचा एक फार मोठाउपजीविकेचा उद्योग आहे. मासळी हे जपानी लोकांचे राष्ट्रीय अन्न समजण्यात येते. साहजिकच

जसजशी जपानची लोकसंख्या वाढत जाईल, तसतशी मासळीची मागणी वाढू लागेल व त्या प्रमाणात त्या धंद्यावर उपजीविका करणारांच्या संख्येतही भर पडेल.

जपानमध्ये मच्छीमारीचा धंदा सशास्त्र पायावर सुरू झाल्याला आज जवळ जवळ एक शतकाचा काळ लोटला आहे. अलिकडे जपानमधील मासळीचें उत्पादन जगातील कोणत्याही देशापेक्षा जास्त आहे. जगात निर्माण होणाऱ्या एकंदर मासळीच्या सुमारे ५० टक्के भाग एकट्या जपानमध्ये होतो. दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपानमध्ये सुमारे १५ लक्ष लोक व साडेतीन लक्ष लहानमोठ्या बोटी या मच्छीमारीच्या उद्योगात गुंतल्या होत्या. या काळात प्रतिवर्षी ७० लक्ष टन मासळीचे उत्पादन होत असे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात या मच्छीमारीच्या व्यवसायात अनेक अडचणी उत्पन्न होऊ लागल्या. सर्वांत मोटी अडचण म्हणजे युद्धजन्य परिस्थितीमुळे असंख्य कोळी लोक व तितक्याच प्रमाणात त्यांची जहाजे युद्धाच्या कामगिरीवर नेण्यात आली. युद्धकाळातील बाँबहल्ल्यामुळे कित्येक मच्छीमारी बोटींना जलसमाधी मिळाली व तातडीने नवीन बोटी बांधणे शक्य झाले नाही.

युद्धोत्तर काळात जपानचा मच्छीमारीचा उद्योग वाढीस लागलाही असता. परंतु जपानी लोकांवर ज्या अटी लादण्यात आल्या, त्यापैकीं एक म्हणजे तिथल्या कोळी लोकांनी मच्छीमारीचे क्षेत्र अगदीच मर्यादित केले पाहिजे. याचा परिणाम म्हणजे इ. स. १९३८ मध्ये ज्या जपानमधील मच्छीमारीचें उत्पादन ७० लक्ष टनांच्या आतबाहेर होते, त्याच जपानमध्ये इ. स. १९५५ मध्ये जेमतेम ३५ लक्ष टन मासळीचेच उत्पादन होऊ शकले.

जपानमध्ये पकडण्यात येणाऱ्या मासळीत सार्डिन, बॉनिटो, म्यूना, सी ब्रोन, प्रॉन, ईल. कटलफिश, स्क्विड व व्हेल या जातींचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

## इतर उद्योग धंदे

जेमतेम एका शतकाच्या कालावधीत जपानमधील औद्योगिक प्रगती इतकी पराकोटीला पोचली ही एक खरोखरच कौतुकास्पद् अशी गोष्ट म्हणावी लागेल. त्यातल्या त्यात जपानमध्ये कोणत्याही प्रकारच्या कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा नसताना झालेली ही प्रगती हे तर विशेषच आश्चर्य होय

लोखंड व कोळसा ही दोन खनिजे म्हणजे आधुनिक उद्योगधंद्यांची प्राणभूत द्रव्येच होत. परंतु या दोन्ही खनिजांच्या बाबतीत तिथली परिस्थिती फारच निराशाजनक आहे. तांबे, पत्रा, पितळ, शिसे, वगैरे इतर धातूंच्या बाबतीतही जपानला फार मोठ्या प्रमाणात परदेशांवर अवलंबून राहावे लागते. नाही म्हणावयास सोने व चांदी या दोन धातूंचे जपानमधील उत्पादन मात्र पुष्कळच चांगले आहे. देशांतर्गत गरजा भागवून या दोन धातू काही प्रमाणात परदेशी रवाना केल्या जातात. इ. स. १९४० साली जपानमध्ये सोन्याचे उत्पादन वीस हजार किलोग्रॅम व चांदीचे उत्पादन साडे तीन लक्ष किलोग्रॅम होते. हे उत्पादन त्या वेळपर्यंतच्या सोने–चांदीच्या उत्पादनातील उच्चांक ठरले गेले.

गंधक या एकाच खनिजाच्या बाबतीत मात्र जपान इ. स. १९४० पर्यंत स्वयंपूर्ण होता असे दिसते. प्रतिवर्षी उद्योगधंद्यासाठी लागणाऱ्या सुमारे१० लाख टन गंधकाची मागणी स्थानिक खाणींकडून पुरविली जात असे. सुमारे ७५ हजार टन तांबे जपानी उद्योगधंद्याना दरसाल लागत असे; परंतु त्यापैकी बराचसा पुरवठा हा परदेशांहून होणाऱ्या तांबे आयातीतूनच करावा लागे.

आधुनिक जगातील औद्योगीकरणाचा मूळ कणा म्हणजे पोलाद होय. पोलादाच्या निर्मितीकरता कच्चे लोखंड, मँगॅनीज, खनिज कोळसा व इतर मिश्रणाकरता लागणाऱ्या धातू यांची फार जरूर असते. पोलादाच्या निर्मितीला आवश्यक असणारा कच्चा माल जपानमध्ये तर जवळ जवळ उपलब्ध होतच नाही असे म्हटले तरी चालेल. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीपर्यंतच्या म्हणजे विसाव्या शतकाच्या पहिल्या ४० वर्षांत जपानमध्ये पोलादाच्या निर्मितीला आवश्यक असणाऱ्या कच्च्या लोखंडापैकी जेमतेम १२ टक्के कच्चे लोखंड खाणीत मिळू शकत असे. कच्च्या लोखंडाप्रमाणे पोलादाच्या निर्मितीकरता लागणारी मँगॅनीज व क्रोमियम ही खनिजे जेमतेम पुरतील इतकीच जपानमध्ये उत्पादन होऊ शकत असत. उदाहरणार्थ,जपानमध्ये प्रतिवर्षी ५० हजार टन क्रोमियमचे उत्पादन होत असे. मँगॅनीज मात्र मलाया, भारत व रशिया या देशांतून आयात केली जाई. दुसऱ्या महयुद्धापूर्वी जपानचे मँगॅनीजबद्दलचे परावलंबित्व शक्य तितके कमी करण्याकरिता जपानमधील अगदी हलक्या प्रकारच्या मँगॅनीजचे उत्पादन वाढवून त्याचाच वापर करण्याचे धोरण आखण्यात आले. त्यामुळे इ. स. १९३६ मध्ये मँगॅनीजचे एकंदर उत्पादन जे सुमारे पाऊण

लाख टनांच्या आसपास होते, ते इ. स. १९४४ मध्ये जवळजवळ ४ लाख टनांपेक्षाही जास्त झाले.

मँगॅनीज व क्रोमियम यांच्याप्रमाणेच निकेल, टंगस्टन वगैरे इतर धातूंचे उत्पादनही अगदीच अल्प होते. भट्टीच्या कोळशाच्या उत्पादनातही जपान हा देश फारच मागे आहे. एकंदरित पाहता, आधुनिक औद्योगीकरणातील जपानपुढील सर्वांत मोठी अडचण म्हणजे बहुतेक सर्व कच्चा माल आयात करणे ही होती. खनिज तेल, कोळसा, शिसे, जस्त वगैरे इतर खनिज वस्तूंच्या बाबतीतही जपानची परिस्थिती फारच कठीण होती. इतक्या कठीण परिस्थितीतही जपानी लोकांनी धाडसाने व धीमेधीमे आपल्या देशात निरनिराळ्या प्रकारचे मोठमोठे उद्योग व कारखाने सुरू केले. इतकेच नव्हे, तर अगदी थोड्या अवधीत जगाच्या बाजारपेठाही काबीज करण्यास सुरवात केली.

जपानची औद्योगिक भरभराट जसजशी होऊ लागली, तसतसा त्याचा परदेशांशी व्यापारही वाढू लागला. वाढत्या उद्योगधंद्यांना वाढत्या प्रमाणावर कच्च्या मालाचा पुरवठा करण्याची जरूर भासू लागली. हा सर्व कच्चा माल परदेशांकडून घेण्यासाठी बँका, जहाजे वगैरेंचीही निकड वाटू लागली. कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर केल्यावर पुन्हा तो पक्का माल निरनिराळ्या देशात पाठवायचा म्हणजे आगबोटींचा प्रश्न आला. त्यामुळे जपानचे नौदल वाढू लागले. त्या पाठोपाठ त्याच्या संरक्षणाचा प्रश्नही आपोआपच आला. थोडक्यात सांगायचे तर, जपानच्या औद्योगिक भरभराटीची दखल व काळजी घेणे हे काम जपानच्या संरक्षणखात्याला आवश्यक झाले. व्यापारीदृष्ट्या कच्च्या मालाच्या पैदाशीचे देश कोणते, ते जपानच्या आसपास आहेत किंवा कसे, जपानी पक्क्या मालाला हमखास बाजारपेठा कोणत्या, त्याचप्रमाणे आणखी नवीन बाजारपेठा कोणत्या उपलब्ध होतील, या नव्या बाजार पेठांच्या देशांशी जपानचे संबंध मैत्रीचे कसे राखले जातील, इ. कामे परराष्ट्रखात्याला जबाबदारीची व महत्त्वाची ठरली. ही जबाबदारी पेलण्यासाठी जपानी सरकार निरनिराळ्या खातेमंत्र्यांच्या सल्ल्याने व सहकार्याने काम करीत राहिले.

विमाने व मोटारी यांचा जपानमध्ये जसजसा प्रसार होऊ लागला, तसतसा खनिज तेलाच्या पुरवठ्याचा प्रश्नही तिथल्या अर्थशास्त्रज्ञांना भेडसावू लागला. विशेषतः दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी परदेशातील खनिज तेलाची आवक

बंद झाल्यापासून, तर खनिज तेलाचे महत्त्व त्यांना जास्तजास्तच पटू लागले. मध्य होनशिऊ बेटावरील अकीता व निईगाता या दोन प्रदेशात तेलाचा शोध सुरू झाला. या ठिकाणच्या तेलविहिरींतून प्रतिवर्षी २० लाख बॅरल्स तेलाचे उत्पादन होऊ लागले; पण हे उत्पादन म्हणजे जपानच्या एकंदर तेलविषयक मागणीच्या फक्त दहा टक्केच होते. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीला जपानला होणारी खनिजतेलाची निर्यात अमेरिकेने बंद केली. त्यामुळे जपानच्या मानेभोवती जो एक फास तयार झाला, तो दूर करण्याकरता जपानला नाईलाजास्तव खनिज तेलाने समृद्ध असलेल्या कालिमंतान, सारावाक, सावा, इंडोनेशिया, वगैरे प्रदेशांचा सक्तीने तावा घ्यावा लागला. जी गोष्ट सरळ मार्गाने मिळत नाही ती नाइलाज म्हणून जबरदस्तीने घेणे किंवा घेण्याचा प्रयत्न करणे हा मानवी स्वभावच आहे. त्याला अनुसरूनच जपानने हे पाऊल उचलले होते व म्हणूनच ते न्याय्य होते !

## खनिज कोळसा

दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपानमधील खनिज कोळशाचे उत्पादन जवळजवळ ५ कोटी टनांच्या आसपास होते. हे उत्पादन म्हणजे राष्ट्रीय गरजेच्या जेमतेम ५० टक्केच होते. कोळशाच्या खाणीत काम करणारे कामकरी बहुतेक चिनी व कोरियन असल्याने व दुसऱ्या महायुद्धानंतर त्यांना त्यांच्या मायदेशी पाठविणे भाग पडल्यामुळे महायुद्धोत्तर काळात हे कोळशाचे उत्पादन एकदम २ कोटी टनांपर्यंत खाली घसरले. जपानमधला हा बहुतेक कोळसा निकृष्ट-प्रतीचा असल्याने आधुनिक उद्योगधंद्यांना त्याची फारशी मदत होत नसे. हे कोळशाचे उत्पादन जपानमधील किऊशू व होक्काईदो या दोन बेटांवरच विशेषेकरून होते. याखेरीज अलिकडे होनशिऊ व शिकोकू या बेटांवरही नव्यानेच कोळशाच्या खाणींचा शोध लागला आहे. शक्यतो स्वदेशात मिळणाऱ्या कोळशावरच आपली सर्व गरज भागविण्याचा निर्धार जपान-मधील उद्योगपतींनी अलिकडे केला आहे.

## जलविद्युत

अलिकडील काळातील मोठमोठाले उद्योगधंदे दोन मुख्य गोष्टीवर आधारलेले असतात. पोलाद व कोळसा किंवा शक्ती या त्या दोन

गोष्टी होत. जपानमध्ये पोलादाची निर्मिती बहुतेक सर्वस्वी परदेशांतून आयात केलेल्या कच्च्या लोखंडावर अवलंबून आहे. कोळसा आहे, पण तोही निकृष्ट प्रतीचा. जपानी उद्योगपतींनी कोळशाचा वापर शक्य तो कमी केला व जास्तीत जास्त प्रमाणात जलविद्युत उपलब्ध करून तीवर आपले मोठमोठे कारखाने उभारण्यास सुरवात केली. जलविद्युतनिर्मितीकरिता जपानमध्ये निसर्गाची फार मोठी मदत होते. एकंदर जपानी क्षेत्रफळाचा मोठा भाग डोंगराळ असल्याने त्या भागातून वाहणाऱ्या असंख्य नद्या-नाल्यांचा व ओहळांचा विद्युत्‌निर्मितीकडे उपयोग करण्यात येऊ लागला. इ. स. १९५३ साली जपानमध्ये जलविद्युत निर्मितीची लहानमोठी अशी एकंदर १,४०० केंद्रे होती. या सर्व केंद्रांतून प्रतिवर्षी ६४ लाख किलोवॅट इतकी वीज निर्माण करण्यात येऊ लागली. या प्रचंड वीजनिर्मितीमुळे घरकामाकरिता व उद्योगधंदे आणि कारखाने या सर्वांकरिता भरपूर वीजपुरवठा होऊ लागला व त्यामुळेच खनिज तेलाची आणि कोळशाची गरज पुष्कळच कमी झाली.

हल्लीच्या काळातील सर्वांत मोठा उद्योग म्हणजे वस्त्रोत्पादन हा होय. सुती, रेशमी व लोकरीच्या कापडाचे उत्पादन यांचा या वस्त्रोत्पादनात समावेश केला जातो. जपानमधील कापड उद्योग हा केवळ जपानची स्थानिक मागणी पुरी करण्याकरताच नसून, अन्य देशांना कापडपुरवठा करण्यासाठीही आहे. सुती कापडाकरिता लागणारा कच्चा माल म्हणजे कापूस. परंतु जपानमधील प्रतिकूल हवामानामुळे तिथे कापसाची पैदास फारशी होतच नाही, असे म्हटले तरी चालेल. जपानी कापसाच्या कापडउद्योगाकरिता जगातील निरनिराळ्या देशांतून तऱ्हेतऱ्हेचा कापूस जपानमध्ये आणावा लागतो. जवळजवळ अशीच वस्तुस्थिती लोकरीचीही आहे. जपानमधील लोकरीची पैदास अत्यंत अल्प आहे. कच्च्या मालाचा संपूर्ण अभाव असूनही, जपानमध्ये वस्त्रोत्पादनाचा उद्योग खूपच भरभराटीला आला आहे. भारत, चीन, इजिप्त, अमेरिका वगैरे निरनिराळ्या देशांतून निरनिराळ्या जातीचा कापूस खरेदी करताना जपानी कापडगिरण्यांचे मालक सहकारी तत्त्वांवरही कापूस खरेदी करतात. त्यामुळे या कच्च्या मालाला किंमत फारच अल्प द्यावी लागते. हा सर्व कच्चा माल निरनिराळ्या देशांतून आणताना व त्याची कापडे बनवून परत परदेशी पाठवताना जपानमधील आगबोटकंपन्या या मालावर अत्यंत अल्प भाडे

आकारतात. अतिशय थोड्या काळात जपानने आपल्या कापड उद्योगाचा हा जो प्रचंड पसारा वाढविला, त्याचे बरेचसे श्रेय जपानी उद्योगपतींना व त्यांच्या सहकारी दृष्टीला द्यावे लागेल. सशास्त्र पायावर उभारलेले कारखाने, सहकारी तत्त्वावर आधिष्ठित अशी कमीत कमी किंमतीने करण्यात येणारी कच्च्या मालाची खरेदी, अद्ययावत् यांत्रिक सुधारणा, तयार केलेल्या मालाला परदेशांतून गिऱ्हाईक मिळविण्याकरता जपानी सरकारच्या सहकार्याने केले जात असलेले नानाविध प्रयत्न, इ. गोष्टींमुळे जपानी कापडउद्योग आज जगात फार महत्त्वाच्या पदावर जाऊन वसला आहे.

सुती कापडाप्रमाणेच लोकरीच्या कापडाबद्दलही सांगता येईल. जपानमधील लोकरीच्या कापडगिरण्यांना लागणारी बहुतेक सर्व लोकर परदेशाहून आणावी लागते. तयार झालेल्या लोकरीच्या कापडापैकी बहुतेक सर्व कापड परदेशी बाजारपेठांकडे रवाना केले जाते. व्यापार व उद्योग याबाबतीत जपान्यांनी पाश्चात्यांचे नुसते अनुकरणच केले नाही, तर त्यांच्या एकंदर तांत्रिक व यांत्रिक पद्धतीत आवश्यक त्या सुधारणाही केल्या व त्याच्या जोडीला आपली कल्पकता, दूरदृष्टी आणि कष्ट करण्याची तयारी, इ. निरनिराळे गुण जगाच्या प्रत्ययाला आणून दिले आहेत.

जपान हा देश पहिल्यापासूनच रेशमाच्या उत्पादनाकरिता प्रसिद्ध होता. जपानी शेतकरी घरोघरी रेशमी किड्यांची जोपासना करून, कच्चे रेशीम तयार करीत.हा त्यांचा एक महत्त्वाचा पूरक धंदा म्हणून समजला जात असे. कित्येक वर्षे जपानमध्ये तयार होणाऱ्या कच्च्या रेशमाचा फार मोठा भाग परदेशी निर्यात केला जात असे. शिल्लक राहिलेल्या रेशमाचे कापड तयार केले जाई. सुती व लोकरी कापडांच्या मानाने जपानमध्ये रेशमी कापडाचा उपयोग कमी महत्त्वाचा समजला जाई. विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून पाश्चात्य राष्ट्रांनी कृत्रिम रेशीम उत्पादनास सुरुवात केली. हे कृत्रिम रेशीम किंवा रेयॉन दिसावयास सुंदर व किंमतीने पुष्कळच स्वस्त असल्याने लवकरच खऱ्या किंवा अस्सल रेशमाच्या कापडाचा खप एकदम मंदावला. जपानमध्ये तयार केल्या जाणाऱ्या रेशमाला परदेशात गिऱ्हाइक मिळणे दिवसेंदिवस दुर्घट होऊ लागले. त्यामुळे जपानी रेशीम उत्पादकांनीही रासायनिक कृती आत्मसात करून कृत्रिम रेशीम उत्पादनास सुरवात केली.

रबर, चामडी, कातडी, कागद, काचसामान, मातीची भांडी व इतर वस्तू, खेळणी, वगैरे गोष्टी तयार करण्याचे मोठमोठे कारखाने जपानमध्ये आहेत. या बहुतेक कारखान्यांकरिता लागणारा सर्व कच्चा माल जपानला परदेशांतून आयात करावा लागतो.

इ. स. १८६८ च्या जपानमधील राजकीय क्रांतीपासून तेथे औद्योगिक क्रांतीलाही सुरवात झाली असे म्हणण्यास हरकत नाही. परंतु खरे पाहता या राजकीय क्रांतीच्या अगोदरपासूनच जपानमधील निरनिराळ्या उद्योगधंद्यांना लहान प्रमाणांवर कां होईना, सुरवात झाली होती. शोगुन या सरंजामशाहीच्या शेवटच्या काळात जपानमधील कित्येक लहानमोठ्या दायमिओंनी ( सरंजामदार ) आपल्या संपत्तीचा उपयोग निरनिराळ्या औद्योगिक क्षेत्रांत करावयास सुरुवात केली. या दायमिओंनी गृहउद्योग किंवा लघुउद्योग म्हणून हातमाग चालविणे, चिनी मातीच्या वस्तू तयार करणे, कागद बनवणे, लहानमोठी गलबते बांधणे, कोळशाच्या खाणी उकरणे, लोखंड गाळून त्याचे पोलाद करणे, वगैरे हरतऱ्हेच्या उद्योगांत आपला पैसा गुंतविला. अशा रीतीने अगोदरच सुरू झालेल्या निरनिराळ्या उत्पादनक्षेत्रांत राज्यक्रांतीनंतर आणखी महत्त्वाचे बदल होऊन, पाश्चात्यांच्या औद्योगिक धर्तीवर त्या धंद्यांची मोठ्या प्रमाणावर सुधारणा झाली. राजकीय सत्तांतरानंतर जपानी सरकारने तिथल्या लहानलहान उद्योगपतींच्या सहकार्याने संरक्षण-साहित्य, लोहमार्ग, दूरध्वनी व दूरसंदेशवाहक, खाणी, जहाजबांधणी, वगैरेंसारखे मोठमोठे उद्योग उभारण्यास सुरुवात केली. या सर्व उद्योगधंद्यांना भांडवलाचा पुरवठा साहाजिकपणे दायमीओंकडूनच जास्तीत जास्त प्रमाणात झाला. हेच दायमिओ त्यावेळी तरी जपानमधील उद्योगधंद्यात महत्त्व पावलेले होते. सुरवातीपासूनच मित्सुई, मित्सुबैशी, वगैरे दायमिओ कुटुंबियांनी या उद्योगधंद्यांवर आपली पक्कड घट्ट आवळल्याने, उत्तरोत्तर जपानची आर्थिक व औद्योगिक नाडीच जणू काय, त्यांच्या हातात राहू लागली. जसजसे उद्योगधंदे वाढून पैसा खेळू लागला, तसतशा बँका, नौकानयन, आयात व निर्यात व्यापार, जपानी कारखानदारांस कच्च्या मालाचा पुरवठा करणे, त्या कारखान्यांनी उत्पादिलेला माल परदेशात खपविणे, वगैरे बाबतीतही याच काही ठराविक कुटुंबांची मक्तेदारी होऊ लागली. ज्याप्रमाणे टाटा, बिर्ला, जैन, डालमिया वगैरे काही

अगदी थोडी कुटुंबे भारताच्या आर्थिक व औद्योगिक क्षेत्रांत अग्रस्थानी आहेत, जपानमध्येही तशीच स्थिती आहे. किंबहुना इतरत्र सर्व पाश्चात्य काय किंवा पौर्वात्य काय, प्रत्येक देशातही हीच वस्तुस्थिती आढळून येते.

एकंदर ३० लक्ष कामगार इ. स. १९३६ साली जपानमधील कारखान्यातून काम करीत होते. याखेरीज घरोघरी हातमागावर किंवा यांत्रिक मागावर कापड विणणे, त्याचप्रमाणे चिनी मातीची भांडी व इतर वस्तू तयार करणे, लाखेच्या वस्तू तयार करणे, सायकलीचे सुटे भाग व इतर हरप्रकारची यंत्रे बनविणे वगैरेसारख्या असंख्य उद्योगांत असंख्य जपानी लोक गुंतले होते. या सर्व लहान लहान उत्पादकांकडून वस्तू व त्यांचे सुटे भाग तयार करवून घेऊन, प्रसंगी त्यांच्यावर कांही अन्य प्रक्रिया करून, त्या वस्तू वा ते भाग मोठ्या प्रमाणावर बाजारांत विकणे, हाही काही मोठमोठ्या उत्पादकांचा एक महत्त्वाचा उद्योग बनला होता व अजूनही तसा तो आहे.

इ. स. १९३७ साली चीनशी संघर्ष सुरू झाल्यानंतर स्वदेशाच्या स्वातंत्र्य-रक्षणासाठी व अन्य ईप्सितांच्या पूर्तीसाठी आपल्याला आता युद्धाचाही अवलंब करावा लागेल, असे जपानी लष्करी नेत्यांना वाटू लागले. आणि एकदा युद्ध सुरू झाले, की मग आपल्याला कच्च्या मालाचा पुरवठा करणारी परराष्ट्रे तसे करण्याचे नाकारतील, हेही त्या नेत्यांच्या दूरदृष्टीला तेव्हाच कळून चुकले. अशा स्थितीत जपानमधील एकंदर औद्योगिक जीवन हे प्राप्त परिस्थितीशी कितपत व कसे मिळते जुळते राहील, ते पाहण्याकडे जपानी उद्योगपतींची दृष्टी वळली. मग कच्च्या मालाच्या व अत्यंत आवश्यक अशा इतर वस्तूंच्या राष्ट्रीय गरजा स्वावलंबनानेच कशा पुऱ्या करता येतील त्याचा आराखडा तयार करण्यात आला. उदाहरणार्थ, इ. स. १९३० मध्ये जपानमधील पोलादाचे उत्पादन जेमतेम २० लाख टन होते. इ. स. १९४१ मध्ये पोलादाच्या त्या उत्पादनाने ७० लक्षांचा आकडा गाठला. पुढील तीन वर्षांत हे उत्पादन एक कोटी टनांपर्यंत वाढले व अखेर दरवर्षी जास्तीत जास्त दीडकोटी टन पोलादाची निर्मिती करता येणे शक्य आहे, असे सिद्ध झाले. इ. स. १९४१ मध्ये जहाजबांधणीकरिता लागणाऱ्या पोलादाचे उत्पादन केवळ ५ लाख टन होते. परंतु पुढील तीन वर्षांत त्यात चौपटीने वाढ करण्याचे ठरले.

इ. स. १९३० पर्यंत जपानमध्ये मोटारींचे उत्पादन मुळीच होत नव्हते. मोटारी व विमाने यांचे उत्पादन एकमेकांना पूरक आहे. इ. स. १९४२ पर्यंत जपानमध्ये प्रतिवर्षी चाळीस हजार मालमोटारी व पाच हजार विमाने तयार होऊ लागली. इ. स. १९४४ मध्ये विमानांचे उत्पादन पाच पटीने वाढले.

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस जपानी उद्योगधंदे अगदी मोडकळीस आलेले होते. कच्च्या मालाचा तुटवडा, परदेशी बाजारपेठा गमाविलेल्या, बहुतेक सर्व उत्पादन लष्करी कामाला वाहिलेले, बॉंब हल्ल्यामुळे अनेक मोठमोठे कारखाने उद्ध्वस्त झालेले, याशिवाय काही उत्पादनाच्या बाबतीत युद्धोत्तर कराराप्रमाणे जपानवर बंदी घातली गेलेली. अशा परिस्थितीमुळे जपानी उद्योगधंदे झंझावातात सापडल्यासारखे झालेले दिसले. जपानमध्ये ज्या कापड उद्योगांत सुमारे १ कोटी चात्यांचा उच्चांक गाटला गेला होता, त्या कापड उद्योगात युद्धानंतर जेमतेम २५ लाख चात्याच सुरक्षित राहिल्या होत्या. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानी कारखानदारीची किती विलक्षण हानी झाली होती, त्याची कल्पना या वर दिलेल्या आकडयावरून सहज येऊ शकेल ! !

दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी व प्रत्यक्ष युद्धकाळातही जपानी लोकांबद्दल सर्व पाश्चात्यांना एक प्रकारची असूया वाटत होती. जपानने संपूर्ण व बिनशर्त शरणागती पत्करल्यानंतर झालेल्या तहाने जपानवर कायकाय अटी लादल्या जातात त्याची प्रत्यक्ष कल्पना येईपर्यंत, जपानी उद्योगपतीना आपल्या धंद्याची नवीन पायावर उभारणी करणे अवघड होऊन बसले. आशिया खंडातील अनेक देशांनी जपानविरूद्ध नुकसानभरपाई दाखल करून अगणित मागण्या चालू ठेवल्या होत्या. अमेरिकेने तर जपानचा संपूर्ण तावा घेतला आणि प्रथम सर्व जुने राजकारणी, संरक्षण अधिकारी व औद्योगिक भांडवलदार यांना सक्तीचा संन्यास दिला. या लोकांच्या अमर्याद महत्त्वाकांक्षेमुळेच शेवटी आपले असे नुकसान झाले, ही गोष्टही जपानी जनतेला पटण्यास फारसा उशीर लागला नाही. सुरवातीच्या काळात निरनिराळ्या प्रकारची बंधने शिथिल करवून घेण्याकरता जपानी जनतेने श्री. शिगेरू योशिदा यांच्या पुढारीपणाखालील 'जियूतो' या पक्षाला बहुमताने निवडून दिले. अमेरिकन अधिकाऱ्यांनी योशिदा सरकारला शक्य तितके सहकार्य देऊन, जपानी उद्योगधंद्यांवरील

बंधनेही हळूहळू शिथिल करण्यास परवानगी दिली. जपानी उद्योगधंदे पुन्हा डोके वर काढू लागले. इ. स. १९५० मध्ये सुरू झालेल्या कोरियन युद्धामुळे जपानी उद्योगधंद्यांना फार मोठ्या प्रमाणावर प्राणवाय मिळाल्यासारखे झाले व उत्पादन भराभरा वाढू लागले.

आज दुसरे जागतिक महायुद्ध संपून जवळजवळ वीस वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे. या काळात जपानी जनतेने आपल्या विविध राष्ट्रीय गुणसमुच्चयांमुळे युद्धात झालेली आपली सर्व हानी धुऊन काढली आहे. त्याचप्रमाणे वाताहत झालेले मोठमोठे कारखाने पुन्हा पूर्व स्थितीवर आणून, पूर्वीप्रमाणेच जगाच्या बाजारपेठा काबीज करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. पहिल्या व दुसऱ्या जागतिक महायुद्धात जर्मनीची ज्याप्रमाणे दुर्दशा झाली होती आणि तरीही त्या दुर्दशेतूनसुद्धा केवळ काही विशिष्ट राष्ट्रीय गुणांच्या जोपासनेमुळेच जर्मनीने ज्याप्रमाणे आपली सर्वांगीण पुनर्रचना करून पूर्ववत आंतरराष्ट्रीय राजकारणात मानाचे स्थान प्राप्त करून घेतले, त्याचप्रमाणे जपाननेही आपला उज्ज्वल इतिहास घडवला. फिनिक्स पक्ष्याच्या सुप्रसिद्ध गोष्टीप्रमाणे अक्षरश: राखेतून व चितेतून जपानने आपला कायापालट घडवून आणला व जागतिक व्यापार आणि राजकारण या दोहोंत पुन्हा एकदा हिरिरीने भाग घ्यावयास सुरवात केली. नव्यानेच स्वतंत्र झालेल्या आशिया व आफ्रिका या खंडातील अनेक देशांना जपान-जर्मनीचे हे उदाहरण खचितच मार्गदर्शक ठरेल. पण त्याकरता ज्या राष्ट्रीय गुणांची अत्यंत जरूरी आहे, त्यांच्या जोपासनेविषयीच जर ही राष्ट्रे बेफिकीर राहिली, तर त्यांच्या उत्तरोत्तर होत जाणाऱ्या अध:पतनाची जबाबदारी केवळ त्यांचीच म्हणावी लागेल !

औद्योगिकदृष्ट्या जपानचे खालील विभाग आढळून येतात :–

**( १ ) तोक्यो विभाग–**

क्योतो किंवा तोक्योच्या मैदानाचा हा प्रदेश असून, तोक्यो व योकोहामा या दोन शहरांना केंद्र कल्पून, त्यांच्या आसमंतात हा औद्योगिक विभाग तयार झाला आहे. या विभागाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे असंख्य व हरतऱ्हेचे लघुउद्योग चालू आहेत. या निरनिराळ्या उद्योगकेंद्रात उत्पादन केला जाणारा माल एकत्र करून, मग त्याचे मोठमोठे भाग

किंवा वस्तू तयार करतात व त्या परदेशांत पाठविल्या जातात. एकाच कारखान्यात एकाच ठिकाणी मोठमोठ्या यंत्रांचे उत्पादन न करता या निरनिराळ्या भागांचे उत्पादन लहानलहान कारखान्यांत करवून, त्यानंतर त्या सर्वांचे एकत्रीकरण करणे जास्त फायदेशीर व सोयीस्कर होत असावे, असे दिसते.

**( २ ) इसे उपसागर व नागोया शहराच्या आसमंतातील औद्योगिक विभाग–**

नागोया हे या विभागाचे केंद्र आहे. या विभागात कापूस व रेशीम यांच्यापासून सूत तयार करण्याचे व चिनीमातीच्या विविध वस्तू बनविण्याचे असंख्य लहान-मोठे कारखाने आहेत.

**( ३ ) जपानी भूमध्य समुद्राच्या कोबे व ओसाका या दोन केंद्राच्या आसमंतातील भाग–**

या विभागात ओसाका हे जपानमधील सर्वांत महत्त्वाचे असे कापडगिरण्यांचे केंद्र आहे. ओसाका हे शहर म्हणजे जपानचे 'मँचेस्टर' असे समजण्यात येते. कापडाखेरीज या औद्योगिक क्षेत्रात निरनिराळ्या धातूंच्या ( तांबे, पितळ, शिसे, जस्त, इत्यादी ) वस्तू तयार करण्याचे व अनेक लहान-मोठी यंत्रे आणि त्यांचे सुटे भाग बनविण्याचे कारखाने आहेत.

**( ४ ) जपानमधील कोळशाच्या खाणींकरिता प्रसिद्ध असलेल्या कियूशू बेटाच्या उत्तरेकडील औद्योगिक विभाग–**

या भागात खनिज कोळशाचे विपुल उत्पादन होत असल्यामुळे इथे परदेशांतून आयात केलेल्या कच्च्या लोखंडाचे पोलादांत रूपांतर करण्याचे मोठमोठे कारखाने आहेत. पोलादापासून तयार होणारी अनेक लहान-मोठी यंत्रे व अन्य वस्तू यांचे उत्पादनही या विभागात केले जाते.

जपानमधील सर्वांत महत्त्वाचा व ज्याला राष्ट्रीय उद्योग असे सार्थपणे म्हणता येईल असा उद्योग म्हणजे कापडाचा होय. यांत प्राधान्याने सुती व रेशमी कापडाच्या उत्पादनाचा समावेश होतो. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला या धंद्याला सुरवात होऊन जपानमध्ये औद्योगिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. या वेळेपासून तो दुसऱ्या महायुद्धाच्या मध्यापर्यंत खंड ५० वर्षे

हा उद्योग एकसारखा वाढतच गेला. विसाव्या शतकाच्या सुरवतीला जपानमध्ये एकंदर कापडगिरण्यांची संख्या १४७ असून, त्यांत एकंदर २५ लक्ष चात्या होत्या. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीला या धंद्यातील गिरण्यांची संख्या २६७ वर गेली व त्यात एकंदर ९० लाख चात्या होत्या. या धंद्यांकरता लागणारा सुमारे ९० टक्के कच्चा माल भारत, अमेरिका, इजिप्त, व चीन या देशांतून आयात केला जाई व त्याचा जपानमध्ये पक्का माल बनवून तो पुन्हा परदेशी बाजारपेठांत नेऊन विकला जाई. जपानची या व्यवसायातली एकूण परिस्थिती अशी असल्यामुळे, ही वाढ आश्चर्य करण्यासारखी वाटल्यास नवल नाही. इ. स. १९३४ मध्ये जपानने १८० कोटी चौरस वार कापडाचे उत्पादन केले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात या उद्योगधंद्याला बाँबहल्ल्यांमुळे फार मोठा आघात सहन करावा लागला. पण युद्धोत्तर काळांत जपानने आपली विस्कटलेली घडी पुन्हा पूर्ववत बसवली व या उद्योगधंद्याला असे स्थैर्य आणून दिले, की इ. स. १९५४ मध्ये जपानमधील कापड उत्पादनाने २८१ कोटी चौरस वारांच्या निर्मितीचा उच्चांक गाठला. अलिकडे भारत व चीन या दोन देशांनी आपआपल्या देशांत जाडेभरडे व मध्यमप्रतीच्या कापडाचे उत्पादन सुरू केल्यापासून जपानमधील कापडाच्या गिरणीमालकांनी आपले बहुतेक सर्व लक्ष उंची व तलम कापडांच्या निर्मितीवर केंद्रित केले आहे.

इ. स. १९१९ च्या सुमारास जपानमध्ये रेयॉन किंवा दिखाऊ रेशमाच्या कापडाच्या निर्मितीला सुरुवात करण्यात आली. इ. स. १९३३ मध्ये रेयॉनच्या उत्पादनाचा आकडा ६ कोटी पौंड होता, तो जवळजवळ एक वर्षाच्या अवधीतच म्हणजे इ. स. १९३४ मध्ये १४ कोटी पौंडावर गेला. जपानी भूमध्य समुद्रावरील किरोतो या शहराच्या आसमंतात कानाझाबा व फुकूई या दोन केंद्रांत रेयॉनचे उत्पादन केंद्रीभूत झाले आहे. रेयॉनचे जपानमधील उत्पादन मुख्यत: परदेशांतून आयात होणाऱ्या लाकडाच्या रंध्यावर अवलंबून आहे. दुसऱ्या महायुद्धात बाँबहल्ल्यामुळे या धंद्यालाही जबरदस्त तडाखा बसला. इ. स. १९५४ साली जपानमध्ये १० लक्ष चौरस वार रेयॉनचे उत्पादन झाले व जागतिक व्यापारात रेयॉनच्या बाबतीत अमेरिकेच्या खालोखाल जपानने दुसरा क्रमांक पटकावला.

जपानमधील कापडउद्योग हा एक राष्ट्रीय उद्योग आहे, असे म्हणण्याचे आणखी एक कारण म्हणजे जपानमधील एकंदर भांडवल गुंतवणुकीच्या २२ टक्के भांडवल एकट्या एका कापड उद्योगांत गुंतविले गेले आहे. त्याच्या खालोखाल पोलाद व लोखंड यांचे उत्पादन असून, या दोहोंच्या उद्योगांत सुमारे १२ टक्के भांडवल गुंतविले गेले आहे.

जपानमधील कागद व तत्सम उत्पादनास गेल्या शतकाच्या अखेरपासून सुरुवात झाली असून कागद, कार्डबोर्ड व इतर प्रकारच्या कागदाच्या उत्पादनाचे आकडे एकसारखे वाढत आहेत. इ.स. १९५४ मध्ये एकंदर १० लाख टन कागद व कार्डबोर्ड यांचे उत्पादन झाले. या उद्योगाकरता लागणारा बराचसा कच्चा माल जपानमधील होक्काइदो या बेटातून येत असला, तरी बऱ्याच प्रमाणात तो कॅनडा व अमेरिका या देशांतूनही येतो.

हल्लीच्या यांत्रिक युगात उद्योगधंद्यांची भिस्त फार मोठ्या प्रमाणात रसायनांच्या उत्पादनावर अवलंबून असते. काच व काच सामान, रंग, आगपेट्या, कागद, कचकड्याचे जिन्नस, साबण, खते वगैरे हरतऱ्हेच्या वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर या रासायानिक उद्योगांवरच अवलंबून आहे.

लहानमोठी खेळणी, पिठाच्या गिरण्या, साखर उत्पादन, निरनिराळ्या प्रकारची तेले व चरबी तयार करणे, रबरी वस्तू, कातड्याच्या वस्तू, ब्रश, वांबूचे अनेक प्रकारचे जिन्नस वगैरेंचेही उत्पादन जपानमध्ये दरवर्षी वाढत असून, एकंदरीत पाहता जपानने गेल्या वीस वर्षांच्या अवधीत आपली औद्योगिक घडी पूर्णपणे सुधारून बसविली असल्याची खात्री पटते.



# राज्यकारभार

दुसऱ्या महायुद्धानंतर जपानच्या शरणागतीमुळे व जपानवर काही काळ अमेरिकेचे सर्वाधिकार असल्यामुळे, त्या देशात राज्यकारभारविषयक असे दूरगामी परिणाम पुष्कळ झाले. या काळात पूर्वी काही मर्यादित लोकांच्याच हाती असलेली सत्ता संपुष्टात आली व दिवसेंदिवस जपानी राज्य कारभार जास्त जास्त समाजसन्मुख होऊ लागला. एकंदर राज्यकारभारात जिकडे-तिकडे केंद्रीकरणाऐवजी विकेंद्रीकरणच सुरू झाले. नवल असे, की ' जुने ते सोने' मानणाऱ्या जपानी जनतेने या नवीन राज्यकारभाराबद्दल मात्र आपली संपूर्ण संमती दर्शविली व आपआपल्या परीने या नवीन घटनेचे स्वागत केले.

इ. स. १९४७ च्या मे महिन्यात नवीन सुधारणांचा कायदा संमत होऊन तो प्रत्यक्षात अंमलातही आला. सुधारणांचा हा आराखडा तयार करण्यात जपानमधील अनेक पक्षांच्या पुढाऱ्यांनी परिश्रम घेतले होते. त्यापूर्वी हा

आराखडा जपानमधील अमेरिकन सरकारच्या (एस्. सी. ए. पो.–Supreme Commandar of the Allied Powers ) नजरे खालूनच गेला होता व त्यांनी त्यात काही किरकोळ फेरफारही सुचविले होते. अमेरिकेच्या राज्य कारभार-संहितेची व अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या घोषणेची या आराखड्यावर चांगलीच छाप बसली होती, हे स्पष्ट दिसते.

इ. स. १९४७ च्या नवीन सुधारणा अंमलात येण्यापूर्वी जपानमध्ये अस्तित्वात असलेली राज्यघटना इ. स. १८८९ मध्ये प्रिन्स इतो यांनी तयार केलेली होती. स्थलाभावी या दोन्ही घटना तपशीलवार न देता त्यांच्यामधील काही महत्त्वाच्या फरकांचा–काही साम्यस्थळांचाच विचार येथे करण्यात आला आहे. जुन्या व नव्या दोन्ही राज्यघटनांमध्ये मर्यादित राजसत्ता आहे. त्याचप्रमाणे दोन विधानसभाही ( एक वरिष्ठ व एक कनिष्ठ अशा ) कायम राहिल्या आहेत. राजगादीही जपानच्या राजघराण्याकडे वंशपरंपरा चालू राहणार आहेच. फक्त राजा, मंत्रिमंडळ व दोन्ही विधानसभा यांच्या कार्यक्षेत्रात आणि अधिकारांत थोडेफार बदल करण्यात आले आहेत. पूर्वीच्या जमान्यात जपानी बादशहाच्या हाती अनियंत्रित सत्ता होती. राजा हा सर्व संरक्षक दलांचा सर्वश्रेष्ठ अधिकारी असे. कोणत्याही परराष्ट्राशी तह वा युद्ध करणे, ही गोष्ट तेव्हा राजाच्या पूर्ण अधिकारक्षेत्रातील होती. योग्य त्या अटींवर परराष्ट्रांबरोबर तह करणे, ही सुद्धा राजाच्या खास अधिकाराची बाब होती. राजा कोणाही संरक्षण किंवा मुलकी अधिकाऱ्याला कोणतेही कारण न देता बडतर्फ करू शकत असे. त्याच्या संमतीशिवाय विधानसभेने संमत केलेला कोणताही ठराव अमलात येऊ शकत नसे. राजा हा ' विष्णू ' आहे, ही जुनी भारतीय कल्पना जपानी समाजाच्या रोमरोमात भिनली असल्यामुळे राजाच्या हाती अशी निरंकुश सत्ता देणे ही गोष्ट प्रिन्स इतो यांना त्या वेळी वाजवी व योग्य वाटली असल्यास नवल नाही. नवीन कायद्यामुळे राजाची ही अमर्याद सत्ता कमी होऊन, जपानी जनतेच्या हाती सार्वभौम सत्ता सोपविण्यात आली. विधानसभा किंवा ' दाएत 'ने बहुमताने निवडून दिलेल्या व्यक्तीला मुख्यप्रधान म्हणून नेमायचे व ते सांगतील त्याप्रमाणे हुकुम द्यायचे, सह्या करायच्या, विधानसभेने संमत केलेल्या ठरावांवर शिक्का मोर्तब करावयाचे हे आणि येवढेच मर्यादित अधिकार राजाच्या हाती ठेवण्यात आले. नवीन कायद्याप्रमाणे

राज्यकारभार राजाच्या तंत्राने न चालता तो मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने चालावा असे स्पष्ट नमूद करण्यात आले.

देशाचे मंत्रिमंडळ विधानसभेला जबाबदार असावे, असे घोषित करण्यात आले. यापूर्वी असे नव्हते. मंत्रिमंडळ हे तेव्हा राजाला जबाबदार असायचे· त्यामुळे राजा विधानसभेच्या संमतीशिवाय किंवा प्रसंगी विधानसभेच्या इच्छेविरुद्धही काही महत्त्वाच्या गोष्टी मंत्रिमंडळाकरवी करवून घेत असे. परंतु आता मात्र राजाबद्दल असलेला आजवरचा नितांत आदर व सद्भावना कायम ठेवून सुद्धा एक नवीन गोष्ट घडवली गेली व ती म्हणजे ' मी माझे शेष अधिकार सोडून दिले असून, यापुढे विधानसभा बहुमताने जे ठरवील ते सर्व मला मान्य होईल ' अशी घोषणा खुद्द राजानेच करायची. जनरल मॅक्आर्थर या अमेरिकन सरसेनापतीने दिनांक १ जानेवारी १९४६ रोजी ही राजघोषणा करविण्याचे महत्त्वाचे काम पार पाडले.

इ. स. १८८९ च्या प्रिन्स इतो यांनी तयार केलेल्या राज्यघटनेच्या कायद्याप्रमाणे जपानचे बादशहा हे सर्व सत्ताधीश समजले जात असत. प्रत्यक्षात मात्र स्वत: बादशहा आपले हे अधिकार स्वत:च्या इच्छेप्रमाणे क्वचितच वापरीत. प्रीव्ही कौन्सिलचे सभासद, बादशहांचे व्यक्तिगत सल्लागार, त्यांचे खाजगी चिटणीस, संरक्षण व राज्यकारभारातील अगदी वरच्या दर्जाचे अधिकारी इत्यादींच्या शब्दाबाहेर बादशहा क्वचितच जात. या सर्व जागांवर नियुक्त होणाऱ्या व्यक्तींची नावे बादशहांना अन्य अनुभवी अधिकारी सुचवीत व अंतिम निवड बादशहा करीत. नवीन सुधारणांमुळे प्रीव्ही कौन्सिल, लॉर्ड प्रीव्हीसील, मिनिस्ट्री ऑफ इंपीरियल हाऊसहोल्ड वगैरेंसारखी सर्व महत्त्वाची स्थाने रद्द करण्यात आली व सर्व सत्ता मुख्यप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ यांच्या हाती सोपविण्यात आली. विधानसभेच्या दोन सभागृहांपैकी कनिष्ठ सभागृहाला म्हणजेच दाएतला विशेष महत्त्व देण्यात आले. मंत्रिमंडळ, प्रधानमंत्री किंवा मंत्रिमंडळाचा कोणताही एखादा सभासद यांच्याविरुद्ध दाएतमध्ये निंदाव्यंजक ठराव संमत झाल्यास, त्याने राजीनामा द्यावा असे स्पष्ट नमूद करण्यात आले.

नवीन कायद्यामध्ये मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या संख्येचा काहीच उल्लेख नाही. पंतप्रधान आपल्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांचा विचार घेऊन ही

मंत्र्यांची संख्या निश्चित करू शकतो. या कायद्याप्रमाणे नव्यानेच निर्माण झालेल्या मंत्रिमंडळात पुढीलप्रमाणे खातेमंत्री होते. – (१) मुख्य प्रधान, (२) परराष्ट्रमंत्री, (३) अर्थमंत्री, (४) कायदामंत्री, (५) शिक्षणमंत्री, (६) समाजविकासमंत्री, (७) शेती व जंगलमंत्री, (८) व्यापार व उद्योग मंत्री, (९) वाहनव्यवहारमंत्री, (१०) दळणवळण मंत्री व (११) मजूर मंत्री.

जुन्या व नव्या मंत्रिमंडळाची तुलना करता जुन्या मंत्रिमंडळातील युद्ध, आरमार व गृह ही मंत्रालये कमी करण्यात येऊन कायदा व मजूर ही मंत्रालये नव्याने सुरू करण्यात आली. दोन्ही कायद्यामध्ये द्विवर्गीय विधानसभा ही कायम राहिली आहे. जुन्या कायद्याप्रमाणे कायदे करणे, कर बसविणे, वगैरे महत्त्वाचे अधिकार राजा व विधानसभा यांच्याकडे असत व साहजिकच त्या दोहोंमध्ये राजाचा अधिकार नेहमीच वरचढ व सर्वश्रेष्ठ असे. नव्या कायद्याने राजाचे अधिकार काढून टाकल्याने कनिष्ठ विधानसभा सर्व सत्ताधीश झाली. जुन्या कायद्याप्रमाणे वरिष्ठ संविधान सभा ही सरदार, दरकदार, सरंजामदार, राजघराण्यातील पुरुष, इ. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नियुक्त असे, तर कनिष्ठ सभा ही आम जनतेने निवडलेली असे. दोन्ही सभागृहांना सारखेच अधिकार असत; पण त्यांतल्या त्यात वरिष्ठ सभेला एक खास निर्णायक अधिकार जुन्या नियमाप्रमाणे देण्यात आला होता व त्यामुळे कनिष्ठ विधानसभेला फारसे महत्त्व नव्हते. नवीन कायद्याप्रमाणे सरदारक्या व मानमरातब नष्ट करण्यात आले. साहजिकच वरिष्ठ सभागृहाचे सभासद म्हणून सामान्य व्यक्तींची निवड होऊ लागली. वरिष्ठ सभागृहाच्या सर्वच्या सर्व म्हणजे २५० सभासदांची नेमणूक निवडणुकीने होऊ लागली. वंशपरंपरागत हक्क किंवा अधिकार नाहीसे करण्यात आले. वरिष्ठ सभागृहाच्या सभासदत्वाची मुदत ६ वर्षांची ठरविण्यात आली. दर तीन वर्षांनी या २५० सभासदांपैकी निम्म्या सभासदांची निवडणूक नव्याने होते. वरिष्ठ सभा केव्हाही बरखास्त करता येत नाही, ही एक महत्त्वाची गोष्ट या नव्या कायद्यात समाविष्ट करण्यात आली आहे.

कनिष्ठ विधानसभेच्या सभासदांची संख्या ४६६ ठरविण्यात आली आहे. हे सर्व सभासद जपानच्या निरनिराळ्या भागातून निवडले जातात. त्यांच्या सभासदत्वाची मुदत ४ वर्षे ठेवण्यात आली आहे. मंत्रिमंडळाविरुद्ध निंदाव्यंजक

ठराव संमत केल्यामुळे किंवा मुख्य प्रधानाला नव्याने निवडणुका घेणे अत्यावश्यक वाटल्यास, कनिष्ठ विधानसभा केव्हाही बरखास्त करता येते. अर्थविषयक विधेयकाला एकटया दाएतच्या संमतीनेच कायद्याचे स्वरूप मिळू शकते. वरिष्ठ सभागृहाला या अर्थविषयक विधेयकासंबंधी मतप्रदर्शन करण्याचा फक्त अधिकार आहे.

न्यायदानाविषयी नव्या व जुन्या राज्यकारभारविषयक कायद्यात कित्येक महत्त्वाचे फेरफार करण्यात आले आहेत. जुन्या कायद्याप्रमाणे देशातील सर्व न्यायमंडळांवर कायदामंत्र्याचा अधिकार असे. न्यायदानाच्या कामात व्यत्यय येण्याचा त्यामुळे जास्त संभव असे. नवीन कायद्याप्रमाणे न्यायदान ही मंत्रिमंडळाच्या कक्षेबाहेरील बाब ठरविण्यात आली आहे. साहजिकच आता न्यायदानाचे काम जास्त निर्दोष व नि:पक्षपाती होईल, अशी अपेक्षा बाळगण्यास हरकत नाही.

याखेरीज न्यायदानविषयक कायद्यातही पुष्कळ सुधारणा करण्यात आल्या. राज्यकारभाराच्या सोयीसाठी जपानचे एकूण ४६ विभाग ( किंव प्रिफेक्चर्स ) पाडण्यात आले आहेत. प्रत्येक विभागात पुन्हा शहरे, दुय्यमा प्रतीची शहरे व खेडी असे उपविभागही पाडण्यात आले आहेत. जुन्या कायद्या-प्रमाणे या विभागीय कारभारात मध्यवर्ती सत्तेचा फार मोठा अधिकार होता. पूर्वीच्या अमदानीत गृहमंत्री या विभागांचे गव्हर्नर किंवा अन्य अधिकारी यांना मन मानेल तेव्हा बडतर्फ करू शकत असे. नवीन कायद्याप्रमाणे हे सर्व विभाग कित्येक बाबतीत स्वायत्त समजले गेले. भारतातील पंचायत राज्या-मागील भूमिकाही याच धर्तीची आहे. विभागीय अधिकारी हे त्या त्या विभागातील लोकांकडूनच निवडले जातात. प्रत्येक विभागाकरिता एक विभागीय मंडळ सुरू करण्यात आले असून, या मंडळातील सभासदांची निवडणूक, दर चार वर्षांनी सार्वत्रिक मतदान पद्धतीने होते.

इ. स. १९४७ च्या नवीन कायद्यातील ९ वे कलम हे अत्यंत प्रक्षोभक ठरले. त्या कलमाप्रमाणे जपानी जनतेने युद्धाचा नुसता जाहीर निषेधच केला नाही, तर क्षणिक भावनावेगाला वश होऊन त्यांनी आणखी असेही जाहीर केले, की ' जपानमध्ये यापुढे केव्हाही सैन्य, आरमार व वायू या दलांची स्थापना केली जाणार नाही ! ' पाश्चात्य राष्ट्रांत तर देशाचे सार्वभौमत्व व

संरक्षण यांचा अन्योन्य संबंध व ही जपानी घोषणा याबद्दल बरेच वादळ उठले. अगदी थोड्याच कालानंतर जपानी लोकांना आपली ही चूक उमगली व त्यांनी लागलीच हे कलम रद्द करवून घेण्याबद्दल ' आवाज ' उठविण्यास सुरुवात केली !

महायुद्धोत्तर परिस्थितीमुळे त्या वेळच्या काळजीवाहू व काळकाढू परकीय सत्ताधिकाऱ्यांना रुचेल त्याप्रमाणे जपानी लोकांनी स्वत:च्या इच्छेविरुद्ध एकमताने वरील ' त्रिदंडी संन्यासा ' ला पाठिंबा दिला असला तरी जपान हा पूर्ववत शस्त्रसज्ज राहावा, अशी ( स्वत:च्या स्वार्थाकरता तरी ) अमेरिकेला इच्छा झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार करता अमेरिकन लोकांना जपानला शस्त्रसज्ज करण्यास संमत्ती देणे भाग पडले.

### जपानमधील काही महत्त्वाचे राजकीय पक्ष

दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीला जपानमध्ये राजकीय पक्ष असे नव्हतेच म्हटले तरी चालेल. सर्व राजकीय सत्ता राजाच्या हातात केंद्रीभूत होती. दाएतच्या निवडणुकांमध्ये जपानमधील सनदी व लष्करी अधिकारी आपल्याला योग्य वाटतील त्या उमेदवारांना निवडून देत असत. निरनिराळ्या विभागांमधून ज्या निवडणुका होत त्यांच्यावर जपानी सरकारच्या गृहखात्याचे फार बारकाईने लक्ष असे. त्यामुळेच जपानमधील प्रचलित सरकारला, म्हणजे बादशहांच्या सल्लागार पक्षाला फारसा विरोध होत नसे. या काळात जपानमधील सर्व राजकीय सत्ता 'इंपीरिअल रूल ॲसोसिएशन' नामक पक्षाच्या हातात होती. या पक्षात संरक्षण दलांतील मोठमोठे अधिकारी, जमीनदार, व्यापारी, सरंजामदार, राजघराण्याशी निकटचा संबंध असलेले असे लोक होते. या पक्षालाच कित्येक वेळा लष्करी अधिकाऱ्यांचा पक्ष असेही संबोधण्यात येई. इंपीरिअल रूल ॲसोसिएशनच्या बरोबरीने ' ताययुकाय ' किंवा कॉंस्टिटयूशनल पक्ष या नावाचाही एक पक्ष अस्तित्वांत होता; पण त्याचे वरील पक्षापुढे चालत नसे.

दुसऱ्या महायुद्धाच्या अंती जपानने शरणागती पत्करल्यावर अमेरिकन सरकारने, आपल्या खास अधिकाऱ्यांच्या मदतीने जपानचा राज्यकारभार सुरू केला. जनरल मॅकऑर्थर यांच्या अधिपत्याखाली मित्रराष्ट्रांच्या एका

समितीने ' जर्मनीप्रमाणे जपानचीही चिरफाड करावी व त्या निरनिराळ्या जपानी विभागांवर आपला अधिकार असावा ', अशा तऱ्हेने प्रयत्न सुरू केले. मित्र राष्ट्रांमध्ये अमेरिका, इंग्लंड, रशिया व राष्ट्रीय चीन हे मुख्य सदस्य होते. अमेरिकेच्या नेटाने व दडपणामुळे जपानची आणखी होणारी ससेहोलपट लवकरच थांबली. अखेर सर्व मित्र राष्ट्रांच्या वतीने केवळ अमेरिकन सरकारने जपानची राज्यव्यवस्था पाहावी असे ठरले. त्याप्रमाणे जनरल मॅकआर्थर यांना ' सुप्रीम कमांडर ऑफ दि अलाईड फोर्सेस ', असा हुद्दा देऊन त्यांच्या हाती जपानची एकंदर सूत्रे सोपविण्यात आली.

जनरल मॅकआर्थर यांनी प्रथम जपानमधील इंपीरिअल रूल ॲसोसिएशन हा पक्षच बरखास्त करून टाकला. जपानचा राज्यकारभारविषयक कायदा नवीन तत्त्वांवर आखण्यात आला. पूर्वीच्या अमदानीत नाममात्र ठरलेला तायपुकाय किंवा कॉन्स्टिटयूशनल पक्ष बाळसे धरू लागला. या पक्षाचे ध्येय संपूर्ण फॅसिस्टविरोधी व लष्करशाहीविरोधी असले, तरी जपानमधील सर्वात पुराणमताभिमानी पक्ष म्हणूनच तो ओळखला जाऊ लागला. या पक्षाने आपल्या डोळ्यांपुढे प्रारंभी दोन मुख्य गोष्टी ठेवल्या होत्या. ( १ ) राजघराण्याचे अस्तित्व कायम राखणे व ( २ ) उद्योगधंद्यांचा विकास खासगी भांडवलामार्फतच करणे. परंतु अल्पावधीतच या पक्षामध्ये फाटाफुटीला सुरुवात झाली या फाटाफुटीतून प्रोग्रेसिव्ह किंवा शितपोतो नामक एक दुसरा पक्ष जन्मला. थोडयाच दिवसात या पक्षाने आपले नाव बदलून मिनशूतो किंवा डेमोक्रॅटिक पक्ष असे नवीन नाव धारण केले. या पक्षाची मते पूर्वीच्या लिबरल पक्षाशी बरीच मिळतीजुळती होती. परंतु एकंदर कालमान पाहून हा मिनशूतो पक्ष डाव्या किंवा साम्यवादी विचारवंतांशी मैतकूट जमविण्याचीही इच्छा दर्शवू लागला.

उपरिनिर्दिष्ट जीयूतो व मिनशूतो या दोन पक्षांखेरीज आणखी एका तिसऱ्या पक्षाची स्थापना लौकरच करण्यात आली. त्या पक्षाला "कियोदोतो" किंवा सहकार पक्ष असे नाव दिले गेले. या पक्षाची बहुतेक सर्व भिस्त निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांवर होती. या पक्षाला फारसे पाठबळ मिळाले नाही. इ स. १९५० मध्ये या पक्षाचे मिनशूतो किंवा डेमोक्रॅटिक पक्षांत विलीनीकरण झाले.

चवथा पक्ष म्हणजे शाकाइतो किंवा सोशालिस्ट पक्ष. स्थापनेनंतर थोड्याच अवधीत जपानी सोशालिस्ट पक्षात इंग्लंडमधील फेबियन तत्त्वावर आधारलेला व रशियातील मार्कस्प्रणीत समाजवाद डोक्यावर घेऊन नाचणारा, असे दोन तट पडले.

जपानमधील राहता राहिलेला पाचवा व शेवटचा पक्ष म्हणजे 'कियोसांतो' किंवा साम्यवादी पक्ष हा होय. या पक्षाला जपानी जनतेकडून फारसे पाठबळ मिळाले नाही; पण या पक्षाचे कार्यकर्ते मात्र मोठ्या श्रद्धेने व पवित्र भावनेने जनसेवा करण्याचा गंडा बांधून व प्रसंगी उपाशी पोटीही पक्षाचे कार्य अविरत करीत होते. या पक्षाची मुख्य मदार रशियातील साम्यवादी पक्षाच्या मदतीवर होती. वर्तमानकालीन जपानच्या राज्यकारभाराची घडी बदलून, रशिया-प्रमाणे संपूर्ण साम्यवादी सरकारची स्थापना जपानमध्ये करावी अशी स्वप्ने या पक्षाच्या पुढाऱ्यांना एक सारखी पडत होती.

कोणत्याही पुढारलेल्या किंवा मागसलेल्या देशांतील पुढाऱ्यांची सत्ता मिळविण्यासाठी नेहमी खटपट व धडपड चालू असते. त्यासाठी वेळप्रसंगी हे पुढारी निरनिराळी सोंगे घेतात. आपल्या मागे भरपूर पाठबळ आहे असा दावाही ते मांडू लागतात. आपल्या प्रतिस्पर्ध्याचा व त्यांच्या पाठीराख्यांचा पाडाव करण्याकरता वाटेल त्या थरापर्यंत जातात. नीति-अनिती, हिंसा-अहिंसा, वगैरे सारख्या तत्त्वांना बगलेत घालून हरप्रयत्नाने आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न ते करतात. जपानही याला अपवाद नव्हताच !

इ. स. १९४६ च्या एप्रिल महिन्यांत मॅकआर्थर सरकारने देशात सार्वत्रिक निवडणुका घेण्याचा आदेश दिला. निवडणुका गुप्त मतदान पद्धतीवर व प्रत्येक सज्ञान स्त्री-पुरुष व्यक्तीला एक मत या तत्त्वावर अधिष्ठित होत्या. मतदानप्रसंगी सरकारी अधिकाऱ्यांनी कोणत्याही तऱ्हेने मतदारांवर वजन टाकू नये, असेही फर्माविले गेले. या सत्तासंक्रमणावस्थेत जपानी जनता थोडीशी बावरून गेली असल्यास नवल नाही. निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला निर्भेळ मताधिक्य मिळाले नाही. जीयूतो किंवा लिबरल पक्षाला सर्वांत अधिक मते मिळाली; पण दाएतमध्ये त्या पक्षाला निर्विवाद बहुमत मिळविता आले, नाही. जीयूतो पक्षाच्या खालोखाल मिनशूतो किंवा

डेमोक्रॅटिक पक्षाला मते मिळाली. कियोसांतो किंवा साम्यवादी पक्षाला एकंदर २६७ जागांपैकी फक्त पाचच जागा मिळाल्या ! श्री. योशिदा या जीयूतो पक्षाच्या पुढाऱ्याने मिनशूतो पक्ष व स्वतंत्र पक्षाच्या खासदारांशी समझोता करून युद्धोत्तर जपानमधील पहिले मंत्रिमंडळ बनविले.

सुमारे एक वर्षाच्या अवधीतच आपल्या मंत्रिमंडळावरील दाएतचा विश्वास ढासळला असल्याचे श्री. योशिदा यांना दिसून आले. श्री. योशिदा हे नावाजलेले व मुरब्बी मुत्सद्दी होते. नवीन वातावरणात जपानमध्ये डाव्या पक्षाला जनतेचा जास्त जास्त पाठिंबा मिळत आहे, हे त्यांनी ओळखले. जपानी जनतेत साम्य-वादाचे विष भिनू नये, म्हणून त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली; परंतु हे सर्व प्रयत्न फोल ठरून श्री. योशिदा यांच्या मंत्रिमंडळाला इ. स. १९४७ च्या सुरुवातीला राजीनामा द्यावा लागला. जपानमध्ये पुन्हा सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. इ. स. १९४७ च्या निवडणुकींमध्ये शाकाइतो किंवा समाजवादी पक्षाला जास्तीत जास्त मते मिळाली. तरीही त्या पक्षाला दाएतमध्ये निर्णायक बहुमत मिळाले नाही. मग श्री. काधायामा या समाज-वादी पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली एक संमिश्र मंत्रिमंडळ बनविले गेले; पण दुसऱ्याच वर्षी या मंत्रिमंडळाच्या पराभव झाला. यानंतर श्री. आशीदा या मिनशूतो पक्षाच्या पुढारीपणाखाली जपानमध्ये तिसरे मंत्रिमंडळ अधिकारावर आले. लवकरच याही मंत्रिमंडळाला अधिकारत्याग करावा लागला. यानंतर जनता या प्रकाराला कंटाळली. श्री. आशीदा यांच्यामागून पुन्हा जीयूतो पक्षाच्या श्री. योशिदा यांना मंत्रिमंडळ बनविण्यास सांगण्यात आले. त्यांनी इ. स. १९४९ मध्ये नव्याने निवडणूका घेतल्या व आपल्या जीयूतो पक्षाला दाएतमध्ये निर्विवाद व निर्णायक बहुमत मिळवून दिले.

दिनांक २२ नोव्हेंबर १९६३ रोजी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीतील विविध पक्षांचे बलाबल पुढील प्रमाणे होते. लिबरल पक्ष २९४. सोशालिस्ट पक्ष १४४. डेमोक्रॅटिक सोशालिस्ट पक्ष २३. साम्यवादी पक्ष ५.स्वतंत्र १

लिबरल डोमॉक्रॅटिक पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाल्यामुळे, त्या पक्षाचे पुढारी श्री. हायादो इकेदा यांनी पंतप्रधानपद स्वीकारून आपले मंत्रिमंडळ बनविले.

● ● ●



# संरक्षण

सांप्रतचे जपानी लोक हे मुळात कित्येक शतकांपूर्वी परदेशातून जपानमध्ये वसाहत करण्याकरता म्हणून आले. एतद्देशीय मागसलेल्या लोकांचा पराभव करून व त्यांना डोंगराळ भागात हाकलून देऊन, किनाऱ्यालगतच्या सर्व व इतर सुपीक भागावर या लोकांनी आपले वर्चस्व स्थापले. साहाजीकच प्रथमपासून आपण शूर व लढवय्ये आहो, अशी त्यांची धारणा असल्यास त्यात आश्चर्य नाही.

भारताप्रमाणे जपानमध्येही वर्णव्यवस्था असावी. कारण संरक्षण करणारे असे जे वर्ग होते, त्यांना ओतोमो, कुमेन, मोनोतोबे, इ. नावांनी संबोधण्यात येत असे; तर राजकारण, विद्याभ्यास व ईश्वराची उपासना करणाऱ्या वर्गास नाकातोमी, इमिबे, इ. नावे होती. कालांतराने जपानमध्ये सरंजामशाही

व्यवस्थेला सुरुवात झाली. सरंजामदारांना तायरो, मिनामोतो, इ. नावे दिली जात व त्यांचे पाठीराखे असणाऱ्या लोकांना साधारणत: जमिनीची मशागत करणारे आणि आपल्या नेत्यांना लढाईत मदत करणारे, असे म्हणण्यात येई. वर वर्णन केलेल्या तायरो व मिनामोतो जमातींना नंतर ' बुशी ' हे उपपद लावण्यात येऊ लागले. या बुशींनाच नंतर सामुराई किंवा लढवय्ये म्हणून संबोधण्यात येऊ लागले. हळूहळू या सामुराई लोकांनी आपल्या क्षात्रधर्माची एक संहिताच तयार केली. या संहितेत खालील गोष्टींचा प्रामुख्याने अंतर्भाव केला गेला –

( १ ) दररोज सकाळी ६ वाजता उठून आपली नित्यकर्मे पार पाडणे. घोड्यावरून रपेट करणे व नेमबाजी करणे या दोन गोष्टींचा या नित्यकर्मांत समावेश केला गेला. या दोन गोष्टींत एखाद्या व्यक्तीने विशेष कौशल्य दाखविले, तर तिला खास इनाम दिले जाई.

(२) कुस्ती, हरणाची व बहिरी ससाण्याची शिकार यासारख्या व्यवसायात प्रत्येक सामुराईने आपला रिकामपणाचा वेळ घालवावा.

(३) फक्त सुती कापडाचेच कपडे वापरावे. कोणाही सामुराईने कर्जवाम करून जर रेशमी किंवा इतर चांगले कपडे वापरले, तर त्याचा तो कायदेभंग समजण्यांत येऊन त्याला योग्य अशी शिक्षा किंवा दंड द्यावा लागेल.

(४) अन्नामध्ये फक्त तांदुळाचाच उपयोग केला पाहिजे.

(५) प्रत्येकाने आपला सर्व सरंजाम आटोपशीर ठेवला पाहिजे. लढाईच्या वेळी कोणत्याही प्रकारचे महागडे कपडे त्याने वापरता कामा नयेत.

(६) फक्त लष्करी खेळच खेळावे. नृत्यादी गोष्टी त्याने वर्ज्य समजल्या पाहिजेत. याविरूद्ध वर्तन करणाऱ्याला आत्मघाताची शिक्षा दिली जाईल.

(७) प्रत्येकाने साक्षर झालेच पाहिजे. युद्धशास्त्र, मंत्र व तंत्र याविषयावरील ग्रंथ त्याने नेहमी अभ्यासले पाहिजेत. कोणाही सामुराईने कविता करण्याचा नाद लावून घेऊ नये. अहर्निश त्याचे तलवारीशीच साहचर्य असले पाहिजे.

( ८ ) कोणाही सामुराईला वरील नियम जाचक वाटत असल्यास त्याने आपण सामुराई नसल्याचे जाहीर करावे.

( ९ ) आत्यंतिक काटकसर, अपार श्रद्धा व वरिष्ठांचे विनातक्रार आज्ञापालन या तीन गोष्टी म्हणजे आदर्श सामुराई अशी व्याख्या करण्यात आली.

अशाप्रकारे नियमबद्ध असणारे हे सामुराई जपानमधील सरंमजामशाही, राजेशाही, इत्यादींचे वर्चस्व झुगारून देऊन स्वतंत्रपणे स्वदेशाचा राज्यकारभार पाहू लागले. यानंतर असे हे वंशपरत्वे एकामागून एक असे हे शोगून राज्यपदावर येऊ लागले. कालांतराने या शोगुनांमध्ये कित्येक दुर्गुणांचा प्रादुर्भाव झाला. एकोणिसाव्या शतकांत या निष्क्रिय, स्त्रीलंपट व अनीतिमान शोगुनांच्या वर्तणुकीमुळे जपानमध्ये परकियांचा शिरकाव झाला. अर्थातच या गोष्टी जपानी लोकांना सहन न होऊन, त्यांनी एक राजकीय क्रांती घडवून आणली व पुनश्च सर्व सत्ता राजघराण्याकडे सोपविण्यात आली.

राजकीय क्रांतीनंतर जपानने पाश्चिमात्य जगाचे निरीक्षण करून आपणास अवगत नसलेली अनेक शास्त्रे आत्मसात केली व अन्य निरनिराळ्या विषयात आपली प्रगती करण्यात सुरवात केली. देशाचे संरक्षण ही केवळ एका विवक्षित जातीची किंवा वंशाची मिरासदारी नसून, ते सर्व समाजाचे कर्तव्य आहे, हे नवीन तत्त्व व्यवहारात आणले गेले. यानंतर सक्तीच्या संरक्षण शिक्षणाचा कायदा संमत झाला व देशाचे संरक्षण केवळ सामुराईच करू जाणे ही परिस्थिती बदलली गेली. आपल्या स्वातंत्र्यरक्षणात प्रत्येक नागरिकाचा सारखा हिस्सा आहे, ही जाणीव दिवसेंदिवस जनतेला करून देण्यात येऊ लागली. जपानने आपल्य लष्कर व आरमाराची पाश्चात्य तत्त्वांनुसार पुनर्रचना केल्याचे पाहून,पाश्चात्यांना प्रथम थोडेसे कुतूहल व नंतर बरेच आश्चर्य वाटले. या क्रांतीकाळात सक्तीचे संरक्षणशिक्षण घेणारांना दोन महान तत्त्वांची शिकवण विशेष कटाक्षाने देण्यात आली. पहिले तत्त्व म्हणजे प्रत्येक लढवय्याने अमर्याद स्वार्थत्यागास तयार झाले पाहिजे. दुसरे तत्त्व हे की, युद्धामध्ये शरणागती कधीही पत्करायची नाही. तशीच वेळ आली तर, देहत्याग ( आत्महत्या ) करण्यालाही मागेपुढे पाहायचे नाही. सुरवातीच्या काळात जपानी सरकारने फ्रेंच लष्करी शिक्षकांना आपल्याकडे नोकरीस ठेविले होते; परंतु इ. स. १८८० च्या सुमारास जर्मनीने फ्रान्सचा धुव्वा उडवल्यानंतर जपान सरकारला फ्रेंचांसंबंधी वाटत असलेल्या अपेक्षा हळूहळू नाहीशा झाल्या. मग त्यांनी जर्मन शिक्षकांना लष्कराचे शिक्षणाधिकारी नेमले. जर्मन लोकांचे युद्धशास्त्र व तत्संबंधी अन्य शास्त्रे आत्मसात करण्याची जिद्द जपानी लोकांत उत्पन्न झाली. परंतु विसाव्या शतकाच्या प्रारंभी

झालेल्या पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाल्यामुळे जपानी लोकांचा जर्मनीच्या युद्धतंत्रावरील विश्वास डळमळू लागला. तथापि थोड्याच काळात जर्मनीने स्वतःचा कायापालट घडवून आणून हिटलरसारख्या एका सर्वसत्ताधाऱ्याच्या हातात आपले भवितव्य सोपविले. त्याबरोबर जपानी लोकांमधील जर्मन युद्धतंत्राबद्दलचा डळमळीतपणा नाहीसा होऊन, त्यांना त्या प्रकारच्या युद्धशास्त्र, मंत्र व तंत्र यांबद्दल एक विशेष प्रकारची आपुलकी वाटू लागली. लवकरच जपानी लोकांनी जर्मन युद्धतंत्र संपूर्णपणे आत्मसात केले.

इ. स. १९३१-३२ सालच्या मांचूरिया विरुद्धच्या लढाईत व त्यानंतरच्या इ. स. १९३४ नंतरच्या चीन विरुद्धच्या कारवाईमध्ये जपानी युद्धशास्त्रज्ञांनी पाश्चात्य युद्धशास्त्रज्ञांच्या मदतीने आपलें स्वतःचे असे एक विशिष्ट युद्धतंत्र तयार केले. सर्वसाधारणपणे जपानी युद्धशास्त्रावर जर्मन तंत्र–मंत्राचा पुष्कळच प्रभाव पडला असावा असे दिसते. जपानच्या संरक्षणव्यवस्थेसंबंधीचा उत्साह, संरक्षणखात्याजवळ असलेल्या निरनिराळया प्रकारच्या आयुधांची व शस्त्रास्त्रांची कमाल क्षमता, आजपर्यंत निरनिराळया देशांबरोबर झालेल्या युद्धांत मिळवलेला अनुभव, इ. गोष्टींचा संगम म्हणजे जपानी जनतेला आपल्या संरक्षणदलांबद्दल वाटत असलेला कमालीचा विश्वास होय. पहिल्या महायुद्धानंतर इंग्लंडने जपान बरोबर केलेला मैत्रीचा करार रद्द केला, ही गोष्ट जपानी जनतेला खटकणे साहजिकच होते. जपानच्या वाढत्या लोकसंख्येच्या तीन प्राथमिक गरजा पुरवायच्या म्हणजे जपानची औद्योगिक भरभराट अखंड चालू राहणे आवश्यक होते. जपानी उद्योगधंद्याना लागणारा कच्चा माल आयात करून, त्यापासून तयार होणाऱ्या पक्क्या मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळणे हीही तितकीच निकडीची गोष्ट होती. कच्च्या मालाच्या पुरवठ्याकरता आपल्या राष्ट्राला इतर राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागू नये व त्यासाठी आपण शांततेच्या मार्गाने प्रयत्न करावे आणि ते अशक्य झाल्यास आपल्या मनगटाच्या जोरावर आपल्या आजूबाजूचे मागासलेले प्रदेश आपल्या अधिकाराखाली आणावे असे तिथल्या मुत्सद्यांनी ठरवले. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीस जपानी लष्करी अधिकाऱ्यानी मग फ्रेंचाच्या अमलाखाली असलेले प्रदेश तात्पुरते म्हणून आपल्या ताब्यात घेतले. लष्करी अधिकाऱ्यांच्या या धाडसामुळे जपानी जनतेला त्याच्याविषयी आदर व

आपलेपणा वाटू लागला परिणामी जपानचा राज्यकारभार मात्र दिवसेदिवस लष्करी अधिकाऱ्यांच्या हाती जाऊ लागला.

इ. स. १८७३ साली जपानमध्ये सक्तीच्या सार्वत्रिक लष्करी शिक्षणाचा कायदा संमत करण्यात आला. या कायद्याप्रमाणे वयात आलेल्या प्रत्येक जपानी नागरिकाला सैन्य, आरमार व विमानदल या तिन्हीपैकी कोणत्या तरी एका शाखेचे लष्करी शिक्षण सक्तीचे करण्यात आले. वयाच्या अठराव्या वर्षापासून तो चाळिसाव्या वर्षापर्यंतचा प्रत्येक जपानी नागरिक हा सक्तीने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या संरक्षणदलांत भरती झाल्यावर बारा वर्षेपर्यंत त्या नागरिकाचे जीवन, आवडीनिवडी, खाणे–पिणे, पोषाख, इ. बाबी नियंत्रित होऊ लागल्या. या सक्तीच्या लष्करी शिक्षणापासून व्यक्तिगत, सामाजिक व राष्ट्रीय असे अनेक फायदे होत असल्याचे दिसून आले आहे. यासंबंधी श्री. गोतेरो ओगावा या नामवंत जपानी लेखकाचे पुढील उद्‌गार विशेष लक्षात ठेवण्यासारखे आहेत.

‘ सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा समाजाचा आर्थिक व औद्योगिक क्षमतेवर फार मोठा व दूरगामी परिणाम होतो, यात यत्किंचितही शंका नाही. या सक्तीच्या लष्करी शिक्षणामुळे बालमृत्यूचे प्रमाण घटते, जननसंख्या कमी होते, शेती व उद्योगधंद्यातील वाकबगारी वाढून उत्पादनही वाढते. थोडक्यात सांगायचे झाल्यास लष्करी शिक्षण हे एका दृष्टीने राष्ट्रीय शिक्षणच होय. सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा समाजातील तरुणांचे चारित्र्य सुधारण्यासाठी फार उपयोग होतो.

( जपानमधील सक्तीचे लष्करी शिक्षण )

सक्तीच्या लष्करी शिक्षणामुळे होणारे फायदे लक्षात घेऊन, विसाव्या शतकांत बहुतेक सर्व प्रगत राष्ट्रांत लष्करी शिक्षण सक्तीचे करण्यात आले आहे. या शिक्षणाचे फायदे थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील.–

( १ ) जनतेतील तरुण वर्गाला व अप्रत्यक्षपणे सर्व जनतेला उत्तम शिस्त लागते. ( २ ) तरुणांचे शरीरारोग्य उत्तम राहते. ( ३ ) समाजातीला भांडणाची वृत्ती नाहीशी होऊन त्या ऐवजी परस्परसहकार्य वाढीस लागते. ( ४ ) नेमून दिलेले काम मन लावून करणे, त्यांत शक्य तितकी नासधुस वा उधळपट्टी कमी करणे या गोष्टी प्रत्येकाच्या अंगवळणी पडतात. ( ५ ) अशा रीतीने एक विचाराने व एक ध्येयाने एकत्र आलेले तरुण राष्ट्राला

खचितच भूषणावह ठरतात.( ६ ) विशिष्ट तऱ्हेने शिक्षण मिळालेल्या लोकांचा उद्योगधंद्याला फार मोठा उपयोग होतो. ( ७ ) राष्ट्रीय वृत्तीची जोपासना होऊन दृष्टी विशाल बनते. ( ८ ) संरक्षणकार्यात उत्तरोत्तर यंत्रांचा उपयोग कल्पनेबाहेर वाढल्यामुळे अशा रीतीने तयार झालेले तंत्रज्ञ व कारागीर शांततेच्या काळातही लहानमोठ्या कारखान्यात फारच उपयोगी पडतात. ( ९ ) तरुणपणातील महत्त्वाचा काळ लष्करी शिस्तीत गेल्यामुळे अशा तरुणांचे आचार, विचार, राहणी, इ. सर्वच स्वभावगुण प्रगल्भ होतात. या सर्वांचा सामाजिक जीवनावरही फार मोठा अनुकूल परिणाम होतो.

सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे राष्ट्रीय संरक्षणावरील खर्चात बचत होते. सर्व राष्ट्रच संरक्षण कार्यात गोवले गेले असल्यामुळे कोणत्याही आणिबाणीच्या परिस्थितीत लष्करी दृष्ट्या असंख्य शिक्षित जवान संरक्षणाकरता सदैव सिद्ध असतात. विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून पाश्चिमात्य देशांत सक्तीच्या लष्करी शिक्षणाला सुरवात झाली. या नंतर या प्रकारच्या शिक्षणाचे फायदे इंग्रज जनतेला पटवून देण्याची व कोणत्याही प्रकारच्या सक्तीविरुद्ध असणारी त्यांची मनोवृत्ती बदलण्याची महत्त्वाची पण अवघड कामगिरी त्या वेळच्या अनेक मोठ्या मोठ्या लष्करी अधिकाऱ्यांनी पार पाडली. अलिकडे–विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर-आग्नेय आशियातील नव्यानेच स्वतंत्र झालेल्या बहुतेक सर्व देशांनी सक्तीच्या लष्करी शिक्षणाची कास धरल्याचे दिसून येते.

एकंदर समाजाची नव्याने व सुव्यवस्थित घडी बसविण्यासाठी सक्तीच्या लष्करी शिक्षणासारखी दुसरी कोणतीही उपयुक्त गोष्ट नाही हेच वरील सर्वदेशीय उदाहरणावरून दिसून येते कर्नल मॉड नामक इंग्रज लष्करी अधिकाऱ्याने आपल्या ‘ स्टडी ऑफ वॉर ’ या पुस्तकात म्हटले आहे

“ जर्मनीमधील बहुतेक सर्व प्राथमिक शिक्षक हे सक्तीचे लष्करी शिक्षण संपवून आलेले असतात. इंग्लंडमध्ये तर सक्तीच्या लष्करी शिक्षणाला विरोध करणे म्हणजे शुद्ध आडमुठेपणाच समजला जातो. ’

दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपानचे बादशहा हे जपानी सैन्याचे सरसेनापती व जपानी आरमाराचे दर्यासारंग होते. कोणत्याही राष्ट्राबरोबर तह करणे किंवा युद्ध करण हा अधिकारही त्यांच्याच हाती होता. त्यांना सल्ला-मसलत

देण्यासाठी दोन मंडळे होती. ( १ ) सुप्रीम मिलिटरी कौन्सिल व ( २ ) बोर्ड ऑफ मार्शल्स् अँड ॲडमिरल्स्. या दोन्ही मंडळांची कामे बादशहाला फक्त सल्ला देण्याची होती. बादशहाने तो मानलाच पाहिजे अशी सक्ती नव्हती, तरी त्या मंडळातील सभासदांच्या प्रदीर्घ अनुभवामुळे त्यांचा सल्ला बादशहाला नेहमीच योग्य वाटे.

जपानच्या भौगोलिक परिस्थितीमुळे जपानी लोकांना आरमाराबद्दल एक विशेष प्रकारची आत्मीयता आहे. आरमाराचे संरक्षणकारभारातील वाढते महत्त्व जाणून जपानी मंत्रिमंडळांत युद्धमंत्र्याच्या बरोबरीने आरमार मंत्र्याचीही एक जागा निर्माण करण्यात आली. या जागेवरील मंत्री हा नेहमी आरमारातील एक वरिष्ठ अधिकारीच असे. जपानच्या बादशहाचे संरक्षणविषयक सल्लागार हे एकजात संरक्षण अधिकारीच होते व बादशहाच्या हाती अमर्याद सत्ता असल्यामळे त्याच्याच करवी सर्व राष्ट्राची सर्व सूत्रे हे संरक्षण अधिकारी हलवित असत. जपानचा व्यापार, उद्योगधंदे, संरक्षण, राजकारण, इ. सर्व बाबींवर बादशहाच्या या सल्लागारांची चौफेर नजर असे व साहजिकच या प्रत्येक बाबतीत संरक्षण अधिकाऱ्यांचा सल्ला नेहमी मानला जाई.

सार्वत्रिक व सक्तीच्या लष्करी शिक्षणामुळे जपानी सैन्याची किंबहुना सर्व संरक्षणदलांचीच संख्या दरवर्षी वाढू लागली. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीला जपानमधील नुसत्या सैन्याची गणसंख्या तीस लाख होती. जपानने महायुद्धात सक्रिय भाग घेतल्याबरोबर ही गणसंख्या पन्नास लाखापर्यंत गेली. हे पन्नास लाखांचे लष्कर एकंदर १४० निरनिराळ्या विभागात विभागले गेले होते. या पन्नास लाखांखेरीज आरमार व विमानलातील गणसंख्या निराळीच होती. इ. स. १९४१ मध्ये जपानी आरमारात अकरा बॅटल शिप्स्, नऊ विमानवाहू बोटी, अठरा अवजड चिलखती आगबोटी, बावीस हलक्या पण चिलखती बोटी, एकशे वीस विध्वंसक आगबोटी व सदुसष्ट पाणबुड्या होत्या. विमानदलांतील विमानांची संख्या व त्यांचे प्रकार अगणित होते.

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस जपानने संपूर्ण शरणागती स्वीकारल्यावर जपानमधील सर्व सशस्त्र दले नाहीशी करण्यात आली. अनेक लष्करी व आरमारी अधिकाऱ्यांना युद्धगुन्हेगार म्हणून पकडले व त्यांच्यावर कोर्टाने

खटले भरून त्यांपैकी कित्येकांना देहांत शासनही ठोठावण्यात आले. जपानी आरमाराच्या एकूण एक आगबोटी दोस्त राष्ट्रांनी आपआपसात वाटून घेतल्या. लाखोगणती शस्त्रास्त्रे व आयुधे यांचा सर्रास नाश करण्यात आला. जपान-वरील अमेरिकेच्या अधिसत्तेने सुरवातीला जपानच्या संरक्षण दलांविरुद्ध एक प्रचंड मोहीम सुरू केली. युद्धमंत्री व आरमारमंत्री ही जपानी मंत्रि-मंडळांतील दोन महत्त्वाची खातीही नाहीशी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या क्रमिक पुस्तकांतील युद्धखोर व लढाऊ वृत्तीची जोपासना करणाऱ्या व्यक्तींची चरित्रे व त्यांचे जीवनप्रसंग यांच्यावर सरसकट कात्री चालविण्यात आली. थोडक्यांत म्हणजे 'माजलेल्या जपानी राष्ट्राला' 'खच्ची' करण्याचे पद्धत-शीर प्रयत्न सुरू झाले. इ. स. १९४६ साली अमलात आलेल्या नवीन राज्य-पद्धतीच्या कायद्यान्वये जपानकडून पुढील आशयाची एक जाहीर घोषणाच करवून घेण्यात आली. 'सैन्य, आरमार व विमानदल यांपैकी एकही संरक्षण प्रकार यापुढे जपान अवलंबणार नाही. इतकेच नव्हे, तर आपल्या राष्ट्राचा युद्धाचा सार्वभौम हक्कही आपल्याला पसंत नाही व आंतरराष्ट्रीय वाद हे शक्तीच्या जोरावरच सोडविले जावे हे तत्त्वही आपल्याला पसंत नाही.' अर्थात अशी जाहीर घोषणा करण्यामागे तात्पुरती का होईना, पण आपल्या देशावर पडलेली जेत्या राष्ट्राची मगरमिठी थोडी सैल व्हावी व त्यांची कृपा आपणाला संपादन करता यावी हाच एक हेतू जपानी मुत्सद्द्यांच्या मनात होता, यांत शंका नाही.

महायुद्ध संपून जेमतेम ४-५ वर्षे होतात न होतात तोच, जपानमधील विचारवंताना व जागतिक पातळीच्या राजकारणी लोकांना असे स्पष्ट दिसून आले, की आपण आपल्या अज्ञातवासाच्या काळात शमीवृक्षावर लपवून ठेवलेली शस्त्रास्त्रे बाहेर काढण्याचा समय समीप येऊ लागला आहे. यामुळे पूर्वीच्या सक्तीच्या संरक्षण शिक्षणाच्या कायद्यामध्ये थोडासा बदल केला गेला. यानंतर वयात आलेल्या प्रत्येक जपानी नागरिकाला सक्तीचे शिक्षण देण्यात येऊन, त्यामध्ये शारीरिक शिक्षणाच्या नावाखाली लष्करी कवायत व शस्त्रास्त्रांची माहिती करून देण्यास किंवा सराव करवून घेण्यास प्रारंभ झाला. जपानी राष्ट्राच्या संरक्षणाकरिता म्हणजे फक्त देशांतर्गत यादवी किंवा बंड यांच्या निर्मूलनाकरिता एक नवीन संघटना उभारण्यात आली व तिला

नॅशनल पोलिस फोर्स असे नाव देण्यात आले. इ. स. १९५१ मध्ये या नॅशनल पोलिस फोर्सची एकंदर गणसंख्या साडेसात लाखापर्यंत गेली.

जपानचे सर्वाधिकारी जनरल मॅकऑर्थर यांनी याच सुमाराला नववर्षानिमित्त जपानी लोकांना दिलेल्या संदेशात असे जाहीर केले, की 'स्वसंरक्षण हा प्रत्येक राष्ट्राचा स्वयंसिद्ध हक्क आहे. इ. स. १९४६ मध्ये प्रसिद्ध केलेल्या आपल्या राज्यपद्धतीच्या मसुद्यात जपानी लोकांनी आपला हा स्वयंसिद्ध हक्क आपणहून जरा बाजूला ठेवला आहे; पण जपानी लोकांची तशीच इच्छा असेल, तर केवळ स्वसंरक्षणार्थ योग्य ती तरतूद किंवा सोय करण्यास त्यांना कोणत्याही परकीय राष्ट्राची आडकाठी येणार नाही.' त्यानंतर जपानबरोबर झालेल्या स्वसंरक्षणाच्या तहातही अमेरिकेकडून व इतर दोस्त राष्ट्रांकडून जपानच्या या स्वसंरक्षणाच्या हक्काला संपूर्ण व निःसंदिग्ध संमती देण्यात आली.

इ. स. १९५६ नंतर जपानमध्ये राज्यकारभारविषयक कायदा बदलून व विशेषतः त्यातील संरक्षणविषयक आठव्या कलमात जरूर तो फेरफार करवून घेण्याबद्दल एक मोठे आंदोलन सुरू झाले. कालांतराने ते कलमही जरुरीपुरते सुधारण्यात आले. अशा रीतीने जपानी लोकांनी केवळ दगडाखाली सापडलेला आपला हात सोडवून घेण्याकरिता 'आम्हास युद्ध नको, आम्ही कोणाशीही लढणार नाही, आम्ही सर्व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वाद फक्त शांततेच्या मार्गाने सोडवू आम्हास सैन्य नको, आरमार नको, विमानदल नको, आम्हास पाहिजे फक्त एकच आणि ते म्हणजे आमचे महान नैतिक बल !' असा एकसारखा घोषा चालू ठेवला आणि आपला हा दगडाखालील हात सोडवून घेताच पुन्हा 'आम्ही स्वतःस नाकारलेल्या त्या गोष्टी केवळ नावापुरत्याच व तात्पुरत्या होत्या. आमचा संरक्षणविषयक सार्वभौम हक्क बजावण्याचा आम्हाला पूर्ण अधिकार असलाच पाहिजे', अशा प्रकारची स्वाभिमानपूर्ण भाषा करावयास सुरुवात केली.

इ. स. १९५२ मध्ये जपान व अमेरिका यांच्यात एक संरक्षणकरार झाला. त्यातील सर्वात महत्त्वाचे कलम म्हणजे जपानला स्वसंरक्षणाकरिता जरूर ते सैन्य, आरमार व विमानदल ठेवण्याची अमेरिकेने दिलेली पूर्ण परवानगी होय. त्यानंतर पुन्हा दोन वर्षांनी या दोन राष्ट्रांत एकमेकांनी परस्परांस

सर्वतोपरी साहाय्य करावे, यासंबंधी एक नवीन करार झाला. या करारात जपानला लागणारे यच्चयावत संरक्षण साहित्य व साधनसामुग्री अमेरिकेने पुरवावी असे ठरविण्यात आले. दिनांक १९ जानेवारी १९६० रोजी झालेल्या दोन देशांमधील आणखी एका करारान्वये अमेरिकेने जपानला आपल्या बरोबरीचे एक स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र म्हणून मान्यता दिली.

जनरल मॅकआॅर्थर यांनी जपानमध्ये सुरू केलेल्या नॅशनल पोलिस फोर्सचे सुमारे १० वर्षांनंतर 'ग्राउंड सेल्फ डिफेन्स फोर्स' असे नवीन नामकरण करण्यात आले. इ. स. १९६३ च्या जानेवारीअखेर या डिफेन्स फोर्सची गणसंख्या १,७१,५०० ( अधिकारी व इतर ) शिपाई अशी होती. याशिवाय सुमारे चौदा हजार मुलकी लोकांचाही त्यांत समावेश करण्यात आला. याखेरीज वीस हजार लष्करी शिक्षण घेऊन तयार असलेले राखीव दलातील लोक होते, ते निराळेच.

यानंतर आरमार व हवाईदलाची पुनर्रचना करण्यात आली. सैन्याप्रमाणेच जपानी आरमाराला आता 'मॅरिटाइम सेल्फ डिफेन्स फोर्स' असे नवीन नाव देण्यात आले. विमानदलाचेही नाव 'एअर सेल्फ डिफेन्स फोर्स' असे ठेवण्यात आले. आरमाराची एकंदर गणसंख्या जवळ जवळ चाळीस हजार इतकी आहे; तर विमानदलात लष्करी व मुलकी दोन्ही मिळून सुमारे पंचेचाळीस हजार अधिकारी व इतर नोकर वर्ग आहे. नाविक व विमान दलात सर्व जातीची आयुधे सुसज्ज ठेवण्यात आली आहेत.


जपानमध्ये इ. स. १९६५ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकानंतर त्याच वर्षीच्या मार्च महिन्यात खालील मंत्रीमंडळ अस्तित्वात आले--

| | |
|---|---|
| १ पंत प्रधान | एसाकू सातो. |
| २ न्याय मंत्री | हितोशी नाकाहाशी. |
| ३ परराष्ट्र मंत्री | एत्सुसाबुरो शिईना |
| ४ अर्थमंत्री | काकूई तनाका |
| ५ शिक्षण, शास्त्र वगैरे | किईची एची |
| ६ आरोग्य व स्वास्थ्य मंत्री | हिरोशी कांदा |
| ७ शेती व वनमंत्री | मुनेनोरी आकागी |
| ८ व्यापार व उद्योग मंत्री | योशिओ साकुराऊची |

| | | |
|---|---|---|
| ९ | दळणवळण मंत्री | शुतारो मात्सुऊरा |
| १० | टपाल मंत्री | जित्सुझो तोकू यासू |
| ११ | मजूर मंत्री | हिरोहिदे इशिदा |
| १२ | बांधकाम मंत्री | ओसानोरी कोयामा |
| १३ | गृहमंत्री | बीईची योशिताके |
| १४ | राज्यमंत्री ( राज्यकारभार व्यवस्था ) | कीईकिची मासूहारा |
| १५ | राज्यमंत्री ( ऑलिंपिक गेम्स ) | इचिरो कोनो |
| १६ | राज्यमंत्री ( संरक्षण व्यवस्था ) | जूनिया कोईझूमी |
| १७ | राज्यमंत्री ( आर्थिक नियोजन ) | मामोरू ताकाहाशी |

१८ मंत्रीमंडळाचे प्रधान सचिव तोमिसाबुरो हाशीमोतो.





# वळण वळण

पूर्वीच्या काळी जपानमधील देशांतर्गत वाहतूक सडकांवरून घोड्यांच्या गाड्यांमधून होई. या सडका चांगल्या स्थितीत ठेवल्या जात व त्यांवर काही ठराविक अंतरावर विश्रामस्थाने असत, तसेच गाड्यांचे घोडे बदलण्याच्य-सोयीही केलेल्या असत. सरंजामशाहीच्या काळात मोठमोठ्या सरंजामा दारांना वर्षातून काही दिवस तरी येदो या राजधानीच्या ठाण्यावर वास्तव्य करण्याविषयी सरकारी हुकूम असल्याने, जपानच्या निरनिराळ्या भागातून येदो या राजधानीपर्यंत असलेल्या रस्त्यांची व्यवस्था उत्तम ठेवली जात असे. या प्रवासात निरनिराळ्या ठिकाणी विश्रांतिस्थाने असून, त्यांचे दरही सरकारने ठरवून दिलेले असत. या विश्रांतिस्थानावर घोड्यांना द्यावा लागणारा मोबदलाही सरकारीरीत्या नियंत्रित केला जात असे. एकंदरीत पाहता जपानमधील जमिनीवरील वाहतूक सुखावह होती हे स्पष्ट दिसते.

इ. स. १८६७ च्या सत्तांतरानंतर जपानमधील खुष्कीचे मार्ग सुधारणे, आहेत त्या मार्गांची वाढ करणे, जरुरीप्रमाणे नवीन नवीन मार्ग तयार करणे, वगैरे गोष्टींचा विचार करण्याकरता जपानमधील सर्व विभागांच्या

# जपान
## लोहमार्ग


उ
ओतारु
सप्पोरो
मुरोरान
हाकोदेत
आओमोरी
अकीता
सेंदाई
यामागाता
नीईगाता
फुकुशिमा
कानाझवा
तोक्यो
योकोहामा
नागोया
क्योतो
कोबे
ओसाका
तोत्तोरी
मात्सुए
हिरोशीमा
शिमोनोसेकी
मोजी
फुकुओका
नागासाकी
कुमामोतो
मियाझाकी
कागोशीमा

राज्यपालांची एक बैठक बोलावण्यात आली. सध्या अस्तित्वात असलेल्या सडका सुस्थितीत ठेवण्याच्या कामाला लागणारा खर्च ज्या त्या विभागाने करावा, नवीन बांधावयाच्या सडकांना येणारा खर्च ते ते विभाग व मध्यवर्ती सरकार यांनी संयुक्त रीत्या करावा, निरनिराळे रस्ते व सडका यांची रुंदी मध्यवर्ती सरकारने आखून द्यावी, इ. गोष्टी या बैठकीत नक्की करण्यात आल्या.

जपानमध्ये औद्योगिक क्रांतीला सुरवात होऊन जसजसे कारखान्यातून उत्पादन वाढू लागले, तसतशी दळणवळणाच्या साधनांची वाढती आवश्यकता भासू लागली. विशेषतः औद्योगिक केंद्रे व निरनिराळी बंदरे यांना जोडणाऱ्या रस्त्यांची मागणी वाढू लागली. पुढे जसजसा मोटारींचा प्रसार होऊ लागला तसतसा उत्तम सडकांचा प्रश्नही उभा राहिला. हळूहळू आवश्यकतेप्रमाणे नव्या सडका बांधून त्या सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी वाढू लागली. इ. स. १९४० च्या सुमाराला जपानमधील उत्तम सडकांची एकंदर लांबी जेमतेम पाच हजार मैलांच्या आसपास होती. अन्य दुय्यम प्रतीचे रस्ते हजारो मैल लांबीचे होते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात या सडकांच्या दुरुस्तीच्या कामात अनेक अडथळे आले. बाँबहल्ल्यांमुळेही कित्येक सडका नादुरुस्त झाल्या होत्या. महायुद्धोत्तर काळात नवे रस्ते बांधणे, जुन्यांची सुधारणा करणे किंवा त्यांची सुस्थिती राखणे; इ. कामांसाठी एक पंचवर्षीय योजना आखण्यात आली. वाहनव्यवहार हे नवीन मंत्रालय उघडण्यात येऊन सर्व प्रकारच्या दळणवळणांच्या साधनांचा प्रश्न या खात्याकडे सोपविण्यात आला.

इ. स. १८८० पासून जपानमधील सर्वसाधारण लोकांचे वाहन म्हणजे एका माणसाने ओढून न्यावयाची गाडी हे होऊ लागले. या गाडीत एक किंवा दोन माणसे बसू शकत. यालाच 'जिन रिक्षा' असे म्हणत असत. हळहळू या या जिनरिक्षा मागे पडल्या व त्यांची जागा सायकलींनी व सायकल रिक्षांनी घेतली. इ. स. १८९७ मध्ये जपानी लोकांनी प्रथमच मोटारींचे दर्शन घेतले. रूसो-जपानी युद्धाच्या समाप्तीपर्यंत मोटारींची संख्या जेमतेम सोळापर्यंतच होती. इ. स. १९२३ च्या भूकंपानंतर मात्र मोटारींची संख्या भराभर वाढू लागली. इ. स. १९२४ मध्ये त्या देशांत जवळ जवळ ४०,००० मोटारी झाल्या.

इ. स. १९३० पासून जपानमध्ये मोटारींच्या उत्पादनाला सुरवात झाली. प्रथम अमेरिकेतील 'जनरल मोटर्स' या कंपनीने जपानमध्ये मोटारींचा एक मोठा कारखाना सुरू केला. इ. स. १९५५ साली जपानमध्ये तयार होणाऱ्या मोटारींची संख्या दोन लाखांच्या आसपास होती.

## लोहमार्ग

जपानमध्ये लोहमार्गांना सुरवात झाली ती त्या देशाच्या मीईजी क्रांती-नंतरच ! इ. स. १८७०च्या सुमाराला दक्षिण कियुशू बेटात जो दुष्काळ पडला, त्या वेळी तिथे अन्नधान्याची नेआण करणे फार बिकट होऊ लागले. तेव्हा जपानमधील इंग्रजांचे राजदूत सर हेन्री पार्कस् यांनी जपानी सरकारला लोहमार्ग बांधण्याची सूचना केली. जपान सरकार किंवा खासगी भांडवलवाले यांपैकी कोणीही या लोहमार्गबांधणीकरता भांडवल गुंतविण्यास तयार होईना. शेवटी श्री. होरेशियो नेल्सन ले या एका इंग्रज गृहस्थाने जपान सरकारच्या परवानगीने लंडन येथे जपानी लोहमार्गाकरता १० लाख पौंडांचे कर्ज उभारले. या कर्जाने तोकियो, योकोहामा, कोबे व ओसाका ही शहरे परस्परांशी जोडली गेली. तोकियो व योकोहामा यांना जोडणाऱ्या लोहमार्गाचे उद्घाटन जपानी बादशहांच्या हस्ते इ. स. १८७२ मध्ये झाले. अशाप्रकारे श्री. शिगेनोबू ओकूमा यांच्यासारख्या दीर्घदृष्टी मुत्सद्द्यांच्या अविरत प्रयत्नांमुळे लोहमार्गांच्या बांधणीस जपानमध्ये सुरवात झाली. लवकरच इ. स. १८७४ मध्ये ओसाका व कोबे यांच्यात लोहमार्ग सुरू होऊन तो पुढील तीन वर्षांत कियोतोपर्यंत वाढविण्यात आला. जपानी यंत्र-तंत्रज्ञांनी लवकरच लोहमार्ग बांधणीची पद्धती आत्मसात केली व त्यानंतर थोड्याच वर्षांत लोहमार्गांवरील परकीय तज्ज्ञ काढून टाकण्यांत आले.

जपानमधील सर्वांत लांब लोहमार्ग म्हणजे उत्तरेकडील आओमोरी व दक्षिणेकडील शिमोनोसेकी या दोन टोकांना जोडणारा १,१५३ मैल लांबीचा लोहमार्ग होय. मध्य होनशिऊ व दक्षिणेकडील कियुशू या दोन बेटांना जोडणारा. पण समुद्राखालून जाणारा भूयारी लोहमार्ग लवकरच तयार झाला. या लोहमार्गाने मोजी ते कागोशिमा हे २३३ मैलांचे अंतर जोडले व मोजी ते कागासाकी हे १६४ मैलांचे अंतरही जोडले.

सुरवातीच्या काळात जपानमध्ये लोहमार्गांच्या बांधणीकरिता खासगी भांडवल मिळू शकले नाही. जुन्या सरंजामदारांचा पैसा हळूहळू अशा लोहमार्गांचे बांधणीकरता मिळविण्याचे काम निप्पोन तेत्सुदो कायशा किंवा जपान रेल्वे कंपनीने अंगावर घेतले. लोहमार्गांच्या धंद्यात नफा भरपूर होतो, हे दिसून येताच निप्पोन तेत्सुदो कायशाच्या धर्तीवर पुष्कळ निरनिराळ्या कंपन्या जपानमध्ये स्थापन करण्यात आल्या. इ. स. १८९२ मध्ये जपान सरकारने लोहमार्गासंबंधी एक कायदा करून या सर्व खासगी कंपन्यांचे एकत्रीकरण केले. इ. स. १९०६ साली जपानमध्ये निरनिराळ्या ३६ खासगी लोहमार्गकंपन्या होत्या. या एकंदर ३६ कंपन्यांपैकी १७ कंपन्यांचे व त्यांच्याकडे असलेल्या २,८२३ मैल लांबीच्या लोहमार्गांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. त्यासाठी जपान सरकारला सुमारे ४.५ कोटी पौंड खर्च आला.

इ. स. १९०८ मध्ये जपानमधील लोहमार्गांची व्यवस्था पाहण्याकरता एक स्वतंत्र रेल्वेबोर्ड सुरू करण्यात आले. लवकरच रेल्वेचे अंदाजपत्रकही वेगळे करण्यात आले. अगोदर जपान हा देशच अनेक बेटांचा मिळून झालेला आहे. त्यामुळे लोहमार्गांचा विस्तार हा त्यांपैकी काही थोड्या पण मोठमोठ्या अशा बेटांवरच झाला. त्याशिवाय जपानमधील बहुतेक सर्व मोठमोठे कारखाने समुद्रकिनाऱ्यापासून फारसे लांब नाहीत. कच्च्या मालाचा पुरवठा परदेशातून होणाऱ्या आयातीवरच अवलंबून आहे. कारखान्यांतील उत्पादन परदेशी निर्यात होते. या दोन्ही गोष्टीमुळे जपानमध्ये सागरी वाहतुकीला जास्त महत्त्व येणे अपरिहार्य होते. इतर देशांतील लोहमार्गाशी तुलना करता जपानी लोहमार्ग हे मालाच्या वाहतुकीपेक्षा प्रवासी वाहतुकीवर जास्त प्रमाणात अवलंबून होते. मालाची वाहतुक वर दिलेल्या कारणांमुळे लांब पल्ल्याची नसून, फक्त लहानलहान अंतरावरील होती व आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या धुमश्चक्रीत जपानी लोहमार्गांवर फार मोठी आपत्ती ओढवली. बॉंबहल्ल्यांमुळे पुष्कळ लोहमार्ग निकामी झाले. मालवाहतुकीचे व प्रवासी वाहतुकीचे डबे व रेल्वे इंजिने यांचीही मोठ्या प्रमाणावर मोडतोड झाली. युद्धोत्तरकाळात अमेरिकेच्या सहकार्याने जपान सरकारने लोहमार्गांच्या पुनर्वसनाला व नूतनीकरणाला सुरुवात केली. इ. स. १९४६ मध्ये जपानी

लोहमार्गांची लांबी, सुमारे २०,००० मैल होती. याशिवाय खासगी कंपन्यांच्या मालकीचे जवळजवळ, ७,६०० मैल लांबीचे लोहमार्ग होतेच ! या सर्व लोहमार्गांची वाहतूक एकेरी होती. याच सुमाराला राष्ट्रीय व खासगी मालकांची अशी एकंदर ६,३०० रेल्वे इंजिने, ११,००० प्रवासी डबे व १,१७,००० मालाचे डबे किंवा वाघिणी होत्या.

जपानी लोहमार्ग हे प्रथमपासूनच मध्यम अंतराचे ( म्हणजे दोन रुळांतील अंतर ३ फूट ६ इंच इतक्या अंतराचे ) आहेत. जपानची स्वाभाविक भूरचना पाहता या देशातील लोहमार्ग बांधण्यात अनेक पूल व बोगदे यांची आवश्यकता भासते.

### जलवाहतूक

जपान हा देश अनेक बेटांचा मिळून झालेला असल्यामुळे या देशातील दळणवळणाची मुख्य भिस्त जलवाहतुकीवर असणे साहाजिकच आहे. या देशातील लोक दर्यावर्दी व कुशल नावाडी असल्यामुळे, त्यांनी कोरिया, चीन, मांचूरिया, इ. आपल्या आसमंतांतील भागावर चढाई करण्यास मागे-पुढे पाहिले नाही. फार पूर्वीपासून थायलँड, कोचीन, उत्तर व्हिएटनाम, फिलिपाइन्स बेटे, जावा, सुमात्रा व इंडोनेशियातील इतर बेटे यांच्याशी जपानी लोक आपआपल्या बोटीतून व्यापार करीत असल्याचे अनेक दाखले आहेत.

मध्ययुगीन काळात तोकुगावा शोगुनांच्या अंमलाखाली जपान देश असताना मात्र जलपर्यटन व परदेशगमन यांवर निरनिराळ्या प्रकारचे कडक निर्बंध लादले गेले. त्यामुळे जपान व जपानच्या बाहेरील जग यांचा संबंध हळूहळू सुटू लागला. दीडशे टनांपेक्षा जास्त वजनाच्या बोटी बांधण्यास संपूर्ण मज्जाव करण्यात आला. जपानी लोकांना आपला दर्यावर्दीपणा व नाविक कौशल्य यांचा उपयोग फक्त मच्छीमारीमध्ये करण्याचा प्रसंग आला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जपानमधील शोगुनांची सत्ता संपुष्टात आणली गेली व सर्व राज्य-कारभार जपानी बादशहांच्या हाती आला. या सत्तांतरानंतर जपान सरकारने पाश्चात्यांचे अनुकरण करून ज्या अनेकविध सुधारणा केल्या, त्यात नौकानयन व जलपर्यटण यांवर लादली गेलेली बंधने काढून घेण्यात आली. योकोसुका येथे अद्ययावत् पद्धतीचा जहाज बांधणीचा एक मोठा कारखाना सुरू करण्यात

आला. नागासाकी येथे एक नाविक विद्यालयही सुरू करण्यात आले. या विद्यालयांतून शिक्षण घेतलेले तरुण आगबोटींवर अधिकारी म्हणून नेमले जाऊ लागले. इ. स. १८७० मध्ये किनाऱ्यावरील जलवाहतूक करणारी एक कंपनी स्थापन करण्यात आली. इ. स. १८८५ मध्ये जपानमधील सर्वांत महत्त्वाची व मोठी समजली जाणारी निप्पोन यूसेन कायशा नामक जलवाहतूक कंपनी स्थापन करण्यात आली. या कंपनीत मित्सूबिशी नामक एक श्रीमंत सरंजामी कुटुंबाचे फार मोठे भांडवल गुंतले होते व आजही आहे. चीन-बरोबरच्या जपानी युद्धात जपान सरकारने ज्या आगबोटी परदेशी कंपन्यांकडून भाड्याने घेतल्या त्या आगबोटी युद्धसमाप्तीनंतर उपरिनिर्दिष्ट कंपनीने विकत घेतल्या व जलवाहतूक सुरू केली. या एकूण ६३ मोठमोठ्या परदेशी आगबोटी होत्या. यावरून एकट्या मित्सुबिशी कुटुंबाजवळ केवढी प्रचंड संपत्ती होती, याची कल्पना येईल.


निप्पोन यूसेन कायशाने सागरी मालवाहतुकीला सुरुवात करून चारही महासागरांवर आपला संचार सुरू केला. याच सुमाराला आणखी एका जल-वाहतूक करणाऱ्या कंपनीची स्थापना झाली. ही कंपनी म्हणजे ओसाका सोसेन कायशा ही होय. कोणत्याही देशाच्या औद्योगिक विकासाच्या मार्गांत एखादे युद्ध आले म्हणजे ते एक मोठे गंडांतर समजले जाते. युध्यमान राष्ट्राला मात्र युद्ध म्हणजे एक आपत्ती वाटते. पहिल्या जागतिक महायुद्धांत जपान हे तटस्थ राष्ट्र होते. त्या चार वर्षांच्या काळांत जपानी उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, वगैरेची जी कित्येक पटींनी वाढ झाली, त्यात जपानी जलवहातूक कंपन्यांनी आपला मोठा वाटा उचलला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जपानचा जगातील सर्व राष्ट्रात सहावा क्रमांक असून, जपानी आगबोटींचे एकंदर वजन १० लाख टनांपर्यंत होते. इ. स. १९१४ मध्ये या अंकाने १६ लक्ष टनांचा उच्चांक गाठला. इ. स. १९३७ मध्ये जपानी जहाजांची एकूण संख्या २५६४ झाली व त्यांचे एकंदर वजन ४५ लाख टनापर्यंत पोचले

जहाजे बांधण्याच्या धंद्याला उत्तेजन व मदत म्हणून जपान सरकारने इ. स. १८९६ मध्ये एक कायदा संमत केला. या कायद्यामुळे प्रत्येक नवीन जहाजबांधणीकरता जपानी कंपन्यांना त्या जहाजाला लागणाऱ्या एकंदर खर्चाचा काही हिस्सा सरकारी मदत म्हणून मिळू लागला. परदेशात रोख

किंमत देऊन जहाजे विकत घेण्यापेक्षा ती आपल्या देशातच बांधली गेली तर एका नवीन उद्योगाची भर पडून एकंदर जनतेच्या आर्थिक विकासाला ते फायदेशीर होईल, अशा कल्पनेने जपान सरकारने प्रथम हा कायदा संमत केला.

इ. स. १९४२ च्या सुमाराला जपानी जहाजांची संख्या २,७३६ झाली· व त्यांचे एकंदर वजन जवळ जवळ ६४ लाख टनांपर्यंत गेले. दुसऱ्या महायुद्धामध्ये एकंदर २,३२० जपानी आगबोटींचा नाश झाला. युद्धोत्तर काळात ही जबरदस्त हानी जपानला भरून काढणे अत्यंत कठीण होते. जपानमध्ये काही काळापर्यंत मित्र राष्ट्रांच्या सरकारचा वरचष्मा असल्यामुळे, तिथल्या जलवाहतुकीला पुष्कळच विघ्ने आली. परंतु अशाही परिस्थितीत जपानी जहाज कंपन्यांनी धीर न सोडता हळू हळू, पण खंबीरपणे आपले नष्ट झालेले नाविक दल पुन्हा उभे करण्याचा चंग बांधला. याचा परिणाम म्हणजे इ. स. १९५५ मध्ये जवळजवळ ३३ लक्ष टनांची जहाजे जपानने उभी केली. व जागतिक जलवाहतुकीत आपला दुसरा क्रमांक पटकावला.

खुष्कीच्या व सागरी वाहतुकीबरोबरच जपानने आपल्या हवाईदलाचीही उभारणी केली असून, प्रवासी व मालाची नियंत्रित वाहतूक जपानी विमान-कंपन्या करू लागल्या आहेत.





# अर्थव्यवस्था

**वजने व मापे**

इ. स. १९२१ च्या मार्च महिन्यात संमत करण्यात आलेल्या एका कायद्या-प्रमाणे जपानमध्ये सार्वत्रिक रीत्या दशमान पद्धती अंमलात आणली गेली. हिशेवाच्या सोयीच्या दृष्टीने अशी सुधारणा हितावहच होती. जुन्या पद्धतीची वजने व मापे यांचा उपयोग काही काळपर्यंत चालू ठेवण्यास संमती देण्यात आली. वेळोवेळी केलेली ही तात्पुरती व्यवस्था शेवटी ३१ डिसेंबर १९५८ रोजी रद्द करण्यात आली. म्हणजे दशमान पद्धतीवरोबर जुनी वजने व मापे सुमारे ४० वर्षे वापरात होती, असे स्पष्ट दिसते.

**चलनव्यवहार**

जपानमधील मुख्य चलन म्हणजे 'येन' हे होय. १,५,१०,५०, व १०० येनच्या दर्शनी किमतीची नाणी टांकसाळीतून पाडली जातात. याशिवाय

१,५,१०, ५०, १००, ५००, १०००, ५००० व १०,००० च्या दर्शनी किमतीच्या कागदी नोटाही बँक ऑफ जपानच्या वतीने वापरात आणल्या जातात. इ. स. १९६२ मध्ये १,७०,४७,०९५ कोटी येन किमतीच्या बँक ऑफ जपानच्या कागदी नोटा प्रचारात होत्या. त्याचबरोबर ७,५१२ कोटी येन किमतीची नाणीही प्रचारात होती.

इ. स. १९३७ मध्ये एका जपानी येनची किमत २९ अमेरिकन सेंटस् बरोबर होती. भारतीय नाण्यांत ती सुमारे २० पैशांइतकी होती. इ. स. १९४९ मध्ये १,००८ येन = १ पौंड व ३६० येन = १ डॉलर अशी हुंडणावळ ठरविण्यात आली. परदेशी हुंडणावळ ही सर्वस्वी बँक ऑफ जपानच्या अखत्यारीत दिली गेली. या नवीन हुंडणावळीच्या दराप्रमाणे एका जपानी येनची किमत भारतीय चलनात दीड पैशाइतकी झाली.

**परदेशी व्यापार**

सुमारे १०० वर्षांपूर्वी जपानी लोकांचा कोणत्याही पाश्चात्य किंवा परकीय राष्ट्रांशी व्यापारी संबंध नव्हता. याला अपवाद म्हणजे फक्त डच लोक. त्यांनाही वर्षांतून एकदाच एक गलबत भरून माल बाहेर नेण्यास परवानगी देण्यात आली होती. डच लोक हा माल जपानच्या नागासाकी या एकाच बंदरातून नेत असत. कारण अन्य बंदरांतून मालाची ने-आण करण्यास त्यांना परवानगी नव्हती.

इ. स. १८६८ मध्ये झालेल्या सत्तांतरानंतर पाश्चात्य देशांशी जपानचे दळणवळण भराभर वाढू लागले. त्या काळी नागासाकीप्रमाणे ओसाका बंदरही जपानच्या व्यापाराची मोठी पेठ होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या काळात जपानमधून निर्यात होणाऱ्या मालात रेशीम, चहा, चिनीमाती, तांबे, वगैरे वस्तूंचे महत्त्व जास्त होते. आयातमालात पुष्कळच विविधता दिसून येई. इ. स. १८७० च्या सुमाराला म्हणजे जपानमधील औद्योगिक क्रांतीच्या प्रारंभी जपानचा एकंदर परदेशी व्यापार पंचाहत्तर लक्ष डॉलर्सच्या आसपास होता. सुमारे वीस वर्षांनंतर त्या व्यापाराने दोन कोटी पंचाहत्तर लक्ष डॉलर्सची मजल गाठली. इ. स. १९१० मध्ये जपानमधून निर्यात झालेल्या मालाचीच किमत बावीस कोटी तीस लक्ष डॉलर्सइतकी होती. आणखी दहा

वर्षांनी जपानच्या निर्यात व्यापाराने साडे चौऱ्याण्णव कोटी डॉलर्सचा उच्चांक ओलांडला. हळूहळू जपान यापूर्वी आयात करीत असलेला मालच निर्यात करू लागला. इ. स. १९२० साली जपानमधून निर्यात केल्या गेलेल्या वस्तूत कणीक, साखर, कातडी, कापड, काच व चिनीमातीच्या वस्त यांचा प्रामुख्याने समावेश होता.

इ. स. १९२० नंतर जपानने आंतरराष्ट्रीय बाजारपेठा काबीज करण्याचा धूमधडाका सुरू केला. औद्योगिक प्रगतीमध्ये जपानमधील मित्सुई, मित्सूबिशी, सुमितोमो, वगैरेसारख्या मोठमोठ्या धनाढ्य व्यापारी कुटुंबांनी प्रत्येक उत्पादन क्षेत्रात आपला नुसता हातच शिरकावला असे नाही; तर हळूहळू त्या प्रत्येक क्षेत्रांत आपली मक्तेदारी स्थापन करण्यास सुरवात केली. आयात–निर्यात व्यापार, बँका, विमा कंपन्या, आगबोट कंपन्या, मोठमोठे कारखाने, परदेशांत हरत-हेचा कच्चा माल विकत घेण्याकरता स्थापन करण्यात आलेल्या संस्था, इत्यादींच्याद्वारे जपानी मालाची विक्रीही सुरू करण्यात आली. इ. स. १९२८ ते १९३५ या ५ – ७ वर्षांच्या काळात जपानी कापडगिरण्यांतून तयार होऊन निर्यात केल्या जाणाऱ्या कापडाने जागतिक उच्चांक मोडला. इ. स. १९२८ मध्ये जपानमधून १७० कोटी चौरस वार कापड निर्यात केले गेले; तर इ. स. १९३५ मध्ये एकंदर कापडाची निर्यात २७,२०५ कोटी चौरस वारांपेक्षाही जास्त झाली.

खालील कोष्टकावरून जपानच्या परदेशी व्यापाराच्या प्रगतीची कल्पन येईल. ( सर्व आकडे कोटी येनमध्ये आहेत )

| वर्ष | आयात | निर्यात |
|---|---|---|
| १९३० | १,६८,०३१ | १,५१,८५७ |
| १९३२ | १,५२,४५२ | १,४५,७३० |
| १९३४ | २,४०,०५० | २,२५,८०८ |
| १९३६ | २,९२,७९८ | २,७२,७६० |
| १९३७ | ३,९५,४७३ | ३,१३,८८२ |

वरील कालावधीत जपानमधून निर्यात केलेल्या वस्तूंमध्ये सुती, रेशमी, व लोकरीचे कापड त्याचप्रमाणे कृत्रिम रेशमाचे किंवा रेयॉनचे कापड या सर्वात

महत्त्वाच्या वस्तू होत्या. याखेरीज पॅकबंद डब्यांतील खाद्यपदार्थ व इतर अनेक पक्क्या मालाचा अंतर्भाव होत असे. जपानमध्ये आयात होणाऱ्या मालांत कापूस, रबर व लोकर या मुख्य बाबी होत्या.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपानी व्यापार अगदीच खालावला. युद्ध-काळातील बाँबवर्षावामुळे मोठमोठी औद्योगिक केंद्रे भराभर उद्ध्वस्त होऊ लागली. अशा परिस्थितीत जपानी उद्योगधंद्यांना सावरून, त्यांना आपआपल्या पायावर पुन्हा उभे राहू देण्यास मदत करणे ही फार महत्त्वाची गोष्ट होती. अमेरिका हे जेते राष्ट्र व जपान हे जित राष्ट्र असून सुद्धा युद्धकालीन नुकसानीची भरपाई अमेरिकेने जपानकडून करवून तर घेतली नाहीच; उलट इ. स. १९४५ते १९५१ या सहा वर्षांच्या आपल्या राजवटीत अमेरिकेने जपानला २०० कोटी डॉलर्सची मदतच केली. या मदतीचा उपयोग जपानी जनतेला अन्नपुरवठ्याकरता करण्यात आला. या २०० कोटी डॉलर्सच्या मदतीव्यतिरिक्त अमेरिकन सरकारने जपानी सरकारला कित्येक कोटी डॉलर्सचे कर्ज कच्च्या मालाच्यां स्वरूपात दिले.

खालील कोष्टकावरून युद्धोत्तर काळातील जपानच्या परदेशी व्यापारा-बद्दल कल्पना येईल – ( सर्व आकडे कोटी डॉलर्समध्ये आहेत. )

| वर्ष | आयात | निर्यात |
|---|---|---|
| १९५८ | ३०,३३१ | २८,७६६ |
| ९५९ | ३५,९९५ | ३४,५६० |
| १९६० | ४४९. | ४०,५५० |
| १९६१ | ५८,१०० | ४२,३६० |
| १९६२ | ४५,४६० | ४७,८७० |
| ९६३ | ६७,३६० | ५४,४७० |

युद्धोत्तर काळात जपानचा परदेशी व्यापार कसा सुधारला, हे वरील आकड्यांवरून सिद्ध होईल. यानंतर खाली दिलेल्या आणखी एका कोष्टका-वरून जपानची आयात कोणकोणत्या देशांतून झाली, त्यांत घट किंवा वाढ किती झाली, तसेच जपानचा माल कोणकोणत्या देशात निर्यात होतो व त्यामध्ये चढउत्तार किती व कसा झाला, इ. बाबींचे स्पष्ट दिग्दर्शन होईल

या कोष्टकात फक्त महत्त्वाच्या देशांचाच संबंध दाखविला आहे. ( सर्व आकडे कोटी डॉलर्समधील आहेत. )


| | निर्यात | वर्ष | | आयात | वर्ष | |
|---|---|---|---|---|---|---|
| देश | १९५९ | १९६० | १९६१ | १९५९ | १९६० | १९६१ |
| हाँगकाँग | १२.९२ | १५.६० | २५.३ | २.७१ | २.३० | ५७. |
| थायलँड | १०.३४ | ११.७५ | १३.४ | ३.६८ | ७.२३ | ५७. |
| फिलिपीन्स | ११.०० | १५.४५ | १२.८ | १३.४४ | १५.८९ | १५.६ |
| इंग्लंड | १०.३४ | १२.०५ | ११.४ | १०.३५ | ९.९१ | १३.७ |
| कॅनडा | ११.४३ | ११.९२ | ११.६० | १५.३६ | २०.३७ | २६.६। |
| अमेरिका | १०३.०६ | १०८.२९ | ११४.५ | १११.२९ | १५४.५४ | २०८.१। |
| ऑस्ट्रेलिया | ५.८३ | १४.४१ | १०.०० | २९.५७ | ३४.३७ | ७४.५। |

वरील कोष्टकात दाखविलेल्या आयात–निर्यात मालामध्ये खालील वस्तू विशेष महत्त्वाच्या आहेत.

**आयात** – खनिज तेल, कापूस, लोकर, कच्चे लोखंड, लाकूड, गहू, सोयाबीन्स, साखर व कच्चे रबर.

**निर्यात** – सुती कापड, लोखंड, पोलाद, जहाजे, आगबोटी, रेयॉन कापड, मासळी, तयार कपडे, खेळणी, रासायनिक खते, कापडगिरण्यांची यंत्रसामुग्री.







**हिरोशिमा**

हे जपानमधील हिरोशिमा याच नावाच्या एका राजकीय विभागाचे मुख्य शहर व बंदर आहे. एका उपसागरावर चोहोबाजूंनी लहान लहान बेटांनी तयार झालेल्या एका गोलाकृती कड्यामध्ये हिरोशिमा हे बेट वसले आहे. या बंदरामधून जपानमधील इतर भागांशी सुरू असलेली जलवाहतूक महत्त्वाची समजली जाते.

हिरोशिमाजवळील ईताकूशिमा नामक बेटावर असलेल्या नयनरम्य मंदिरामुळे हिरोशिमाला महत्त्व आले आहे. बेंटन नामक एका देवीची प्रतिष्ठापना या मंदिरात करण्यात आली आहे. हिरोशिमा हे एक महत्त्वाचे लष्करी केंद्र होते व त्यामुळेच दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीला दिनांक ६ ऑगस्ट १९४५ रोजी या बेटावर अमेरिकेच्या वैमानिक दलाने पहिला ॲटम बॉंब टाकून त्या युद्धाचा शेवट केला.


जपान
उ
जपानी समुद्र
होक्काईदो
हाक्कोदेत
तोवादा
हानामाकी
त्सुरूओका
मात्सुशिमा
ऐझुवाकामात्सु
निक्को
तोयामा
मिनाकामी
कुसात्सु
मात्सुमातो
इकाओ
तोक्यो
याकोहामा
फूजीसान शिखर
कामिकोची
इनुयामा
फूजियामा
१२,३८९ फूट
जपानचा आल्प्स
क्योतो
नारा
नागोया
ओसाका
योशिनो-कुमानो
शिराहामा
किनोसाकी
होन्शू
वाईसेन
हिरोशिमा
कांची
शिकोकू
जपानी भूमध्य समुद्र
फूकूओका
नागासाकी
उनझेन
आसो
क्यूशू
किरिशिमा
आओशिमा
पूर्व चिनी समुद्र
पॅसिफिक समुद्र
राष्ट्रीय उद्याने
गरम झरे
महत्वाची ठिकाणे
शिखरे

या ॲटम बाँबच्या फेकीमुळे हिरोशिमा बेटावर जो काही हलकल्लोळ उडाला व तेथील समग्र जीवन जे धुळीला मिळाले, त्याला जगात दुसरीकडे कोठेही जोड आढळणार नाही. हिरोशिमावरील या ॲटम बाँबच्या हल्ल्यामुळे भावी युद्धात ॲटम बाँबसारखी अस्त्रे कोठपर्यंत संहार करू शकतील, त्याची थोडीशी कल्पना शास्त्रज्ञांना आल्यामुळे अलिकडे प्रत्येक राष्ट्र युद्धाची भाषा टाळण्याच्या प्रयत्नात असते.

**मात्सुयामा**

हे जपानच्या शिकोकू बेटावरील, वायव्येकडील एक महत्त्वाचे बंदर आहे. एहिमे या नावाच्या एका राजकीय विभागाचे ते मुख्य ठाणे आहे. दळणवळण, प्रवासी व औद्योगिक केंद्र म्हणूनही प्रसिद्ध आहे.

मात्सुयामा येथे सुती व कृत्रिम रेशमी कापडाच्या मोठमोठ्या गिरण्या आहेत. कागद, रसायने व यंत्रोत्पादनाचे अनेक लहान-मोठे कारखाने येथे आहेत. निरनिराळ्या प्रकारची लिंबे, संत्री, मोसंबी, अंजीर, इ. फळफळावळ या शहराच्या आसमंतात होते. या शहराची आजची लोकसंख्या तीन लाख आहे.

**योकोसुका**

तोक्योच्या आखातातील योकोहामा बंदराच्या दक्षिणेला बारा मैलांवर असलेले हे जपानमधील महत्त्वाचे नाविक केंद्र आहे. हे लोहमार्गांनी तोक्योशी जोडले गेले आहे. इ. स. १८६५ साली या ठिकाणी प्रथम आगबोटी बांधण्याचा कारखाना सुरू करण्यात आला. लवकरच या कारखान्याची व तदनुषंगाने त्या बंदराची वाढ होत जाऊन, सध्या तिथे एक मोठे जपानी नौदलाचे केंद्रस्थान स्थापण्यात आले आहे. योकोसुकाची लोकसंख्या तीन लाख आहे.

**योकोहामा**

तोक्योच्या आखातातील पश्चिम किनाऱ्यावरील सर्वांत मोठे व महत्त्वाचे असे हे बंदर आहे. जपानची राजधानी जे तोक्यो तेथपासून दक्षिणेकडे १८ मैलांवर योकोहामा येते. योकोहामाजवळील कानागावा हे बंदर इ. स. १८५९ मध्ये अमेरिकेच्या दडपणामुळे परकीयांना व्यापाराकरता खुले करण्यात

आले. त्या वेळी योकोहामा हे एक लहान बंदर मच्छीमारीचे केंद्र म्हणून समजले जात असे. प्रशांत महासागरावरील योकोहामा हे एक महत्त्वाचे बंदर असून त्याच्या परिसरात सुप्रसिद्ध तोक्योचे मैदान येते. त्यामुळे या बंदराला आणखीच महत्त्व येत चालले आहे.

इ. स. १९२३ साली झालेल्या प्रचंड ज्वालामुखीच्या स्फोटामुळे या बंदराचा सुमारे ८० टक्के भाग जमीनदोस्त झाला. येथील बहुसंख्य लोक मृत्युमुखी पडले. परंतु ज्वालामुखी व धरणीकंप हे जणू काही जपानी लोकांच्या पाचवीलाच पुजले असल्याने या ज्वालामुखीच्या स्फोटानंतर लगेच योकोहामाचे पुनर्वसन सुरू झाले. लवकरच योकोहामाची परिस्थिती पुनश्च मूळपदावर आली. या शहराची लोकसंख्या बारा लाख आहे.

**तोक्यो ( टोकियो )**

जपानमधील होनशिऊ बेटाच्या आग्नेय किनाऱ्यावर त्याच नावाच्या आखातावर वसलेले जपानच्या राजधानीचे सुप्रसिद्ध शहर. पूर्वी या शहराचे नाव येदो असे होते. तोक्यो शहर हे सुमिदा नामक एका लहानशा नदीच्या काठावर वसले आहे. सुमिदेचे पात्र अतिशय उथळ असल्यामुळे तिचा जलवाहतुकीकडे काहीच उपयोग होत नाही. तोक्यो शहराला जवळचे असे बंदर म्हणजे तोक्योपासून सुमारे १८ मैल दूर दक्षिणेकडे असलेले प्रशांत महासागरावरील योकोहामा हे होय. तोक्यो व योकोहामा या दोन शहरांमधील अंतर अगदीच थोडे असल्याने ही दोन्ही ठिकाणे एकत्र करण्यात येऊन त्याना कायहिन असे नवीन नाव देण्यात आले आहे.

तोक्योच्या आसपास जपानमधील सर्वात मोठा मैदानाचा प्रदेश असल्याने औद्योगिक दृष्टचाही तोक्योची भरभराट चालू आहे. हा भाग भूकंपाच्या क्षेत्रात येत असल्यामुळे तोक्योला वारंवार त्याचे चटके बसतात. या शहराजवळच एक मोठा किल्ला असून, तो पूर्वीच्या शोगुन राज्यकर्त्यांचा एक महत्त्वाचा बालेकिल्ला समजला जात असे. इ. स. १८७५ मध्ये झालेल्या शोगुनविरुद्धच्या क्रांतीत हा किल्लेवजा राजवाडा जाळून टाकण्यात आला. त्यानंतर याच वास्तूवर जपानी बादशहांचा नूतन राजवाडा बांधण्यात आला.

तोक्यो शहराची उभारणी जपानी व पाश्चात्य अशा दोन्ही पद्धतींनी झाली आहे. या शहरात जी अनेक उद्याने आहेत, त्यांपैकी आशाकुसा नामक उद्यानात एक दयेच्या देवते चा ( Goddess ot Merey ) पुतळा उभारण्यात आला आहे. तोक्योच्या परिसरात जहाज बांधणी करणे, मोटारी तयार करणे, कापड विणणे, रसायने बनविणे, इ. चे मोठमोठे कारखाने आहेत. इ. स. १८६९ मध्ये येथे पहिल्या विश्वविद्यालयाची स्थापना झाली. आजमितीला तोक्यो हे जपानमधील संस्कृती, उद्योगधंदे, शिक्षण, अर्थकारण, इ. गोष्टींचे एक सर्वांत मोठे केंद्र समजण्यात येते. तोक्योची आजची लोकसंख्या आठ लाख आहे.

**सप्पोरो**

जपानच्या सर्वांत उत्तरेकडील होक्काइदो या बेटाचे हे मुख्य ठिकाण आहे. या शहराची स्थापना व वाढ गेल्या शंभर वर्षांतच झाली आहे. येथील विश्वविद्यालयात शेतीशास्त्राची शाखा सुप्रसिद्ध आहे. या शहरातील संग्रहालय, पिठाच्या गिरण्या, दारू गाळण्याचे कारखाने व गोणपाटे तयार करण्याच्या गिरण्या महत्त्वाच्या आहेत. शहराची लोकसंख्या पाच लाख आहे.

**नागोया**

होनशिऊ बेटाच्या पूर्व किनाऱ्यावरील आईशी या राजकीय विभागाचे हे मुख्य शहर आहे. जपानमधील औद्योगिक केंद्रांमध्येही नागोयाचा क्रमांक पुष्कळच वरचा आहे. नागोया हे इसे उपसागरावरील एक बारमाही व सुरक्षित बंदर असल्याने तर व्यापारीदृष्टचा त्याचे महत्त्व फारच वाढले आहे. या शहराच्या आसमंतातील भाग म्हणजे नोबी नामक मैदानी प्रदेश होय.

तोकूगावा राज्यकर्त्यांनी सतराव्या शतकात येथे प्रथम एक चांगला किल्ला बांधला व ते आपले ठाणे केले. त्यानंतर लष्करी सरंजामदारांचे प्राबल्य कमी झाले, तरी नागोया शहराचे महत्त्व कायमच राहिले. नागोयाच्या आजूबाजूला अनेक लहान लहान नद्या असल्यामुळे त्या नद्यांच्या पाण्यापासून होणारे जलविद्युत्‌चे उत्पादन महत्त्वाचे ठरले आहे. प्रथम येथे सुती कापडाचे कारखाने निघाले. अलिकडे जंगलातील लाकूड व त्यापासून होणाऱ्या निर-

निराळ्या वस्तू, मोटारी, विमाने, यंत्रे व त्यांचे सुटे भाग बनविणे; काच व चिनी मातीच्या वस्तू तयार करणे विजेची उपकरणे, पोलाद, कृत्रीम रेशीम, कृत्रीम रबर, वैजिक रसायने, इत्यादींची निर्मिती करणे; असे नानाप्रकारचे मोठेमोठे उद्योगधंदे चालू असून ते आजूबाजूच्या गृहउद्योगांना साहाय्यभूत होतात.

नागोया शहराची बांधणी शास्त्रशुद्ध पायावर केलेली असून , तिथे भरपूर रूंदीचे रस्तेही आहेत. दुसऱ्या महायुद्धांत बाँबवर्षावामुळे या शहराची मोठीच हानी झाली; परंतु युद्धोत्तर काळात शहर व त्यातील अनेकविध कारखाने यांचे पुनर्वसन व नूतनीकरण सुरू झाले. आता ते पूर्ण झाले असून, लहान मोठ्या अनेक सरकारी व खासगी इमारतीही नव्याने बांधण्यात आल्या आहेत.

नागोया हे जपानमधील लोहमार्गाचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. नागोया बंदरात एकाचवेळी किमान ३० मोठमोठ्या आगबोटी थांबण्याची सोय करता येते. नागोयापासून जलवाहतुकीकरता पुष्कळ कालवे काढण्यात आले असून, ते नागोयाच्या परिसरातील कारखान्यांपर्यंत व उद्योगकेंद्रांपर्यंत आगबोटींची ने-आण करू शकतात. नागोयाची हल्लीची लोकसंख्या पंधरा लाख आहे.

## नीईगारा

होनशिऊ बेटाच्या नीईगारा याच नावाच्या भागाचे हे एक महत्त्वाचे शहर आहे. या शहराची रचना बरीच वैचित्र्यपूर्ण आहे. मोठमोठे रस्ते वाहतुकीला खुले असून, त्यांच्या बाजूने मालाच्या वाहतुकीकरता लहानलहान कालवे बांधण्यास आले आहेत. त्यामुळे रस्त्यावरील रहदारीमध्ये मोठमोठ्या मोटार लॉऱ्या दिसून येत नाहीत व रहदारीलाही फारसा अडथळा होत नाही, या शहराचे पूर्वीपासूनचे वैशिष्ट्य म्हणजे लाखेच्या हरतऱ्हेच्या वस्तू तयार करण्याचे कारखाने हे होय. परंतु अलिकडे येथे इतरही निरनिराळ्या प्रकारचे कारखाने सुरू केले गेले आहेत. या शहराची हल्लीची लोकसंख्या तीन लाख आहे.

## ओसाका

जपानमधील कारखान्यांचे सर्वात मोठे व महत्त्वाचे केंद्र म्हणून ओसाका प्रसिद्ध आहे. होनशिऊ बेटावर बिवा सरोवराच्या दक्षिणेला व जपानी

भूमध्य समुद्राच्या ईशान्य टोकाला हे शहर वसले असल्याने हे बंदर म्हणूनही फार प्रसिद्ध आहे. ओसाका व कोबे यांच्या दरम्यान मोठमोठ्या आगबोटींची जा-ये असते. या शिवाय या दोन शहरांना जोडणारा लोहमार्गही आहे.

सध्या ओसाका येथे लोखंड शुद्ध करण्याचे, साखर निर्मितीचे, कापसापासून सूत काढण्याचे, जहाजे बांधण्याचे व अन्यही अनंत प्रकारचे मोठमोठे कारखाने रात्रंदिवस चालू असतात. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात बाँबफेकीमुळे या शहरातील अनेक कारखाने व इमारती अक्षरश: जमीनदोस्त झाल्या. युद्धसमाप्तीनंतर जवळजवळ ५–६ वर्षांच्या अवधीतच या शहरात किमान एक लाख लहानमोठ्या इमारती व नऊ हजार कारखाने पुन्हा उभे करण्यात आले. ओसाका शहराची आजची लोकसंख्या तीस लाख आहे.

## कोबे

जपानच्या पश्चिम किनाऱ्यावरील हे एक महत्त्वाचे बंदर आहे. इ. स. १९२३ साली झालेल्या ज्वालामुखीचे स्फोटामुळे योकोहामा बंदराचे जे अनन्वित नुकसान झाले, तेव्हापासून योकोहामाचा बराचसा आयात-निर्यात व्यापार कोबे बंदराकडे वळविण्यात आला. कोबे या बंदराचे परिसरात अनेक मोठमोठे कारखाने आहेत व कोबे हे जपानमधील लोहमार्गाचे एक महत्त्वाचे केंद्र झाल्यापासून कोबे बंदराची भरभराट होऊ लागली.

इ. स. १९१७ मध्ये कोबे येथे जहाजे बांधण्याचा एक मोठा कारखाना सुरू करण्यात आला. कोबे शहराजवळून जाणाऱ्या मिनाटोगारा या एका लहानशा नदीचा पुरेपूर उपयोग करण्यात येऊन कोबे बंदराची सुधारणा करण्यात आली. कोबेपासून ओसाकापर्यंत पूर्व-पश्चिम असा एक औद्योगिक विभाग सुरू झाला असून, त्यामुळे कोबेचे महत्त्वही एकसारखे वाढत चालले आहे. कोबेची लोकसंख्या अकरा लाख आहे.

## क्योतो

एकेकाळी जपानची राजधानी समजले गेलेले हे शहर होनशिऊ बेटावर व बिवा सरोवराच्या दक्षिण किनाऱ्यावर वसले आहे. या शहराच्या रचनेवरुन या शहराला अतिपूर्वेकडील रोम असे म्हणण्यात येते व ते

सार्थही वाटू लागते. या शहराच्या मध्यापासून ५–१० मैलांपर्यंत सर्व दिशांना मोठमोठ्या सडका ( जवळजवळ सवाशे फूट रुंदीच्या ) तयार करण्यात आल्या आहेत. या रुंद व भव्य सडकांना जे जोड रस्ते आहेत, तेही प्रत्येकी ५०–६० फूट रुंदीचे आहेत.

क्योतो येथील पुरातन राजवाडा फार अप्रतिम आहे. अजूनही जपानचा शाही निवास तोक्यो येथे असला, तरी सर्व धार्मिक व इतर समारंभ क्योतो येथील राजवाड्यातच केले जातात. इ. स. १८९७ मध्ये तोक्यो येथे एक विश्वविद्यालय स्थापन करण्यात आले. या विश्वविद्यालयात अमेरिकेच्या परराष्ट्रीय मिशनच्या सहकार्याने येशू ख्रिस्ताच्या धर्माचे शिक्षण देण्याचे एक मोठे केंद्र सुरू करण्यात आले आहे.

रेशमी कापड, लाखेचे पदार्थ, काच, चिनीमातीच्या वस्तू व ग्रंथछपाई हे या शहरातील प्रमुख उद्योग समजले जातात. या शहराची लोकसंख्या जवळजवळ पंधरा लाख आहे.

### कागोशिमा

जपानमधील दक्षिण कियुशू बेटावरील कागोशिमा राजकीय विभागाची ही राजधानी आहे. कागोशिमा उपसागराच्या पश्चिम किनाऱ्यावर हे बंदर वसले आहे. या बंदराच्या जवळच स्ताकुता जिमा या नावाचा एक जिवंत ज्वालामुखी आहे. सरंजामशाहीच्या काळात कागोशिमा हे शिमाझू सरंजामदारांचे मुख्य ठिकाण होते. इ. स. १८६७ मधील राजकीय सत्तांतराच्या वेळचे सुप्रसिद्ध पुढारी सायगो ताकामोरी व ओकुबो तोशीमिची यांचा जन्म कागोशिमा येथेच झाला. अलिकडे कागोशिमाच्या आसमंतातील भाग फारसा सुपीक नसल्यामुळे या बंदराचे महत्त्व पुष्कळच कमी आहे. या शहराची लोकसंख्या दोन लाख आहे.

### फुकूओका

किऊशू या एका बेटावरील वायव्य किनाऱ्यावरील हे बंदर आहे. नागासाकीपासून फुकूओका हे बंदर, ईशान्येकडे नव्वद मैलांवर असून, ते लोहमार्गानीही जोडले गेले आहे. या शहराच्या आसमंतात रेशमी कापडाच्या अनेक गिरण्या आहेत. पश्चिम जपानमधील सर्वांत महत्त्वाचे विश्वविद्यालय

या ठिकाणी आहे. त्या विश्वविद्यालयातील रोगचिकित्सेचा विभाग हा फार महत्त्वाचा समजण्यात येतो. या शहराची लोकसंख्या सात लाख आहे.

**यामागाता**

जपानच्या होनशिऊ बेटाच्या उत्तरेकडील यामागाता या राजकीय विभागाची ही राजधानी आहे. यामागाताच्या आसमंतात तांदळाचे उत्पादन फार महत्त्वाचे समजले जाते. याशिवाय फळफळावळ व कच्चे रेशीम यांचीही पैदास केली जाते. यामागाता बंदरावरून असंख्य मच्छीमारीबोटी मासळी पकडण्याकरिता जपानी समुद्रावर जातात. याच्या आजूबाजूच्या जंगलातील लाकूडही महत्त्वाचे आहे.

यामागाताच्या आसपास अगदी थोड्या प्रमाणात खनिजतेल व हलक्या प्रतीच्या कोळशाच्या खाणी सापडल्या आहेत. यामागाता येथे एक मोठे विश्व-विद्यालय आहे. या शहराची लोकसंख्या तीन लाख आहे.

**त्सुशिमा**

जपानी समुद्रावरील उत्तरेकडच्या कोरिया व दक्षिणेकडच्या इकी या दोन बेटांच्या दरम्यान हे बेट वसले आहे. या बेटाचे क्षेत्रफळ २७४ चौरस मैल असून, लोकसंख्या एक लाख आहे.

इ. स. १८६१ मध्ये एका रशियन काफिल्याने या बंदराचा तावा घेण्याचा प्रयत्न केला; परंतु तो यशस्वी झाला नाही. इ. स. १९०५ च्या रूसो-जपानी युद्धात दिनांक २७–२८ मे रोजी त्या बेटाजवळ जपानी व रशियन नौदलांची एक घनघोर लढाई झाली. जपानी आरमाराचे प्रमुख अॅडमिरल तोजो यांनी अॅडमिरल रोझेस्ट वेंस्की यांच्या अधिपत्याखालील रशियन आरमाराचा पार धुव्वा उडविला व ही सागरी लढाई जपानी इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेविली गेली.

**तोयामा**

होनशिऊ बेटावरील मध्य राजकीय विभागाची ही राजधानी आहे. हे जपानी समुद्रावरील व जपानच्या पश्चिम किनाऱ्यावरील एक बंदर आहे. तोयामाच्या आजूबाजूच्या डोंगरातून वाहणाऱ्या पाण्यापासून ठिकठिकाणी जलविद्युत्निर्मिती करण्यात येते.


तोयामा शहराच्या आसपास अल्प प्रमाणावर खनिजांचे उत्पादन होते. या खनिजांपासून रसायने व कापूर बनवण्यात येते. कृत्रिम रेशीम व लोकर यांच्या मिश्रणाने अनेक प्रकारचे कृत्रिम सूत कातण्यात येते. याखेरीज यंत्रे व त्याचे सुटे भाग लाकडाचा लगदा, कागद, लोखंड व पोलाद इ. पदार्थ बनविण्याचे मोठमोठे कारखाने आहेत.टोयामाची लोकसंख्या तीन लाख आहे.

**नागासाकी**

जपानच्या दक्षिणेकडील किऊशू बेटावरील नागासाकी याच नावाच्या राजकीय विभागाच्या राजधानीचे हे शहर आहे. नोमो व बिशिसो नोगी या दोन द्वीपकल्पांच्या केंद्रावर नागासाकी हे बंदर वसले आहे. या बंदराला इ. स. १५७१ मध्ये प्रथम पाश्चात्यांचे पाय लागले. साहजीकच त्यानंतर पाश्चात्य देशांच्या जहाजांना या बंदरात येऊन पाणी व अन्नसामुग्रीचा पुरवठा करून घेणे सोयीचे झाले. हळूहळू पाश्चात्यांचा व्याप जसजसा वाढू लागला, तसतसे तत्कालीन जपान सरकारने त्यांना जपानी भूमीवर पायही टाकण्यास कायमची बंदी केली. याला अपवाद फक्त डचांचा होता.

नागासाकीच्या आसपास कोळशाच्या खाणी असल्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपासून या बंदराचा उपयोग जहाजांना कोळशाचा पुरवठा करणारे बंदर म्हणून होऊ लागला. नागासाकी येथे मित्सूबिशी कंपनीचा एक भलामोठा जहाजबांधणीचा कारखाना आहे.

दिनांक ९ ऑगस्ट १९४५ रोजी दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस दोस्त राष्ट्रांच्या विमानांनी या बंदरावर बाँबचा सतत मारा केल्यामुळे या बंदराची व त्याच्या आसमंतातील औद्योगिक जीवनाची फार मोठ्या प्रमाणात हानी झाली. जवळजवळ पन्नास हजार लोक प्राणास मुकले व आणखी लाख दीडलाख जखमी झाले. सांप्रत नागासाकीची लोकसंख्या चार लाख आहे.



# महत्त्वाच्या व्यक्ती

**हिरोहितो**

सांप्रतचे जपानचे बादशहा. यांचा जन्म गतकालीन बादशहा योशिहितो यांच्या पोटी दिनांक २९ एप्रिल १९०१ रोजी झाला. युवराज असताना म्हणजे इ. स. १९२१ साली यांनी युरोपियन देशांचा दौरा केला. या दौऱ्यावरून परत आल्यावर बादशहा योशिहितो यांनी प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे राजसंन्यास घेतला व हिरोहितो यांना गादीचे वारस म्हणून राज्यकारभार हाती घ्यावा लागला. दिनांक २६ जानेवारी १९२३ रोजी त्यांचा राजकन्या नागाको यांच्या बरोबर विवाह झाला. या दांपत्याला २ मुलगे व ४ मुली आहेत.

दिनांक २५ डिसेंबर १९२६ मध्ये योशिहितो यांचा मृत्यू झाला. त्यानंतर हिरोहितोंना जपानचे बादशहा म्हणून रीतसर राज्याभिषेक करण्यात आला. हिरोहितो यांच्या कारकीर्दीनंतर जपानी राजकारण चढाऊ बनत चालले

व जपानच्या साम्राज्याचा भराभर विस्तार होत गेला. याचा शेवट जपानने दुसऱ्या महायुद्धात प्रवेश करण्यात होऊन इ. स. १९४५ अखेर जपानला मानहानीकारक शरणागती पत्करावी लागली. इ. स. १९४५ च्या तहातील कलमांना अनुसरून हिरोहितो यांनी स्वखुषीने राजगादी सोडून दिली.

**जनरल हिदेकी तोजो**

एक प्रसिद्ध राजकारणी लष्करी अधिकारी. यांचा जन्म तोक्यो येथे दि. ३० डिसेंबर १८८४ मध्ये झाला. तोक्योमधील शाही लष्करी महाविद्यालयात शिक्षण पुरे केल्यावर त्यांनी जपानी सैन्यात प्रवेश केला. इ. स. १९१९ मध्ये बर्लिन येथील जपानी राजदूतांचे लष्करी सल्लागार म्हणून त्यांची नेमणूक झाली. इ. स. १९२८ मध्ये ते एका जपानी सेनाविभागाचे मुख्याधिकारी म्हणून नेमले गेले.

इ. स. १९३७ मध्ये क्वांगतुंग येथील जपानी लष्करी छावणीचे ते मुख्याधिकारी झाले. १९४० च्या जुलै महिन्यात प्रिन्स कोनेये यांच्या मंत्रिमंडळात त्यांना युद्धमंत्र्याची जागा देण्यात आली. दिनांक १६ ऑक्टोबर १९४१ रोजी कोनोये मंत्रिमंडळ गडगडल्यावर ते जपानचे महामंत्री झाले. त्यांच्याच अमदानीत जपानी साम्राज्यविस्ताराची कल्पना फुलाफळाला आली, व दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी त्यांनी जर्मनीच्या बाजूने जपानला युद्धात ओढले. पर्ल हार्बरवरील हवाई हल्ला व अमेरिकेच्या विरुद्ध युद्धघोषणा या दोन्ही गोष्टी त्यांच्याच सल्ल्याने झाल्या. युद्धकाळात जनरल तोजो यांनी मंत्रिमंडळाची सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. दुसऱ्या महायुद्धानंतर जनरल तोजो यांना युद्ध गुन्हेगार ठरवून दिनांक २५ डिसेंबर १९४८ रोजी फाशी देण्यात आले.

**मासायोशी मात्सुकाता**

एक प्रसिद्ध अर्थतज्ञ. यांचा जन्म कागोशिमा येथे १८३५ साली, सामुराई पंथातील सत्सुमा या एका लहानशा कुटुंबात झाला. इ. स. १८६८ मध्ये जपानमध्ये राज्यक्रांती झाल्यावर तोसा प्रांताचे राजप्रमुख म्हणून त्यांची नेमणूक झाली. इ. स. १८७४ साली अर्थखात्याचे दुय्यम मंत्री म्हणून ते जपानी मंत्रिमंडळात आले. या सुमारास जपानच्या नाणेबाजारात घसरगुंडी चालू होऊन जपान हे दिवाळखोर राष्ट्र होण्याच्या मार्गावर होते. राज्याच्या तिजोरीत पैसा अपुरा पडू लागला, म्हणून जपान सरकारने तात्पुरते का

होईना, नाण्यांमध्ये चांदी-सोन्याचे प्रमाण कमी केले. शिवाय कागदी नोटाही प्रचारात आणण्यास सुरवात केली. याचा परिणाम म्हणजे इ. स. १८७१ साली जपानमध्ये कागदी नोटांचा भाव घसरून त्यांना कोणी हातातही धरीना.

मात्सुकाता यांनी यावेळी कागदी नोटांचे चलन पुष्कळच घटविले. त्यांच्या सल्ल्यानुसार जपानमध्ये बँक ऑफ जपान या राष्ट्रीय बँकेची स्थापना करण्यात येऊन त्या बँकेकडे सर्व चलनव्यवहार सुपूर्त करण्यात आला. जपानच्या अर्थव्यवहारात असे स्थिरस्थावर झाल्यानंतर लगोलग जपानचा लष्करी व आर्थिक भाग्योदय सुरू झाला. याच सुमाराला चीनविरूद्ध चालू असलेली लढाई फत्ते करून जपानने आपला व्यापारही वाढविला. या युद्धाच्या खर्चा-संबंधीची तरतूद करण्याकरता मात्सुकाता यांनी जपानमधील एकंदर करांची पुनर्रचना व आखणी केली.

इ. स. १८९७ मध्ये त्यांच्याच अमदानीत जपानने सुवर्ण परिमाण चालू केले. मात्सुकाता यांची ही विविध प्रकारची देशसेवा पाहून त्यांना प्रिन्स, काउंट, मार्क्विस, इ. एकापेक्षा एक सरस किताब बहाल करण्यात आले. दोन वेळा त्यांनी जपानच्या महामंत्र्याची भूमिका उत्तमतऱ्हेने पार पडली होती. जपानी अर्थकारणातील या मेरुमणीचे दिनांक २ जुलै १९२४ रोजी तोकियो येथे देहावसान झाले.

## तारोकात्सुरो

एक प्रसिद्ध लष्करी अधिकारी व मुत्सद्दी. इ. स. १८४७ मध्ये चोशू या प्रांतात यांचा जन्म झाला. अंतर्गत यादवीयुद्धात कात्सुरो यांनी सरकारी फौजांच्या बरोबर इतक्या हिरीरीने लढा दिला, की जपान सरकारने त्यांची उच्च लष्करी शिक्षणासाठी दोनदा रवानगी केली. जर्मनीहून परतल्यावर त्यांची दुय्यम मुख्य मंत्री म्हणून निवड झाली. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस चीन व जपान यांच्यात झालेल्या युद्धप्रसंगी यांनी एका जपानी सेनाविभागाचे नेतृत्व पत्करले व ऐन हिवाळ्यात चीनच्या ईशान्य किनाऱ्यावरून हायकोंग या पीत समुद्राच्या बंदरात घुसून, पुढे न्यूश्वांगपर्यंत धडक मारली. तेथे ते दुसऱ्या जपानी सैन्यविभागाला येऊन भिडले. या युद्धांतील त्यांच्या कामगिरी-बद्दल त्यांना 'व्हायकाऊंट ' हे उमरावपद देण्यात आले. त्यानंतर लागलीच

ते मुख्य प्रधान म्हणून ही नेमले गेले. इ. स. १९०२ मध्ये त्यांच्या पुढारीपणाखाली जपानी मंत्रिमंडळाने इंग्लंडशी प्राथमिक दोस्तीचा तह केला. त्याबद्दल त्यांना ' काउंट ' ही बहुमानाची पदवी देण्यात आली. त्यानंतर लवकरच त्यांना ' मार्क्विस ' हाही किताब बहाल करण्यात आला.

कात्सुरो हे जपानमधील जुन्या विचारप्रणालीचे, पण तडफदार गृहस्थ असून, त्यांचा लोकशाहीवर मुळीच विश्वास नव्हता. मंत्रिमंडळ बादशहाला जबाबदार असल्याने लोकप्रतिनिधींचा सल्ला त्याने मानलाच पाहिजे, असे मंत्रिमंडळावर बंधन नसावे अशा मताचे ते होते. इ. स. १९११ नंतरच्या आर्थिक घोटाळ्यात त्यांनी जपानला भक्कम स्थिरता आणून दिली. म्हणून त्यांना जपानमधील सर्वोच्च असा ' प्रिन्स ' हा किताब बहाल करण्यात आला. निरनिराळ्या प्रकारांनी जपानची सेवा व चाकरी करून अखेर हा मुत्सद्दी दिनांक १० ऑक्टोबर, १९१३ रोजी मरण पावला.

**ताका – आकिता कारो**

एक सुप्रसिद्ध जपानी मुत्सद्दी. यांचा जन्म नागोया शहरात इ. स. १८५९ मध्ये झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पुरे केल्यावर त्यांनी प्रथम मित्सुबिशी या एका जगद्विख्यात जपानी व्यापारी संस्थेत लहानशी नोकरी मिळविली. आपल्या अंगच्या गुणांनी व हुषारीमुळे इ. स. १८८७ मध्ये त्यांना त्यावेळच्या जपानी मंत्रिमंडळातील परराष्ट्रीय प्रधान मार्क्विस ओकूमा यांच्या खासगी चिटणिसाची जागा मिळाली. लवकरच त्यांची तिथल्या अर्थखात्यात एक वरिष्ठ अधिकारी म्हणून नेमणूक झाली. थोड्याच दिवसांनी म्हणजे इ. स. १८९४ मध्ये त्यांना इंग्लंडमधील जपान सरकारचे राजदूत म्हणून पाठविण्यात आले. इ. स. १९०६ मध्ये त्यांना किष्मोजी साईओंजी यांच्या मंत्रिमंडळात परराष्ट्रीय प्रधान म्हणून नेमण्यात आले. पुढे जपानमधील खाजगी मालकीच्या लोहमार्गांचे राष्ट्रीयीकरण करण्याच्या प्रश्नावरून त्यांचा जपानी मंत्रिमंडळाशी मतभेद झाला व त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

इ. स. १९१३ पर्यंत ते इंलंग्डमध्ये जपान सरकारचे राजदूत म्हणून काम करीत होते. इंग्लंडहून परत आल्यावर ते कात्सुरा मंत्रिमंडळात परराष्ट्रमंत्री म्हणून नेमले गेले; पण या पदाचाही त्यांनी लवकरच राजीनामा दिला.

त्यानंतर मुख्य प्रधान कात्सुरा यांनी स्थापन केलेल्या ' दोशीकाई ' पक्षाची त्यांनी पुनर्रचना केली व त्या पक्षाला ' केन्साईकाई ' किंवा ' घटनावादी ' पक्ष असे नाव दिले. इ. स. १९१३या केन्साईकाई या पक्षाचे ते अध्यक्ष निवडले गेले. इ. स. १९१५ मध्ये त्यांना 'काऊंट' हा किताब देण्यात आला.

काही वर्षे स्वस्थपणे घालविल्यावर इ. स. १९२४ मध्ये त्यांना केन्साई-काई, साई यू काई व काकूशिन या त्रिपक्षमंत्रिमंडळाचे महामंत्री म्हणून नेमण्यात आले. या अधिकारावर असतानाच ते इ. स. १९२६ मध्ये वयाच्या ६७ व्या वर्षी निधन पावले.

### आकोतो सैतो

एक सुप्रसिद्ध नाविक अधिकारी. यांचा जन्म इवारेकेत येथे एक मध्यमवर्गीय कुटुंबात इ. स. १८५८ मध्ये झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पुरे केल्यावर सैतो हे वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी जपानी नौदलात शिरले. क्रमाक्रमाने चढत चढत इ. स. १८९३ मध्ये ते नौदलाचे सेनापती झाले. नौदलाची अधिकारसूत्रे हाती घेताच त्यांनी जपानी नोदलाची पाश्चिमात्य पद्धतीवर पुनर्रचना केली. या त्यांच्या कार्यांच्या गौरवार्थ त्यांना निरनिराळे किताब बहाल करण्यात आले. इ. स. १९१३ सालच्या जपानी मंत्रिमंडळात त्यांना नौदलाचे मंत्रीपद देण्यात आले. यानंतर इ. स. १९१७ मध्ये त्यांना ' बॅरन ' हे उमरावपद देण्यात आले व शेवटी इ. स. १९१९ मध्ये कोरियाचे गव्हर्नर जनरल म्हणून त्यांची नेमणूक झाली.

इ. स. १९२७ मध्ये जिनीव्हा येथील शस्त्रसंन्यास परिषदेकरता जपानचे सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी म्हणून त्यांना पाठविण्यात आले. इ. स. १९३६ मध्ये त्यांना ' व्हायकाऊंट ' हा किताब देण्यात आला व त्यानंतर थोड्याच दिवसात त्यांचा खून झाला.

### तोमोयुकी यामाशिता

एक सुप्रसिद्ध लष्करी नेता. दुसऱ्या महायुद्धात मलायातील लढाईत विशेष शौर्य गाजविल्यामुळे यांचा ' मलायाचा वाघ ' म्हणून जगभर बोलबाला झाला. यांचा जन्म ' कोची ' प्रांतात दिनांक ८ नोव्हेंबर १८८५ रोजी झाला. प्राथमिक व दुय्यम शिक्षण पुरे करून ते यामाशिता येथील लष्करी

महाविद्यालयात दाखल झाले. तिथला अभ्यासक्रम पुरा केल्यावर लष्करातील निरनिराळ्या लहान-मोठ्या अधिकारांच्या जागांवर त्यांनी काम केले व नंतरच्या उच्च लष्करी शिक्षणाकरिता त्यांनी स्टाफ कॉलेजमध्ये पदार्पण केले. तेथील अभ्यासक्रम संपल्यानंतर त्यांनी युरोपियन देशांच्या युद्धशास्त्रविषयक अभ्यासाच्या दृष्टीने एक खास दौरा केला.

त्यांची बहुतेक सर्व हयात लष्करी नोकरीतच गेली. जपानने दुसऱ्या महायुद्धात पदार्पण केल्यावर सिंगापूरच्या लढ्यांत त्यांना ब्रिटिशांविरूद्ध लढणाऱ्या जपानी सेनेचे सेनापतीपद मिळाले. ब्रिटिशांनी सिंगापूरचा आरमारी तळ अत्यंत सुसज्ज असा ठेवला असल्याने, यामाशिरा यांनी सिंगापूरवर उत्तरेकडून म्हणजे मलायामधून खुष्कीच्या व हवाईमार्गाने, शिवाय दक्षिणे-कडून म्हणजे हिंदी महासागरावरून जबरदस्त हल्ले केले व शेवटी सिंगापूर काबीज केले. त्यानंतर म्हणजे इ. स. १९४५ मध्ये त्यांची फिलिपाइन्समध्ये सेनापती म्हणून नेमणूक झाली. इतक्यात महायुद्ध संपले व त्यांच्यावर युद्ध-गुन्हेगार म्हणून खटला भरण्यात आला. अखेर दि. २३ फेब्रुवारी १९४६ रोजी त्यांना मनिला येथे फाशी देण्यात आले.

**तांझान इशिबाशी**

युद्धोत्तर जपानचे काही काळचे मुख्यमंत्री व मुत्सद्दी. यांचा जन्म इ. स. १८८४ मध्ये झाला. विश्वविद्यालयीन शिक्षण वासेदा विश्वविद्यालयात झाल्यावर ते तोकियोमधील प्रख्यात मैनिचीशिंबून या वृत्तपत्राच्या व्यवसायात शिरले. इ.स. १९११ मध्ये म्हणजे वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी ओरिएंटल इकॉनॉमिस्ट या एका नामांकित वृत्तपत्राचे मुख्य संपादक झाले. प्रथम पासूनच त्यांनी उदारमतवादी पक्षाचे सभासदत्व स्वीकारले होते. इ. स. १९४५ मध्ये श्री. इशिबाशी हे त्या पक्षाचे अध्यक्ष झाले. इ. स. १९४६ च्या योशिदा मंत्रिमंडळात त्यांच्याकडे अर्थखाते देण्यात आले. इ. स. १९५६ व १९५७ या दोन वर्षाच्या काळात ते जपानचे महामंत्री होते.

महायुद्धोत्तर काळात उद्योग व अर्थव्यवहार या खात्याची पुनर्रचना करून, जपानला पूर्व वैभवप्रत नेण्यासाठी त्यांनी अपार श्रम व कष्ट घेतले. सध्या ते जपानमधील लिबरल ( डेमोक्रॅटिक ) पक्षाचे अध्यक्ष आहेत.

**मीईजी तेन्नो**

यांचे मूळचे नाव मुत्सुमितो असे होते. यांचा जन्म इ. स. १८५४ मध्ये झाला. कोमाई तेन्नो या जपानच्या बादशहाचे ते चिरंजीव असून, इ. स. १८६८ मध्ये त्यांना राज्याभिषेक करण्यात आला. इ. स. १८५४ साली आयेमोची या शोगुनाने अमेरिकेबरोबर व्यापारी करार करून अमेरिकन नागरिकांना जपानमध्ये ज्या व्यापारी सवलती दिल्या, त्यामुळे एकंदर जपानी लोकमत खवळले. या खवळलेल्या लोकमताचा उपयोग करून जपानमधील काही दायमियोंनी जपानच्या बादशहाचे कान फुंकले व शोगुन हे पदच रद्द केले. शोगुन हे मुख्यप्रधाननिदर्शक पद रद्द करण्याविरुद्धच जपानी लोकमत होते. तरीही जपानी बादशहाने हा एकाएकी घेतलेला निर्णय त्या वेळेच्या 'काईकी' या शोगुनाने शिरोधार्य मानून, आपली जागा खाली करून दिली. जपानमधील सर्वसाधारण लोकमत परकीयांना जपानमध्ये अजिबात थारा मिळू नये, इतक्या कडव्या थराला गेले होते. त्याचप्रमाणे जपानच्या राजगादीचे शोगुनांनी बळकावलेले अधिकार पुन्हा जपानच्या राजघराण्याने आपल्या हाती घ्यावे असे त्यांचे मत असल्याने, अमेरिकेबरोबरील तह हे निमित्त पुढे करून शोगुनांची सत्ता प्रथम संपुष्टात आणण्यात आली. ही सत्ता नाहीशी केल्यावर जपानी बादशहाला मदत करणाऱ्या दायमियो घराण्यातील सत्सुमा व चोशू या दोन पुढाऱ्यांनी आपला पवित्रा बदलून जपानमध्ये परकीयांना व्यापारी सवलती देण्याचा विचार जाहीर केला. जपानी बादशहा मीईजी तेन्नो हेही या दायमियो पुढाऱ्यांशी सहमत असल्याने त्यांनी दिनांक २३ मार्च १८६८ रोजी काही निवडक परकीय प्रतिनिधींना भेटीचे आमंत्रण दिले. याच दिवशी इंग्रजांचा प्रनिनिधी सर हेन्री पार्कस् हा त्या बैठकीमध्ये भाग घेण्याकरता जात असता वाटेत त्याच्यावर एका सामुराईने प्राणघातक हल्ला चढविला. हा हल्ला म्हणजे एकप्रकारे जपानी सरकारवरच ठपका आहे असे समजून जपानी बादशहाने या प्रकाराची जाहीर निर्भर्त्सना केली व झाल्या प्रकाराची पूर्ण भरपाई जपान सरकार करील, असे इंग्रजांना आश्वासन दिले. याच वेळी शोगुनांच्या सत्तेखाली असलेल्या कियोतो या ठाण्याहून आपली राजधानी हलवून ती येदो येथे नेण्यात आली व तोकियो असे तिचे नवे नामकरण करण्यात आले.

इ. स. १८६८ मध्ये बादशहाने जपानमध्ये विधानसभा स्थापन करण्यासारख्या काही महत्त्वाच्या सुधारणा अमलात आणण्याचा संकल्प सोडला. या कार्यात जपानच्या बादशहांना बऱ्याच दायमियोंचा पाठिंवा मिळाला. या दायमियोंनी बादशहांना नुसता पाठिंबाच दिला असे नाही, तर त्यांनी आपआपल्या जमिनी व सर्व हक्कही बादशहाकडे परत केले. जपानमधील सरंजामशाही नाहीशी होण्यास यामुळेच सुरवात झाली.

बादशहांनी जपानची सर्वांगीण सुधारणा करण्याचा चंग बांधल्यानंतर शोगुनांची सत्ता व इतर सरंजामशाह्या पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळू लागल्या. बादशहांच्या हाती सर्व सत्ता केंद्रीभूत झाल्यावर त्यांनी राज्यकारभाराकरता एक पोलादी चौकट निर्माण केली. लवकरच निरनिराळे कार्यक्षम, व्यवहारपटू, मातृभूमीचे निस्सीम उपासक, असे अनेक सेवक विविध खात्यांवर नेमले गेले. भराभर जपानचा कायापालट होऊ लागला. इ. स. १८७३ साली प्रथमच देहदंडाच्या शिक्षा रद्द करण्यात आल्या. फ्रेंच बादशहा नेपोलियन याने तयार केलेल्या संहितेप्रमाणे एक संहिता तयार करून ती अमलात आणली गेली. इ. स. १८७२ मध्येच योकोहामा ते तोकियो हा जपानमधील पहिला लोहमार्ग सुरू झाला. याच काळात ख्रिश्चन कालगणना अमलात आणली केली. इतकेच नव्हे तर सर्व विश्वविद्यालयात इंग्रजी भाषा सक्तीने सुरू करण्यात आली. वरील सर्व सुधारणा या बादशहा मीईजी तेन्नो यांच्या खास मार्गदर्शनाखाली केल्या गेल्या.

एका मागोमाग एक सुरू झालेल्या या सुधारणा पाहून जपानमधील सनातनी लोकांनी जोर करून त्यांना विरोध करण्याचा चंग बांधला. त्यांच्या प्रोत्साहनाने जपानच्या निरनिराळ्या भागात बंडे सुरू झाली. पण जपानी बादशहांनी या बंडांचा पक्का बीमोड केला. त्यानंतर या बंडाचे नेते कोण कोण आहेत तेही हुडकून काढले व त्यांना पुरेपूर वठणीवर आणले. याच सुमाराला चीनच्य ताब्यातील तैवान ( फोर्मोसा ) या बेटावरील चाच्यांचा चीन सरकार बंदोबस्त करीत नाही या सबबीवर मीईजी तेन्नो यांनी तैवानवर एक सैन्यविभाग पाठवला व तेथील चाचे लोकांचा पाडाव केला. चीन सरकारकडून या युद्धाबद्दल भरपाई होईपर्यंत त्यांनी तैवानमधील आपले लष्कर काढून घेतले नाही.

मीईजी तेन्नो यांच्या या खंबीर धोरणामुळे सर्वसामान्य जपानी जनतेत त्यांच्याबद्दलचा आदर वाढू लागला. परकीयांनी जपानवर लादलेल्या अटी सैल करण्यासंबधी मीईजींनी चालविलेले प्रयत्न निष्फळ ठरल्याचे पाहून, जपानी जनतेत पुन्हा एकदा परकीयांविरुद्ध तीव्र असंतोष धुमसू लागला. मोठमोठ्या शहरांतून परकीयांना मुक्त संचार करणे कठीण झाले. एकदा तर खुद्द तोकियो शहरात रशियन राजपुत्रावर हल्ला करण्यात आला. जपान सरकार सर्व परकीय राष्ट्रांबरोबर पूर्वी झालेल्या तहात सुधारणा करवून घेण्याचे प्रयत्न जारीने करीत होते. इ. स. १८९४ मध्ये ब्रिटिश सरकारने जपानबरोबर पूर्वी केलेला तह सुधारून, पूर्वीच्या तहातील कित्येक जाचक कलमे रद्द करून टाकली. याचा परिणाम इतर राष्ट्रांवरही होऊन रशिया, अमेरिका, वगैरे देशांशी पूर्वीचे तह रद्द समजून, नवीन तह करण्यात आले. याच सुमाराला जपान व चीन यांच्यातील संबंध बिघडले व संघर्ष वाढू लागला. परिणामी झालेल्या लढाईत चीनचा जपानने सपशेल पराभव केला.

स्वराष्ट्राची परदास्यातून मुक्तता करून, त्याला प्रगतिपथावर नेणे व त्याची लष्करी ताकद वाढवून, त्या लष्करी ताकदीची परीक्षा पाहणे, ही दोन्ही अत्यंत महत्त्वाची अशी कार्यें मीईजी तेन्नो यांच्या दीर्घोद्योग व मुत्सद्देगिरी या गुणांमुळे पार पडली. साहजिकच अखिल जपानी जनतेच्या मनात आपल्या बादशहाबद्दल एक विशेष आदर व प्रेम दिसून येऊ लागले.

मीईजी तेन्नो यांनी चीनबरोबर युद्ध करून, आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वदेशाचा दर्जा वाढविला. लवकरच त्यांना इ. स. १९०४-५ मध्ये रशिया विरुद्धही तलवार उचलावी लागली. रूसो-जपानी युद्धात जपानने रशियाचा चारी मुंडे चीत असा ठणठणीत पराभव केल्याबरोबर सर्व पाश्चिमात्य राष्ट्रांना आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसला. रशियासारख्या युरोपखंडातील एका नावाजलेल्या बलाढ्य व लष्करी तयारीत अत्युत्तम असलेल्या राष्ट्राचाही जपानसारख्या एका चिमुकल्या आशियायी राष्ट्राने पुरता धुव्वा उडवावा, ही गोष्टच त्या राष्ट्रांच्या डोळ्यांवरील झोप उडविण्यास पुरेशी झाली. नंतर रशियाबरोबर झालेल्या तहात जपानने कोरिया, मांचूरिया, इ. आशियायी

राष्ट्रांवर आपले वर्चस्व तर स्थापन केलेच; परंतु रशियालाही ओखोतस्कच्या आखातात पूर्वेकडे सरकण्यास पायबंद घातला. यापुढे आंतरराष्ट्रीय राजकारणात जपानला वगळून चालणार नाही, हे ओळखून इंग्रज मुत्सद्द्यांनी जपानबरोबर एक वीस वर्ष मुदतीचा मैत्रीचा तह केला. हा तह म्हणजेच १९०७ चा सुप्रसिद्ध अँग्लो- जपानी तह होय

मीईजी तेन्नो यांनी आपल्या विशुद्ध राष्ट्रीय भूमिकेमुळे मिळालेल्या संधीचा पूर्ण उपयोग करून जपानसारख्या एका चिमुकल्या आशियायी राष्ट्राला अगदी थोडक्या काळात मोठेपणा प्राप्त करून दिला, ही गोष्ट इतिहासात केवळ अद्वितीय ठरण्याजोगी आहे त्यामुळेच जपानी जनता त्यांना युगपुरुष म्हणून आदरांजली वाहू लागली.

मीईजी तेन्नो यांचा विवाह इ. स. १८६९ मध्ये एका खानदानी जपानी कुटुंबातील राजकन्या हारू हिच्यावरोवर झाला. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव राजकुमार योशिहितो हे त्यांच्यानंतर जपानचे वादशहा झाले. मीईजी तेन्नो यांना दिनांक ३० जुलै १९१२ रोजीं देवाज्ञा झाली.

**राईजिरो वाकात्सुकी**

एक नामांकित जपानी मुत्सद्दी. यांचा जन्म इ. स. १८६६ मध्ये झाला. वयाच्या बाविसाव्या वर्षी तोकियोच्या विश्वविद्यालयाचे स्नातक म्हणून ते बाहेर पडले व जपानच्या राज्यकारभारात एक सनदी नोकर म्हणून शिरले. इ. स. १९११ मध्ये राजघराण्याचे प्रतिनिधी म्हणून त्यांना ' हाऊस ऑफ पीयर्स ' या जपानच्या वरिष्ठ कायदे- मंडळात प्रतिनिधी म्हणून नेमण्यात आले. जपानी मंत्रिमंडळांत गृहमंत्री, अर्थमंत्री, इत्यादी जागांवर त्यांनी वरीच वर्षे काम केले. ' व्हायकाउंट ' केरो यांच्या पश्चात इ. स. १९२६ मध्ये ते जपानचे मुख्यप्रधान व केन्साईकाई या पक्षाचे पुढारी म्हणून निवडले गेले. त्यांच्या कारकीर्दीत साईमूहोंरो या पक्षाच्या काही पुढाऱ्यांना मंत्रिमंडळात घ्यावे अशी त्यांनी वरीच खटपट केली ; पण त्यांना त्यात यश आले नाही. इ. स. १९२७ मध्ये सुझूकी या एका नामांकित जपानी पेढीचे दिवाळे वाजले. या संबंधात वाकात्सुकी यांचे मंत्रिमंडळ गडगडले. या मंत्रिमंडळाच्या राजीनाम्याचे तात्कालिक किंवा वरकरणी कारण, त्या वेळी जपानमधील

काही विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांविरुद्ध ते साम्यवादी असल्याचा आरोप ठेवला गेला,हे दिले गेले. राजकारणात कित्येकदा वरकरणी केला जाणारा देखावा मृगजळाबारखा फसवा असतो. त्याचे धागेदोरे मात्र फार खोलवर आणि अन्यत्र पसरलेले असतात, असे आपण पहातो, त्याचे हे एक स्पष्ट उदाहरण आहे. इतो या शहरी बाकात्सुकी यांचे दिनांक २१ नोव्हेंबर १९४९ रोजी देहावसान झाले.

**हिरोबूमी इतो**

एक सुप्रसिद्ध जपानी मुत्सद्दी. यांचा जन्म इ. स. १८४१ मध्ये झाला. यांच्या वडिलांप्रमाणेच हिरोबूमीही जपानमधील धनाढ्य व बलाढ्य अशा चोशू घराण्याचे सरंजामी नोकर होते. आपल्या इतर अनेक दायमियो सहकाऱ्यां-प्रमाणेच हिरोबूमी हे अत्यंत कडवे असे शोगुनांचे विरोधक होते. कमोदोर पेरी या अमेरिकन नाविक अधिकाऱ्याने इ. स. १८५४ मध्ये शोगुनांच्या बरोबर जो तह केला, त्याच सुमारास हिरोबूमी यांना चोशू घराण्याकडून गुप्तपणे परदेशी रवाना करण्यात आले व इंग्रज आणि इतर पाश्चात्यांचा राज्य-कारभार, संरक्षण, अर्थशास्त्र, वगैरे विषयांचा बारकाईने अभ्यास करण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविली गेली. हिरोबूमी व त्यांचे इतर सहाध्यायी याप्रमाणे परदेशांत गेले न गेले तोच इकडे जपानमध्ये पुन्हा वातावरण तंग झाले व हातचे सर्व उद्योग सोडून हिरोबूमी यांना मायदेशी परतावे लागले.

इ. स. १८६८ मध्ये त्याना हीआगो प्रांताचे गव्हर्नर म्हणून नेमण्यात आले. इ. स. १८७१ मध्ये ते परत युरोपीय देशांच्या दौऱ्यावर गेले. तेथे त्यांनी निरनिराळ्या देशांच्या सैन्य व आरमारी विभागांची माहिती करून घेतली व त्या त्या सरकारांबरोबर काही निवडक जपानी तरुणांना लष्करी व नाविक दलाचे शिक्षण देण्यासंबंधी बोलणी केली.

इ. स. १८८६ मध्ये हिरोबूमी हे जपानचे मुख्य प्रधान झाले. हे मुख्य प्रधानपद त्यांच्याकडे सतत १५ वर्षे राहिले. हिरोबूमी पंतप्रधान असतानांच चीन व जपान यांच्यात युद्ध पेटले व अंती त्यांत जपानची सरशी झाली. इंग्रजांबरोबर झालेला तहही यांच्याच अमदानीत घडून आला. यांच्या प्रयत्नामुळेच पाश्चात्यांनी जपानी लोकांवर लादलेल्या मानहानीकारक अटी

रद्द करण्यात आल्या व जपानी लोकांना जगात स्वतंत्रपणे व स्वाभिमानाने वावरायची संधी मिळाली.

श्री. हिरोबूमी यांनी जपानच्या राष्ट्रीय उत्थापनात जी महत्त्वाची कामगिरी बजावली तिच्या गौरवार्थ इ. स. १८९७ मध्ये त्यांचा 'मार्क्विस' हे पद देऊन मोठा बहुमान करण्यात आला. इ. स. १९०७ मध्ये त्यांना जपानमधील सर्वोच्च असा 'प्रिन्स' हा मान देण्यात आला. रूसो-जपानी युद्धानंतर त्यांना कोरियाचे सर्वाधिकारी म्हणून नेमण्यात आले. दिनांक २९ ऑक्टोबर १९०९ या दिवशी हार्बिन येथे एका कोरियन मारेकऱ्याने त्यांना ठार मारले.

**हायातो इकेदा**

जपानचे सध्याचे पंतप्रधान व जपानमधील सर्वात बलिष्ठ अशा जियूती किंवा लिबरल डेमोक्रॅटिक पक्षाचे अध्यक्ष. श्री. हायातो इकेदा यांचा जन्म इ. स. १८९९ मध्ये झाला. कियोतो विश्वविद्यालयांतून स्नातक म्हणून बाहेर पडल्यावर, इ. स. १९२५ मध्ये ते अर्थखात्यात सरकारी नोकर म्हणून राहिले. इ. स. १९२९-३६ या सात वर्षाच्या काळात अर्थखात्याच्या करविषयक उपखात्याचे ते मुख्य अधिकारी होते. इ. स. १९४७–४८ मध्ये अर्थखात्याचे दुय्यम मंत्री म्हणून त्यांची निवड झाली. युद्धोत्तर काळातील जपानच्या मंत्रिमंडळांत अर्थखात्याचे मंत्री म्हणून इ. स. १९४९–१९५२ पर्यंत व व्यापार मंत्री म्हणून इ. स. १९५२-५३ पर्यंत त्यांनी काम केले. इ. स. १९५६-५७ मध्ये ते पुन्हा जपानचे अर्थमंत्री झाले. इ. स. १९६० पासून जपानचे पंतप्रधान म्हणून सतत ते राज्यकारभार हाकीत आहेत.

श्री. इकेदा यांचा अर्थखात्यातील दीर्घ अनुभव व सेवा यांमुळे युद्धोत्तर काळात जपानच्या अर्थव्यवस्थेत स्थिरता प्राप्त करून देण्याचे फार मोठे कार्य त्यांच्या हातून घडले हे कबूल करावे लागेल.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय

# संदर्भ

१ एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका

२ स्टेट्स्मन इयर बुक, १९६७.

३ इंटरनॅशनल हूज हू

४ आशिया —डड्ले स्टँप

५ स्टॅटिस्टिकल इयरबुक

६ फॉरेन ट्रेड ऑफ जपान ( जपानी मिनिस्ट्री ऑफ इंटरनॅशनल ट्रेड मार्फत प्रसिद्ध )

७ जपान ऑफ टुडे ( जपानच्या मिनिस्ट्री ऑफ फॉरेन अफेअर्स मार्फत प्रसिद्ध ) १९६२.

८ टाइम्स इयर बुक ऑफ जपान

९ जपान्स नॅचरल रिसोर्सेस, आर. ए. आकरमन, १९५३.

१० शॉर्ट इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ जपान जी. सी. अॅलन, १९४६.

११ धिस इज जपान. असाही न्यूज प्रिंटिंग कंपनी १९५४.

१२ नॅशनॅलिझम इन जपान. डी. एम्. बाऊन, १९५५.

१३ दि कॉंस्टिटयूशनल डेव्हलपमेंट इन जपान के. कोलग्रोव्ह १९५४.

१४ जपान सर आर्. डेनिंग, १९६०.

१५ जपान्स न्यू ऑर्डर इन ईस्ट एशिया एफ्. सी. जोन्स, १९५४.

१६ ए हिस्टरी ऑफ जपान एम् डी. केनेडी, १९६३.

१७ इंडस्ट्रियल रिव्हयू ऑफ जपान एन्. के. शिवून, १९५६.

१८ दि न्यू जपान एच्. एस्. क्विग्ले व जे. बी. टर्नर, १९५६.

१९ दि वेस्टर्न वल ... न, १९५०.


२० दि डबल पेट्रि ... ५७.

REFBK-0017211

● ● ●


अमेरिका -
(यू.एस.ए.)


र शि या


भारत
जर्मनी
इंग्लंड
फ्रान्स
जपान